यात्रिकक्रमण.

इहलोकापासून परलोकास.

हें

स्वप्नाच्यारूपकानेकथिलेंअसे

ज्यानूबनियानू

यानेमूळग्रंथकेला,

 त्याचेंभाषांतर

हरिकेशवजी

सोमवंशीक्षत्रिपाठारेयानी

केलें.

शाके १७६३

BUNYAN'S

PILGRIM'S PROGRESS

in Murathi

मुंबईत गणपतकृष्णाजीयाचेछापखान्यात छापिलें

इश्वीसन् १८४१

यात्रिकक्रमण.

इहलोकापासून परलोकास.

हें

स्वप्नाच्या रूपकानें कथिलें असे

ज्यान् बनियान्

यानें मूळग्रंथ केला,

त्याचें भाषांतर

हरिकेशवजी

सोमवंशी क्षत्रि पाठारे यानी

केलें.

शाके १७६३

BUNYAN'S

PILGRIM'S PROGRESS

in

Murathe

मुंबईंत गणपत कृष्णाजी याचे छापखान्यात छापिलें

इश्वी सन् १८४१

यात्रिकक्रमण

भाग १

या जगदरण्यांतून जात असतां मी एक्या ठिकाणीं उतरलों, आणि तेथें एक गुहा होती त्या गुहेंत निजलों; तेसमयीं मला स्वप्न पडलें, त्या स्वप्नांत पाहतों तों एक चिंध्या पांघरलेला मनुष्य आपल्या घराकडेस पाठ करून उभा आहे त्याच्या हातांत एक पुस्तक आहे, आणि पाठीवर मोठें ओझें आहे. मग तो तें पुस्तक उघडून वाचूं लागला, आणि वाचतां वाचतां रडून कांपूं लागला; मग त्यास तो गेंहिवर सांवरेना असें होतांच मोठ्यानें ओरडून ह्मणूं लागला कीं "अहाहा आतां मी काय करूं?"

अशी त्या मनुष्यास अवस्था प्राप्त होउन तो आपल्या घरीं गेला, आणि तें दुःख आपल्या स्त्रीस व मुलांस कळूं नये ह्मणून तें तसेंच जिरवून ठेवूं लागला; शेवटीं तें दुःख फार वाढून त्यास उगें राहवेना ने

समयीं तो आपल्या स्त्रीस व मुलांस तें आपलें संक॰ टसांगूंलागला: कीं "अगे जिवलग स्त्रीये, अरे मा झ्या पोटच्या मुलांनो, मजवर जें दुःखाचें ओझें पड लें आहे तेणेंकरून तर मी फार व्याकूळ झालों आहे. तशांत ह्या आपल्या नगरावर आकाशांतून अग्नि पडून हें जळून जाणार असें मला निश्चित वर्तमान लागलें आहे; त्यांत माझा व तुह्मी जीं माझीं जिव लगें तुमचा अगदीं नाश होईल, परंतु जर एखादा आपल्यास मार्ग सांपडला तर मात्र आपलें रक्षण होईल." असें त्याचें भाषण ऐकून त्याचीं जीं आ स होतीं त्यांस मोठें आश्चर्य आणि फार दुःख वा टलें; त्यांस त्याच्या गोष्टी खऱ्या वाटल्या असें ना हीं, तर यास वेड लागलें असा त्यांस भास झाला; मग यास झोंप लागली ह्मणजे गुण पडेल असें आ णून रात्र होतांच त्यांनी त्यांस निजायास नेलें: पर तु त्यास निज कोठून लागेल, जशी त्यास दिवसास तळमळ होत होती तशीच रात्रीस होउं लागली. म ग॰ अर्धरात्र त्याणे श्वासोच्छ्वास टाकून अश्रुपा

तकनून काढिली. प्रातःकाळीं पाहतात तों त्याच्या बोलण्यांत अधिकच अंतर पडलें, पुनः पुनः त्याच गोष्टी बोले त्याजवरून त्यांनी ही आपलीं अंतःकरणें कठोर केलीं आणि असें बोलूं लागलीं कीं यासीं कठोर होउन यास दबावल्याविना हा चांगला होणार नाहीं: ह्मणून तो कांहीं बोलूं लागला असतां त्यास हासावें, केव्हां धमकी द्याव्यावी, केव्हां त्याच्याकोणी शोधच ठेवूं नये असें त्यांनी आरंभिलें. असें पाहून त्याणें अशी वृत्ति धरिली कीं केव्हां आपल्या खोलींतच एकटें असावें, तेथें त्यो आपल्या आसांच्या कळवळा येउन त्यांजविषयीं ईश्वराची प्रार्थना करावी, व आपल्या ही दुःखाचा शोक करावा: कोणे समयीं तळवटांत एकटेंच फिरत असावें, केव्हां पुस्तक पहात असावें, केव्हां प्रार्थना करीत असावें, या प्रमाणें त्याणें कितीएक दिवस घालविले.

एक्या दिवशीं तो नित्याप्रमाणें पुस्तक पहात पहात तळवटांत फिरत आहे इतक्यांत अंतरीं फार खिन्न होउन पहिल्याप्रमाणें रडूं लागला कीं

"अहः हः माझा उद्धार व्हावयास म्या काय करावें?"

मग आणखी जसा एखादा पळून जायास मार्ग पाह तो तसा इकडे तिकडे पाहूं लागला. आणि मार्ग सांपडेना म्हणून उगाच उभा राहिला. याप्रमाणें मी पाहत आहें इतक्यांत रुवार्तिक म्हणून एक मनुष्य येउन त्यास पुसूं लागला कीं तूं कां रडतोस त्यास त्यानें उत्तर दिलें महाराज हें जें माझ्या हातीं पुस्तक आहे याजवरून मला असें कळूं आलें कीं मी मरणार आणि मरणानंतर माझा न्याय होणार परंतु मरायास माझी इच्छा नाहीं आणि न्याया पुढें उभें राहयास माझी योग्यता नाहीं.

त्याजवरून तो रुवार्तिक बोलूं लागला कीं या संसारांत अनेक दुःखें आहेत मग तूं मरणाचें कां कबूल करीत नाहींस? त्यास तो मनुष्य उत्तर देतो, माझे पाठीवर जें ओझें आहे तें मी मेलों असतां मला खालीं दडपून नरकांत नेउन घालील. आणखी महाराज असें आहे, जो मी बंदिशाळेंत हीर हायास योग्य नाहीं तो मी न्यायाधिशापुढें उभा रा

ह्यास कसा योग्य होईल. न्याय झाला असतां म
ला दंड होणार अशा ह्या कल्पना माझ्या मनांत येऊ
न मला रडवितात.

मग सुवार्तिक बोलूं लागला जर अशी अवस्था
आहे तर मग तूं उगाच कां राहिला आहेस? तो उत्त
र देतो, म्या कोठे जावें हें मला कळत नाहीं ह्मणून त्या
जवरून सुवार्तिकाने त्यास एक पट दिला त्या पटांत
असें लिहिलें होतें कीं "जो क्षोभ होणार त्याजपासू
न पळून जा." नंतर तो पट वाचून सुवार्तिकाच्या तोंडा
कडेस न्याहाळून पाहूं लागला आणि ह्मणतो कीं मी
कोठे पळून जाऊं? त्याजवरून सुवार्तिक बोटानें दाख
वून ह्मणूं लागला कीं हें जें मोठें तळवट आहे याचे प
लीकडेस तुला एक अरुंद द्वार # दिसतें ना? तो उ
त्तर देतो नाहीं दिसत. त्याजवरून सुवार्तिक बोलतो,
बरें तेथें जो प्रकाश चमकत आहे तो तुला दिसतो का
य? होय तो दिसतो सा वाटतो. बरें तर तो प्रकाश ल
क्ष्यांत ठेवून त्याच्याच धोरणाने तिकडे चजा, ह्मणजे
तुला तें द्वार # दिसेल; आणि तें ठोकूं लागलास ह्म

णजे त्वां कसें काय करावें तें तुला कळूं येईल.

नंतर मी मास्या त्या स्वप्नांत पाहूं लागलों कीं तो मनुष्य पळूं लागला, पण तो आपलें घर सोडून काहीं दूर गेला नाहीं इतक्यांत त्याची बायको मुलें त्यास मागें आणावया करितां रडत त्याच्या पाठीस लागलीं; तेसमयीं त्या मनुष्यानें कानांत बोटें घालून "जीवन, जीवन, अक्षय जीवन" असें ओरडत धाव घेतली. या प्रकारें तो मागें न पहातां थेट त्या मोठ्या तळवटाच्या मध्य भागीं गेला.

ज्या वेळीं तो पळून जाऊं लागला त्या वेळीं त्याचे शेजारीही त्यास पहावयास आले: कित्येकजण त्याची टवाळी करूं लागले; कित्येकजण त्यास भय दाखवूं लागले; कित्येकजण मागें फिर मागें फिर ह्मणून हांका मारूं लागले; असे जे हांका मारीत होते त्यांतून दोघांजणानी असा पण केला कीं आह्मी जाउन याला ओढून ताणून माघारें घेउन येतों. त्यांतून एकाचें नाव दुराग्रही व एकाचें नाव चलमति. तो मनुष्य तर यांजपासून बराच लांब गेला होता तरी त्यानी

त्याचा पाठीलाग करण्या विषयीं कंबरा बांधिल्या, मग त्यांनी त्यास लोकरच आटोपिलें. ते समयीं तो त्यांस ह्मणतो अहो शेजारी बाबा तुह्मी येथवर कां आलां. ते उत्तर देतात, तुह्मास समजावून घरीं न्यावयास आलों; त्याजवरून तो बोलतो ही गोष्ट तर कालत्रयीं घडणार नाहीं; तुह्मी त्या विनाश नगरांत रहातां, मीही तेथेंच जन्मलों पण आतां मला तेथें नाश दिसूं लागला; असें आहे, मरण केव्हां येईल याचा काहीं निश्चय नाहीं, पण तुह्मास जर त्या नगरांत मरण आलें तर फारच कठिण आहे, कां तर जेथें अग्नि आणि गंधक प्रज्वलित आहेत अशा ठिकाणीं तुह्मी जाऊन पडाल; ह्मणून बाबा मी तुह्मास सांगतों कीं निकड लाना द सोडून तुह्मी माझ्या बरोबर चला.

दुराग्रही ह्मणतो आह्मी आमचे आप्तजन प्रपंच सुखें हीं सर्व सोडून द्यावीं काय?

त्यास ख्रिस्ती* उत्तर करितो, होय तीं सर्व सोडून द्यावीं. मीं ज्या वस्तूचा शोध करीत आहें तिच्या लवा

---

* ख्रिस्ती हें त्या मनुष्याचें नाव.

शीं ही त्यां सुखांची तुलना होत[११] नाहीं. तुह्मी जर माझ्या
बराबर एकसारिखे चलाल, तर मला जें मिळणार तें तु
ह्मास ही मिळेल. मीं जेथें चाललों आहें तेथें ती वस्तु
पुष्कळ पुरून उरे इतकी आहे[१२]. याजकरितां तुह्मी ही
चला आणि मीं जें सांगत आहें त्याचा अनुभव घेऊ
न पहा.

दुराग्रही ह्मणतो—— अहो तुह्मी ज्याकरितां सर्व प्र
पंच सोडून देतां अशी ती वस्तु तरी काय आहे.

खिस्ती ह्म॰ ——"अविनाश, अलिप्त, अक्षय,
असें जें वतन तें ती वस्तू[१३]." तें वतन दिव्यलोकीं रक्षून
ठेविलें आहे.

त्यास कशाचा काहीं धोका नाहीं. त्याच्या जे उद्यो
गपूर्वक शोधास लागले आहेत त्यांस तें नेमल्या का
ळीं प्राप्त होईल[१४]. या पुस्तकांत ही असेंच आहे, आ
पण वाचून पहावें.

दु॰ — अहो राहूंद्या हो तुमचें पुस्तक, तुह्मी आ
मच्या बरोबर मागें फिरतां किंवा नाहीं हें सांगा.

खि॰ — मी आतां मागें फिरणार नाहीं, आतां मी

नागरास हात घातला.

दु० — नाहीं येत, तर अहो चलमति आपण यास सोडून चला परत; असले अभिष्ट आह्मी पाहिले आहेत, एकवेळ मनांत भरलें तें खरें, कोणी जे चार सूज्ञ असतील त्यांजहून कायते आह्मीच शहाणे.

चलमति ह्मणतो. तुह्मी याच प्रमाणें केवळ त्यास निषेधूं नये: अहो हे ख्रिस्ती जें सांगत आहेत तें खरें असलें तर हे ज्या सुखाचा शोध करीत आहेत तें आपल्या सुखाहून चांगलें असेल, आणि असें जर आहे तर मग या आपल्या शेजारी बाबा बरोबर आपण कां जाउं नये.

दु० — काय तुह्मी ही मूर्ख झालां! मी सांगतों तें ऐका आणि मागें चला, हा असला वेडगळ तुह्मास कोठे नेउन घालील तें न कळे. ह्मणून शाहणे व्हा आणि घरीं चला.

ख्रि० — अहो चलमति सेजारी बाबा तुह्मी माझ्या बरोबर चला; मी जें काहीं सांगितलें तें तेथें मिळेल

व दुसरीं बहुत ऐश्वर्यें प्राप्त होतील: मी सांगतों तें जर आपल्यास खरें वाटत नसलें, तर हें पुस्तक वाचून पहा. हें पुस्तक ज्याणें निर्माण केलें आहे त्याणें याच्या खरेपणाविषयीं आपला प्राण दिला आहे.[१६]

चलमति० — अहो दुराग्रही शेजारी बाबा, माझा तर निश्चय झाला: मीआतां या उत्तम पुरुषाच्या समागमें जातों, मग याची जी अवस्था ती माझी अवस्था. अहो आतां आह्मी तुमचे सोबती झालों. बरें आपण जेथें जाणार त्या स्थळाचा मार्ग कोणता? तो आपल्यास ठाउक आहेना?

खि० — सुवार्तिक ह्मणून एक गृहस्थ मला भेटला होता त्याणें त्या समोरच्या अरुंद द्वाराकडेस जायास सांगितलें आहे, तेथें गेलें असतां कसें कोणत्या मार्गें जावें हें सर्व कळू येईल.

च० — तर मग आपण चलावें. याप्रमाणें ते बोलून बरोबर चालते झाले. इकडे दुराग्रही बोलतो, आतां आपण ही मागें घरीं जावें. असल्या छांदिष्ट भ्रमिष्टांच संग आपण तर करणार नाहीं.

मग तो दुराग्रही मार्गे परतला असतां ख्रिस्ती आणि चलमति असे ते दोघे जण त्या तळवटांतून एकमेकाशीं बोलत चालते झाले.

ख्रि॰— कां चलमति बाबा आपला काय समाचार आहे? तुह्मी माझें ऐकून माझ्या बरोबर आलां या जवरून मला मोठा आनंद झाला. पुढें जो नाश व दुःख प्राप्त होणार त्याचें मला जसें भय प्राप्त झालें आहे, तसेंच जर त्या दुराग्रही बाबास झालें असतें तर तो ही आपल्यास सोडून गेला नसता.

च॰— अहो ख्रिस्ती बाबा आतां आपण येथें दोघेच जण राहिलों या जकरितां आपण जात आहों कोठे, तेथें काय काय वस्तु आहेत आणि त्यांचा उपभोग कसा घडेल हें विशेषें करून सांगावें.

ख्रि॰— त्या वस्तूंचा जसा मनास बोध होतो तसें त्यांचें वाणीनें वर्णन करितां येत नाहीं: परंतु त्या जाणून घ्याव्या असेंच जर तुमच्या मनांतून असलें तर मी हें पुस्तक वाचून तुह्मास त्या वस्तु ऐकवितों.

च॰— बरें त्या तुमच्या पुस्तकांत जें सांगितलें आहे

तें सर्व खरें आहे काय?

ख्रि॰ — खरें यांत काय सांगावें, हें ज्याणें निर्माण केलें आहे तो कदापि असत्य बोलायाचा नाहीं.[१७]

च॰ — बरें तर मग तेथें काय काय प्राप्त होईल तें सांगावें.

ख्रि॰ — तेथें अखंड राज्य आहे, तेथें आपलें राहणें घडेल आणि आपलें तेथें निरंतर राहणें घडे असें आपल्यास जीवन प्राप्त होईल.[१८]

च॰ — फारउत्तम! आणखी काय प्राप्त होईल?

ख्रि॰ — तेथें आपल्यास तेजःपुंज मुकुट प्राप्त होतील; आणि आकाशांत सूर्याचा प्रकाश पडतो त्यासारिखा आपला प्रकाश पडे अशीं वस्त्रें आपल्यास मिळतील.[१९]

च॰ — हें तर फारच चांगलें, बरें आणखी तथें काय आहे?

ख्रि॰ — तेथें रडणें किंवा शोक करणें हें होणार नाहीं; त्याजागेचा जो धनी आहे तो आपल्या डोळ्यांचीं अश्रु पुसून काढील.[२०]

च॰ — तेथें आपल्यास कोण सोबतीस असतील.

खि॰ — ज्यांस पहातां डोळे दिपून जातात[२१] असे सराफिम व चेरूबिम ह्मणून जे ईश्वराचे दूत आहेत ते आपल्यास सोबतीस असतील. आपल्या आगोधर जे हजारो जन गेले आहेत तेही तेथें आपल्यास भेटतील. त्यांपासून काहीं कोणास उपद्रव होत नाहीं, ते पवित्र आहेत, परस्परांवर प्रीति करावी हाच त्यांचा स्वभाव; सर्वजण तेथें ईश्वराचे आज्ञेंतच वागतात, व त्याच्या सन्मुख उभे राहतात, ईश्वर त्यांस मान्य करून आपल्या जवळच ठेवितो. सोन्याचे मुकुट ज्यांनी मस्तकीं धारण केले आहेत असे जे वडील ते आपल्यास तेथें दिसतील;[२२] ज्याच्या हातीं सुवर्णवीणा आहेत असे जे पवित्र कुमार ते आपल्या दृष्टीस पडतील.[२३] त्या स्थळाच्या धन्या विषयीं ज्यांचे ठायीं प्रीति फार ह्मणून ज्यांचे जनाने कापून तुकडे केले, ज्यांस अग्निज्वाळांत जाळून टाकिलें, ज्यांस पशूंच्या तोंडीं दिलें, व समुद्रांत बुडविलें असे जे ते अमरत्वाचीं वस्त्रें ल्याले ले आपल्या दृष्टीस पडतील.[२४]

च० — त्या गोष्टी ऐकून तर मला मोठी उत्कंठा प्राप्त झा ली: यांचा काय आपल्यास उपभोग घडेल, आपण यांचे विभागी कसे होउं ?

ख्रि० — तें त्या देशीचा राज्यकर्ता प्रभू त्याने या पुस्त कांत लिहिलें आहे, त्याचें तात्पर्य असें कीं जो कोणी त्या स्वराची अंतःकरण पूर्वक इच्छा करील तर त्यास तें फुकट प्राप्त होईल. [२५]

च० — बाबा त्या गोष्टी ऐकून मला परम आनंद झाला, आतां आपण चला, लौकर पाय उचला.

ख्रि० — लौकर पाय उचलावे असें माझ्या मनांतून आ हे, पण, हें माझ्या पाठीवर ओझें आहे त्यामुळें लौकर पाय उचलवत नाहीं. या प्रकारें त्यांचें भाषण होऊन ते चालते झाले तों त्या तळ्यांत एक चिखलाची जा गा होती तेथें ते आले आणि जपून चालत नव्हते म्ह णून ते दोघेजण ही त्या चिखलांत अचानक रुतले. या जागेचें नाव निराशा कर्दम, यांत ते दोघेजण लोळूं ला गले, त्यांचीं आंगें केवळ चिखलाने माखून गेलीं: त शांत ख्रिस्ती-च्या पाठीवर ओझें ह्मणून त्याभाराने तो

न्तर फारच त्या चिखलांत रुतला.

च॰ — कां ख्रिस्ती बाबा आपण आतां कोठें आहां?

ख्रि॰ — कोठें आहे हें बाबा आतां कांहीं कळत नाहीं.

च॰ — हें उत्तर ऐकून संतापून रागानें ह्मणतो, अथवा वेळभर जें सुख घेकील होतां तें हेंच काय? अहो आपल्या आण्यास प्रारंभींच असें विघ्न झालें मग आपल्या मजलेस पोंहचूं तों पर्यंत किती विघ्नें होतील तें नकळे. माझी यांतून जीवानशी सुटका झाली ह्मणजे पुरे, त्या नामी मुलकाचा आमच्या वांटचा तुह्मी एकटेच उपभोग करा. असें बोलून तो चलमति बाबा * एक दोन त्राणें करून त्या चिखलीआगेची जी बाजू त्याच्या घराकडेस होती त्या बाजूनें निघाला आणि तसाच चालता झाला तो कांहीं पुनः त्या ख्रिस्तीचे दृष्टीस पडला नाहीं.

या प्रमाणें तो ख्रिस्ती त्या निराशाचे कर्दमांत एकटाच रुतलेला राहिला. त्या कर्दमाची जी बाजू त्याच्या घराहून दूर आणि त्या आखूड द्वारा जवळ बाजूनें बाहेर निघण्या विषयीं त्याणें आपला ह्वावा तितका उद्योग केला परंतु त्याच्या पाठीवर तें ओझें त्या मुळें

त्याचें बाहेर निघणें घडलें नाहीं. इतक्यांत त्याचे जवळ एक पुरुष आला त्याचें नाव साह्य. तो त्या ख्रिस्तीस पुसतो, "कायरे येथें तूं काय करितोस."

ख्रि० — महाराज सुवार्तिक ह्मणून एक बाबा होते, त्यांनी ईश्वराचा जो क्षोभ होणार त्यांत मीन सांपडावें ह्मणून तें पलीकडचें द्वार दाखविलें आणि तेथें या मार्गानें जायास सांगितलें, तेथें जात असतां मी या ठिकाणी पडलों. साह्य ह्मणतो, तूं यां पायऱ्यांवर लक्ष देऊन कां चाललास नाहीं ?

ख्रि० — मला फार भय प्राप्त होउन मी पळत होतों त्यामुळें मला मार्गाचें धोरण न राहतां मी येथें रुतलों.

सा० — बरें तर बाबा आतां इकडे हात दे. त्याणें त्यास हात देतांच त्याला बाहेर काढून चांगल्या जमिनीवर नेऊन ठेविलें. मग त्यास मार्गीं चालता केला. २६

हें पाहून ज्यानें त्या ख्रिस्तीस बाहेर काढिलें त्याच्या जवळ जाउन म्या पुसलें कीं महाराज त्या विनाशनगराहून निघून त्या पलिकडच्या द्वारास जावयास हा मार्ग आहे, असें असतां या मार्गांत जी ही चिखली जागा

आहे ती बुजवून कांकादीत नाहीं. हा मार्ग नीट झाला म्ह णजे जे गरीब बिचारे या वाटेने जाणारे ते निर्भय जातील. त्याजवरून त्याणें उत्तर केलें कीं ही खिरवलीजागा काहीं असें स्थळ आहे कीं ही नीट करूं गेलें असतां नीट होउंच नये. मी पापी आहें असा विंबण्याचा ओघ आला म्हणजे त्याब रोबर मळ हें दर उठतात तीं येउन या स्थळीं पडतात, मी खचित पापी आहें असें मनास विंबलें म्हणजे चित्तास अनेक भय शंका प्राप्त होतात, व मासें कार्य होईल अशी आशा रहात नाहीं म्हणून या स्थळाचें नाव निराशा कर्दम. भयादिकांचा समुदाय जमून या स्थळीं राहतो म्हणून ही भूमिका फारवाईट आहे.

ही खिरवलीजागा येथें अशीच रहावी असें त्या राजा २७ च्या मनांतून नाहीं. त्यानी रस्त्याची पहाणी करावयास मनुष्य ठेविले आहेत. त्या राजाचे कामदार लोक त्याचे आज्ञेप्रमाणें हा मार्ग निट करायास लागले आहेत, त्यांस या कामावर अठराशें वर्षे झालीं. येथें बाबा काहीं नाहींतरी पांच पंचवीस हजार भरलेलीं गाडीं गडद झालीं, आणि येथें चांगला मजबूत रस्ता बांधाया करितां त्या॰रा

जाऱ्या सर्व मुलकांत शोध करून नानाप्रकारचीं सा
हित्यें आणून उद्योग केला पण हा निराशा कर्दम
अजून जसाचा तसाच आहे आणि ह्यावें तित
के उपाय केले तरी हा काहीं बुजून जाणार ना
हीं. आतां इतकें बरिक आहे खरें कीं आज्ञा देणारा जो प्र
भु त्याचे आज्ञेवरून या कर्दमाचे केवळ मधून चांगल्या म
जबूत पायऱ्या बसविल्या आहेत: पण हवा पालटून हा
कर्दम वितुळला ह्मणजे त्या पायऱ्या चिखलाने दडून जा
उन चांगल्याशा दृष्टीस पडत नाहींत, आणि जरी दृष्टीस
पडल्या तथापि मनुष्यांस सावधपणा रहात नाहीं त्यामु
ळें या पायऱ्या चुकून ते चिखलांत पडतात: पण एक वेळ
तो दरवाजा पार झाला ह्मणजे मग चांगला मार्ग लागतो. २८
मग इकडे मी त्या स्वप्नांत असें पाहूं लागलों कीं तो चल
मति गृहस्थ आपल्या घरीं जाउन पोहचला. ते समयीं
त्याचे शेजारी त्यास भेटायास आले. कित्येक जण त्यास
ह्मणूं लागले कीं तुह्मी परत आलां हें मोठें शहाणपण के
लें कित्येक ह्मणूं लागले कीं त्या खिस्तीचे नादीं लागावें
हा काय वेडेपणा, दुसरे त्याची हेलना करूं लागले कीं अ

हो याणें जर त्या ख्रिस्ती बराबर आपल्या विषयीं कंबर बांध ली होती तर याणें तसेंच आयाचें होतें, कांहीं अडचणी पाहून याणें पळ काढावी काय, केवढा हा गांडूपणा बरें. या प्रकारें ते बोलत असतां चलमति बावा त्यामध्यें स्तब्ध होउन उगेच ऐकत बसले. नंतर चलमतीस कांहींशी हु शारी आली मग ते सर्व मिळून त्या बापुड्या ख्रिस्तीची त्याच्या पाठीमागें निंदा करूं लागले.

मग तो ख्रिस्ती एकटाच मार्गानें चालत असतां त्या णें एक दुरून आपल्या कडेस मनुष्य येताना पाहिला. तो त्या तळंचटामधून आडवे मार्गानें येत होता त्याची आ णि ख्रिस्तीची अकस्मात् मार्गांत गांठ पडली. त्याचें नाव प्रपंचसुज्ञ. हे प्रपंच ज्ञाननगर ह्मणून जें मोठें शह र आहे तेथले रहाणार. ख्रिस्ती ज्या नगराहून आला त्यास तें प्रपंच ज्ञाननगर लगतच आहे. या प्रपंचसुज्ञ बाबांस ख्रिस्ती ऐकून ठाउक होता. कांतर ख्रिस्ती जे व्हां आपलें विनाशनगर सोडून चालता झाला तेव्हां त्याचा लौकिक फार झाला होता, त्याचे गांवीं व दुसऱ्या ही कित्येक ठिकाणी त्याच्याच गोष्टी चालल्या होत्या. त

शांत त्याला तो प्रपंचसुज्ञ पाहतो तों तो श्रमित होउन चाललां आहे, उच्छ्वास देत आहे, कुंथत आहे, या चिन्हावरून प्रपंचसुज्ञानी मनांत गांठ घातली कीं ख्रिस्ती ह्मणून ज्यास ह्मणतात ते हेच गृहस्थ असावे. ह्मणून त्याचे बरोबर बोलणें आरंभिलें.

प्रपंचसुज्ञ पुसतात — कां बाबा आपण हें ओझें घेउन कोठे चाललां?

ख्रिस्ती उत्तर देतो. — हें ओझें खरें, असलें ओझें मास्यासारिख्या बापुड्यांस मात्र वाहवें लागलें. मला आपण पुसतां कीं तूं कोठे जातोस, त्यास मी त्या पलिकडल्या द्वाराकडे सजातों. मला कोणी असें सांगितलें आहे कीं तूं त्या पलिकडल्या द्वारांत गेलास ह्मणजे तुझें ओझें दूर होईल याजकरितां बाबा मी तेथें जात आहें.

प्र० — तुह्मास कुटुंब वमुलें आहेत ना?

ख्रि० — होय आहेत; पण मी या ओझ्याने असा व्याकुळ होउन गेलों आहें कीं पूर्वी जसा मला त्यां पासून आनंद होत असे तसा आतां काहीं होत नाहीं, मला असें वाटतें बायको मुलें मला काहीं एक नाहीं

प्र॰ — बरें आह्मी तुह्मास कांहीं विचार सांगितला तर तो तुह्मी ऐकाल काय?

ख्रि॰ — होय चांगला विचार असला तर ऐकूं. मी चांग ल्याच विचाराची वाटपहात आहें.

प्र॰ — तर माझा विचार ऐका, हें तुमचें ओझें सर्वथा दूर करून घ्या, त्यावांचून तुमच्या अंतःकरणीं समाधान होणार नाहीं आणि ईश्वरानें जे तुह्मास उपभोग्यपदार्थ दिले आहेत त्यांपासून तुह्मास सुख होणार नाहीं.

ख्रि॰ — हें माझें ओझें दूर व्हावें हींच मी वाट पाहत आहें; हें माझ्या हातून तर दूर होतना हीं, व हें कोणी दूर करील असा ही मनुष्य आपल्या त्या गावांत दिसत नाहीं; हें ओझें दूर करून घ्यावें ह्मणून मी एकाचा विचार ऐकून या वाटेने चाललों आहें.

प्र॰ — या वाटेने गेलें असतां तुमचें ओझें दूर होईल असें तुह्मास कोणी सांगितलें?

ख्रि॰ — सुवार्तिकह्मणून मला एक थोर बहुमान्य गृहस्थ भेटले होते, त्यांनी मला सांगितलें.

प्र॰ — अशो त्याचें तें सांगणें; तुह्मास त्यानें ज्या मार्गास

लाविलें त्या मार्गांत जीं संकटें व दुःखें आहेत तशीं दुसरीं कोठे नाहींत. आणि तुह्मी त्याच्याच सांगण्या प्रमाणें चालला असतां तीं सर्व तुमच्या अनुभवास येतील. आणि त्याचा तुह्मास कांहींसा प्रत्यय आलासा दिसतो, तुमच्या आंगास त्या निराशा कर्दमांतील मळ लागला आहे. असून कोठे हा तर नुगताच आरंभ आहे. या वाटेने जाणारास तो कर्दम पहिल्याने लागतो, याजकरितां बाबा मासें ऐका मी तुह्मांहून वडील आहें. या मार्गांत असें असें पुढें आये तशीं तशीं अनेक दुःखें प्राप्त होतात. शरीरीं क्षीण व्हावा, पीडा प्राप्त व्हाव्या, क्षुधेने मरावें, संकटांत पडावें, आंगास वस्त्र मिळूं नये, तरवारी खालीं मरून जावें, सिंहाच्या तोंडीं सांपडावें, अंधकारांत पडून रहावें, अजगराने गिळावें, असे प्रसंग यावे किंबहुना तत्काळ मरण प्राप्त व्हावें. ही अशी दशा होईल यांत कांहीं संशय नाहीं कळलें? याचा प्रत्यय बहुतांस आला आहे. याजकरितां भलत्याच्याच नादीं लागून उगीच आपल्या जीवाचा नाश कां करून घ्यावा.

ख्रि॰ — महाराज आपण जीं दुःखें सांगितलीं त्यांज हू

न या ओझापासून मला अधिक दुःख होत आहे. तर मला तीं दुःखें प्राप्त झालीं आणि हें ओझें दूर झालें तर त्यां दुःखांची मला काळजी नाहीं.

प्र० — बरें हें ओझें तुह्मास प्रथम कसें प्राप्त झालें?

ख्रि० — हें पुस्तक वाचलें त्याजवरून प्राप्त झालें.

प्र० — होय हें पुस्तक वाचून दुःख प्राप्त झालें असेल खरें, असीच अवस्था अल्पबुद्धि मनुष्यांस प्राप्त होती. जी वस्तु त्यांस अप्राप्य त्या वस्तू विषयीं ते प्रयत्न करीत असतां ते अकस्मात् असल्या व्यामोहांत पडतात तेणें करून ते मनुष्यपणास मुकतात. ते आपल्या जीवाची हाणी करून काय मिळवायास जातात तें त्यांचें त्यांसच कळत नाहीं.

ख्रि० — पण मी काय मिळवायास जातों तें मला कळतें, हें भाराचें ओझें मजपासून दूर होउन मला स्वस्थ व्हावें, अशी म्या आशा धरली आहे.

प्र० — तें सुख मिळविण्या विषयीं तुह्मी ही वाट धरली आहे पण या वाटेंत अनेक संकटें आहेत. आपण जर स्थिर बुद्धि करून माझा विचार ऐकाल तर तुह्मास क्षो

हीं संकटे प्राप्त न होतां तुह्मी ज्या स्वस्थाची इच्छा करीत आहां, तें तुह्मास प्राप्त होईलः त्याज विषयीं उपाय अवश्यच आहे. तीं नशीं संकटें तर काय पण उलटें तुमचें रक्षण होईल, तुह्मास आसजोडतील आणि तुह्मी तृप्त व्हाल.

खि॰ — जेणें करून असें प्राप्त होईल तें काय गुज आहे तें कृपाकरून सांगावें.

प॰ — तें पलिकडेस गांव दिसत आहे तें पहा, त्याचें नाव स्ववर्तन, तेथें एक गृहस्थ राहतो त्याचें नाव नियम, तो चांगला विवेकी व भला मनुष्य आहे: त्याच्यां जवळ असलीं ओझीं दूर करण्याची चांगली युक्ति आहे, त्याने बहुतांचीं ओझीं दूर करून त्यांस स्वस्थ केलें आहे, आणि ओझ्याच्या भारामुळें बुद्धीस विकार झाला असला तर तो ही त्यास दूर करितां येतो. याज करितां तुह्मी त्याच्याजवळ जाऊन आपलें कार्य करून घ्यावें, येथून त्याचें घर कोसभर ही लांब नाहीं. तो जर कदाचित् तुह्मास घरीं भेटला नाहीं तर सभ्यता ह्मणून त्याची लेंक आहे ती तुमचें कार्य करील. ती आपल्या

कपासारिखीच कुशळ आहे. तेथें तुह्मीं गेलां असतां या तुमच्या ओस्याचें निवारण होईल; आपल्या पूर्व ठिकाणी आवें असें जर तुमच्या मनांत नसलें तर तुह्मी जाउं नये, आपलीं मुलें बायको यांस त्या गावीं बोलावून आणावें, तेथें घरें रिकामी आहेत, त्यांतून एकादें घर तुह्मास थोडक्यांतच मिळेल. तेथें खाया प्यायाचे पदार्थ ही चांगले स्वस्त मिळतात, तेथें तुमचा संसार सुखाने चालेल, तुह्मी भले लोकां बरोबर वागाल आणि चांगले अब्रूने व डौलाने रहाल.

हें बोलणें ऐकून ख्रिस्ती कांहींसा स्तब्ध राहिला; नंतर आपल्या मनांत विचार करूं लागला कीं हे बावा जें सांगत आहेत तें जर खरें असलें तर मग यांची बुद्धि ऐकावी हेंच शाहणपण. याजकरितां तो त्यास पुसूं लागला: —

ख्रि॰ — बरें महाराज त्या भल्यां गृहस्थाच्या घरीं जाण्याचा मार्ग कोणता?

म॰ — तो पहा तो पलिकडला डोंगर.

ख्रि॰ — बरें मग?

प्र० — त्या डोंगराच्या कडेने जा आणि तेथें पहिलें जें घर लागेल तेंच त्या गृहस्थाचें.

मग तो ख्रिस्ती आपला मार्ग सोडून त्या ओझ्याच्या निवारणार्थ नियमाकडेस जाऊं लागला, पण त्या डोंगराजवळ येतांच तो त्यास मोठा उंच दिसूं लागला आणि ज्या वाटेने जायाचें तिकडेस त्याचा वरला शेंडा जाणूं आंगावरच कोसळतो असा भास होउं लागला; तें पाहून ख्रिस्तीस पुढें पाउल टाकायास धीर होईना; मग तेथें उगाच उभा राहिला काहीं सुचेना आणि पहिल्या मार्गीं असतां त्या ओझ्याचा जो भार होता त्याजपेक्षां अधिक झाला. तशांत त्याडोंगरांतून ज्वाला उठूं लागल्या, त्या अशा कीं आतां जाणूं येउन जाळून टाकितील; अशी त्यास अवस्था प्राप्त होतांच त्याचे आंगास घाम सुटला आणि भयाने चळचळां कांपूं लागला. मग खिन्न होउन आपल्या आपण मनांत ह्मणतो कीं. मी त्या प्रपंच सुज्ञाचे नादीं कसा लागलों: इतक्यांत त्याने सुवार्तिकास आपल्याकडेस येतां पाहिलें; त्याला पहातांच त्यास मोठी लज्जा प्राप्त झाली. मग तो सुवार्ति

क त्याचेजवळ येवुन वक्रदृष्टीने भयवाटाया जोगें त्या जकडेस पाहूंलागला: नंतर त्यासीं बोलणें आरंभिलें.

कायरे ख्रिस्ती तूं येथें कायकरितोस: हे शब्द ऐक तांच त्यास काहीं सूचेना असें झालें, मग त्याज पुढें तो उगाच उभा राहिला. तें पाहून सुवार्तिक पुसतो भिंती च्या बाहेर उभा राहून रडतां जो माझे दृष्टीस पडला होता तोच तूं मनुष्य काय?

ख्रि॰ — होय महाराज तोच मी.

सुवार्तिक — तुला त्या अरुंद द्वारा कडेस जाउं सांगितलें होतें नां?

ख्रि॰ — होय महाराज.

सु॰ — तर मग हें असें कसें झालें, तूं तर लौकरच बहकलास. आतां तूं त्या आपल्या मार्गांत नाहींस.

ख्रि॰ — मी महाराज निराशा कर्दम टाकून पुढें आलों आहें इतक्यांत मला एकजण भेटला, त्याणें समजाविलें कीं तूं त्यासमोरच्या गावांत जा, तेथें तुला एक पुरूष भेटेल तो तुझें ओझें दूर करील.

सु॰ — तो कोण होता?

ख्रि० — तो चांगल्या भल्या गृहस्था सारिखा दिसत होता, त्याने मला बहुत गोष्टी सांगून माझी समजूत केली. त्याजवरून मी येथें आलों: परंतु हा मी डोंगर पाहिला हा या वाटेवर कोसळून पडेल आणि त्या खा लीं माझा ही चुराडा होईल असा मला भास झाला ह्मणून मी येथेंच उभा राहिलों.

सु० — तो गृहस्थ तुला काय बोलिला ?

ख्रि० — त्याणें मला पुसलें तुह्मी कोठे जातां, त्याज वरून म्या आपली कथा त्यास सांगितली

प्र० — आणखी त्याने काय पुसलें ?

ख्रि० — त्याणें आणखी असें पुसलें तुह्मास बायको मुलें आहेत काय; त्याजवरून म्या त्यास उत्तर दिलें कीं आहेत परंतु हें माझें पाठीवर ओझें आहे तेणेंकरून मी फार व्याकूळ आहें ह्मणून पहिल्याने तीं अशीं मला गोड होतीं तशीं तीं आतां नाहींत.

सु० — मग तो काय बोलिला.

ख्रि० — मग तो असें बोलिला कीं हें आपलें ओझें लोकर दूर करून घ्या. त्याजवरून म्या त्यास सांगित

लें कीं मीं सुखाची फार वाट पाहतों ह्मणून मीं त्या पलिकड
त्या दाराकडेस आलों आहें, तेथें गेलें असतां या ओझ्या
पासून सुटका कशी करून घ्यावी हें मला कळून येईल. म
गतो ह्मणूं लागला कीं तेथें जावयास चांगला जवळचा
मार्ग दाखवितों; सुवार्तिकानें जो मार्ग दाखविला त्यांत ज
शा अडचणी आहेत तशा ह्या मार्गांत नाहींत; मी दाख
वितों हा मार्ग एक्या गृहस्थाच्या घराकडेस जातो त्यास
असलीं ओझीं दूर करायाची युक्ति ठाउक आहे: ही त्याची
गोष्ट खरी मानून त्या तो मार्ग सोडून दिला आणि माझें
ओझें लौकर दूर होईल असें जाणून हा मार्ग धरिला. प
रंतु या ठिकाणी येउन येथील प्रसंग पाहतांच भयामुळें पु
ढें जावेना असें झालें; आतां कसें काय करावें हें काहीं सु
चत नाहीं.

सु॰ — तर अमळ उगा राह, मी तुला ईश्वरी वाक्य दाख
वितों. तें ऐकून तो ख्रिस्ती कांपत उभा राहिला. मग तो
सुवार्तिक तें ईश्वरी वाक्य बोलतो: "जो बोलतो, त्याचें बोल
णें तुच्छ करूं नका; कां तर जो पृथ्वीवर बोलिला त्याचें बो
लणें ज्यांनी तुच्छ केलें, ते निभावले नाहींत, तर मग जो॰

दिव्य लोकाहून बोलतो त्याचें बोलणें आपण तुच्छ करूं नर कसे निभावूं"[३१] आणखी असें बोलिला, "जो पुण्यवान् तो विश्वासानें जगेल, परंतु जर आड सरकेल, तर त्या विषयीं माझा जीव संतोष पावणार नाहीं.[३२]" मग यां वाक्यांचे अभिप्रायानें त्यानें असें सांगितलें कीं, याच प्रकारच्या दुःखांत तूं जाउं पाहतोस, आणि परात्पर जो ईश्वर त्यानें जो बोध केला त्या बोधाचा अव्हेर करूं लागला आहेस आणि शांतिमार्गांतून तूं आपुलें पाउल काढून विनाशमार्गाकडेस जाउं लागला आहेस.

असें ऐकून ख्रिस्ती त्या सुवार्तिकाच्या पायांवर मृतप्राय पडला आणि ह्मणूं लागला कीं हाय हाय, धिक् माझें जिणें माझा नाश झाला! अशी त्याची अवस्था पाहून त्यास उजवे हातानें धरून तो ह्मणूं लागला, "सर्व पापें व दुर्भाषणें यां विषयीं माणसांस क्षमा होईल.[३३] विश्वास धरा. त्यांत अंतर करूं नका.[३४]" त्याजवरून तो ख्रिस्ती कांहीं सावध झाला आणि पहिल्या प्रमाणे कांपत सुवार्तिकाच्या पुढें उभा राहिला.

मग सुवार्तिक बोलूं लागला कीं तुला ज्या गोष्टी सांग

न्नों त्यां विषयीं फार जपून रहा, तुला ज्याने भुलविलें तो को ण आणि तो ज्याकडेस तुला पाठवीत होता तो कोण हें मी तुला सांगतों. तुला जो भेटला त्याचें नाव प्रपंचसुज्ञ; हें त्या चें नाव वास्तविक आहे: कांतर त्याच्या मनांत प्रपंचाचेंच मत वागतें; ३५ ह्मणून तो सुवर्तनगांवींच्या भजनसभेस जातो; त्याला प्रपंचाचें मत अतिशय आवडतें त्याचें कार ण असें आहे कीं या मतांत त्याला क्रुसाचे श्रम सोसावेला गत नाहीं; आणखी त्याचा शारीर स्वभाव आहे ह्मणून मा झा मार्ग नीट असतां ही त्या मार्गास तो दूषितो. या मनुष्याने तुला विचार सांगितला त्यांत तीन गोष्टी आहेत. त्यांचा त्यां सर्वस्वें त्रास मानावा: त्या अशा, त्याने तुला तुझा मार्ग सो डायास सांगितलें; — क्रूस त्रासदायक आहे असें सुच विलें; — आणि ज्या मार्गाने मरण प्राप्त व्हावें अशा मार्गा कडेस तुझी योजना केली.

त्याने तुला आपला मार्ग सोडायास सांगितलें तर त्या गोष्टीचा त्वां त्रास मानावा. आणखी त्वां त्याचें ऐकिलें या चाही त्रास मानावा. त्याचें ऐकिलें असतां ईश्वरी वचन अव्हेरून प्रपंचसूज्ञाचा विचार ऐकिला असें होतें. प्रभू

च्यें वाक्य असें आहे कीं "अरुंद द्वाराने आंत जाण्याचा प्रयत्न करा;[३६]" ज्या ज्या द्वारा कडेस तुला जावयास सांगितलें होतें तें हेंच द्वार आणखी असें आहे, "ज्या द्वाराने जीविताचे मार्गास लागावें. तें द्वार अरुंद होय आणि ज्यांस त्या द्वाराचा शोध लागतो ते थोडके आहेत.[३७]" या असल्या अरुंद द्वारा कडेस जो मार्ग जातो त्या मार्गी तूं जात असतां तुला त्या दुष्टाने फिरवून विनाश मार्गा कडेस लावून दिलें; याजकरितां तुला त्या मार्गापासून भ्रष्ट केलें, या गोष्टीचा त्रास कर आणि त्यां त्याचें ऐकिलेंस याच्याहीत्रास कर.

क्रूस त्रास दायक आहे असें त्यानें सुचविलें, याचाही त्वां खेद मानावा; कारण कीं; "मिसरांतल्या द्र्व्यापेक्षां[३८]" क्रूसा विषयीं अधिक आवड असावी. आणखी गौरव युक्त जो प्रभु त्याने असें सांगितलें आहे कीं, "जो आपला जीव रक्षण करावयास इच्छितो तो त्याला मुकेल.[३९]" आणि "जो कोणी मजकडे येतो व आपला बाप, आई, बायको, लेंकरें, आणि भाउ, बहिणी, आणखी आपला जीव, यांचा द्वेष ही करीत नाहीं तो माझा शिष्य व्हाया

[४०] स समर्थ नाहीं." असें आहे याजकरितां, ज्या वांचून अ
क्षय जीवन प्राप्त होत नाहीं असा जो क्रूस, तो तुला मारक
होईल, असें ज्यानी रचविलें त्याचें मत अमंगळ होय,
त्या मताचा त्वां त्रास मानावा.

ज्या मार्गानें नाश प्राप्त व्हावा अशा मार्गास तुला ला
विलें यास्तव त्याचा त्वां त्रास करावा. पहा बरें तुला त्यानें
कोणाकडेस पाठविलें होतें, अरे त्या मनुष्याच्या हातून
तुझे ओझ्याचें निवारण झालें असतें काय?

तुझें ओझें दूर करावयास तुला ज्या गृहस्था कडेस पा
ठविलें होतें त्याचें नाव नियम,[४१] तो दासीचा लेंक. ती दासी
व तिचीं लेंकरें असून बंदांतच आहेत, आणि ती दासी उ
पमारूप सिनाडोंगर तुझ्या मस्तकावर कोसळेल ह्मणून तूं
ज्यास भ्याला होतास तोच हा डोंगर. ती स्त्री आणि तिचीं
लेंकरें स्वतां बंदांत असतां त्यांचे हातून तुझी मोकळीक क
शी होईल! तीचा लेंक नियम त्याच्यानें तुझें ओझें दूर कर
वेल काय. अझून तर त्यानें कोणाचें ओझें दूर केलें ना
हीं; आणि पुढें ही त्यांचे हातून असलें कार्य घडायाचें
नाहीं." कर्म नियमानें कोणी पुण्यवान् असा ठरणार

नाहीं. कांतर कर्मनियमाने कोणी ही एक मनुष्य आपलें ओझें दूर करायास समर्थ नाहीं. याजकरितां प्रपंच सुज्ञ जी लबाड आहेत आणि नियम जी ठक आहेत; आणि सभ्यता ह्मणून जी त्यांची लेंक ती चांगली हास्यमुख दिसतीं पण तीही ढोंगी आहे, ती तुमचें साह्य करणार नाहीं. त्यांचे बोलण्यांत कांहीं जीव नाहीं, त्यां अविचारी मनुष्यांचा त्यां विचार ऐकिलास पण त्यांच्या विचारांत दगा आहे, म्यां ज्या मार्गास तुला लाविलें होतें त्या मार्गांतून तुला काढून तुझा उद्धार नव्हावा अशी त्यांची बुद्धि होती. असें त्या सुवार्तिकानें बोलून ईश्वराची उंच स्वराने प्रार्थना केली कीं, प्रभो म्या जें या ख्रिस्तीस सांगितलें तें सत्य आहे असें याच्या प्रत्ययास आणून दे. त्याजवरून हा ख्रिस्ती ज्या डोंगरा खालीं उभा राहला होता त्या डोंगरातून वाणी निघाली आणि अग्नि उठला, तेणें करून त्या ख्रिस्तीच्या शरीराचे रोमांच उभे राहिले. ती वाणि झाली ती अशी "कर्मनियमाधीन जितके आहेत तितके शापग्रस्त आहेत; कांतर असें लिहिलें आहे कीं," कर्मशास्त्रांत जे नियम सांगितले आहेत ते सर्व जो कोणी

निरंतर आचरत नाहीं तो शापग्रस्त आहे."

हें असें झाल्यावरून ख्रिस्तीस असें वाटूं लागलें कीं आतां मला मरणच प्राप्त होईल. मग तो मोठा शोक करून रडूं लागला, कीं हाय हाय तो प्रपंचसुज्ञ मला कोणते वेळेस भेटला, अशी ती वेळ; मी शंभर वेड्यांतला वेडा कीं मी त्याची बुद्धि ऐकिली: अरे मी नीट मार्गानें जात असतां त्या गृहस्थाच्या प्रापंचिक वार्ता ऐकून मला तो मार्ग सोडायास लाज तरी कशी वाटली नाहीं. असें बोलून तो त्या सुवार्तिकास पुनः विचारूं लागला.

बरें महाराज आपल्यास काय वाटतें? कांहीं आशा राहिली आहे काय? मी आतां परतून त्या अरुंद द्वाराकडेस जाउं काय? म्यां कायजें केलें त्याजवरून मा झा त्याग करून मला खालीं पहायास लावून परतून माघारें लावून देणार नाहींत कीं? त्या मनुष्याची म्यां बुद्धि ऐकिली तें मला फार आश्चर्य वाटतें; बरें पण मा झ्या पापाची क्षमा होईल ना?

त्याजवरून सुवार्तिक बोलूं लागला कीं तुझें पाप मोठें आहे, त्वां दोन अपराध केलेस: जो चांगला मी

र्ग तो सोडून दिलास व निंद्यमार्गास लागलास; असें तुजकडून झालें आहे तथापि त्या द्वाराजवळ जो गृहस्थ आहे तो मनुष्यांवर दया करितो. तो तुझा स्वीकार करील; परंतु आतां तरी तूं निंद्यमार्गीं जाऊं नको, कांतर तो किंचित् "क्रोधानें पावला ह्मणजे" तुझा नाश होईल. मग ख्रिस्ती परत जाण्या विषयीं उद्युक्त झाला; त्याजवरून सुवार्तिक त्यास आलिंगन देऊन प्रसन्न वदनें करून बोलूं लागला कीं बाबा सुखरूप सत्वर जाः मग तो ख्रिस्ती त्वरेनें निघाला. मार्गांत कोणाबराबर बोलूं नये, कोणी पुसल्यास उत्तर देऊं नये; मनांत असें वाटावें कीं अझून मी निंद्यमार्गांतच आहे, प्रपंच सुज्ञाची बुद्धि ऐकून मी जो मार्ग सोडिला तो मार्ग मला मिळे तों पर्यंत भयच आहे, या प्रकारची चिंता वागवून जाऊं लागला. मग कांहीं काळानें तो त्या द्वाराशीं येऊन पोहचला, त्या द्वारावर पाहतो तों "ठोका ह्मणजे तुह्मास द्वार उघडतील," असें लिहिलें आहे. त्याजवरून त्या ख्रिस्तीनें तें द्वार दोन चारदां ठोकून ह्मणूं लागला.

आर्या

मी दुःखित अतिव्याकुळ, कपाट उघडून
आंत घे मातें; अपराधी मि खरा पण,
गाइन तुझ्या अगाध कीर्तितें.

तें ऐकून त्या द्वाराजवळ एक प्रौढ गृहस्थ आला, त्याचें नाव दयाहेतु, तो पुसूं लागला, तूं कोण आहेस? कोठून आलास, तुला काय पाहिजे?

ख्रि०—मी एक गरीब पापी ओझ्याने व्याकुळ झालेलों आहें. मी विनाशनगराहून आलों, पुढें कोप होणार तो मजवर नव्हावा ह्मणून मी जियोन पर्वतास जात आहें: माझ्या ऐकण्यांत आलें आहे कीं या द्वारांतून त्या पर्वताकडेस जावयास मार्ग आहे ह्मणून मी महाराज आपल्यास पुसतों आपण मला या द्वाराच्या आंत जाऊं द्याल काय?

दयाहेतु—आंत जाउं देण्या विषयीं मजकडून किमपि अंतर होणार नाहीं, असें बोलून त्याने तें द्वार उघडलें.

मग तो ख्रिस्ती आंत प्रवेश करीत आहे इतक्यांत त्यास त्या दयाहेतूने आंत ओढिलें; त्याजवरून ख्रिस्ती पुसतो, असें कां हो ओढिलें? दयाहेतु सांगतो या दरवा

ज्याहून कांहिंसा दूर एक किल्ला आहे, तो मोठा बळकट आहे त्याजवर जो किल्लेदार आहे त्याचें नाव बाआल जेबूल; तो व त्याचीं माणसें या द्वाराकडेस येणारावरकि ल्यावरून बाण मारितात, त्यांचा बेत हाकीं या द्वारांत शि रतां शिरतां तरी ठार करावें. तें ऐकून ख्रिस्ती बोलतो अ सें आहे तर मग एक अर्थी मला आनंद झाला आणि एक अर्थी मला भय ही वाटलें. मग जेव्हां तो द्वाराच्या आंत आला, तेव्हां तो द्वारा धीश ख्रिस्तीस पुसतो तु ला येथें कोणी पाठविलें.

ख्रि० — सुवार्तिकाने पाठविलें; आणि द्वार ठोकावया स सांगितलें; आणि पुढें म्या करें काय करावें हें आप ण मला सांगाल असें तो बोलिला.

द० — "हें तुझ्या पुढें उघडलेलें द्वार आहे, हें कोणी बंद करायास समर्थ नाहीं"

ख्रि० — म्या जो भय सोडून उद्योग आरंभिला त्याचें फ ळ आतां दृष्टीस पडूं लागलें:

द० — बरें तूं येथें एकटाच आलास हें कसें?

ख्रि० — पुढें जो अनर्थ होणार तो मला जसा कळला त

सा माझ्या शेजाऱ्यांस कळला नाहीं ह्मणून ते माझ्या स मागमें आले नाहींत.

द॰ — तूं येथें येणार हें त्यास समजलें होतें कीं?

ख्रि॰ — होय! मला येतांना प्रथम माझ्या मुलांनीं व स्त्रीने पाहिलें, आणि तीं मला मागें फिरवूं लागलीं: मग माझे किती एक शेजारी मला परत वावयांस हांका मा रूं लागले; परंतु मी कानांत बोटें घालून त्यांचें न ऐकतां पुढें चालता झालों.

द॰ — बरें तुला समजाउन परत न्यावया करितां त्यांतून कोणी तुझ्या मागें आले नाहीं काय?

ख्रि॰ — दोघेजण आले, एक दुराग्रही व एक चलमति; त्यांनीं मला मागें न्यावयाचा उद्योग केला परंतु मी ऐके नासा झालों तेव्हां दुराग्रही माझी निंदा करीत मागें गेला, पण तो चलमति काहींसा माझ्या बरोबर आला.

द॰ — तो तसाच तुझ्या बरोबर पुढें कां आला नाहीं?

ख्रि॰ — तें असें झालें, आह्मा उभयतांस, मार्गांत निराशा कर्दम लागला, त्यांत आह्मी दोघेजण अचानक पडलों. त्याजवरून चलमति माझा शेजारी भयाभीत

होउन पुढें चालायास पाय घालिना. मग त्याच्या घरा कडेस जो मार्ग गेला आहे तिकडे जाउन ह्मणूंलागला कीं त्यानामी देशाचा आपण एकटेच उपभोग करा: असें बोलून, तो आपल्या वाटेने चालता झाला, मीमाझा मार्ग क्रमूं लागलों; तो त्या दुराग्रहीच्या मागें गेला, मीया द्वाराकडेस आलों.

द०— अहा हा काय दीन बिचारा! असलें दिव्य वैभव त्यास काय तुच्छ वाटलें, ह्या वैभवासाठी थोडक्या शाअडचणी त्याच्याने सोसून घेववल्या नाहींत काय?

खि०—म्या चलमतीचें झालेलें वर्तमान सांगितलें, आणि आपलें ही सांगितलें तर त्याला व मला कांहीं अंतर नाहीं असें आपल्यास वाटेल. तो तर आपल्या घरीं गेला; पण मी तर प्रपंच सुज्ञजीची विषयबुद्धि ऐकून मरण मार्गाकडेस जाउं लागलों होतों.

द०—प्रपंच सुज्ञाच्या हातीं तूं सांपडला होतास काय? तुझ्या ओझ्याच्या निवारणा करितां तुला नियमाकडेस जाउं सांगितलें होतें काय? प्रपंच सुज्ञ आणि नियम. हे दोघे मोठे ठक आहेत: बरें त्या प्रपंच सुज्ञाची बुद्धि तां

ऐकिलीस काय?

ख्रि॰ — होय ऐकिली खरी: त्याच्या सांगण्यावरून तर नियमास धुंडायास गेलों होतों, परंतु त्याच्या घराजवळ एक डोंगर लागला, तो माझ्या आंगावर येउन कोसळतो असें वाटूं लागलें म्हणून मी पुढें गेलों नाहीं.

द॰ — त्या डोंगरानें तर बहुत जण मारले गेले आणि पुढें बहुत मारले जातील: बरें झालें कीं तो तुजवर कोसळून तुझा चुराडा झाला नाहीं.

ख्रि॰ — मी चिंताग्रस्त असतां मला रुवार्तिक भेटला हा एक मोठा लाभ झाला, नाहींतर कोणास कळे माझी तेथें काय अवस्था झाली असती: रुवार्तिकास तर तेथें ईश्वर नेंच पाठविलें, तो जर तेथें आला नसता, तर माझें येथें येणें घडलें नसतें. या प्रकारचा मी असतां येथें आलों आहे, मी तर त्या डोंगराखालीं रगडून मरायास योग्य आहें, येथें उभें राहून आपल्या बराबर भाषण करायाची मला कोठून योग्यता! असा मी असतां ही माझा येथें प्रवेश झाला या कृपेचा थोरपण म्या काय वर्णावा!

द॰ — येथें येण्याच्या पूर्वीं कोणी कसें ही आचरलें अ

सलें तथापि त्यास आमच्याकडून येथें येण्यास कांहीं एक अटकाव होणार नाहीं. "ते कदापि त्याज्य होणार नाहींत," याजकरितां बाबा ख्रिस्तीरे, माझ्या समागमे अमळसा ये, ह्मणजे तूं ज्या मार्गानें जाणार त्यामार्गाचा मी तुला बोध करीन. पुढें पहा; हा अरुंद मार्ग तुला दिसतो ना? हाच तुझा जायाचा मार्ग.

आद्यपुरूष, भविष्यवक्ते, ख्रिस्त, व त्याचे प्रेषीत असे मिळून त्यानी हा मार्ग बांधिला आहे, हा नीटच आहे कोठे वांकडा नाहीं, ह्याच मार्गानें तुलाजायाचें.

ख्रि० — बरें या मार्गास काहीं आडे वेढे नाहींतना, कां कीं कोणी गैर्माहित असला तर हा मार्ग चुकून जाईल?

द० — यास तर आडेवेढे नाहींत पण आडयां वेढयांच्या बहुत वाटा आहेत, त्या या मार्गास सोडून आहेत, त्या वांकडया व रुंद होत; खरा मार्ग मात्र नीट व अरुंद आहे, याजवरून तुला खरा मार्ग कोणता व खोटा कोणता हें कळूं येईल.

मग मी आपल्या त्या स्वप्नांत पाहतों तों तो ख्रिस्ती त्यास आणखी पुसूं लागला कीं महाराज हें जें मा

ऱ्या पाठीवर ओझें आहे, हें आपल्या हातून दूर होणार नाहीं काय? तें ओझें त्या ख्रिस्ती पासून दूर झालें नव्हतें व तें दुसऱ्याच्या साह्या वांचून त्यास स्वतां दूर करण्याचें सामर्थ्य नव्हतें.

त्याजवरून दया हेतु त्यास बोलूं लागला कीं जेथें हें ओझें दूर होतें अशा स्थानी जाउन पोहोंचेस तोंपर्यंत कसेंही करून तें ओझें सोसून घे, तेथें गेलास ह्मणजे तें ओझें तुझ्या पाठीवरून आपें आप खालीं पडेल.

मग तो ख्रिस्ती कंबर बांधून आपल्या मार्गें जाऊं लागला, त्या वेळीं दया हेतूनें त्यास सांगितलें कीं या द्वारापासून काहीं दूर गेलास ह्मणजे तुला बोधकाचें घर लागेल, त्याचा दरवाजा ठोकिला असतां तो तुला उत्तम वस्तु दाखवील मग महाराज आतां मला जावयास आज्ञा असावी असा ख्रिस्तीनें त्या दया हेतूचा निरोप घेतला. त्याजवरून दया हेतु बोलिला सुखरूप जा बाबा.

मग ख्रिस्तीस आपल्या मार्गीं जात असतां त्या बोधकाचें घर लागलें, त्याचें दार एक दोन दां ठोकिलें तेव्हां त्या दाराजवळ एक जण येउन पुसूं लागला, कोण आलें

आहे ?

ख्रि० — महाराज मी वाटसरू आहें, या घरच्या धन्या
चे स्नेही आहेत त्यांनी मला माझ्या हिता करितां ये
थें यावयास सांगितलें; याजकरितां घरधन्या बराबर
दोन गोष्टी बोलाव्या असें मनांत आहे: मग तो त्या घ
रधन्यास बोलवावयास गेला; त्याजवरून तो घरधनी
त्या ख्रिस्ती जवळ लौकरच येउन पुसूं लागला कीं तुला
काय व्हावें. ते समयीं ख्रिस्ती सांगतो, महाराज मी वि
नाशनगराहून आलों आणि जियोन पर्वतास जातों; या
मार्गाच्या शेवटीं द्वाराजवळ जो पुरुष आहे त्यानें मला
सांगितलें कीं मीं येथें आलों असतां आपण मला चां
गल्या वस्तु दाखवाल, त्या मला मार्गांत उपयोगी पड
तील,

त्याजवरून तो बोधक बोलिला कीं आंत येः तुला
उपयोगी पडाया जोगें मी दाखवितों. मग त्यानें आप
ल्या मनुष्यास दिवा लावायास सांगितलें आणि त्या
ख्रिस्तीस बोलिला कीं माझ्या मागून ये, नंतर त्यास
एक एकांत खोली होती नेथें नेउन त्यानें आपल्या मनु

ष्यास दरवाजा उघडायास सांगितलें; तो दरवाजा उघ डतांच एक्या प्रौढ मनुष्याचें चित्र त्या ख्रिस्तीच्या दृष्टीस पडलें, तें भिंतीस बसविलें आहे: त्याने आपले डोळे दिव्य लोकाकडेस लाविले आहेत, अतिउत्तम पुस्तक हातांत आहे, सत्य त्याच्या मुखावर लिहिलें आहे; जगत्याच्या पाठी मागें आहे; तें चित्र असें दिसलें कीं हा जणो कोण्ही मनुष्याशीं वाद प्रतिवाद करायासच उभा राहिला आहे, आणि शिरावर तेजाचा मुकुट लोंबत आहे.

तें पाहून ख्रिस्ती पुसतो, हें काय आहे? बोधक उत्तर देतो, हें ज्या पुरुषाचें चित्र आहे तो हजारांत एक प्राणी आहे; तो मुलें उत्पन्न करितो, तो तींच मुलें आपल्या गर्भीं धारण करितो, आणि तीं गर्भस्थानांतून बाहेर पडलीं ह्मणजे तोच त्यांस स्तन्य देतो. याने आपले डोळे आकाशाकडेस लाविले आहेत, अतिउत्तम पुस्तक याच्या हातीं आहे, आणि सत्य याच्या मुखावर लिहिलें आहे, आणि जसा जाणों मनुष्याशीं वाद प्रतिवाद सांगायास उभा राहिला आहे: याज वरूनी

असें आणावें कीं गुह्य गोष्टी जाणून घ्याव्या व त्या पा त्रक्यास कळवाव्या हेंच त्या पुरुषाचें काम होय; ज गास यानें आपल्या पाठी मागें सोडून दिलें आहे, या जवरून असें आणावें कीं आपले स्वामीची सेवा घ डावी ह्मणून त्या पुरुषानें येथील वस्तू तुच्छ मानिल्या आहेत. आणि मस्तकावर तेजाचा मुकुट लोंबत आहे, याजवरून असें समजावें कीं परलोकीं त्यास तेजाचा मु कुट अवश्य मिळेल. मग तो बोधक ख्रिस्तीस सांगूं ला गला कीं म्या तुला हें चित्र पहिल्यानें दाखविलें, याचें कारण असें कीं तूं ज्या ठिकाणी जातो आहेस त्या ठिका णाच्या धन्यानें यालाच वाट दाखविण्याचा अधिकार दिला आहे, याजकरितां तुला मार्गांत अडचणी येऊन पडल्या ह्मणजे करें काय करावें तें हाच कळवील. ह्मणून तुला जें काहीं म्या दाखविलें त्याजवर चांगलें लक्ष्य ठे व, आणि त्वां जें कांहीं पाहिलेंस त्याची नीट आठव ण धरः नाहींतर तुला कोणी भेटेल आणि चांगला मा र्ग दाखवितों असें सांगूं लागेल, तेणेंकरून तूं फसून जाशील. असले जे मार्ग दाखविणारे ते नरकाचा मा

र्ग मात्र दाखवितात.

नंतर त्याने ख्रिस्तीस हातीं धरून एक्या मोठ्या महालांत नेलें, तो महाल धुळीने भरला होता तो कोणी झाडला नव्हता; मग त्यानें आपल्या मनुष्यास झाडायास सांगितला. तो मनुष्य झाडावयास लागला तेव्हां फार धूळ उडूं लागली, तेणेंकरून तो ख्रिस्ती घुसमुटून गेला. तेसमयीं तेथें एक दासी उभी राहिली होती तिला त्या बोधकानें पाणी आणून त्या महालांत शिंपडायास सांगितलें: तेणेंकरून तो महाल अल्पायासाने स्वच्छ झाला. तें पाहून ख्रिस्ती पुसतो हें असें केलें याजवरून काय समजावें?

बोधक सांगतो सुवार्तेच्या उत्तम संस्कारेंकरून जें अंतःकरण शुद्ध झालें नाहीं त्या अंतःकरणाचें स्वरूप या महालावरून जाणावें: ज्याणे मनुष्यास व्यापून अशुद्ध केलें आहे असें जें आद्य पाप, व अंतरगत अशुद्धि, ती त्या धुळीवरून जाणावी. पहिल्याने झाडूं लागला तो नियम; परंतु जीणे पाणी आणून सिंपडलें ती सुवार्ता. पहा, पहिल्याने तो मनुष्य झाडूं लाग

ला तेसमयीं धूळ उडून तो महाल झाडवेना असें झालें, आणि त्या धुळीनें तूंही कोंडून गेलास; यावरून असें जाणावें कीं नियम आपल्या कर्में करून पाप दूर करून अंतःकरण शुद्ध करूं लागला, तर तें त्याच्या हातून शुद्ध होत नाहीं, त्या पापाचा शोध लावून जसा जसा निषेध करूं लागतो तसें तसें तें उलटें आगें होउन बळकट होतें, आणि वाढूं लागतें, तो नियम पापजिंकायाचें सामर्थ्य जीवाला देत नाहीं.[४८]

जेव्हां त्या दासीनें त्या महालांत पाणी शिंपडलें तेव्हां त्या धूळीचें उडणें राहिलें आणि तो मनुष्य सुखानें झाडूं लागला; याजवरून असें जाणावें कीं जेव्हां अंतरीं सुवार्ता येउन राहती, व तीचा मधुर आणि उत्तम संस्कार अंतःकरणास होतो, तेव्हां तें पातक धुळी सारिखें शमून नाहींसें होतें, जीव विश्वास धरून निर्मळ होतो, आणि तेजःपुंज जो राजा त्याला राहायास पात्रभूत होतो.[४९]

नंतर म्या असें स्वप्नांत पाहिलें कीं त्या बोधकानें ख्रिस्तीस हातीं धरून एक्या लहान्या खोलींत नेलें, ते

थें दोन मुलगे आपआपल्या आसनावर होते. त्यांत जो मोठा त्याचें नाव काम, आणि धाकट्याचें नाव धीर. काम केवळ असंतुष्ट झाला होता आणि धीर उगाच शांत बसला होता.त्याजवरून ख्रिस्ती पुसतो, हा काम इतका असंतुष्ट कां झाला आहे? बोधक उत्तर देतो, हे ज्याच्या स्वाधीन आहेत तो पुरुष कामास सांगतो कीं तूं चांगल्या वस्तू करितां आतांच घाबरा होउं नको, त्या तुला दुसरें वर्ष लागलें ह्मणजे मिळतील परंतु त्यास त्या आतांच पाहिजेत; ह्मणून तो असंतुष्ट झाला आहे; धीर तसा नाहीं,तो स्थिर बुद्धीने राहिला आहे.

नंतर म्या असें पाहिलें कीं कोणी एकाने त्या कामाजवळ द्रव्याची थैली आणून त्याच्या पायांजवळ ओतिली, तें द्रव्य घेउन तो फार आनंद पावूं लागला आणि त्या धीरास हासून त्याची निंदा करूं लागला. नंतर माझ्या असें दृष्टीस पडलें कीं तें द्रव्य त्याने लोकरच उधळून टाकिलें आणि आपण चिंध्या पांघरूं लागला.

तें पाहून ख्रिस्ती बोधकास पुसतो याचा अर्थ स्पष्ट करून सांगावा त्याजवरून बोधक सांगतो. त्यां हे मुळ

गे पाहिले त्यांतून एक प्रापंचिक मनुष्याच्या कामाचें स्वरूप; आणि एक पारमार्थिक मनुष्याच्या धीराचें स्वरूप: कामास यंदाच सर्व पाहिजे, याजवरून असें जाणावें कीं जीं प्रापंच बुद्धि मनुष्यें आहेत त्यांस सर्व उत्तम पदार्थ या लोकींच मिळावे असें ते इछितात, चांगल्या वस्तू करितां त्यांच्याने दुसऱ्या वर्षपर्यंत ह्मणजे परलोक प्राप्त होईतोंपर्यंत थांबवत नाहीं. त्यांचें असें ह्मणणें कीं आजजें मिळालें तें खरें, उद्यांचा कोणास भरवसा आहे. या वचनावर विश्वास देवून परलोकींच्या सुखाविषयीं जीं ईश्वर वाक्यें आहेत तीं त्यांस तुच्छ वाटतात. परंतु त्या कामाचें सर्व द्रव्य नाहींसें होउन तो चिंध्या पांगरू लागला, त्या प्रमाणें प्रापंचिक जनाची मरणाअंतीं अवस्था होईल.

तें ऐकून ख्रिस्ती बोलतो, धीर ऐकून शाहणा खरा. तो उत्तम पदार्थाकरितां थांबून राहतो, कामाचें सर्व जाउन त्यास चिंध्या राहतात, तेव्हां धीरास वैभव प्राप्त होतें.

बोधक ह्मणतो तें वैभव तरी परलोकीचें फळलें,

ज्यास क्षयच नाहीं; येथलें वैभव तर क्षणांत नाहींसें होतें. कामास चांगले पदार्थ पहिल्याने मिळाले ह्मणून त्याने धीरास हांसूंनये, कांतर धीरास अंतीं उत्तम पदार्थ प्राप्त होतील त्या काळीं तोच कामास हांसेल: पहिल्यानें बरें मग वाईट आणि पहिल्यानें वाईट मग बरें; ज्यास प्रथम बरें मिळतें तें अंतीं नाहींसें होतें, परंतु ज्यास अंतीं बरें मिळतें त्याजवळ तें निरंतर राहतें, कांतर या लोकास अंत आहे तसा परलोकास अंत नाहीं, तो नित्य होय. आणखी द्रव्यवाना विषयीं असें ह्मटलें आहे "त्वां जीवंत असतां आपल्या उत्तम पदार्थांचें ग्रहण केलें, आणखी लाजारसानें आपल्या वाइटाचें केलें; परंतु आतां हा संतोष पावतो, आणि तूं क्लेशीत आहेस."

ख्रि॰ — तेव्हां ज्या वस्तु ऐथें आहेत त्यांचा लोभ धरूंनये, ज्या वस्तू परलोकीं प्राप्त होणार त्यांजविषयीं धीर धरून राहावें.

बोधक॰ — तूं खरें बोलतोस; "कारण जे पदार्थ दृश्य, ते अशाश्वत; जे अदृश्य, ते शाश्वत असें आ

हे." असें असतां इहलोकींचे पदार्थ आपल्यास फार आवडतात, त्याचें कारण असें कीं त्यां पदार्थां चा आणि आपल्या इंद्रियांचा नित्य संबंध आहे; परंतु परलोकींचे जे पदार्थ ते या इंद्रियांच्या ओळखे चे नव्हत: याजकरितां इंद्रियांचा आणि ऐहिक पदार्थांचा लौकर स्नेह घडतो, आणि यांचें पारलौकिक पदार्थांशीं अंतर पडतें.

मग म्या असें स्वप्नांत पाहिलें कीं, त्या बोधकाने ख्रिस्तीस हातीं धरून एक्याजागेंत नेलें, तेथें भिंतीजवळ अग्नि पेटलेला आहे, आणि त्या अग्निजवळ एकजण उभा राहून तो अग्नि विझावा ह्मणून फार पाणी ओतीत आहे; या प्रकारें पाणी ओतीत असतांही तो अग्नि अधिकच पेटत आहे आणि दाह करित आहे.

ख्रिस्ती पुसतो याचा भाव काय?

बोधक उत्तर देतो, ईश्वरी कृपेचें जें फळ अंतःकरणांत उमटतें.तें हा अग्नि; हा अग्नि विझून जाउन नाहींसा व्हावा ह्मणून याजवर जो पाणी ओतीत आहे

तो सैतान; असें ही असतां तो अग्नि धडकून पेटला आहे आणि त्याचा दाह ही अधिक होत आहे, याचें कारण तुला दाखवितों. मग त्याने त्यास त्या भिंतीच्या मागें नेलें, तेथें पाहतो तो एक मनुष्य हातीं तेलाचें पात्र घेउन उभा आहे आणि कोणास नकळतां त्या अग्नींत तेल ओतीत आहे.

ख्रिस्ती पुसतो. याजवरून कायसमजावें?

बोधक उत्तर देतो, हा ख्रिस्त होय, अंतःकरणांत जें उत्तम फळ उमटलें आहे त्याचें हा कृपारूप तैलाने रक्षण करीत आहे; याजमुळें असें घडतें कीं तो सैतान या ख्रिस्ताच्या लोकांस अपाय करीत असतां ही त्यांचें जीवात्मे उत्तम दशेंतच असतात. तो मनुष्य त्या अग्नीचें रक्षण करायास भिंतीमागें उभा राहिला आहे, याजवरून त्वां असें जाणावें कीं ज्यांस सैतान अपाय करितो त्यांस कृपेच्या फळाचें अंतःकरणांत कसें रक्षण होतें हें समजणें कठिण आहे.

मग म्या असें पाहिलें कीं त्या बोधकाने ख्रि

स्तीस हातीं धरून एक्या चांगल्या स्थानीं नेलें, ते थें एक मोठें रमणीय मंदिर बांधलें आहे तें पाहून ख्रिस्तीस फारच आनंद झाला; त्या मंदिरावर प ह्मतो तों कितीएक मनुष्य फिरत आहेत, त्यानी सु वर्णमय वेश धारण केले आहेत.

ख्रिस्ती पुसतो, आपलें तेथें जाणें घडेलना?

त्याजवरून त्या बोधकाने त्यास त्या मंदिराच्या द्वाराकडेस नेलें; तेसमयीं मनुष्यांचा एक मेळा त्या द्वाराजवळ उभा आहे आणि तीं मनुष्यें आंत जा उं पाहातात परंतु त्यांच्याने जाववेना. त्या द्वाराच्या कांहींसा दूर एक मनुष्य पुढें मेज घेउन बसला आ हे त्या मेजावर एक वही वदवुत आहे, जे कोणी त्या दरवाज्यांत शिरतील त्यांची त्याने नावें लिहावीं हें त्याचें काम: आणखी असें पाहिलें कीं जे कोणी आं त जातील त्यांस दुःख उपद्रव द्यावयाकरितां बहुत मनुष्यें आगांत चिलखतें घालून त्या दरवाज्या क डला रस्ता धरून बसलीं आहेत. हें पाहून तो ख्रिस्ती तर कांहींसा चमकला: जो कोणी त्या दरवाज्या क

डेस येउं लागावा त्यानें तीं हत्यारबंद माणसें पाहून मागें हटत असावें. असें होत आहे इतक्यांत एक मनुष्य मोठा शूर तेथें आला आणि जो नावनिशी लिहायास बसला होता त्यास सांगूं लागला कीं माझें नाव लिहा. त्यानें नाव लिहून घेतांच त्या शूर मनुष्यानें आपली तरवार उपसली आणि चिलखत आंगांत चढवून दरवाजा धरून जे हत्यारबंद मनुष्य बसले होते त्यांजवर तो धांवला. ते समयीं ते मनुष्य याजवर तुटून पडले; परंतु त्या शूरानें अवसान न सोडितां त्यांज बराबर लढायास कंबर बांधली, मग आपण काहीं त्यांचे घाय घेउन व त्यांस घाय देउन त्यांची झुंड फोडून पार निघाला आणि थेट त्या मंदिराशीं जाउन पोंहचला. ते समयीं त्या मंदिरांतून आणि तेथें जे फिरत होते त्यांच्या मुखांतून मधूरवाणी निघाली, ती अशी.

आर्या

येयेवाशूरारे, मनेंशुनीअंतरीं सुखें राहा; अक्षयसुखवैभवजेंजयफलतुजलामिळेल हें पाहा.

त्याजवरून तो त्या मंदिरांत गेला, तेसमयीं ते थील राहणारांस जसे पोषाक होते तसाच पोषाक यास दिला. तें पाहून तो ख्रिस्ती जरा हांसून ह्मणूं लागला कीं याचा भाव तर मला कळला, आतां मला येथून जाउं द्या. त्या काळीं त्या बोधकाने सांगितलें कीं थांब, तुला अझून कांहीं आणखी दाखवायाचें आहे, तें पाहून मग तूं आपल्या मार्गी जा. नंतर त्याने त्यास पुनः हातीं धरून फार अंधार पडला होता अशा खोलींत नेलें, तेथें लोखंडाच्या पिंजऱ्यांत एक मनुष्य बसला आहे.

त्यास पाहतो तंव तो केवळ खिन्न होउन बसला आहे. मान खालीं घातली आहे, हात जोडले आहेत आणि महान् दुःखाने व्याकुळ होउन जसा कोणी उच्छ्वास टाकितो त्या सारिखा उच्छ्वास टाकित आहे, तें पाहून ख्रिस्ती पुसतो याजवरून काय जाणावें, बोधक उत्तर देतो तूं त्या मनुष्यास पूस.

त्याजवरून तो ख्रिस्ती त्या मनुष्यास पुसूं लागला किं तूं कोण आहेस, त्याने त्यास उत्तर दिल्हें

कीं पूर्वीं मी जो होतों तो मी आतां नव्हे.

ख्रि॰ — पूर्वीं तूं कोण होतास ?

तो मनुष्य सांगतो. पूर्वीं मीं चांगला उत्तम प्रकारचा भक्त होतों, मीं चांगला भक्त अशी माझी खात्री होती व लोकही मला असेंच समजत होते: मला असें वाटत होतें कीं मी दिव्य नगराच्या मार्गास लागलों आहें. आणि त्या नगराचें स्मरण झालें ह्मणजे असें वाटे कीं माझें तेथें जाणें घडेल असें वाटे त्याजवरून मला आनंद होई.

ख्रि॰ — बरें पण आतां तूं कसा आहेस ?

मनुष्य॰ — माझी आतां निराशा झाली, या लोखंडी पिंजऱ्या सारिखें त्या निराशेंने मला बंद केलें आहे. माझी मोकळीक होत नाहीं; अहाहा माझ्याने तर या बंदीतून निघवत नाहीं !

ख्रि॰ — बरें तुझी अशी अवस्था कशी झाली ?

म॰ — म्या जपून चालणें सोडून दिलें, मी सावध राहिलों नाहीं: मी आपल्या विषय वासना मोकळ्या सोडिल्या; मला शास्त्राचा प्रकाश प्राप्त झाला होता,

व ईश्वराची कृपा मजवर झाली होती, असें असतां ही म्यां पाप केलें: म्यां पवित्र आत्म्यास खिन्न केलें ह्मणून तो मजपासून दुरावला; म्यां सैतानास आमंत्रण दिलें ह्मणून तो मजपाशीं आला; म्यां ईश्वरास क्षोभविलें, ह्मणून त्याणें मला सोडून दिलें; म्यां माझें अंतःकरण कठिन करून घेतलें, ह्मणून माझ्या ठायीं पश्चात्ताप उत्पन्न होत नाहीं.

हें ऐकून ख्रिस्ती बोधकास पुसतो, बरें अशा मनुष्यास आतां कांहीं आशा राहिली नाहीं काय? बोधक उत्तर देतो हें तूं त्यालाच पूस.

ख्रिस्ती पुसतो आतां कांहीं आशा राहिली नाहीं काय, त्वां या निराशेच्या पिंजऱ्यांत राहावेंच काय?

म०—आतां कश्शी आशा.

ख्रि०—असें कां ह्मणतोस? कृपावंताचा पुत्र तर परम दयाळू आहे.

म०—म्यां तर त्यास पुनः मृत्यस्तंभीं दिलें; म्यां त्याचा धिक्कार केला, म्यां त्याच्या पुण्याची अवगण

ना केली, म्या त्याचें रक्त अपवित्र मानिलें, म्या कृ पेच्या आत्म्याला तुच्छ केलें, ह्मणून ईश्वरोक्त जीं वचनें त्यांतून आतां मला कोणत्याही वचनाचें फळ प्राप्त होणार नाहीं, मात्र न्याय होउन मजवर अग्निसारिखा क्रोध होईल आणि मला भयंकर दुःख प्राप्त होईल हेंच काय तें मला फळ.

ख्रि० — तर मग अशीं तूं आपली अवस्था कां करून घेतलीस?

म० — प्रापंचिक वासना, विषयभोग व प्रापंचिक लाभ हे गोड लागले ह्मणून, यांतच काय तें सुख म्यां मानिलें होतें: परंतु आतां हीं सुखें मला गांधळाच्या माशी सारिखीं डसतात, आणि अंतरीं टोंचितात.

ख्रि० — बरें आतां तुला पश्चात्ताप होउन तुझ्याने पुनः सन्मार्गास लागवत नाहीं काय?

म० — ईश्वर आतां माझ्या ठायीं पश्चात्ताप उत्पन्न होउं देत नाहीं. त्याच्या वचनावर म्या विश्वास ठेवावा अशी त्याच्या वचनावरून माझ्या ठायीं प्रेरणा होत नाहीं; आतां त्यानेंच या लोखंडी पिंजऱ्यांत मला

कोंडून ठेविलें आहे यांतून मला कोण सोडवील अ हा हा, अनंत काळा, मला अनंत काळ दुःख भास होणार त्या दुःखा बराबर मी कसा पुरा पडों?

नंतर तो बोधक त्या खिस्तीस ह्मणूं लागला कीं या मनुष्यास जें दुःख झालें आहे त्याची तूं आठव ण धर, आणि तें दुःख पाहून सर्वकाळ सावध अ स. खिस्ती बोलतो हें दुःख मोठें भयंकर, हे ईश्व रा मला अनुकूळ होउन जपून हुशारीने चालूं दे, आणि जेणें करून या मनुष्यास दुःख झालें आ हे तें मजकडून घडूं देउं नको. मग त्या बोधकास पुसूं लागला कीं महाराज आतां मी आपल्या मा र्गीं जाउं ना?

बो॰ — नको, जरा थांब तुला आणखी कांहीं एक दाखवितों. तें पाहून जा.

नंतर त्याने खिस्तीला एक्या खोलींत नेलें, ते थें पाहतो तों एकजण आपल्या आंथरूणावरून उठला आणि तो आपलीं वस्त्रें पांघरते वेळीं का पून भयाभीत झाला. तें पाहून खिस्ती पुसतो हा

मनुष्य इनका भयाभीत कां झाला आहे. तेसमयीं बोधकाने त्या मनुष्यास सांगितलें कीं आपल्या भयाचें कारण यास सांगावें; त्याजवरून तो मनुष्य सांगूं लागला; कीं रात्रीस म्या स्वप्न पाहिलें, त्यास्वप्नांत पाहतों तों आकाश अगदीं काळें होउन गेलें; मग फारच मोठ्याने गर्जना होउं लागली आणि वीज चमकूं लागली; तेणें करून मी भयाने व्याकूळ झालों. मग पाहतों तों आकाशांत अभ्राचे ढगाचे ढग चालूं लागले; इतक्यांत एक मोठा करण्याचा नाद ऐकिला, आणि आकाशवासी हजारो जणासहीत एक्या ढगावर बसलेला एकजण पाहिला: त्याचें तेज असें दिसों लागलें कीं जशा काय अग्निच्या ज्वाळाच उठल्या आहेत, आकाश ही ज्वालाने प्रदीप्त झालें. मग म्या अशी वाणी ऐकिली कीं जे मेलेले ते तुम्ही उठा आणि न्यायास याः त्याजवरून खडक फुटले, कबरा उघडल्या, आणि त्यांत जे मेलेले पुरले होते ते बाहेर आले; त्यांतून कितीएकांस तर फारच आनंद झाला, आणि वर

पाहूंलागले; कित्येकजण पर्वतां खालीं लपावयास पाहूंलागले: मगजो दगावर बसला होता त्यानें वही उघडली, आणि जगास जवळ बोलाविलें. त्याच्या आणि जगाच्या मधोमध एक भयंकर ज्वाला उठली होती ह्मणून न्याय करिते समयीं न्यायाधिशापासून बंदिवान जितके दूर असतात तितकें जग त्यापासून दूर राहिलें. मगजे दगावर बसणाऱ्याच्या समागमी होते त्यांस अशी आज्ञा झाली कीं जीं निंदण भूस धसकट आहेत त्यांस जमा करून जें मोठें तळें अग्निमय आहे त्यांत त्यांस टाका; अशी आज्ञा होतांच मी जेथें उभा राहिलों होतों तेथें एक खांच उघडली ती पाहतोंतों तिच्या तळाचा अंत च नाहीं: त्या खांचे तून पुष्कळ धूर आणि निखारे निघूंलागले आणि त्यांच्या निघण्यां बरोबर मोठे भयंकर शब्द होउंलागले. मग त्यां जमा करणाऱ्यां मनुष्यांस सांगितलें कीं माझे गहूं कोठारांत जमा करा. तेव्हां माझे असें दृष्टीस पडलें कीं बहुत्येक जणास धरून त्या दगांत नेलें; आणि मला मागें

च टाकून दिलें. ते समयीं मी ओपूं लागलों परंतु माझ्याने ओपवेना, कांतर तो ढगावर बसलेला मनुष्य माझ्या कडेस पाहतच होता: माझ्या पापाचें ही मला स्मरण झालें, आणि माझें मन मला अंतरीं खाऊं लागलें. असें होतांच मी जागा झालों."

ख्रि० — बरें त्यांजें पाहिलें स त्याचें तुला इतकें भय कां वाटलें.

म० — मला असें वाटलें कीं न्याय व्हायाचा दिवस आला, आणि त्या न्यायांत पार पडाया जोगी माझ्या कडून तर कांहीं तयारी झाली नाहीं: त शांत त्या देवदूतानी कित्येकांस जमा करून नेलें आणि मला मागेंच टाकून दिल्हें; मी जेथें उभा राहिलों होतों तेथें नरकाची खांच उघडली. मा झें मन मला अंतरीं टोंचूं लागलें; आणि मला असें वाटलें कीं तो न्यायाधीश रागें भरून मज कडेस नेहेमी पहात आहे. म्हणून मला इतकें भय वाटलें.

ते समयीं बोधक त्या ख्रिस्तीस सांगतो, तुला जें सर्व दाखविलें त्याचा त्वां विचार केलास ना?
ख्रि० — होय केला तें ऐकून माझ्या ठायीं आशा आणि भय उत्पन्न होतात?
बो० — बरें तर त्या गोष्टीची चांगली आठवण ठेव, ह्मणजे त्याची तुला टोंचणी होउन तूं आपल्या मार्गाने सरळ जाशील. ते समयीं ख्रिस्ती कंबर बांधून आपल्या मार्गीं जावयास सिद्ध झाला. तें पाहून बोधकाने त्यास आशीर्वाद दिला अरे बाबा ख्रिस्ती, शांतिदाता तुझ्या समागमे नित्य असो, आणि दिव्यनगरास जो मार्ग जातो त्या मार्गाने तुला नेवो. तो आशीर्वाद घेउन ख्रिस्ती तेथून निघाला, आणि आपल्या मार्गाने जात असतां मुखाने गातगात चालिला आहे.

अभंग

येथें म्या पाहीलें ऐकिलें जें कानी,
थोडे तेसें जनीं दिसे मज १
हितकारी आणि संतोषदायक,

भय ही कारक, दाखविलें. २
अचल बुद्धि राहे आरंभिल्या कार्यी,
ऐशी सोई मज कळविली. ३
हा बोध मजला राहो स्मरो नित्य,
बोधकें साहित्य केलें माझें. ४
विसरेंना कदां तयाच्या उपकारा,
धन्य त्या दातारा, वानी तसें. ५

मग म्या असें स्वप्नांत पाहिलें कीं ज्या थोरल्या मार्गा ने ख्रिस्ती जाणार त्याच्या दोन्हीं कडेस भिंती बांधिल्या आहेत, आणि त्या भिंतीस तारण असें ह्मणतात. ५६ या मार्गी तो ख्रिस्ती धांवत आऊं लागला परंतु त्याच्या पाठीवर जें ओझें होतें त्याच्या भारामुळें कुंथत कुंथत चालला. याप्रमाणें चालतां चालतां एक काहींशी चढण होती तेथें तो आडुन पोंहचला, त्या चढणीवर एक मृत्युस्तंभ रोंवला आहे, त्याच्या खालीं एक कबर आहे. त्या मृत्युस्तंभाची व ख्रिस्तीची भेट होतांच याच्या पाठीवर जें ओझें होतें त्याच्या दोऱ्या तुटून तें खालीं पडलें आणि

गडबडत जाउन त्या कबरीच्या तोंडीं पडलें तें तेथें नाहींसें झालें.

या प्रमाणें ख्रिस्तीचें ओझें जाउन ख्रिस्ती मोकळा होउन संतोषित झाला, आणि अंतरीं मोठा हर्ष पावून बोलूं लागला कीं "त्यानें दुःख भोगून मला सुख दिलें, आणि मरण पावून मला जीवन दिलें" असें बोलून उगाच पहात राहिला. मृत्युस्तंभाची भेट होतांच ओझें दूर झालें त्याजवरून त्यास आश्चर्य वाटलें. मग पाहतांपाहतां त्याच्या नेत्रांतून अश्रुपात होउं लागले. या प्रकारें तो पहात वरडत असतां त्याच्या जवळ तिघेजण आले त्यांचीं शरीरें केवळ देदीप्यमान ते त्यास आशीर्वाद देउं लागले, "तुझें कल्याण असो" मग पहिला त्यास बोलूं लागला कीं तुझ्या पापाची तुला क्षमा होउ; नंतर त्या दुसऱ्यानें त्याच्या आंगावरल्या चिंध्या काढून त्यास नवीन [५८] वस्त्र लेववलें. मग तिसऱ्यानें त्याच्या कपाळावर कांहीं चिन्ह केलें, आणि शिक्का मारलेला असा एक पट त्यास दिला [५९], आणि असें सांगितलें कीं

मार्गांतून आलें असतां हा पद पाहावा आणि दिव्य नगराचा दरवाजा लागला ह्मणजे तेथें हा घ्यावा. या प्रमाणें सांगून ते चालते झाले. मग तो ख्रिस्ती हर्ष पावून आनंदानें उडत व गात चालिला.

आर्या

पापाचें जें ओझें, वाहुन आलों किं येथवर पाहीं;
तेणें व्याकुळ कष्टी, होतों परि या स्थळीं सुखें राहीं १
हें स्थान कोण आहे, कीं येथुन त्या सुखास आरंभ;
मत्पृष्ठीचें ओझें, पडलें धरणी असा बहुत लाभ २
मृत्युस्तंभ मतापी; माझीं येथें किं बंधनें तुटलीं;
कवरीला कितिवानूं, ओझ्याची सबळ ग्रंथि कीं सुटली. ३
ज्याचा प्रताप ऐसा तोच मला बहुत धन्य वाटे कीं;
माझ्या कार्यालागीं मृत्यस्तंभीं सलज्ज शिर टेंकी. ४

मग मला असें स्वप्नांत दिसलें कीं तो ख्रिस्ती उतरून त्या उतरणीचे शेवटास पोंहचला ते समयीं त्याच्या दृष्टीस तीन मनुष्य पडले, त्यांच्या पायीं बिड्या होत्या व ते मार्ग सोडून काहींसे एकीकडेस गाढनिजले होते. त्यांचीं नावें; एक भोळसर, दुसरा आळशी, आणि

तिसरा अभिमानी.

या प्रमाणें निजलेले पाहून त्यांस जागें करावें या बुद्धीने ख्रिस्ती त्यांच्या जवळ गेला; आणि ओरडून त्यांस ह्मणतो अहो तुह्मी तर तुटलेल्या कड्या वर निजणारा सारिखे निजले आहां, तुमच्या खालीं मोठा समुद्र आहे आणि ज्यांत अंत लागत नाहीं असें पाणी आहे: याजकरितां जागे होउन इकडे या; येण्याविषयीं काहीं अनमान करूं नका, मी तुमच्या बिड्या काढायास साह्य होतों. जो गर्जन सिंहा सारिखा फिरत आहे, तो जर येथें आला तर तुह्मी त्याच्या तोंडांत आइतेच पडाल. तें ऐकून ते ख्रिस्ती कडेस पाहून उत्तर देऊं लागले: भोळसर ह्मणतो, मला तर भय कोठे दिसत नाहीं: आळशी ह्मणतो भय असेल तर असो पण मा स्याने जरा आणखी झोंप घेतल्या वांचून उठवत नाहीं: अभिमानी ह्मणतो प्रत्येक पात्रास खालीं बैठक आहे मग तें कशाने पडणार. असें बोलून ते पुनः निजले, मग ख्रिस्ती आपल्या मार्गीं चालता झाला.

ख्रिस्तीने त्यांस आगें करून विचार सांगितला आणि त्यांच्या पायांतल्या बिड्या काढण्या विषयीं सिद्ध झाला, या प्रकारें त्यांजवर कृपा केली असतां ही त्याची त्यांनी अवगणना केली, आणि पहिल्या च प्रमाणे संकटांत राहिले त्याजवरून ख्रिस्ती खिन्न झाला. या प्रकारें तो दुःखांत आहे इतक्यांतत्या ने त्या अरुंद मार्गाच्या डाव्या कडल्या भिंतीवरून दोन मनुष्य उतरतांना पाहिले; एक कर्मठ आणि एक ढोंगी. मग ते येउन याचा बरोबर चालूं लागले. ते समयीं त्यांच्या याच्या गोष्टी होउं लागल्या.

ख्रि॰ — कां महाराज, आपण कोठून आलां, आणि कोठे जात आहां?

कर्मठ आणि ढोंगी, उत्तर देतात. आह्मीं व्यर्थ वै भवाच्या देशीं जन्मलों, आणि जियोन पर्वताकडे स स्तुति करितां जातों आहों.

ख्रि॰ — तरमग या मार्गाच्या आरंभीं जो दरवाजा आहे त्या दरवाज्या मधून कां आलां नाहीं, "जो दा राने शिरत नाहीं, परंतु दुसऱ्या ठायीं चढतो, तो चोर

व लुटारू आहे[६२]" असें जें लिहिलें आहे तें आपण जाणत नाहीं काय ?

ते दोघेजण उत्तर देतात, आमचे अवघे गांवकरी सांगतात कीं त्या दरवाज्यांतून आलें असतां फार लांब पडतें; याजकरितां त्यांची अशी चाल आहे कीं कोठे आडवाट मिळाली ह्मणजे तिकडून शिरावें अथवा भिंत आड आली तर तिजवरून चढावें, त्याप्रमाणें आह्मी या भिंतीवरून आलों.

ख्रि॰ — पण आपण ज्या पर्वताच्या नगरास जात आहों तेथल्या प्रभूची इच्छा आपल्यास कळविली आहे, त्या इच्छेप्रमाणें आपण जर न चाललों तर त्याचे आपण अपराधी ठरों किं नाहीं ?

क॰ व ढों॰ — अहो तुह्मास त्या गोष्टीशीं काय कारण आहे; आह्मी जें केलें आहे तें मागल्या चालीच प्रमाणें केलें आहे, आणि ही चाल आज हजार वर्षे चालत आली आहे अशा ह्याव्यात तर साक्षी देउ.

ख्रि॰ — अहो पण न्यायाधीश तुमची चाल कबूल

करील काय?

क० वदों०—अरन्यायाधीश निस्पृह असला तर हजार वर्षे चालत आलेली जी चाल ती तो कबूल करील: आणखी असें आहे आह्मी कोणत्याही वाटेने आलों पण मार्गास लागलों इतकें पुरे: तुह्मीत्या दरवाजाने येउन या मार्गास पोंहचले आहा, आह्मी त्या भिंतीवरून चढून येथेंच आलों आहों. एकून आपण कसेही आलों पण येउन एक्याच मार्गास पोंहचलों आहों. तुह्मी दरवाज्याने येउन आल्या पेक्षां विशेष काय मेळविलें?

ख्रि०— अहो पण मी माझ्या स्वामीच्या नियमाने चालतों तुह्मीतर तुमच्या छंदाने चालतां. या मार्गाचा जो धनी आहे त्याच्या मतें तुह्मी चोर आहां, याजकरितां तुह्मी यामार्गाच्या शेवटीं पोंहचला, असतां तुह्मी प्रामाणिक मनुष्य असे ठरणार नाहींत. तुह्मी या मार्गीं आपल्या आपणच आलां त्याचे आज्ञेने आलां नाहीं; ह्मणून तुह्मी आपल्या आपणच येथून जाल, त्याची तुह्मावर दया होणार नाहीं.

या भाषणास त्यांच्याने कांहीं चांगलें उत्तर देववलें नाहीं; इतकेंच बोलले कीं तुह्मी आपलाच विचार करीत बसा. त्याजवरून मग त्यांचें फारसें बोलणें झालें नाहीं, ज्याचा तो आपल्या वाटेने गेला; परंतु जातां जातां इतकें बरीक ते दोघे जण त्या ख्रिस्तीस बोलिले कीं नियम व आज्ञा यांज विषयीं पुसाल, तर आह्मी तुमच्याच सारिखे चालूं, त्या विषयीं आपण संशय धरूं नये. याजकरितां तुह्मी आमच्याहून कोणत्या गोष्टीने अधिक हें आह्मास नकळे. इतकेंच कीं तुह्माजवळ एक आंगरखा आहे. तो तरी तुह्मास तुमच्या कोणी शेजाऱ्याने तुमचें नग्न शरीर झांकण्या विषयीं दिला असावा, तसा बरीक आमच्याजवळ नाहीं.

ख्रि॰ — नियम आणि आज्ञा यांनी तुह्मी तरणार नाहींत, तुह्मी त्यांचा अतिक्रम केला; कां तर दरवाज्याने यावें अशी आज्ञा व नियम असतां तुह्मी त्या दरवाज्याने आलां नाहीं. माझ्याजवळ जो आंगरखा आहे तो मला मी जेथें जात आहें तेथल्या प्रभूने

मला दिला, आणि तो माझ्या नग्न शरीराच्या संरक्षणार्थ आहे असें आपण बोलतां तें सत्य. हा आंगरखा प्रभूने दिला ही मी त्याची कृपाच समजतों. कां तर पूर्वी माझ्या आंगावर चिंध्या होत्या; हा आंगरखा मला मिळाला आतां तेथें आण्याविषयीं हर्ष वाटतो: याजवरून असें वाटतें कीं मी त्या नगरच्या दरवाज्याशीं आउन पोहचलों ह्मणजे याच्या आंगांतल्या दिलेला आंगरखा आहे त्याजवरून हा भला मनुष्य आहे, असें तेथला प्रभू समजेल. त्याने माझ्या आंगावरल्या चिंध्या काढून टाकिल्या त्याच दिवशीं हा आंगरखा मला फुकट दिला. आणखी माझ्या कपाळावर खुण केली आहे, ही तुह्मी कदाचित् पाहिली नसेल. ज्या दिवसीं माझ्या पाठी वरचें ओझें काढून टाकिलें त्याच दिवसीं माझ्या प्रभूचे जे अत्यंत सलगीचे त्यांतून एकाने ही खुण माझ्या कपाळावर केली. आणखी त्याच दिवसीं मला हा पट दिला, याजवर शिक्का आहे. मी आपल्या मार्गी जातांना हा वाचून समाधान पावावें ह्मणून हा मला

दिला आणि असें सांगितलें आहे कीं हा पट त्या दिव्य नगरच्या दरवाज्याशीं पोंहचलें असतां तेथें दाखल्यास द्यावा ह्मणजे मला आंत आण्या विषयीं निश्चित आज्ञा होईल. ह्या सर्व वस्तू तुह्मापाशीं नाहींत असें मला वाटतें. ह्या तुह्मास मिळाल्या नाहींत याचें कारण हेंच कीं तुह्मी त्या दरवाज्यानें आलां नाहीं.

हें ऐकून त्यां उभयतांनी ख्रिस्तीस कांहीं उत्तर केलें नाहीं, इतकेंच कीं ते एकमेकाकडेस पाहून हांसूं लागले. मग म्या असें पाहिलें कीं ते चालते झाले परंतु ख्रिस्ती त्यांच्या पुढें चालला तो त्यांसीं गोष्टी न सांगतां आपल्या आपणच बोलावें, कोठे उच्छ्वासदेत असावें, कोठे समाधान वृत्तीने असावें या प्रमाणे चालला, त्यास त्या देदीप्यमान शरीर धारण करणाराने जो पट दिला होता तो वाचित असावें, तेणेंकरून जिवास विश्रांति करून घ्यावी, या प्रमाणें तो ख्रिस्ती आपल्या मार्गाने जाऊं लागला.

मग म्या असें पाहिलें कीं ते तिघेजण अडचणी

च्या डोंगरासीं आउुन पोंहचले, त्या डोंगराचे खा लच्या अंगी एक झरा आहे, तेथून दोन वाटा नि घाल्या, एक उजवे हाताकडेस गेली व एक डावे हा ताकडेस गेली. परंतु जी अरुंद दरवाज्या वरून आ ली ती तशीच नीट पुढें डोंगरावर गेली. जी वाट डों गरावर गेली तिचें नाव अडचण. मग ख्रिस्ती त्या झऱ्याजवळ आउुन त्यांतलें पाणि प्याला आणि वि सावा घेउुन गात गात त्या डोंगरावर चढूं लागला.

चाल

पर्वत हा बहु उंच दिसे परि इच्छित मानस
त्यावरि जाया, आड हि काहिं तरी जरि ये
इल काय शिणेल हटेल हि काया;
जीवन तेथें असेन असत्य असा मनि
बोध हो निश्चिंत झाला, सत्वर निर्भय ये
ई मना तरि पूर्ण करी मम हेतु उदेला. १
दुर्गम कष्टद आहे परि दिठि दावित लक्ष्य
असा पथ आहे, जाइं तया तुनि आदरें
निश्चित चालें तयामधें नित्य तुं राहें;

लक्ष्य न दावुनि दुःखद अंतिं हि जो पथ आ
हे असा कुमताचा, जाणें सुखें असलें प
रि त्यांतुन इच्छि, निरंतर त्याग तयाचा. १

ते दोघे ही त्या पर्वता जवळ आले; परंतु तो उंच, चढायास बिकट, आणि त्याच्या खालून ज्या दोन वाटा निघाल्या त्या वाग या पर्वताच्या पलिकडल्या अंगाने जाउन ख्रिस्ती ज्या वाटेने गेला त्या वाटेस मिळाल्या असतील असें मानून एकाने एक वाट धरली, व दुसऱ्यानें दुसरी धरिली. त्यांचीं नावें, एक संकटी व एक नाशी. संकटी वाटेने जो गेला तो एक्या मोठ्या घोर रानांत जाउन पडला; आणि नाशी वाटेने जो गेला तो जेथें अंधकारमय पर्वत आहेत अशा ठिकाणी भ्रमण करूं लागला. तेथें ठेंच लागून पडला तो पुनः उठलाच नाहीं.

मग मी ख्रिस्ती कडेस पाहूं लागलों तों त्या डोंगराच्या बिकटपणामुळें धांवत होता तो चालूं लागला, मग चालतां चालतां हात पाय भुईस टेंकून चढूं लागला.

ते समयीं त्या पर्वताच्या मध्यभागीं एक रमणीय मंडप आहे. श्रमलेले भागलेले जे वाटसरू त्यांस विश्रांतिकरितां त्या पर्वताच्या स्वामीने तो मंडप केला आहे, तेथें ख्रिस्ती येउन विसांव्यां करितां बसला आणि आपल्या वक्षस्थळांतून पट काढून आपल्या समाधानार्थ वाचूं लागला; मग त्यास मृत्युस्तंभाजवळ जो आंगरखा मिळाला होता तो पुनः न्याहाळून पाहूं लागला. या प्रकारें संतोषांत आहे इतक्यांत त्यास डुलकी येउं लागली, मग असतां असतां घोर निज लागली. त्यामुळें उणापुरा संध्याकाळ होई तों पर्यंत तेथेंच त्याचें राहाणें झालें आणि त्या निद्रेच्या भरांत असतां त्याच्या हातांतून तो पट पडला. ते समयीं त्याच्या जवळ कोणी एक गृहस्थ येउन त्यास जागें करून बोलतो. "अरे आळश्या, मुंगी कडेस जा आणि तिची चाल पाहून शाहाणपण धर." तें ऐकून ख्रिस्ती गडबडून उठला तो चालताच झाला, आणि त्या पर्वताच्या शिखराशीं जाउन पोंहचे तों पर्यंत तो हळू चालला नाहीं.

मग ख्रिस्ती त्या पर्वत शिखरास गेला तेव्हां तिक

डून दोघेजण मोठ्या गडबडीने याजकडेस आले, त्यां
तून एकाचें नाव भ्याड व एकाचें नाव अविश्वासू; त्यां
स ख्रिस्ती ह्मणतो अहो गृहस्थ काय झालें, तुह्मी आ
डवाटेने कोठे चाललां? आह्मी बावाजीयोन नगरास
जात होतों, परंतु वाट मोठी बिकट, असें असें पुढें जा
वें तसें तसें अधिकच संकट प्राप्त होतें ह्मणून आह्मी
मागें फिरून परत चाललों आहों.

अविश्वासू ह्मणतो, भ्याड दादा सांगतो तें खरें आ
हे, आह्मी जात होतों त्या वाटेच्या तोंडींच दोन सिंह ब
सले आहेत; कोण जाणे निजले किंवा जागे आहेत;
त्यांस पाहून तर आह्मास असें वाटलें कीं जर पुढें पा
उल घातलें तर हे आमचा ग्रासच करून टाकतील.

ख्रिस्ती उत्तर देतो, अहो तुमचें बोलणें ऐकून म
ला तर भय वाटतें, परंतु भय वाटलें तरी माझें संरक्ष
ण व्हावयास मी कोठे पळून जाऊं. म्या आपल्या गा
वीं परतून जावें, तर तेथें अग्नि आणि प्रज्वलीत गं
धक पडणार, तेथें माझा नाश होणें राहील काय? प
रंतु जर माझें दिव्यनगरास जाणें झालें तरच माझें सं

रक्षण होईल; ह्मणून मी कसें तरी करून तेथें आई न: घरीं परत गेलों असतां मरणच प्राप्त होईल; या मार्गांत पुढें गेलों तर मरणाची भीति आहे; परंतु त्या मरणाच्या पलिकडेस निरंतर जीवन आहे: असें आहे याजकरितां मी पुढेंच चालू करितों. असें बोलणें होउन भ्याड आणि अविश्वासू हे दोघेजण त्या डोंगरावरून खालीं उतरले आणि ख्रिस्ती आपल्या मार्गाने गेला. मग त्या दोघांजणापासून जें ऐकिलें होतें तेणेंकरून चित्तास जें किल्मिष प्राप्त झालें तें जाउन समाधान व्हावें ह्मणून वाचाया करितां ख्रिस्तीस पटाचें स्मरण झालें, तों पाहातो तर तो पट नाहीं. तेसमयीं त्यास मोठें दुःख झालें, पुढें कसें काय करावें हें कांहीं सुचेना, समाधान करून घेण्याची जी वस्तू तीच हातांतून गेली, दिव्यनगरास जाण्याचा मार्गाचें जें दस्तक तेंच हारवलें, आतां मी काय करूं, या प्रकारें खिन्न होउन विचार करीत बसला. मग शेवटीं त्यास असें वाटलें कीं मी त्या मंडपांत निजलों होतों त्या निजेने घात घेतला; तेसमयीं आपल्या

अपराधाची क्षमा व्हावी ह्मणून त्याने गुडघे टेंकून ईश्वराची प्रार्थना केली, नंतर तो पट पहावयाकरितां परतआउं लागला. त्या वेळीं त्याच्या अंतरीं जें दुःख आलें तें सांगतां येत नाहीं. त्या खेदामुळें कोठे उच्छ्वास टाकावा, कोठे रडावें आणि वारंवार असें बोलत असावें कीं मला धिक्कार असो! अरे जें ठिकाण भागल्या शिणल्यास थोडयाशा विसांव्याकरितां केलें आहे तेथें म्या मूर्खाने निजून राहावें काय? अशा स्थितीने तो मार्गाच्याकडेने पट शोधीत शोधीत चालला, कीं कोठे पडला असला तर अढळेल. मग तो मंडप दृष्टीस पडला तेव्हां तेथें बसून रडूं लागला आणि त्या निद्रेचें स्मरण मनांत आणून फारच शोक करूं लागला. " अहाहा किती मी दुष्ट! म्या दिवसास निजावें काय! " मला या संकटांत निद्रा यावी काय? जे यात्रेकरू श्रम पावतात त्यांस जो विसावा पर्वताच्या स्वामीने करून ठेविला आहे. तो विसावा म्या शरीर सुखाकडेस लावून घ्यावा काय? हाय हाय किती मासें चालणें व्यर्थ गेलें! असेंच इस्राइल लोकांस घडलें. त्यांच्या पातकामुळें

त्यांस लाल समुद्रावरून परत जावें लागलें. ही पापिणी निद्रा मला आली नसती तर म्या सुखाने मार्ग क्रमिला असता, तिनका मार्ग मला त्या निद्रेमुळें दुःखानें क्रमावा लागला. येव्हढया वेळांत मी कोठे जाउन पोंहचलों असतों. ही भूमि एकवेळ क्रमायाची तर मला तीन वेळ क्रमावी लागली; तशांत आतां कांहीं दिवस राहिला नाहीं, रात्र पडली असतां म्या काय करावें: अहाहा: मी निजलों नसतों तर इतक्या संकटांत कांपडतों. मग तो त्या मंडपांत येउन पोंहचला आणि तेथें बसून रडूं लागला. शेवटीं ईश्वराने त्याच्या मनांत प्रेरणा केली, त्याजवरून तो दुःखाने खालीं पहात आहे इतक्यांत तो पट आसनाखालीं त्याच्या दृष्टीस पडला; तेसमयीं त्याने कांपत जाउन तो अतित्वरेने उचलिला आणि आपल्या वक्षस्थळीं ठेविला. हा पट त्यास गंवसल्यावरून जो आनंद झाला तो सांगतां येत नाहीं, कांतर हा पट हातीं येतांच त्यास असें वाटूं लागलें कीं आतां जीवन प्राप्ती विषयीं कांहीं धोका नाहीं आणि मी ज्या स्थानीं जात आहें त्यास्थानीं माझें राहणें होण्या

स कांहीं अडथळा होणार नाहीं. या प्रकारें तो पट सां पडल्या वरून ख्रिस्तीने ईश्वराचें स्तवन केलें कीं, हे ईश्वरा तुझी कृपा काय वर्णावी, जेथें हा पट पडला होता तेथेंच माझी दृष्टी आपण लाविली. मग आनंदयुक्त जाला आहे, नेत्रीं अश्रु आले आहेत, अशा स्थितीने तो आपल्या मार्गाने जाता झाला. ते समयीं तो त्या पर्वतावर अति त्वरेने चढला, परंतु तो त्या नेमलेल्या ठिकाणी जाउन पोंहचला नाहीं इतक्यांत दिवस मावळला. तेव्हां पुनः त्यास त्या निद्रेचें स्मरण होउन अंतरीं दुःख होउं लागलें: अगे पापिणी निद्रे, तुझ्याकरितां मला हा मार्ग अंधारे रात्रींत क्रमावा लागला! आतां मला प्रकाश कोठून मिळतो, मार्ग केवळ अंधाराने व्याप्त होउन गेला आहे, अगे दुष्ट निद्रे तुझ्याकरितां आतां मला भयंकर श्वापदांचा शब्द ऐकावा लागेल. असें बोलत आहे इतक्यांत त्यास भ्याड आणि अविश्वासू यांनी जी सिंहा पाहून भय पावल्याची गोष्ट सांगितली होती तिचें स्मरण झालें, ते समयीं ख्रिस्ती ह्मणूं लागला कीं हीं श्वापदें रात्रीस आपल्या आ

ह्यारार्थ फिरतात, आणि या आंधारांत त्यांची माझी गांठ पडली तर मी त्यांच्या हातून कसा सुटेन? ते तर मला फाडून माझे रज रज करतील. या प्रकारें तो त्या घोर मार्गांतून शोकें करून चालत असतां त्यानें ईश्वराची प्रार्थना केली, तेव्हां त्या थोरल्या मार्गाच्या कडेस एक मोठें मंदिर दृष्टीस पडलें, त्याचें नाव सुंदर मंदिर.

मग म्या असें स्वप्नांत पाहिलें कीं त्या मंदिरांत जाउन उतरावें या बुद्धीनें तो ख्रिस्ती त्वरेनें चालूं लागला, ते समयीं मंदिराच्या देवढीशीं पोहचायास हांकेचें अंतर मात्र होतें तेथून आंखूड मार्ग लागला. त्या मार्गांत जातांच पुढें निरखून पाहतो आहे इतक्यांत दोन सिंह त्याच्या दृष्टीस पडले. ते समयीं त्यास स्मरण झालें कीं याच भयानें भ्याड आणि अविश्वासू मागें हटले असतील. ते सिंह तर सांखळेले होते, परंतु त्या सांखळ्या त्यांच्या दृष्टीस पडल्या नाहीं, ते समयीं त्यास भय वाटून आपण ही त्यां दोघांजणां प्रमाणे परत जावें असें मानूं लागला; कां तर पुढें मरणच ठाकलें आहे असें त्यास वाटलें. तेव्हां तेथें जो देवडीवर पाहारेकरी हो

ता तो ख्रिस्तीचा परत आण्याचा रंग पाहून त्यास हा कमाहून ह्मणतो. कायरे तुझें धैर्य इतकें अल्प आहे काय? त्यां सिंहांस भिउं नको, ते सांखळेले आहेत, विश्वासू कोण आहेत, आणि नाहींत कोण, हें पाहावयास त्यां सिंहांस तेथें ठेविलें आहे. तूं आपल्या मार्गानें चाल, ह्मणजे तुला कांहीं धोका नाहीं.

मग म्या पाहिलें तों तो ख्रिस्ती त्यां सिंहांच्या भयामुळें कांपत कांपत चालता झाला; आणि त्या पाहरेकऱ्यानें सांगितलें होतें त्याप्रमाणें त्यानें केलें. त्यां सिंहांनी त्यास पाहून गर्जनामात्र केली, परंतु त्यांजपासून त्यास कांहीं अपाय झाला नाहीं. मग तो टाळ्या पिटून पुढें चालला आणि ज्या दरवाज्याशीं पाहारेकरी होता तेथें जाउन उभा राहिला. मग तो त्या पहारेकऱ्यास पुसूं लागला कीं हें घर कोणाचें आहे बाबा? मी येथें आजची रात्र राहिलों तर कांहीं हरकत नाहीं ना. तेव्हां त्या पाहारेकऱ्यानें उत्तर दिलें कीं हें घर या पर्वताच्या स्वामीनें यात्रेकरू लोकांस विसाव्याकरितां व त्यांच्या संरक्षणासाठीं बांधिलें आहे. आणखी ख्रिस्तीस तो पहा

रे करीं पुसूं लागला कीं तुह्मी कोठून आलां आणि को ठे जात आहां ?

ख्रि॰ — मी विनाशनगराहून आलों आणि जियोन पर्वतास जात आहें; पण आतां दिवस मावळला ह्म णून आजची रात्र येथें राहवें असें माझ्या मनांत आ लें आहे.

पाहरे॰ — तुमचें नाव काय ?

ख्रि॰ — आतां माझें नाव ख्रिस्ती झालें, पूर्वी माझें नाव अयहूपेंतग असें होतें: मी ज्याफेथाच्या वंशां तला आहें, त्या वंशास ईश्वर शेमाच्या तंबूंत राहवी ल असें त्याचें वचन आहे.

पा॰ — बरें पण तुह्मास येथें यावयास इतका वेळ कां लागला? आतां सूर्य तर अस्तास गेला.

ख्रि॰ — मी येथें लौकरच आलों असतों परंतु वाटे नें येत असतां या पर्वतावर एक मंडप लागला तेथें मला पाप्याला झोंप लागली, मला झोंप लागली हो ती तरी मी येथें लौकरच आलों असतों, परंतु त्या निजेंत असतां माझ्या अवल्याचा पट हारवला आ

णि त्याची शुद्धि नराहतां मीं तसाच पुढें आलों. मग तो पाहूं लागलों तोंजवळ नाहीं ह्मणून तसाच मागें परत लों आणि शोक करीत करीत जेथें निजलों होतों तेथें गेलों. तेथें तो पट मिळाला तो घेउन आलों ह्मणून इतका वेळ लागला.

पाहारेकरी. — बरें तर येथें ज्या कुमारी आहेत त्यांतून एकीस बोलावितों, आणि तिला जर तुझें भाषण आवडलें तर ती दुसरीं जीं कुटुंबाचीं माणसें आहेत त्यांशीं तुह्मास, या घराच्या संप्रदाया प्रमाणें भेटवील. मग त्या पहारेकऱ्यानी घंटा वाजविली तो शब्द ऐकून एक प्रौढ सुंदर कुमारी आली, तिचें नाव सुमति, ती येउन पुसूं लागली कीं मला कां बोलाविलें.

त्या जवरून तो पहारेकरी ह्मणूं लागला कीं हे गृहस्थ विनाश नगर सोडून सियोन पर्वतास जात आहेत, हे श्रमले आहेत व रात्र पडली आहे याज करितां रात्रीस येथें रहावें ह्मणून हे सांगत आहेत. म्या यांस सांगितलें आहे कीं मी कुमारी बाईस बोलवितों त्यांच्या जसें विचारास येईल तसें त्या घरच्या संप्रदाया प्रमाणें

करतील.

ते समयीं ती कुमारी त्यास पुसूं लागली कीं तुह्मी कोठून आलां आणि कोठे जात आहां ? त्याजवरून तो आपला वृत्तांत सांगूं लागला. मग ती सुमति पुसूं लागली कीं तुह्मी या मार्गास कसे लागलां? त्याजवरून त्याने तें वर्तमान सांगितलें. नंतर तिणें त्यास विचारिलें कीं तुह्मी मार्गांत काय काय पाहिलें आणि तुह्मास काय काय झालें, मग त्याने त्याचें ही उत्तर दिलें, शेवटीं त्यास त्याचें नाव विचारिलें. तेव्हां त्याने सांगितलें कीं माझें नाव ख्रिस्ती; आणि येथें आज रात्रीस वसती करावी असें फार माझ्या मनांत आहे; कां तर जे या भेकरू आहेत त्यांस विसांव्या करितां व रक्षणा साठीं पर्वताच्या स्वामीने हें स्थळ येथें केलें आहे; तें ऐकून ती सुमति हांसूं लागली, आणि तिच्या डोळ्यांत आंसवें आलीं; मग अमळ स्तब्ध राहून ती ह्मणूं लागली कीं आमच्या कुटुंबांतील दुसऱ्यां दोघां तिघांस बोलाबितें. नंतर तीने दाराजवळ जाउन प्रज्ञा, भक्ति, प्रीति, यांस बोलाविलें; त्यांचें त्याबरोबर कांहीं भाषण होउन त्यांनी त्या

स घरांत बोलाविलें; ते समयीं त्या कुटुंबांतील बहुत्येक जण त्यास द्वाराजवळ भेटले ते ह्मणूं लागले, आंत यावें तुजवर प्रभूची कृपा झाली, तुझ्या सारिखे जे यात्रेकरू येतील त्यांस रहावयास हें घर या पर्वताच्या स्वामीने बांधलें आहे. त्या कार्चीं त्याने त्यांस नमन करून त्याच्या मागून तो घरांत आउन बसला, तेव्हां त्यानी त्यास कांहीं प्यायाला दिलें आणि असा ठराव केला कीं भोजन सिद्ध होई तों पर्यंत कालक्रमणाकरितां आपल्या मधून एकाने या खिस्तीशीं संभाषण करावें: मग भक्ति, प्रज्ञा, प्रीति, ह्या संभाषण करायास पुढें झाल्या, त्यांतून प्रथम भक्तीने आरंभ केला:

भक्ति॰ — कां बाबा खिस्ती आमचा तुजवर फार लोभ आहे, आह्मी तुला आज रात्रीस येथें राहून घेतलें; ह्मणून तुला मार्गांत जें जें घडलें असेल तें सर्व आह्मास त्वां सांगावें. त्या गोष्टी आपल्यास हितावह होतील.

खि॰ — बहुत बरें आपण तें वर्तमान ऐकूं इच्छितां हें पाहून मला फार आनंद झाला.

भक्ति० — बरें त्वां कोण त्या निमित्तानें ही यात्रा आरंभि ली ?

ख्रि० — माझ्या कानांत नित्य एक असा भयंकर शब्द होत असे कीं तूं जर या जागेंत राहिलास तर तुझा अवश्य नाश होईल, ते समयीं म्या तें आपलें जन्मस्थान सोडून दिलें आणि ही यात्रा आरंभिली.

भक्ति० — बरें पण त्वां आपलें जन्मस्थान सोडून दिलें ते समयीं हाच मार्ग धरावा हें तुला कसें सुचलें.

ख्रि० — तें ईश्वरानेंच सुचविलें; आतां माझा नाश होतो असें मला ज्या काळीं भय प्राप्त झालें, त्या काळीं कोठे पळून जावें, काय करावें हें कांहीं सुचेनासें झालें, ते समयीं मी त्या भीतीनें कांपून रडूं लागलों, इतक्यांत तेथें एक पुरुष आला त्याचें नाव सुवार्तिक त्यानें मला अरूंद द्वार दाखविलें, त्यावांचून तें द्वार मला मिळालेंच नसतें, मग त्या द्वारांत जों शिरलों तों थेट या घरीं येउन पोहचलों.

भक्ति० — तूं बोधकाच्या घरावरून आलास ना ?

ख्रि० — होय, आणि तेथें जें जें म्यां पाहिलें तें मी ज

न्मपर्यंत विसरणार नाहीं असें त्याचें दृढस्मरण मा झ्या हृदयीं राहिलें आहे. भक्तांच्या अंतःकरणांत जो कृपासंस्कार उत्पन्न होतो तो नाहींसा करावयास सैतान शकत असतां त्यां कृपासंस्कारांचे ख्रिस्त कसें संरक्षण करितो; आणि ईश्वर कृपेची आशा अगदी नराही इतकें मनुष्यानें पाप कसें केलें; आणि जो निजला होता त्यास न्याय ठरविण्याच्या दिवसाचें स्वप्न कसें पडलें, या तीन गोष्टीचें तर मला फारच स्मरण राहिलें आहे.

भ० — त्वां तें स्वप्न ऐकून घेतलें काय?

ख्रि० — होय, तें भयंकर स्वप्न म्या ऐकून घेतलें तो तें स्वप्न सांगूं लागला तेसमयीं माझे रोमांच उभे राहिले; परंतु तें म्या ऐकून घेतलें म्हणून बरें झालें.

भ० — त्या बोधकाच्या घरीं त्वां इतकेंच पाहिलेंस?

ख्रि० — इतकेंच नाहीं, त्याने मला एक्या मोठ्या मंदिरांत नेलें. तेथें म्यां सुवर्ण ल्यालेले मनुष्य पाहिले; आणखी असें पाहिलें कीं एक शूर मनुष्य आला, तो दरवाज्यांत जाऊं लागला तेव्हां तेथें हातेर बंद मनुष्य होते ते त्यास जाऊं देतना, तेसमयीं तो त्यां मनुष्यांची फळी

फोडून पार आतुन त्या दरवाज्यांत शिरला; मग त्यास निरंतर गौरव घ्यायास बोलाविलें: तें पाहून माझें तर अंतःकरण मोहित झालें! मी त्या भल्या गृहस्थाच्या घरीं एक वर्षही राहिलों असतों परंतु मला अजून पुढें जायाचें आहे असें मला कळलें म्हणून मी तेथें राहिलों नाहीं.

भ॰— आणखी त्या मार्गांत काय आढळलें?

खि॰— आणखी असें आढळलें जरा अमळसा पुढें चाललों इतक्यांत मला भास झाला कीं कोणी एक मनुष्य झाडावर आहे आणि त्याच्या अंगांतून रक्त वाहत आहे; त्याला पाहतांच मी ज्या ओझ्याच्या भाराने कुंथत होतों तें ओझें माझ्या पाठीवरून खालीं पडलें, तें पाहून मला आश्चर्य वाटलें, कांतर तसा चमत्कार पूर्वीं कधीं माझे दृष्टीस पडला नव्हता. मग मी चकित होउन उगाच पाहात उभा राहिलों आहें, इतक्यांत माझ्याजवळ तिघेजण देदीप्यमान पुरूष आले: त्यांतून एकाने मला सांगितलें कीं तुझ्या पापाची तुला क्षमा झाली आहे; दुसऱ्याने माझ्या आंगावरल्या

चिंध्या होत्या त्या काढून टाकून ह्यामला भरजरी अं गरखा दिला; आणि तिसऱ्याने माझ्या कपाळावर एक चिन्ह करून ह्यामला शिक्याचा पट दिला. तेसमयीं खिस्तीने तो पट आपले वस्त्रांतून काढून दाखविला.

भ॰ — याहून आणखी तूं कांहीं पाहिलें आहेस काय?

खि॰ — होय, पण म्यांजें आपणास सांगितलें तें सर्वोत्कृष्ट; त्याहूनही आणखी माझ्या पहाण्यांत आलें: म्यां तीन मनुष्य पाहिले त्यांचीं नावें, भोळसर, आळसी, आणि अभिमानी; त्यांच्या पायांत बिड्या होत्या व मार्गांत एकिकडेस निजले होते. त्यांस मी जागृत करूं लागलों पण ते माझ्या हातून कोठून जागृत होतील. मग कर्मठ व ढोंगी हे भिंत उडून येत होते त्यांस म्या पाहिलें. ते ह्मणूं लागले कीं आह्मीं जियोन पर्वतास जात आहों, परंतु ते लोकरच नाहींसे झाले; त्यांचा नाश होईल असें म्यां त्यांस सांगितलें होतें परंतु तें त्यांस खरें वाटलें नाहीं. आणखी मला असें आढळलें कीं या पर्वतावर चढून येणें कठिण व सिंहाच्या पुढून येणें

हेंही तसेंच कठिण, या सारखी मार्गांत मला दुसरीकोठे अडचण अढळली नाहीं; आणि दरवाज्या जवळ ओ पहारे करी उभा असतो तो जर बापडा तेथें नसता तर माझा सारा उद्योग निर्फळ जाउन मी मागें परतून गेलों असतों; आतां येथें येउन पोंहचलों ही ईश्वराची कृपा, आणि माझें येथें राहणें घडलें ही तुमची कृपा.

नंतर प्रज्ञा पुढें होउन त्यास पुसूं लागली, त्याचें ख्रिस्ती उत्तर देउं लागला.

प्रज्ञा. — तूं ज्या गावांहून आलास त्याचें तुला कधी स्मरण होतें कीं नाहीं?

ख्रि. — होय स्मरण होतें पण त्या स्मरणा बरोबर अंतरीं मोठी लज्जा आणि त्रास उत्पन्न होतो; मी जेथून आलों तेथें परत जावें असेंच जर माझ्या मनांत वागतें तर मी परत गेलों असतों, कां तर तसाच योग आला होता; आतां मला चांगल्या गावांचा ध्यास लागला आहे; तें कोणतें तर दिव्यनगर.

प्र. — बरें पूर्वीं ज्या वस्तूंचा तुला अनुभव होता त्यां

जकडेस आतां तुझें मन जात नाहीं काय ?

ख्रि॰ — होय जातें, तें त्यांजकडेस न जावें असें इच्छित असतांही जातें; आणि माझ्या अंतरीं विषय वासना उत्पन्न होतात त्या तर मला फार च जाचितात, त्या माझ्या गांवकऱ्यांस जशा प्रिय आहेत तशाच मला प्रिय होत्या: परंतु आतां त्या वासना व पूर्वींच्या वस्तू मला केवळ दुःखरूप झाल्या आहेत; माझ्या ज्या वस्तू आहेत त्यांचेंच मला स्मरण पडावें, आणि त्या दुःखद वस्तूंचें अगदि विस्मरण व्हावें अशी माझी इच्छा आहे; पण असें आहे जें उत्तम तें मी करूं लागलों ह्मणजे जें वाईट तें येउन पुढें उभें राहतें.[६९]

प्रज्ञा॰ — तुला ज्या ज्या अडचणी भासतात, त्या अगदीं नाहींशा होउन जाव्या, जरा उरूं न ये असें तुला कोणे समयीं वाटतें कीं नाहीं ?

ख्रि॰ — होय, पण तसलें मला फार कचित् वाटतें. तसें मला अंतरीं वाटलें असतां तो समय मला केवळ आनंदरूप होतो.

प्र॰ — बरें तुझ्या ज्या अंतरींच्या पीडा कोणे समयीं

नाहींशा होतात त्या कशाने नाहींशा होतात त्याचें तु
ला स्मरण आहे काय?

खि॰ — आहे. ज्याजें कांहीं मृत्युस्तंभावर पाहिलें त्या
चा विचार करूं लागलों; आणि ह्या जो माझा भरजरी
आंगरखा ह्या पाहूं लागलों, व वक्षस्थळीं पट धागवीत
आहें ह्या वाचूं लागलों व ज्या स्थानास मी जात आहें त्या
पासून मला काय काय प्राप्त होईल त्याचें ध्यान करू
न मी तल्लीन होउं लागलों ह्मणजे त्या अंतरींच्या पीडा
अगदीं नाहींशा होउन जातात.

प्र॰ — बरें जियोन पर्वतास जाण्याविषयीं इतका तूं उ
त्कंठित झाला आहेस याचें कारण काय?

खि॰ — त्याचें कारण असें आहे, जो म्या मृत्यस्तंभाव
र मेलेला पाहिला त्यास जियोन पर्वतावर जीवंत पा
हीन; ज्यां पासून मला अंतरीं पीडा होतात तीं सर्व ते
थें मज पासून दूर होतील; तेथें मरण नाहीं, आणि म
ला ज्याचा सहवास अत्यंत उत्तम वाटतो त्याजबरावर
माझें तेथें राहणें होईल. मी आपल्यास काय सांगूं,
त्याणें माझें ओझें दूर केलें ह्मणून त्याच्या ठायीं माझा

फार प्रेमा आहे; आणि मी अंतरी रोगाने फार ग्रासलों आहें: जेथें मला मरण प्राप्त होणार नाहीं, आणि जे थें हे पवित्रा हे पवित्रा असें नित्य ह्मणत आतील तेथें मा शें राहणें घडावें अशी जीवास उत्कंठा लागली आहे.

मग प्रीति ख्रिस्तीस पुसूं लागली, तुला कुटुंब आ हे? तुझें लग्न झालें आहे काय?

ख्रि॰ — होय, घरीं स्त्री, व लहान लहान चार मुलें आ हेत.

प्री॰ — मग त्यांस तां आपल्या समागमी कां आणिलीं नाहीं?

ख्रि॰ — तें ऐकून ख्रिस्ती रडूं लागला आणि ह्मणूं ला गला कीं अहाहा त्यांस म्या किती आनंदाने समागमीं घेतलें असतें! पण काय करावें मी या यात्रेस निघालों तेव्हां तीं सर्व माझ्या आण्याचा मोड करूं लागलीं.

प्री॰ — तर मग तां त्यांस समजावून कां सांगितलें ना हींस, आणि तीं तुझ्या समागमीं न आलीं असतां त्यांस अनर्थ प्राप्त होईल असें त्यांस कां कळविलें ना हीं.

ख्रि॰ — तसें म्या त्यांस कळविलें; आणि आमच्या नगराचा नाश होणार त्याविषयीं ईश्वरानें जें मला दाखविलें होतें तेंही म्या त्यांस सांगितलें; परंतु मी त्यांजबराबर उगाच विनोद करीत आहें असें त्यांस वाटून त्यांनी माझ्या बोलण्याच्याठायीं विश्वास धरिला नाहीं.

प्री॰ — बरें पण त्यांजो त्यांस विचार सांगितला तो त्यांच्या मनावर वागावा म्हणून ईश्वराची प्रार्थना केलीस काय?

ख्रि॰ — होय, मोठ्या कळवळ्यानें केली; कांतर माझी तीस्त्री आणि तीं लहान लहान मुलें मला फार प्रिय होतीं.

प्री॰ — पुढें जो नाश होणार तो तुला पुरतेपणीं कळला असेल; त्याजवरून तुझ्याठायीं जो शोक व भय उत्पन्न झालें तें त्यांस त्वां कळविलें स ना?

ख्रि॰ — होय, वारंवार कळविलें. आणि पुढें न्याय होणार त्याचें जें भय मला प्राप्त झालें तें त्यांस माझें मुख, म्लान झालें व नेत्रीं अश्रु आले आणि शरीरीं कंप सुटला, यांजवरून त्यांस कळलेंच असेल; परंतु

एणें करून त्यांस बोध होउन तीं माझ्या समागमें आ लीं नाहीं.

प्री॰ — तीं तुझ्या समागमें आलीं नाहीं याचें कारण काय?

ख्रि॰ — माझे स्त्रीस प्रपंच सोडायास गोड वाटत नाहीं, आणि माझीं मुलें बाळपणाच्या अविचारी मौजांत गर्क झालीं आहेत; अशा या कारणामुळें तीं माझ्या समाग मीं आलीं नाहींत, मला एकट्यालाच यात्रा करायास ये उं दिलें.

प्री॰ — बरें त्वां त्यांस आपल्या समागमें आणण्या वि षयीं जो बोध केला त्या बोधा प्रमाणें तुझें चालणें झालें ना हीं ह्मणून तो बोध व्यर्थ गेला असें तर नाहीं?

ख्रि॰ — माझें चालणें उत्तम हें माझ्याने ह्मणवत ना हीं. माझें मलाच कळतें कीं मजकडून बहुत दोष घ डतात. आणखी असें आहे, कोणी एकाने दुसऱ्याचें हित इच्छून त्यास बोध व्हावा ह्मणून ज्ञान सांगितलें आ णि आपलें आचरण जर नीट नसलें तर तें सांगितलेलें ज्ञान फुकट जातें. परंतु त्यांस यात्रेस निघण्या विषयीं

कंटाळा यावया सारिखें मजकडून कांहीं घडूंनये ह्मणून मी फार जपून चाललों. तीं मला उलटीं अशीं बोलूं लागलीं कीं तूं फार नियमानें चालूं लागलास, व आह्मास ज्या वस्तू अमंगळ वाटत नाहींत त्यांचा त्वां त्याग केला. सारांश मला असें वाटतें कीं ईश्वराचा अपराधी अथवा कोणे मनुष्याचा अपराधी होण्या विषयीं माझें मन धजलें नाहीं ह्मणून तीं माझे समागमीं आलीं नाहींत.

प्री॰ — तूं सांगतोस तसें झालें असेल. कांतर काइनानें आपलीं कर्मे वाईट व आपल्या बंधूचीं कर्मे उत्तम असें पाहून त्याचा द्वेष केला. तुझें उत्तम आचरण पाहून तुझ्या स्त्रीने व मुलानी तुझा द्वेष केला असला तर त्यांस उत्तम वस्तूचा कंटाळा असें सिद्ध होतें. आतां त्यांचा नाश झाल्यास त्याचा शब्द तुजकडेस नाहीं.

मग म्या आपल्या स्वप्नांत पाहिलें तों स्वयंपाक सिद्ध होई तोंपर्यंत तीं गोष्टी सांगत होतीं, नंतर खायाचे उत्तम उत्तम पदार्थ व द्राक्षारस वाढून तीं जेवावयास बसलीं. तेसमयीं त्या पर्वताच्या स्वामीने कशा कशा करितां काय काय केलें, त्याने हें घर कशा साठीं बांधिलें; तो

मोठा लढाउ होय, ज्याच्यागयीं मारक शक्ति त्यास त्यानें युद्ध करून ठार मारिलें परंतु त्या युद्धांत त्यास मोठे आघात लागले ह्मणून आह्मी त्याजवर इतकी प्रीति करितों, या प्रकारें ते त्या स्वामीच्याच गोष्टी सांगूं लागले.

त्यामध्यें ख्रिस्तीचें बोलणें असें निघालें कीं स्वामीनें तें युद्ध केलें त्यासमयीं त्याचें फार रक्त निघून वाहलें, असेंजें बोलले तें मला खरें वाटतें, त्यानें जें कांहीं केलें तें केवळ आपल्या बंधूंच्या प्रीत्यर्थ केलें ह्मणून तें शोभलें आणि कृपावह झालें. आणखी त्यां बंधूंतून कित्येक बोलले कीं तो मृत्युस्तंभावर मरण पावून उठला, त्यानंतर आह्मी त्याजवळ होतों आणि आमचें भाषण ही झालेंआहे; आणखी त्याची गरीब यात्रेकरूंवर अशी प्रीति आहे कीं त्या सारिखा पूर्वेपासून तर पश्चिमेपर्यंत कोणी दुसरा अढळणार नाहीं असें त्याचे भाषणावरून कळूं आलें त्याजविषयीं ते बंधू साक्षी आहेत.

नंतर ते जें कांहीं बोलले होते त्याच्या दृढीकरणार्थ ते असें सांगूं लागले कीं गरीबांचें कल्याण व्हावें ह्मणून त्याणें आपलें महत्व एकीकडे ठेविलें; " मी जियोन

पर्वतावर एकटाच राहणार नाहीं असें त्यास बोलतांना आह्मी ऐकिलें. जे केवळ भिकारी जन्मले होते, आणि ज्यांचें मूळ ठिकाण उकरडा अशा बहुत यात्रेकरांस त्याने राज्यपदें दिलीं.

या प्रकारें तीं परस्परें भाषण करीत असतां फार रात्र झाली, मग हे प्रभू आमचें रक्षण कर, आह्मी तुझीच आहों, अशी त्यानी प्रार्थना करून तीं झोपी गेलीं. त्या यात्रेकरास त्यानी माडीवरल्या मोठ्या खोलींत बिछाना केला होता तेथें तो गेला, त्या खोलीचें नाव शांति, तिला खिडकी उगवत होती तिजमधून सूर्य उगवतांच दृष्टीस पडतो त्या खोलींत उजेडे तोंपर्यंत तो निजला, मग जागा होउन गाउं लागला.

अभंग

आतां कोठे आहें मि हो कवण्या ठायीं,
येउनियां राहीं सौख्य स्थानी. १
देव लोकाच्या हें जवळील स्थान,
निर्मियेलें जाण, विश्रांतिशीं. २
माझीं पापें क्षमा करूनि द्याळा,

सांभाळिलें मला ऐशारीती. ३

यात्रेकरू त्यांची, किती प्रीति चिंता,

वाहाशी सर्वथा इश्युचित्तीं. ४

मग तीं प्रातःकाळीं सर्वजणें उठलीं आणि परस्प रें भाषण करून ख्रिस्तीशीं बोलूं लागलीं कीं आली तुला या स्थानीचे जे अपूर्व पदार्थ ते दाखवितों, ते पाहिल्या वाचून तूं जाउं नको. मग त्यानी त्यास पुस्तकालयांत नेउन अत्यंत प्राचीन लेख होते त्यांतून प्रथमतः त्या पर्वताच्या स्वामीची वंशावळी दाखविली, तेथें असें लिहिलें होतें कीं हा अनादिकाळीच्याचा अनादिपुत्र याणें जीं कर्मे केलीं; आणि ज्यां शेंकडों जणांस आपल्या सेवेस लाविलें; आणि ज्याच्या काळें करून किंवा स्वभावें करून नाश होत नाहीं अशास्थानी त्यांस ठेविलें तें सर्व सविस्तर त्या लेखांत होतें.

नंतर त्याच्या कित्येक सेवकानी राज्यें जिंकिलीं, सत्कर्मे केलीं, त्यांस जीं फळें सांगितलीं होतीं तीं त्यांस प्राप्त झालीं, त्यानी सिंहाचीं तोंडें बंद केलीं, अग्नि बळाने जळत असतां त्यास विझविलें, त्यानी तीक्ष्ण त

रवार आपल्यावरून चुकविली, ते अशक्त असतां ब लवान् झाले, ते युद्ध करीत असतां त्यांचें शौर्य वृद्धिंगत झालें, आणि विदेशी लोकांचे सैन्याचा मोड केला इ त्यादिजीं त्यांचीं योग्य कर्मे तीं त्यास वाचून ऐकवि लीं.

मग त्यास एक दुसरा लेख दाखविला, त्यांत अ सें लिहिलें होतें कीं आमचे स्वामी सांगतात अर कोणी माझ्या कडेस आलें किंवहुना पूर्वी ज्यानी माझा व माझ्या कर्माचा फार अनादर केला त्यांतून ही कोणी माझ्या कडे स आलें तर मी त्याचा अंगिकार प्रीतीने करीन. नंतर स र्व प्रसिद्ध अशा बहुत्येक गोष्टींचे वृत्तांत व प्राचीन व अ र्वाचीन कालीं जींजीं वर्तमानें झालीं तीं व जें भविष्य वा द पूर्वी सांगितले होते त्याप्रमाणें घडतें, शत्रूंस भय व आश्चर्य होतें आणि यात्रेकरूंस सुख व समाधान होतें इत्यादि जे लेख ते ख्रिस्तीस दाखविले.

दुसरे दिवशीं ख्रिस्तीस शस्त्र शाळेंत नेलें आणि तरवार, ढाल, टोप, चिलखत, नित्य प्रार्थना, कवच आ णि ज्याकादून आणार नाहींत अशा वाहाणा इत्यादिजीं

साधनें याम्रे करून्स त्यांच्या स्वामीने दिलीं होतीं तीं ख्रि स्तीस दाखविलीं, आणि आकाशांत जितक्या तारा आ हेत तितके जरी लोक स्वामीच्या चाकरी करितां बाहेर नि घाले तथापि तीं युद्ध साधनें त्यांस पुरत इतकीं तेथें होतीं.

मग त्या स्वामीच्या सेवकानी ज्या यंत्रांनी चमत्कारीक कृत्यें केलीं तीं यंत्रें त्यांस दाखविलीं. मोशेचा दंड; व या एलाने सिसिरास ज्या हातोड्याने व खिळ्याने मारिलें ते व गिदोनाने मिद्यान लोकांचे फौजेचा ज्या घागरीनी व रणशिंगानी व दिव्यानी मोड केला व शामगार याने स हाशें मनुष्यें ज्या पराणीने मारिलीं तीं, अशीं त्यास दाख विलीं. शिमशोनाने मोठमोठे पराक्रम ज्या जाभाडाच्या हाडाने केले तें; व दाविदाने गाथाच्या गोल्यास ज्या गो फणीनें व धोंड्याने मारिलें तीं. व ज्या दिवशीं स्वामी ना श करावयास उठेल व ज्या तरवारीने पापरूप मनुष्यास मा रील ती तरवार; अशीं त्यांस दाखविलीं. याहून दुसऱ्या बहुत उत्तम वस्तु त्यास दाखविल्या, तेणें करून त्यास प रम आनंद झाला. या प्रमाणें त्यास त्या वस्तू दाखवून तीं निजावयास गेलीं.

नंतर म्या असें स्वप्नांत पाहिलें कीं तो ख्रिस्ती पहाटेस उठून जाऊं लागला परंतु त्याला त्यांनीं आणखी एक दिवस राहवून घेतलें आणि त्यास सांगूं लागलीं कीं आज दिशा जर चांगल्या स्वच्छ असल्या तर आह्मी तुला आनंद पर्वत दाखवूं, ते पर्वत पाहून तुला विशेष समाधान होईल, कां तर त्यां ज्या स्थानीं जायाची इच्छा धरली आहे तें स्थान त्यां पर्वतांस याजागेपेक्षां जवळ आहे, त्याजवरून त्यांची गोष्ट ऐकून तो राहिला. मग सूर्योदय झाल्यानंतर त्यास त्यांनी घरावरतें नेउन दक्षिणेकडेस पाहायास सांगितलें: तो पाहूं लागला तों जेथें वनें उपवनें लागलीं आहेत, द्राक्षावेलींचे मंडप आहेत. सर्वप्रकारच्या फलां पुष्पांचे भार दाटले आहेत, कारंजीं उडत आहेत, झरे वाहात आहेत असा अत्यंत रमणीय व दर्शनीय, एक पर्वता सारिखा देश दुरून दिसूं लागला. ते समयीं तो त्यांस देशाचें नाव पुसूं लागला, ती इमानुवेलची भूमि असें त्यांनी त्यास सांगितलें आणि सर्व यात्रेकऱ्यांस आवयास जसा हा पर्वत तैशीच ती भूमी आहे. तूं त्या भूमीस

पोंहचलास ह्मणजे तुला तेथून दिव्य नगराचें द्वार दिसेल; आणि तेथें जे मेंढके राहतात ते तुला तें द्वार दाखवितील.

मग ख्रिस्तीस वाटलें कीं आतां यांचा निरोप घेऊन निघावें, त्याजवरून ते ही त्यास निरोप द्यावयास सिद्ध झाले. ते समयीं ते त्यास बोलिले कीं आपण शस्त्रशाळेंत पुनः आऊं : नंतर ते तेथें गेले आणि मार्गांत त्यास कोणी हाणमार करूं नये ह्मणून त्यानी एकचिलखत मस्तकापासून तर पायांपर्यंत त्यायास दिलें. या प्रमाणें तो तें चिलखत लेउन आपल्या स्नेह्यां बरोबर त्या द्वाराशीं आउन पोंहचला. ते समयीं तेथें जो पहारेकरी होता त्यास त्याने पुसलें कीं येथून कोणी यात्रेकरू जातांना त्वां पाहिला काय. पाहरेकऱ्यानें उत्तर दिलें होय पाहिला.

ख्रि० — बरें त्वां त्यास ओळखिलें काय ?

पा० — म्यां त्यास त्याचें नाव पुसलें त्याजवरून त्याणें सांगितलें कीं माझें नाव विश्वासू.

ख्रि० — हां हां, मी त्यास ओळखिलें; तो माझा गांव

करी माझ्या शेजारी, माझा ज्या ठिकाणी जन्म झाला तेथुनच तो आला; बरें तो पुढें किती लांब गेला असेल?

पा०— आतां तो या पर्वताच्या पलिकडल्या अंगींउतरला असेल.

मग ख्रिस्ती ह्मणूं लागला अरे बाबा पाहरेकऱ्या तुझी मोठी मजवर कृपा झाली, प्रभू तुझ्या समागमी असो आणि तुझें उत्तरोत्तर सर्व प्रकारें कल्याण करो.

नंतर तो ख्रिस्ती पुढें जाऊं लागला; तेव्हां सुमति, भक्ति, प्रीति, प्रज्ञा ह्या ह्मणूं लागल्या कीं तूं पर्वताच्या पलीकडेस जाईस तों पर्यंत तुझ्या बरोबर आह्मी येतों, मग तीं पहिल्या प्रमाणें गोष्टी करीत जाऊं लागलीं. ते समयीं ख्रिस्ती बोलूं लागला कीं जसें या पर्वतावर चढणें अवघड तसें याजवरून उतरणें ही अवघड. प्रज्ञा उत्तर देती होय बाबा, आतां तूं या नम्रतेच्या खोऱ्यांत उतरतणार, या खोऱ्यांत कोठे पाय न निसरतां उतरणें अवघड आहे ह्मणून या पर्वताच्या खालल्या अंगापर्यंत तुला पोंहचवावयास आह्मी आलों आहों.

तें ऐकून तो मोठ्या हुशारीनें उतरों लागला; तथापि त्याचा पाय एक दोन वेळ निसरला.

मग मी स्वप्नांत पाहतों तों ख्रिस्ती डोंगराच्या खालल्या आंगास पोंहचला ते समयीं त्याच्या समागमीं होतीं त्यांनी कांहीं भाकर, द्राक्षारस, सुकीं द्राक्षें त्यास दिलीं. नंतर तो आपल्या मार्गी जाता झाला.

मग तो ख्रिस्ती नम्रतेच्या खोऱ्यांत उतरूं लागला ते समयीं त्यास मोठें संकट प्राप्त झालें; तो जरा पुढें चालला नाहीं इतक्यांत त्यानें एक दुष्ट पिशाच तळव टांतून आपल्या आंगावर येतां पाहिला: त्याचें नाव आपछ्योन्, त्यास पाहून ख्रिस्ती तर भिउन गेला, आणि यास पाठ देउन परतावें किंवा याच्या पुढें उभें रहावें. असा मनांत विचार करूं लागला. मागें परतलें असतां आपल्या पाठीस ढाल नाहीं याजकरितां पाठीवर तिरांचा मार करायास त्याला सोय पडेल, याज करितां धैर्य धरून स्थिर उभें राहावें असा त्यानें निश्चय केला, केवळ प्राणच वांचवावा हें माझ्या मनांतून असतें तरी असें करणें यावेळीं सोईचें होतें. या

प्रमाणें निश्चय करून तो ख्रिस्ती पुढें चालला आहे तों आपल्लुवोनाने येउन त्यास गांठलें: त्याचें तोंड पाहतो तों मोठें विक्राळ वेडें वांकडें; आंगावर मत्स्यासारिखीं खवलें आहेत, तेणें करून गर्वाने डोलत आहे. ज्याचे अजगरासारिखे लांब पांख, अस्वला सारिखे पाय, सिंहासारिखें तोंड, पोटांतून अग्नि व धूर निघत आहे, अशा रूपानें तो येउन ख्रिस्तीस तुच्छवत् मानून पाहूं लागला आणि त्यास पुसतो.

आपल्लुवोन् — अरे तूं कोठून आलास आणि कोठे जातोस?

ख्रि० — मी विनाशनगर म्हणून जें सर्व अमंगळांचें स्थान तेथून आलों आणि सियोन नगरास जात आहें.

आ० — तुझ्या बोलण्यावरून असें दिसतें कीं तूं एक माझी रयत आहेस, तूं जेथून आलास तो सर्व माझा मुलूक, मी त्या मुलकाचा राजा आणि देव आहें, असें असतां तूं आपल्या राजास काय म्हणून सोडून दिलेंस? तूं पुनः माझा चाकर होउन माझें काम करशील असा मला भरवसा आहे, असा जर भरवसा नसता तर तुला आतांच एक्या फटक्याने निजवितों.

ब्रि० — मी तुमच्या राज्यांत जन्मलों खरा पण तुम ची चाकरी फार कठीण, आणि तुह्मी मुशाहिरा देतां यानें चरितार्थ होत नाहीं. " कांतर पापाचा मुशाहि रा मरण आहे." याजकरितां जेव्हां मी चांगला प्रौढ झालों तेव्हां इतर विचारी मनुष्याप्रमाणें आपल्या सोईची वाट पाहिली.

आ० — इतक्याच सबबेवरून आपल्या रयतेस मुकाट्यानें जाऊं देईल असा तर कोणी राजा दिसत नाहीं, आणि मी तरी तुला असाच जाऊं देईन काय? अरे ऐक, चाकरीचें व मुशाहिऱ्याचें निमित्त सांगूं नको, पुष्कळ मिळण्याची असोशी सोडून परत जा; आपल्या गावीं जें निपजेल तें मी तुला देत जाईन.

ब्रि० — पण राजांचा जो राजा त्याचे चाकरीस मी आतां राहिलों, आतां मी जर तुमच्या बरोबर परत गेलों तर माझ्या पदरीं लबाडी येईल.

आ० — एक वाईट होतें त्यांत अधिक वाईट करून घेतलें अशी ह्मण आहे त्याप्रमाणें त्वां केलें. पण त्या राजाचे जे चाकर होतात ते कांहीं दिवस त्याची चाकरी

करून मग त्यास सोडून परतून माझ्या कडेस येतात. तूं ही तसें कर ह्मणजे सर्व चांगलें होईल.

रिब्र० — म्या त्यास आपलें वचन दिलें आहे आणि तुला सोडणार नाहीं अशी आण वाहिली आहे. याज करितां मी जर हें सर्व सोडून परत गेलों तर मला दगेखोर असें समजून फांशीं देतील.

आ० — याच प्रमाणें त्वां मला दगा दिला आहेस परंतु तूं जर मागें फिरून आपल्या गावीं गेलास तर तुझा अपराध मी मनांत आणणार नाहीं.

रिब्र० — मी तुह्मा बरोबर बाळपणी करार केला होता; तत्संबंधी माझ्या कडेस अपराध असला तर तो अपराध क्षमा होईल. कांतर मी ज्या राजाच्या निशाणा खालीं आहें तो माझ्या अपराधाची क्षमा करण्यास समर्थ आहे. आणखी वास्तविक पुसाल तर तुह्मी घातक आहां, याज करितां मला त्या राजाची चाकरी, त्याचा मुशाहिरा, त्याचे चाकर, त्याचा अंमल, त्याची सोबत, त्याचा मुलूक, तुमच्यापेक्षां अधिक आवडतो. ह्मणून माझी समजूत करायाची आशा सोडून

घा; मी त्याचा चाकर झालों. आतां मी त्याच्या पाठीमा गें जातों.

आ० — तूं ज्या मार्गानें जातो आहेस त्या मार्गांत तुला काय काय घडेल त्याचा मन स्वस्थ करून पुनः विचार कर. माझे अपराध करून व माझे नियम सोडून जे त्याचे सेवक होतात त्यांचा परिणाम बहुधा वाईट होतो हें तुला ठाउक नाहीं काय? अहाहा, त्यां सेवकांतून तर बहुतांस लज्जा युक्त मरण प्राप्त झालें असत्या राजाची चाकरी तूं माझ्या पेक्षां चांगली मानितोस; बरें तो ज्या स्थानीं आहे तेथून येउन कोणत्या आपल्या सेवकास त्यानें संकटा पासून रक्षिलें आहे? म्यातर त्या राजा पासून व त्याच्या सेवकां पासून आपल्या एक निष्ठ सेवकांस अनेक वेळ सामर्थ्यानें किंवा कपटानें रक्षिलें आहे. त्याज प्रमाणें मी तुझें ही रक्षण करीन.

ख्रि० — आपल्या सेवकांची प्रीति आपल्या ठायीं कशी आहे, ते अंती आपल्यास सोडून देतात किंवा आपल्या कडेसच राहतात हें पहावयास तो सांप्रत काळीं येउन त्यांचें रक्षण करावयास विलंब करितो. तुह्मी सां

गतां कीं त्यांचा परिणाम वाईट होतो परंतु तो परिणाम त्यांस अत्यंत गौरव युक्त होतो: आणखी असें आहे, सांप्रत काळीं आपलें रक्षण होईल अशी त्यांस बहुत करून आशा नसती; त्यांचा राजा देव दूतां सहित गौरवें करून आला असतां ते महत्व पावतील अशी आशा धरून येथें राहतात.

आ० — अरे पण त्वां एकनिष्ठेने त्याची चाकरी केली नाहींस, मग तूं त्याजपासून मुशाहिरा मिळण्याची कशी आशा धरितोस ?

ख्रि० — म्यां त्याच्या सेवेंत कोठे अंतर केलें आहे ?

आ० — प्रथम जेव्हां तूं त्याची चाकरी करायास निघालास आणि निराशा कर्दमांत रुतलास त्या काळीं तुला त्याची चाकरी नकोशी झाली: तो स्वतां येउन तुझें ओझें दूर करून घेई तोंपर्यंत त्वां थांबायाचें होतें, तसें नकरितां त्वां तें ओझें भलत्याच दुसऱ्या उपायाने दूर करून घेतलें. तूं भलत्याच वेळीं निजलास तेणेंकरून ज्या उत्तम वस्तू त्या हारवून घेतल्यास. त्वां सिंह पाहिले तेणेंकरून घाबरून परत जाण्याचा बेत केला: आ

णि तूं यात्रेस निघाला आहेस त्या यात्रेची व त्यांजें पाहिलें व ऐकिलें आहे त्याची गोष्ट करूं लागलास म्हणजे तुझ्या अंतरींचा दंभ दिसूं येतो.

ख्रि॰ — तुह्मी ह्मणतां तें सर्व खरें; याशिवाय हीकित्येक गोष्टी मजकडून घडल्या आहेत; पण तसें हीजरी मजकडून घडलें तथापि मीज्या राजाची सेवा व ज्यास वंदन करीत आहें, तो माफी क्षमा करायास सिद्ध आहे: असो पण तुह्मी सांगितले जे दुर्गुण त्यापेक्षां तुमच्या मुलकांत असतां मला अधिक दुर्गुण होते: तेथें मी दुर्गुणच ग्रहण करीत होतों परंतु त्याज विषयीं मला पश्चात्ताप झाला, मी अंतरीं फार व्याकूळ झालों आणि मला परम त्रास आला, आतां त्या दुर्गुणा विषयीं माझ्या राजा पासून माफी क्षमा झाली आहे.

हे शब्द ऐकून आपल्लयोनास मोठा कोप आला आणि ह्मणूं लागला कीं त्या राजाचा मी शत्रु आहें; त्याचा मला कंटाळा आहे, मला त्याचे नियम आवडत नाहींत, मला त्याच्या लोकांचात्रास येतो; ह्म

णून मी तुझ्या जाण्यास विघ्न करायास आलों आहें.

ख्रि॰— आपल्लुवोनजी समजून बोला; मी राजाच्या थोरल्या रस्त्यांत आहें, हा पुण्यमार्ग होय; याजकरितां जें करणें तें विचार करून करा.

तें ऐकून आपल्लुवोन रस्त्याच्या एके बाजूस एक पाय व दुसऱ्या बाजूस एक पाय पसरून उभा राहिला, आणि ह्मणूं लागला कीं मी काय तुझी परवा करितों?

तुला मारायास मला वेळ किती, तूं जर पुढें पाउल टाकिशील तर तुला नरकाची शपथ आहे. तुझा येथेंच प्राण घेतों पहा.

असें बोलून त्यानें एक ज्वालाशस्त्र ख्रिस्तीच्या ह्रदयावर सोडून दिलें; इतक्यांत ख्रिस्तीनें हातांत ढाल होती ती पुढें करून तें दुरच्या दूर संभाळलें.

ख्रिस्तीनें पाहिलें कीं हा निकरावर आला खरा ह्मणून आपली ही तरवार काढली, तें पाहून आपल्लुवोनानें त्याजवर चाल करून शस्त्रांचा वर्षाव केला. त्यांचें निवारण करायास ख्रिस्तीनें ह्मावा तितका प्रयत्न केला तथापि आपल्लुवोना पासून त्याच्या डोकीस हा

तास पायांस जखमा लागल्या. त्यामुळें ख्रिस्ती ज रा मागें हटला, त्याजवरून आपल्लुवोन फारच नि कराने भांडूं लागला, ते समयीं ख्रिस्ती पुनः धैर्य धरू न त्याचें मोठ्या शूरत्वाने निवारण करूं लागला. याप्र माणें त्यांचें युद्ध रूमारें दोन प्रहर झालें. ते समयीं ख्रि स्तीस पुढें प्राण राहिले नाहीं असें झालें: शत्रू बराब र एकसारिखें भांडणें तशांत शरीरीं जखमा तेणेंक रून तो थकून गेला.

त्याची अशी अवस्था पाहून आपल्लुयोन त्याशीं अगदीं जवळ भिडला, आणि हात झोंबीस येउन त्या स धरून आपटिला त्या धडाक्या बरोबर त्याच्या हातां तली तरवार उडाली. तें पाहून आपल्लुवोन् बोलूं ला गला आतां माझ्या हातून कोठें जातोस. मग त्याच्या आंगावर पडून त्याचा प्राण निघे असें त्यास भुइव र दडपिलें; तेव्हां ख्रिस्तीस वाटूं लागलें कीं आतां मी मरतों परंतु ईश्वराच्या मनीं आणिकच आहे. ते समयीं असें झालें कीं चांगलें नेम धरून एक शे वटचा फटका मारून यास बराबर करावें ह्मणून आ

पह्लुवोनाने हात वरता उचलिला आहे इतक्यांत ख्रिस्तीने तरवार खालीं पडली होती ती चप दिशीं हातीं धरली आणि "अरे माझ्या वैऱ्या हर्ष मानूनको; मी पडलों तरी उठेन रेउठेन," असें बोलून त्या आपल्लुवोनास एक असा निकराने त्या तरवारीचा फटका मारिला कीं, त्या बरोबरच तो मागें हटून त्याचा प्राण केवळ कासाविस झाला. तें पाहून ख्रिस्तीने त्यास आणखी दुसरा फटका मारिला आणि बोललें कीं "इतकें हें होत आहे यांत आह्मी जयपावणारापेक्षां अधिक आहों. आह्मावर ज्याने प्रीति केली त्याच्या कडून हें घडतें." हे शब्द ऐकून आपल्लुवोन आपले अजगर पक्ष उंचाउन उडून गेला तों पुनः ख्रिस्तीस दिसला नाहीं.

ही लढाई संपे तों पर्यंत आपल्लुवोन ल्होठ्याने किंकाळ्या फोडीत असे व भयंकर गर्जना करीत असे: व अजगरासारिखा बोले परंतु ख्रिस्ती उच्छ्वास टाकून कळवळत असे; ज्याणें आपल्या कानानी त्यांचे शब्द ऐकिले असतील वडोळ्यानी लढायी पा

हिली असेल त्यालाच त्यांची त्याकालींची स्थिति स मजे. ख्रिस्तीच्या हातून दुधारी तरवारीने आपल्लुवोना स जखम लागे तों पर्यंत ख्रिस्तीच्या मुखीं जरा आनं द दिसला नाहीं; नंतर तो हास्य वदन होउन वरता पा हूं लागला: असला घोर प्रसंग म्या कधीं पाहिला नव्हता.

या प्रकारें ती लढाई संपली, ते समयीं ख्रिस्ती ल णूं लागला कीं ज्याणें मला सिंहाच्या मुखांतून सोडवि लें, ज्याणें माझें आपल्लुवोनापासून रक्षण केलें, त्या चे उपकार म्या किती वर्णावे, या प्रमाणें बोलून तो गा वूं लागला.

आर्या

नायक जो भूतांचा बेल्ज़ीबुल्ल ह्मणति ज्या
स यालोकीं, तो अतिदुष्ट तयाने, योजिय
ला हा पिशाच घातुक कीं, १ माझा नाश
कराया, शस्त्रास्त्रें युक्त होउनी आला, अ
ति कोपें क्रूरपणें, संग्रामार्थ ही मशीं उभा
ठेला. २ त्या घोर युद्ध समयीं, मातें मेखे
ल साह्य दाता कीं, आला ह्मणुनी त्यातें म

रखडूं यारणातुनी हांकीं. ३ वर्णीन नित्य
त्यातें, मत्सात्या लागिं जोरणीं धांवे, ध
न्य प्रभु तो त्याच्या पवित्र नामास म्या स
दा गावें. ४

नंतर जीवन रक्षाचीं पानें घेउन तेथें एक हात प्रविष्ट झाला, तीं पानें घेउन ख्रिस्तीने आपणास लढाईत ज्या जखमा लागल्या होत्या त्यांस लाविलीं; तेणें करून त्या तत्क्षणींच बऱ्या झाल्या. मग तेथें बसून काहीं त्याने उपहार केला आणि त्यास नुकतेंच जें पात्र दिलें होतें त्यांतलें तो प्याला; या प्रमाणें चांगला हुशार होउन मग त्याणें आपला मार्ग धरिला; आणि कोण्या दुसऱ्या शत्रूशीं गांठ पडेल ह्मणून ती तरवार नागवीच हातीं ठेविली. परंतु त्या खोऱ्यांतून तो पार पडे तों पर्यंत त्यास आपल्यु शेना पासून दुसरा कांहीं उपद्रव झाला नाहीं.

मग त्या खोऱ्याच्या पलिकडे एक दुसरें खोरें लागलें त्याचें नाव मृत्युच्छाया, त्यांतून ख्रिस्ती स जावें लागलें, कांतर दिव्य नगरास जाण्याचा मा

गं त्या खोऱ्यांतून आहे, हें खोरें मोटी भयानकजागा होय. इर्मैया म्हणून एक भविष्यवादी होउन गेला त्यानें या खोऱ्याचें वर्णन केलें आहे तें असें. हें खोरें " अरण्य, शून्यतेची व खांचाची, निर्जळतेची व मृत्युच्छायेची भूमी, ज्याभूमीतून (खिस्ती विना) कोणी चालेना व जींत मनुष्य दिसेना" असें हें होय. पुढें काय जें घडलें त्याजवरून असें कळून येतें कीं आपल्या वोनाबराबर ख्रिस्तीची जी लढाई झाली त्याजपेक्षां या खोऱ्यांत त्याची फारच कठिण अवस्था झाली.

मग म्या असें स्वप्नांत पाहिलें कीं ख्रिस्ती त्या मृत्युच्छायेच्या सिमेत जातांच त्यास दोन मनुष्य भेटले, ते मोठ्या त्वरेनें परत जात आहेत, ज्यांनी चांगल्या देशाची वाईट खबर आणिली त्यांचे ते मुल; त्यांस ख्रिस्ती पुसूं लागला, अहो तुह्मी इतक्या घाईनें कोठें चाललां.

ते उत्तर देतात, परत चाललों आहों! तुह्माला जर जीवाची अथवा सुखाची आशा असली तर तु

ह्मी ही परता.

ख्रिस्ती पुसतो, अहो कां, झालें तरी काय?

मनुष्य०— काय झालें, तुह्मी ज्या वाटेने जात आहां त्याच वाटेने आह्मी जात होतों, आमच्याने जितकें पुढें जाववलें तितकें आह्मी पुढें गेलों, परंतु शेवटीं असें झालें कीं मागें परत येण्याचा विचार पडला, सारांश जर कां आह्मी दोन पाउलें पुढें जातों तर तुह्मास हें वर्तमान सांगायास ही येथें आलों नसतों.

ख्रि०— असा तर तुह्मास कोणता प्रसंग प्राप्त झाला.

म०— आह्मी या मृत्युच्छायेच्या खोऱ्यांत जात होतों इतक्यांत पुढें जें अरिष्ट होतें त्याजकडेस अकस्मात् आमची दृष्टि गेली ह्मणून आह्मी तिकडच्या तिकडेच थबकलों. ८१

ख्रि०— असें तें अरिष्ट कोणतें.

म०— तें अरिष्ट काय पुसतां, त्या खोऱ्यांत तर केवळ गुहेसारिखा अंधार पडतो, तेथें मोठीं मोठीं विक्राळ भुतें पिशाचें आणि गुहेंतले अजगर आमच्या दृष्टीस पडले, आणि आह्मी ओरडणीं आणि रडणीं

ऐकिलीं तीं एकसारिखीं सततच्या लिलीं होतीं, त्या जवरून असा भास झाला कीं आणू कोणे लोकां च्या पायीं बिडया आहेत आणि ते अत्यंत दुःख शोकांत बुडाले आहेत. तेथें मोठें घोर भयवाटूं लागलें जाणूं जसा साक्षात् काळच गर्जना करीत आहे. तेथें मनाला सुख द्यावयास काहीं एक पदार्थ नाहीं, तें सर्वोपरी भयंकर होय.[८२]

ख्रि॰ — आपण सांगतां असें जरी असलें तथापि आमच्या इच्छिलेल्या ठिकाणीं जावयास आह्मास त्याच खोऱ्यांतून गेलें पाहिजे.[८३]

म॰ — हां असें असलें तर सुखानें जावें, आमच्या बरिक सोईस तें पडत नाहीं. या प्रकारें बोलून ते चालते झाले. मग ख्रिस्ती पुढें जाऊं लागला, परंतु मार्गांत कोणी मारहाण करील ह्मणून तीं उपसलेली तरवार हातांतून सोडली नाहीं.

नंतर म्या असें स्वप्नांत पाहिलें कीं त्या खोऱ्यांच्या उजवे बाजूस त्याच्याच इतका लांब एक मोठा खोल खंदक आहे; जेथें आंधळ्याने आंधळ्यास चालवूं

लागावें, मगते दोन्ही पडून त्यांचा सर्वस्वें नाश व्हाचा. असें जेथें पहिल्या पासून नित्य घडत आहे तोच तो खंदक. आणखी त्या खोऱ्याच्या उजवे बाजूस एक चिखल पाहिला त्यांत चांगला धडसा जरी पडला तरी त्याच्या पायास कशाचा आधार मिळूं नये, तो खालींच रुतत जाचा, दाविद राजा ह्मणून जो झाला तो एक वेळ याच चिखलांत पडला होता; आणि जो असल्या कर्दमांतून काढण्यास समर्थ आहे त्यानें जर त्यास काढिलें नसतें तर तो घुसमटून जाता.

त्यां दोहोंच्या मधून एक पायवाट आहे ती अत्यंत अरुंद तेथें ख्रिस्तीस फारच जपून चालावें लागलें; तेथें असें झालें कीं त्या आंधारामुळें कदाचित् पाय चुकून खंदकांत पडेल ह्मणून एकीकडून व्हावें तर त्या चिखलाची भीति; वरें जर चुकून त्या चिखलांत पाय पडेल ह्मणून अलिकडेस व्हावें तर त्या खंदकाची भीति, या प्रमाणें तो मोठया संकटानें उच्छ्वास देत जाऊं लागला; आणखी एक दुसरें असें अरिष्ट प्राप्त झालें कीं त्या एक पाउलवाटेंत फार अं

धार पडूं लागला; त्यामुळें वारंवार असें होउं लागलें कीं पुढें टाकायास पाउल उचलिलें तें कोठें कशावर पडेल याचा भरवसा राहिला नाहीं.

त्या खोऱ्याच्या मध्यभागीं मला नरकाचें द्वार आढळलें, तें त्या पाउल वाटेच्याजवळच होतें: तेथून ज्वाळा आणि धूर हीं एक सारिखीं सतत व त्वरित गतीने येउं लागलीं व त्यांजबरोबर थिंगळ्या उडूं लागल्या आणि भयंकर शब्द होउं लागले. ते समयीं ख्रिस्ती ची तरवार जशी आपल्लुओना वर चालली तशी या वेळीं चालली नाहीं, गडबडून गेली. तें पाहून आतां काय करावें असा ख्रिस्तीस विचार पडला, मग ख्रिस्ती ने तरवार मेणांत घालून सर्व प्रार्थना[८५] ह्मणून जें शस्त्र होतें त्याचा प्रयोग केला. ते समयीं तो ओरडूं लागला "हे प्रभो मी तुझी प्रार्थना करितों, माझ्या जीवास मुक्त कर[८६]?" या प्रमाणें तो ओरड ओरडत बराच लांब गेला, तरी त्या ज्वाला त्याजकडेस जाउं लागल्या, व मोठे भयंकर दुःखाचे शब्द आणि जिकडे तिकडे सोसाट त्याच्या कानीं पडूं लागले. त्याज

वरून त्यास वाटूं लागलें कीं आतां आपलें शरीर फा
टून याचे तुकडे होतात किंवा याची मृत्तिका होउन प
डती. या प्रकारें विक्राळरूपें आणि भयंकर शब्द तो कि
ती एक कोस जाई तों पर्यंत पाहत ऐकत गेला: नंतर ए
का ठिकाणीं जाउन पांहोंचला तेथें त्यास असें वाटलें
कीं कांहीं भुतांची टोळी आपल्यास गांठायास पुढें ये
त आहे असा त्यानें शब्द ऐकिला, ह्मणून तो थांबून
विचार करूं लागला कीं यास काय उपाय करावा: कोठे
असें मनांत यावें कीं आतां येथून परतावें, कोठे असें
वाटावें कीं परतून मागें जावें तर इतक्या वेळांत हें खो
रें अर्धे आटपेल, म्या पहा कशीं मोठमोठीं विघ्नें ना
हींशीं करून टाकिलीं, कदाचित् पुढें जाण्या पेक्षां
परत जाउं लागल्यास या अपेक्षां ही मोठें अरिष्ट प्रा
प्त होईल. या प्रमाणें विचार करितां करितां शेवटीं त्या
णें असा निश्चय केला कीं आंतां पुढेंच चाल करावी;
मग तो असा पुढें चालूं लागला तशी ती भुतांची टोळी
जवळ जवळ येउं लागली शी दिसली. मग ती अग
दींच जवळ येउन भिडली तेव्हां त्यानें एक मोठ्यानें

आरोळी फोडली कीं "प्रभू जो ईश्वर त्याच्या सामर्थ्या ने मी चालेन." त्या जवरून तीं भुतें मागें हटलीं पुढें आ लींच नाहीं.

आणखी माझ्या दृष्टीस एक नवल पडलें तें सांगि तल्या वांचून माझ्यानें राहवत नाहीं. खिस्तीस ती त शी अवस्था प्राप्त झाली तेव्हां त्यास व्यामोह झाला, आणि आपल्या किंवा इतराच्या शब्दाची ओळख श हिली नाहीं. ते समयीं ज्या खांचेंत अग्नि पेटला होता त्या खांचेच्या तोंडाजवळ तो आतांच तेथें भुतें होतीं त्या तून एक भूत हळूच त्याच्या पाठीमागें येउन त्याच्या का नांत ईश्वरा विषयीं मोठें वाईट अपशब्द बोलूं लागलें ते माझ्याच हृदयांतून निघाले असें खिस्तीस वाटलें. त्याजवरून त्यास फारच वाईट वाटूं लागलें. अहः हः म लाजो इतका आवडत होता त्याअबिषयीं म्या असे अ पशब्द बोलावे काय: पण म्या काय करावें अशी गोष्ट घडूनये पण झाली. सारांश आपला कान बंद करा वा अथवा हे शब्द कोठून निघाले याचा शोध लावावा हें कांहीं भान त्यास राहिलें नाहीं.

या प्रकारें ख्रिस्ती दुःखावस्थेंत कांहीं एक काळ मार्गक्रमींत असतां त्यास असें वाटलें कीं कोणी एक मनुष्य पुढें चालला आहे आणि तोंडानें बोलत आहे कीं "मृत्युच्छायेचे खोऱ्यांतून मी जरी चाललों तरीं कांहीं अरिष्टास भिणार नाहीं कां तूं मज संगतीं आहेस." ८७

ती वाणी ऐकून ख्रिस्तीस आनंद झाला कां तर त्या वाणीवरून त्यानें तीन गोष्टींचें अनुमान केलें. एक असें कीं माझ्यासारिखे दुसरे कोणी ईश्वराचें भय बाळगिणारे या खोऱ्यांतून जात आहेत.

दुसरें. ते अंधारांत व दुःखावस्थेंत असतां हीं त्यांच्या संगतीं ईश्वर आहे असें दिसतें. जर त्यांच्या संगतीं आहे तर तो माझ्या संगतीं कां न साथा? इतकेंच कीं या स्थळाच्या प्रतिबंधामुळें तो माझ्या समागमीं असतां ही मला कळत नाहीं. ८८

तिसरें. असें कीं, आपण जाउन त्यांस आटोपलें ह्मणजे त्यांची संगत आपल्यास मिळेल.

या प्रकारें मनांत आणून तो चालता झाला आणि पुढें एक जण जो जात होता त्यास हांका मारल्या

गला; परंतु त्याणें कांहीं उत्तर दिलें नाहीं; त्यास तरी असेंच वाटलें होतें कीं येथें काय तो मी एकटाच आहें.
नंतर कांहीं वेळानें सूर्योदय झाला: तेव्हां ख्रिस्ती बोलूं लागला कीं "त्याने मृत्युच्छायेचा प्रकाश केला[९]"

मग प्रकाश होतांच तो मागें पाहूं लागला, याजवरून त्याने परत आयाच्या बुद्धीने मागें पाहिलें असें समजूं नये, तर अंधारांत तो ज्या अरिष्टांतून पार पडला तीं दिवसाच्या उजेडानी चांगलीं दिसावीं ह्मणून त्यानें मागें पाहिलें; तेसमयीं तो खंदक व तो चिखल व त्यांच्या मधली वाट मोठमोठे पिशाच व भूतें हीं सर्व त्यास चांगल्या प्रकारें दिसूं लागलीं आणि पाहतो तों तीं सर्व दुरावलीं आहेत: कांतर सूर्योदय होतांच त्यांच्याने याच्या जवळ येवेना असें झालें, तीं याच्या दृष्टीस मात्र पडूं लागलीं, आणि शास्त्रवाक्य ही असेंच आहे: "तो अंधकारांतून खोल वस्तू प्रकट करितो आणि मृत्युच्छायेचा प्रकाश करितो[९]."

नंतर त्या भयंकर वाटेंत जींजीं अरिष्टें प्राप्त झालीं त्यां सर्वां पासून ख्रिस्तीचें रक्षण झालें हें पाहू

न त्यास फार गहिंवर दाटला; पूर्वी ज्या अरिष्टांस तो फार भीन होता, त्यांचें स्वरूप जसजसा सूर्य उगवूं लागला नसतसें स्वच्छ कळूं लागलें; या प्रकारें सूर्योदय झाला ही ख्रिस्तीनें ईश्वरी कृपाच मानिली. कांतर आतां प्रकाश फारच आवश्यक झाला. मृत्युच्छायेच्या खोऱ्याच्या पूर्व भागीं अरिष्टें आहेत खरीं परंतु या उत्तर भागींच्या अरिष्टांसारिखीं नाहींत हीं तर फारच भयंकर. व येथें फारच विघ्नें; ख्रिस्ती जेथें उभा होता तेथून तर त्या खोऱ्याच्या शेवटापर्यंत फांस, सांपळे, जाळें, गुप्त खांचा, दोली, खडक, इत्यादि विघ्नें करून मार्ग एकसारिखा व्यापला आहे. याजकरितां जर कां येथें आंधार असता तर ख्रिस्तीच्या ठायीं हजारो मनुष्यांचें सामर्थ्य असतें तथापि तें लटपटून जातें; सूर्य उगवला ह्मणून मात्र चांगलें झालें. ते समयीं ख्रिस्ती ह्मणूं लागला, "त्याचा दिवा माझ्या शिरावर प्रकाशतो, आणि त्याच्या प्रकाशानें मी अंधकारांतून चालतों."

या प्रकाशानें तो त्या खोऱ्याच्या शेवटास जाउन

पोंहचला, तेसमयीं मीं स्वप्नांत पाहतों तों त्या खोऱ्या-च्या शेवटीं पूर्वीं जे यात्रेकरू गेले त्यांचें रक्त, हाडें, राख, तोडून तुकडे झालेलीं शरीरें, अशीं पडलीं आहेत: हीं येथें अशीं कांपडलीं याचा विचार करीत आहें इतक्यांत एक पुढें ढोल दृष्टीस पडली, तींत दोन राक्षस बहुत दिवसांचे पुरातन आहेत. एकाचें नाव पोप* व एकाचें नाव पेगन+. यांचा अमल व अनीति राज्य होतें तेसमयीं यानीं ज्यांचीं हाडें, रक्त, राखाडी, पडली आहे त्यांचा किमपि दयान धरितां वध केला. परंतु तेथें ख्रिस्ती जाउन निर्भयानें चालूं लागला त्या जवरून मला कांहींसें आश्चर्य वाटलें: मग त्याचें कारण मला समजलें तें असें, त्या ढोलींत ला पेगान मरून बहुत दिवस झाले. पोप जीवंत असला तथापि तोही त्याच्याच सारिखा जाणावा; कां तर त्याचा आतां वृद्धापकाळ झाला, तशांत तरुण अवस्थेंत मोठेजी वावरले धक्के बसले ह्मणून आतां त्याच्या हातापायांचे सांधे ढिले होउन अवयवजड झालें. आ

---

* पोप ह्मणजे रोमी ख्रिस्ती लोकांचा मुख्य आचार्य.
+ ह्मणजे मूर्त्तीपूजक.

ता त्याच्या हातून कांहीं होत नाहीं, तो उगाच त्या ढोलीच्या तोंडीं याचे करून आतांत त्यांजवर दांत खात गुरगुरत बसला असतो, आतां त्यांजवर जायाचें सामर्थ्य राहिलें नाहीं.

मग ज्या ख्रिस्तीस आपल्या मार्गीं जातां पाहिलें; पण तो ह्या तार्डी त्या ढोलींच्या तोंडीं बसला होता त्याचें शरीर पाहिलें असतां अगदीं जर्जर, ख्रिस्ती वरचालून याव याचें सामर्थ्य नाहीं. असें असतां तो त्यास बोलिला कीं "अरे तुमच्यांतले कितीएक आणखी जाळल्या वांचून तुली सुधारणार च नाहींत." त्याजवरून ख्रिस्तीस असें वाटलें कीं या गृहस्थास काय बोलावें. शेवटीं त्याचें तें वरळणें तुच्छ मानून त्यास कांहीं उत्तर न देतां तो चालता झाला. त्याला त्या पासून कांहीं उपद्रव झाला नाहीं. ते समयीं तो गाउं लागला.

श्लोक

आश्चर्य हें थोर दिसेच लोकीं,
मातें कसें रक्षियलें विलोकीं;

त्या घोर विघ्नांतुनि यां मला हो,
नेलें दुरीं हाच अतुल्य लाहो. १

या खोऱ्यांत मला पिशाच नरकें पापें तमें वेष्टिलें,
गर्त्ता पाश हि आळ दुःखद मला यानीं पथीं कष्टिलें;
तेव्हां तो स्वकरें सुरक्षित करी तो धन्य वाटे मला.
कीर्तीचा शिरिंज्याचिया मुकुट त्या मी वर्णितों निर्मला. २

इशूनें मला रक्षिलें पामराला,
तयाच्या कृपें शोक सारा विराला;
तयावीण मी गुंततों पाशबंधें,
म्हणूनी तया गातसें मी प्रबंधें.

या प्रकारें तो ख्रिस्ती गात गात चालला असतां एक्या चढणीस जाउन पोंहचला: यात्रेकरूंची पुढें लांब दृष्टी पोंहचावी म्हणून ती चढण तेथें बांधिली होती, त्या चढणीवर ख्रिस्ती चढून पाहूं लागला तों पुढें विश्वासू चालला आहे: ते समयीं त्यास हांक मारूं लागला अहो विश्वासू बाबा! अहो विश्वासू बाबा, अहो थांबा थांबा, मी तुमच्या समागमीं येतों. त्याजवरून विश्वासूनें मागें पाहिलें, तेव्हां ख्रिस्ती

मार्गानें गेलें असतां अत्यंत ज्ञानी लोकानी ज्यास गौरव असें मानिलें आहे तो गौरव प्राप्त होतो.

ख्रि० — त्या खोऱ्यांत आणखी तुह्मास कोणी भेटलें नाहीं काय?

वि० — आणखी मला लज्जा भेटली; इचें लज्जा नाव उगेंच पडलें, इच्या सारिखें दांडगें मला दुसरें कोणी माझ्या यात्रेच्या मार्गांत भेटलें नाहीं. असंतुष्टास तर कांहीं वादानें किंवा दुसऱ्या कांहीं युक्तीनें बंद करितां येईल परंतु या निर्लाजरे लज्जेस बंद करितां येईना.

ख्रि० — ती तुह्मास काय बोलिली.?

वि० — तिची गोष्ट काय सांगूं? ती तर खतां धर्मालाच दोष लावूं लागली. ती ह्मणूं लागली कीं धर्मावर लक्ष्य ठेवणें या सारिखें अनुचित नीच दुसरें कर्म नाहीं; मृदु अंतःकरण करणें हा गांडूपणा आहे; जे शूर आहेत ते कालानुरूप स्वेच्छाचरण करावया जोगा जो स्वतंत्रपणा तो धारण करितात, तो स्वतंत्रपणा एकीकडेस ठेवून आपल्या तोजांतू

न काय शब्द निघतो आपलें पाउल कोठे पडतें
या प्रकारें जें अपूर्व चालणें तें उपहासास योग्य हो
तें, आणखी ती लज्जा असें बोलूं लागली कीं जे
जे पराक्रमी, धनाढ्य, शहाणे त्यांतून माझ्या म
तास अनुसरले नाहीं असे थोडकेच; पाहिलें अ
सतां ते पूर्वीं सर्वच माझ्या मतास अनुसरले हो
ते परंतु त्यांमधून कित्येकांस कोणी बहकाविलें
ह्मणून ते वेडे होउन त्यानी सर्वांचा त्याग करावा
अशी त्यांस इच्छा झाली, त्यानी काय समजून
तो त्याग आरंभिला हें नकळे.[१००] जेजे यात्रे करू
झाले त्यांस तरी नीचच अवस्था प्राप्त झाली आ
णि ते दीनपणे वागत होते आणि त्यांस सृष्टि
विषयक शास्त्र पूर्णपणीं कळलें नाहीं असें ते अ
ज्ञान होते. याच प्रकारें बहुत्येक दुसऱ्या उत्तम
वस्तूंची तिने निंदा केली; तिच्या मतें धर्मसभेंत
बोध ऐकून आपल्या अंतरीं पातकाविषयीं खे
द करणें, आणि उच्छ्वास टाकीत, अनुताप करी
त घरीं येणें हें मोटें लज्जितकर्म होय: तसेंच आ

स सोडणार नाहीं.

ख्रि० — ज्याच्या खालच्या आंगीं तुह्मास मोशे भेटला त्या पर्वतावर जें घर आहे तें तुह्मी पाहिलें नाहीं काय ?

वि० — होय, तें घर व तेथें दोन सिंह होते तेही पाहिले; ते सिंह निजले होते. मी तेथें आलों तेव्हां दुपार झाली होती. आणि पाहतों तों दिवस पुष्कळ आहे ह्मणून त्या देवडीवरल्या पाहारेकऱ्यास सोडून पुढें चालता होउन तो डोंगर पार झालों.

ख्रि० — तुह्मास तिकडून जातां पाहिलें असें त्या पाहारेकऱ्यानें मला सांगितलें; पण तुह्मी जर त्या घरीं उतरलां असतां तर फारच चांगलें झालें असतें, तुह्मास जन्मपर्यंत विस्मृति न होई असे पदार्थ त्या घरांतील मनुष्यांनी दाखविले असते. बरें तुह्मास नम्रतेच्या खोऱ्यांत कोणी भेटलें होतें काय ?

वि० — होय मला असंतुष्ट भेटला, तो मला समजावूं लागला कीं या खोऱ्यांत कांहीं रहायाची प्रतिष्ठा नाहीं, याजकरितां माझ्याबरोबर ये, आपण परत

जाउं आणखी या खोऱ्यांत प्रवेश केला असतां गर्व, अहंकार, ज्ञानाभिमान, लौकिक इत्यादिजे तुझे आप्त आहेत त्यांस वाईट वाटून त्यांची तुज वर अवकृपा होईल.

ख्रि॰ — मग त्वां त्यास काय उत्तर दिलें ?

वि॰ — म्या त्यास असें उत्तर दिलें कीं शरीर संबंधानें पाहिलें असतां आपण जे गृहस्थ सांगितले ते आमचे आप्त खरे, परंतु मी यात्रेकरू होतांच त्यानी माझा नाकार केला म्हणून म्या ही त्यांचा नाकार केला. आतां ते मला असे झाले आहेत कीं जाणूं त्यांचा वंश भिन्न आणि माझा वंश भिन्न; आणखी म्या त्यास असें सांगितलें कीं तें खोरें एक्या प्रकारचें व तूं जें त्यांचें वर्णन केलेंस तें एक्या प्रकारचें; असें आहे ज्याला गौरवाची इच्छा आहे त्याने नम्रता धरावी, ज्याला पतनाची इच्छा आहे त्याने अभिमान धरावा. याज करितां तुमच्या मतें जे पदार्थ प्रीति करावयास योग्य त्यांजवर प्रीति न करितां म्या या खोऱ्यामधून जावें हेंच मला उचित आहे, कांतर या

उचिलें.

स्त्रि० — तुह्मी तेथून निघाल्याच्या पूर्वीं तुमचें त्याचें कांहीं भाषण झालें होतें काय?

वि० — माझी त्याची मार्गांत एकदां गांठ पडली होती परंतु तो चुकावून एकीकडून जाउं लागला आणू अशी काय काहीं कर्म केल्याची त्यास लज्जाच प्राप्त झाली आहे. त्याची अशी स्थिति पाहून मीही त्यास पुसलें नाहीं.

स्त्रि० — ज्या नें गांव सोडून दिलें त्या काळीं तो चलमति वांचेल अशी मला आशा होती, पण आतां असें वाटतें त्या गावां बरोबर त्याचा नाश होईल. "कुत्रा आपण ओकलेलें खावयास आणि धुतली डुकरीण गाळांत लोळावयास परतली," अशी जी ह्मण आहे त्याच प्रमाणें त्यास घडलें.

वि० — आपण सांगता तसें त्याला घडावें असें मला वाटतें, पण काय करावें जें होणार तें काय चुकतें.?

स्त्रि० — ह्या गोष्टी पुरे, आतां आपण आपल्या गोष्टी करूं. आपल्यास मार्गांत येतांना काय काय घडलें,

णाचा उपसर्ग घडला नाहीं काय ?

वि० — होय घडला, असें झालें अडचणीचा ह्मणून जो डोंगर आहे, त्याच्या जवळ येतांच तेथें एक ह्मातारा माणूस भेटला, त्याणें मला पुसलें अहो तुह्मी कोण आहां कोठें जातां? म्या त्यास उत्तर दिलें बावा आह्मी यात्रेकरूं आहों, दिव्यनगरास जातों. मग तो ह्मातारा बोलूं लागला, तूं चांगला भला गडी दिसतोस. बरें तूं माझ्या कडेस चाकरीस राहशील काय? मी तुझ्या रोजमुऱ्याची सोय करून देतों. मग म्या त्यास विचारिलें बावा तुमचें नांव काय, तुह्मी कोठें राहतां? त्याने सांगितलें माझें नाव पहिला आदम, मी ठकगावीं राहतों. त्याजवरून म्या प्रश्न केला तुमच्या कडेस काय चाकरी करावी लागती आणि आपण काय मुशारा घाल? त्यानें उत्तर दिलें आमच्याकडेस बहु आनंदाची चाकरी आहे. आमचा मुशाहिरा हाच कीं जो आमचा सेवक असेल त्यास आह्मी शेवटीं आपला वारस करितों. मग म्या त्यास विचारलें कीं तुमचे घरीं भोजनास कायकाय पदार्थ असतात, आ

णि कोणत्या प्रकारचे चाकर असतात. तो उत्तर देतो पृथ्वीवरील जे अत्यंत उत्तम मधूर पदार्थ ते आमच्या घरीं भोजनास असतात, आणि माझ्याच वंशीं उत्पन्न झालेले जे तेच माझ्याकडेस चाकर असतात. बरें तुह्मास आपत्यें काय आहेत? आह्मास तीन कन्या मात्र आहेत. त्यांचीं नावें "देहाची हांव, डोळ्याची हांव, व संसाराची उर्मी" यांतून एखादी तूं वरशील तर तीही तुला देईन. बरें तुह्मी मला किती दिवस आपल्याकडेस ठेवाल. जों पर्यंत मी जीवंत आहे तों पर्यंत.

ख्रि॰—शेवटीं तुह्मी सिद्धांत काय केला व त्या ह्मातार्‍याने काय सिध्धांत केला?

वि॰—हे बाबा वास्तविक मजकूर सांगतात त्याजवरून त्याच्या समागमें जावें असें कांहीं प्रथम माझ्या मनांत आलें. इतक्यांत बोलतां बोलतां त्याच्या कपाळाकडेस माझी दृष्टी गेली तों पहातों तर "त्या ह्मातार्‍या मनुष्याचा त्याच्या सर्व कर्मासुध्धां त्याग करा." अशीं त्याच्या कपाळावर अक्षरें लिहिलीं आ

हेत.

ख्रि० — मग.

वि० — मग असें माझ्या मनांत आलें कीं हा कितीही जरीं माझ्याजवळ बोलिला आणि याणें कितीही मला आशा दाखविली तथापि मला आपल्या घरीं नेलें असतां जसें गुलामास विकितात तसें हा मला विकील. ते समयीं म्या त्यास सांगितलें कीं तुह्मी उगीच जल्पना किमर्थ करितां मी काहीं तुमच्या घरीं येत नाहीं. तेव्हां तो माझी निंदा करून असें बोलिला कीं काय चिंता आहे, तुझ्या जीवास पीडा करी असा एक तुझ्या पाठीस लाउन देतों. ते शब्द ऐकतांच मी त्याजकडेस पाठ फिरविली; आणि तेथून जाउं लागलों इतक्यांत मला असें वाटलें कीं त्याने मला धरून जोराने हिस्का मारिला त्यामुळें माझें काहीं मांस त्याजवळ राहिलें: त्याजवरून अरे मी बापुडा दीन असें मी ओरडुं लागलों. याप्रमाणें घडल्यानंतर मी आपल्या मार्गीं त्या पर्वतावर चढूं लागलों.

नंतर मी अर्धी वाट चालून मागें पाहतों तों एक

जण वाऱ्या सारिखा धांवत माझ्यामागें येत आहे. मग जेथें बसावयास साधनें करून ठेविलीं आहेत तेथें आहें इतक्यांत त्यानें येउन मला गांठलें:

ख्रि० — त्याच ठिकाणी मी पूर्वीं विसांव्यास बसलों होतों तेथें मला झोंप आली त्या झोंपेंत हा माझा पट हारवला होता.

वि० — पण दादा माझी अगोदर गोष्ट ऐकून घ्या: त्या मनुष्यानें मला आटोपितांच तो मला एक शब्द बोलिला आणि बोलतांच मारूं लागला. शेवटीं मला भूमीवर पाडिलें ते समयीं मूर्च्छा आली. नंतर म्या कांहींसा सावध होउन त्यास विचारिलें, बाबा असे तुह्मी माझे कां हाल केले? त्यानें उत्तर दिलें तूं कांहींसा गुप्तपणें त्या पहिल्या आदमाच्या नादीं लागला होतास ह्मणून, इतकें बोलून एक दुसरा प्रहार केला. त्या सारिखा मी त्याच्याच पायांजवळ पुनः मूर्छित उताणा पडलों. मग मी सावध होउन मजवर दया करा मजवर दया करा असें त्यास बोलिलों. त्या शब्दां सारिखा

त्याने दुसरा एक मला टोला चढविला याप्रमाणें त्याणें माझा जीवच घेतला असता परंतु तेथें एकजण येउन त्याणें त्यास सांगितलें असें करूनको ह्मणून बरें झालें.

ख्रि० — असें त्यास ज्याणें उगें रहावयास सांगितलें तो कोण.

वि० — म्या त्यास प्रथम ओळखिलें नाहीं, परंतु तो जाउं लागला तेव्हां त्याच्या हातांस आणि कुशीस छिद्रें पाहिलीं त्याजवरून आपला प्रभू असा निश्चय केला. नंतर मी त्या पर्वतावर जाउं लागलों.

ख्रि० — ज्या मनुष्याने वाऱ्या सारिखें येउन तुला गांठिलें तो मोशे. त्याच्या नियमाचा जो कोणी अतिक्रम करितो त्यास तो सुखी ठेवीत नाहीं, त्याजवर दया कशी करावी हें त्यास ठाउकच नाहीं.

वि० — तें मला पुरते पणीं कळतें त्याची माझी ही प्रथमच भेट असें नाहीं, मी निर्भयपणें माझ्या घरीं होतों तेव्हां त्याने माझ्या कडेस येउन सांगितलें कीं जरी तूं या घरांत राहिलास तरी मी हें जाळाया

स सोडणार नाहीं.

ख्रि० — ज्याच्या खालच्या आंगीं तुह्मास मोशे भेटला त्या पर्वतावर जें घर आहे तें तुह्मी पाहिलें नाहीं काय ?

वि० — होय, तें घर व तेथें दोन सिंह होते तेही पाहिले; ते सिंह निजले होते. मी तेथें आलों तेव्हां दुपार झाली होती. आणि पाहतों तों दिवस पुष्कळ आहे ह्मणून त्या देवडीवरल्या पाहारेकऱ्यास सोडून पुढें चालता होउन तो डोंगर पार झालों.

ख्रि० — तुह्मास निकडून जातां पाहिलें असें त्या पाहारेकऱ्यानें मला सांगितलें; पण तुह्मी जर त्या घरीं उतरलां असतां तर फारच चांगलें झालें असतें, तुह्मास जन्मपर्यंत विस्मृति न होई असे पदार्थ त्या घरांतील मनुष्यांनी दाखविले असते. बरें तुह्मास नम्रतेच्या खोऱ्यांत कोणी भेटलें होतें काय ?

वि० — होय मला असंतुष्ट भेटला, तो मला समजावूं लागला कीं या खोऱ्यांत कांहीं रहायाची प्रतिष्ठा नाहीं, याजकरितां माझ्याबरोबर ये, आपण परत

जाउं आणखी या खोऱ्यांत प्रवेश केला असतां गर्व, अहंकार, ज्ञानाभिमान, लौकिक इत्यादिजे तुझे आप्त आहेत त्यांस धाईट वाटून त्यांची तुज वर अवकृपा होईल.

ख्रि० — मग त्वां त्यास काय उत्तर दिलें?

वि० — म्या त्यास असें उत्तर दिलें कीं शरीर संबंधानें पाहिलें असतां आपण जे गृहस्थ सांगितले ते आमचे आप्त खरे, परंतु मी यात्रेकरू होतांच त्यांनी माझा नाकार केला. ह्मणून म्या ही त्यांचा नाकार केला. आतां ते मला असे झाले आहेत कीं जाणूं त्यांचा वंश भिन्न आणि माझा वंश भिन्न; आणखी म्या त्यास असें सांगितलें कीं तें खोरें एक्या प्रकारचें व तूंजें त्यांचें वर्णन केलेंस तें एक्या प्रकारचें; असें आहे ज्याला गौरवाची इच्छा आहे त्याने नम्रता धरावी, ज्याला पतनाची इच्छा आहे त्याने अभिमान धरावा. याज करितां तुमच्या मतें जे पदार्थ प्रीति करावयास योग्य त्यांजवर प्रीति न करितां म्या या खोऱ्यामधून जावें हेंच मला उचित आहे, कां तर या

मार्गानें गेलें असतां अत्यंत ज्ञानी लोकानी ज्यास गौरव असें मानिलें आहे तो गौरव प्राप्त होतो.

ख्रि० — त्या खोऱ्यांत आणखी तुह्मास कोणी भेटलें नाहीं काय?

वि० — आणखी मला लज्जा भेटली; इचें लज्जा नाव उगेंच पडलें, इच्या सारिखें दांडगें मला दुसरें कोणी माझ्या यात्रेच्या मार्गांत भेटलें नाहीं. असंतुष्टास तर कांहीं शब्दानें किंवा दुसऱ्या काहीं युक्तीनें बंद करितां येईल परंतु या निलाजरे लज्जेस बंद करितां येईना.

ख्रि० — ती तुह्मास काय बोलिली.?

वि० — तिची गोष्ट काय सांगूं? ती तर स्वतां धर्मालाच दोष लावूं लागली. ती ह्मणूं लागली कीं धर्मावर लक्ष्य ठेवणें या सारिखें अनुचित नीच दुसरें कर्म नाहीं; मृदु अंतःकरण करणें हा गांडूपणा आहे; जे शूर आहेत ते कालानुरूप स्वेच्छाचरण करावया जोगा जो स्वतंत्रपणा तो धारण करितात, तो स्वतंत्रपणा एकीकडेस ठेवून आपल्या तोडांतू

न काय शब्द निघतो आपलें पाउल कोठे पडतें या प्रकारें जें अपूर्व चालणें तें उपहासास योग्य होतें, आणखी ती लज्जा असें बोलूं लागली कीं जे जे पराक्रमी, धनाढ्य, शहाणे त्यांतून माझ्या मतास अनुसरले नाहीं असे थोडकेच; पाहिलें असतां ते पूर्वीं सर्वच माझ्या मतास अनुसरले होते परंतु त्यांमधून कित्येकांस कोणी बहकाविलें ह्मणून ते वेडे होउन त्यांनी सर्वांचा त्याग करावा अशी त्यांस इच्छा झाली, त्यांनी काय समजून तो त्याग आरंभिला हें नकळे. जे जे यात्रेकरू झाले त्यांस तरी नीचच अवस्था प्राप्त झाली आणि ते दीनवाणे वागत होते आणि त्यांस सृष्टि विषयक शास्त्र पूर्णपणीं कळलें नाहीं असें तें अज्ञान होते. याच प्रकारें बहुत्येक दुसऱ्या उत्तम वस्तूंची तिने निंदा केली; तिच्या मतें धर्मसभेंत बोध ऐकून आपल्या अंतरीं पातकां विषयीं खेद करणें, आणि उच्छ्वास टाकीत, अनुताप करीत घरीं येणें हें मोटें लज्जित कर्म होय: तसेंच आ

पल्या पासून कोणाचा लहानसा अपराध झाला असला तर त्याविषयीं त्याच्याजवळ क्षमा मागणें किंवा आपण कोणाचें कांहीं घेतलें असल्यास तें त्यास भरून देणें हें ही तरी लज्जितकर्म आहे. आणखी ती असें बोलिली कीं धर्माचा स्वीकार केल्याने असें होतें कीं जे थोर असतात त्यांच्या ठायीं कांहींसीं दुर्व्यसनें असलीं ह्मणजे ते थोर गृहस्थ आपल्यास आवडूं नयेत आणि ज्यांनी त्या धर्माचा स्वीकार केला असेल ते आपल्या मंडळीचे ह्मणून त्यांस आपले ह्मणावे आणि त्यांचा सत्कार करावा. असें जें करून घेणें ही मोठी लज्जा होय?

ख्रि० — मग तुह्मी तिला काय बोलिलां?

वि० — तें पुसूंच नका. पहिल्याने तर मला कांहीं सुचेना असें झालें, किंबहुना माझें मन चलित होउन मी शंकेंत पडलों, परंतु शेवटीं म्या असा विचार केला कीं लोकांत जें फार वंदिलेलें तें ईश्वराने निंदिलें आहे. आणखी मला असें सुच

लें कीं ही लज्जा, मनुष्यें कोणकशीं आहेत त्यांज-
विषयीं मात्र सांगती, परंतु ईश्वर किंवा तद्वाक्य
त्यांजविषयीं काहीं सांगत नाहीं. आणखी मला
असें वाटलें कीं जे अभिमानी जीव आहेत त्यांच्या
मता प्रमाणें मरण किंवा जीवन प्राप्त होणार नाहीं
तर परमेश्वराच्या असें इच्छेस येईल व त्याचे जे
नियम आहेत त्या प्रमाणें प्राप्त होईल. याज करि
तां ईश्वरी वाक्यास सर्व जग जरी अनुसरून नस
लें तथापि तें वाक्य सर्वोत्तम. याप्रकारें ईश्वर प्र
णीत जो धर्म तोच ईश्वरास आवडतो; जें मृदु अंतः
करण तें त्यास आवडतें; जे परलोकींच्या राज्या
विषयीं वेडे झाले आहेत ते सर्वोत्कृष्ट शाहणे; ज
गांत सर्वांहून थोर असून तो जर ख्रिस्ताचा द्वेष
करितो तर त्याजपेक्षां गरीब असून ख्रिस्तावर
प्रीति करितो तो श्रेष्ठ. असा विचार करून म्याल
ज्जेस म्हटलें अगे लज्जे तूं मजपासून दूर हो, तूं
माझ्या उद्धारा विषयीं विघ्न आहेस; माझा जो प्र
भू राजा त्याची आज्ञा मोडून ज्या तुझा स्वीकार क

रावा काय? तुझा स्वीकार केला तर तो येईल त्या काळीं त्यास तोंड काय दाखवावें. १०२ त्याचे जे मार्ग आहेत व सेवक आहेत त्यांजविषयीं मला लाज वाटली तर त्याजपासून मला आशीर्वाद कसा मिळेल असें म्यां तिला सांगितलें, पण ती दांडगी मोठी निर्लाजरी; मी तिला हांकून दूर लाविलें मग कांहीं वेळ न होतांच ती पुनः माझ्या पाठीस लागली आणि धर्मांत वागणारास जीं जीं विघ्नें प्राप्त होतात त्यांतील कित्येक माझ्या कानीं सांगूं लागली; शेवटीं म्यां तिला असें सांगितलें कीं आतां उगेच श्रम कशास करितीस मी काय तुझें ऐकणार आहें; तूं ज्या ज्या गोष्टींची निंदा केलीस, त्या त्या गोष्टी माझ्या गौरवास कारण आहेत: या प्रकारें माझ्या पाठीस जें संकट लागलें होतें त्याचें म्यां निवारण केलें. मग मी मोकळा होउन गाऊं लागलों.

श्लोक

मानी ईश्वरवाक्य जो नर तया विघ्नें कसूंपा
हती, तीं देहाश्रित कीं अनेक असती चि

त्यास दा मोहिती, त्यांतें दूरि करीं तयां हूनि
पळें सोडूनियां सत्वरीं, ऐसें निश्चित तूं अ
रीं न करिशी तूं गुंतशी तत्करीं. १

सन्मार्गी जो चालत एक भावें, यास्तव क
रू नाम तया वदावें, तेणें सदा सावध कीं
असावें, लज्जादि विघ्नाशि वळें त्यजावें ॥२॥

स्त्रि०— दादा ती लज्जा अशी लुच्ची दांडगी अस
तां तुल्ली तिचें काहीं चालूं दिलें नाहीं हें ऐकून म
ला संतोष झाला; तुह्मी जें सांगतां तें खरें तिच्या
सारिखें दुसरें कोणास विपरीत नाव मास झालें
नाहीं. कां तर ती अशी निःशंक आहे कीं ती मार्गी
न ही आपल्या पाठीस लागती आणि थाईदा विष
यीं लाजवीत नाहीं परंतु जें चांगलें आहे त्याजवि
षयीं आपल्यास सर्व लोकांच्या समक्ष लाजवीती;
जर ती निर्लज्ज नसती तर ती असें न करिती; अ
सो पण आपण तीस वधूं नये, ती मोठमोठीं बोल
णी बोलती परंतु तिच्या हातून कोणी एक मोठा हो
त नाहीं, मूर्खमात्र मोठा होतो. साळोमोन असें बो

ल्ला आहे, " जे शाहणे ते गौरवाचे वांटेकरी हो तील परंतु जे मूर्ख ते लज्जेचे पदवीस चढतील " [१०३]

वि० — मला वाटतें कीं लज्जेशीं भांडण्या करितां आपल्यास साह्य प्राप्त व्हावें ह्मणून आपण ईश्वराची प्रार्थना करावी ह्मणजे या पृथ्वीच्या ठायीं सत्या विषयीं आपल्या अंगीं शूरत्व येईल.

ख्रि० — आपण खरें सांगतां: बरें पण त्या खिंडींत आपली दुसरे कोणा बरोबर गांठ पडली नाहीं काय?

वि० — नाहीं; तिची भेट झाल्या नंतर त्या खिंडीं तून व मृत्युच्छायेच्या खिंडीतून पार पडें तों पर्यंत सूर्यप्रकाश पडत होता.

ख्रि० — तर तुह्मास चांगली सोईची गोष्ट झाली; असें मला घडलें नाहीं: मी त्या खिंडींत शिरतांच आपल्लुयोन ह्मणून जो दुष्ट पिशाच त्याने मजशीं बहुत काळ घोर युद्ध केलें; ते समयीं मला असें वा टलें कीं हा मला ठार मारितो, तो मला धरून भूमी वर आपटूं लागला तेव्हां असा भास झाला कीं हा माझा चेंदा करितो; त्याने मला भूमी वर आपटिलो

च माझ्या हातींची तरवार उडाली; आणि तो असें बोलूं लागला कीं आतां माझ्या हातीं आलास आतां कोठे जातोस; ते समयीं म्या ईश्वराचा धांवा केला, मग त्याने धांवा ऐकून मला सर्व संकटांपासून सोडविलें. नंतर मी मृत्युच्छायेच्या खिंडींत शिरलों ती अर्धी चालें तोंपर्यंत मला प्रकाश सांपडला नाहीं. त्या वेळीं मला वारंवार असें वाटूं लागलें कीं आतां मी मरतों; शेवटीं पाहांट होउन सूर्य उगवला, मग जो मार्ग राहिला होता तो मी चांगला सुखाने स्वस्थपणें क्रमिला.

मग म्या असें स्वप्नांत पाहिलें कीं ते उभयतां मार्गीं जात असतां विश्वासूची वाटेच्या एके कडेस दृष्टि गेली, त्या काळीं त्याने एक मनुष्य पाहिला त्याचें नाव वाचाळ. हा त्याचाच बाजूने चालला होता (हा मार्ग मोठा होता ह्मणून यांतून त्यां तिघांस चालायास जागा होती) हा उंच होता दुरून पाहिला असतां चांगला सुंदर दिसे तसा जवळून पाहिला असतां दिसत नसे. त्याजबरोबर विश्वा

सूत्राशानें बोलणें आरंभिलें तें असें.

कां दादा आपण कोठें चालिलां; आपण दिव्यदेशास चालिलां काय?

वाचाळ बोलतो. होय मी तेथेंच चालिलों.

वि० — तरमग बरें झालें आह्मास आपल्या चांगल्या समागमाचा लाभ होईलना?

वा० — तें काय पुसतां, तुमचा आमचा संग घडावा हेंच माझ्या मनांतून आहे.

वि० — तरमग चला, आपण सोबतीने जाउं, ज्या उपयोगी गोष्टी त्या सांगून आपली मजल खेटूं.

वा० — तुह्मी असलां काय किंवा कोणी दुसरा असला काय पण चांगल्या गोष्टी कराव्या हें मला फार आवडतें; आणि असल्या उत्तम कर्माकडे सज्यांची बुद्धि झालेली अशां बरोबर माझी गांठ पडली याजवरून मला मोठा आनंद झाला: वास्तविक पुसाल तर वाटसरू असून कालक्रमणा करितां आपल्या सारिखा उद्योग आरंभणारे विरला; वाटसरू ह्मटलें ह्मणजे प्रायः निरूप

योगी गोष्टी कराव्या असल्यांचा मला थावा त्रास येतो.

वि० — अहाहा या लोकीं मनुष्यांच्या वाणीस आणि सुखास परलोकींच्या व ईश्वराच्या गोष्टीजशा हितावह तशा कोणत्या दुसऱ्या गोष्टी आहेत, असें असतां त्या गोष्टी करीत नाहींत याजवरून आल्यास त्यांचा खेद वाटतो.

वा० — तुह्मी मला फारच आवडतां; कांतर तुह्मी केवळ अनुभवाच्याच गोष्टी बोलतां. आपण खरेंच सांगतां ईश्वराच्या गोष्टी सारिख्या दुसऱ्या सुरस व हितावह कोणत्या गोष्टी आहेत.

मनुष्यास जर आश्चर्यकारक गोष्टी आवडत असल्या तर त्यांस ईश्वराच्या गोष्टी पेक्षां दुसऱ्या आश्चर्यकारक गोष्टी कोठे आहेत. इतिहास, सृष्टितील गुह्यें, चमत्कार, आश्चर्यें, भविष्य सूचकें हीं जर आवडत असलीं, व यांजविषयीं गोष्टी सांगाव्या असें वाटत असलें, तर ह्याजशा त्यांस धर्मपुस्तकांत अढळतील अशा दुसऱ्या कोठे अ

ढळणार. त्याजवरून मोठा आनंद व्हावा, त्या केवळ मधूर लागाव्या अशारीतीने त्या तेथें लिहील्या आहेत.

वि॰ — खरें पण तसले प्रकरणांच्या गोष्टी सांगूं लागलें असतां त्यांजपासून आपलें काय करें हित होईल याजकडेस आपलें विशेषें करून लक्ष्य असावें

वा॰ — होय, लक्ष्य असावें खरें;

त्या गोष्टी केल्याने बहुत पदार्थांचें ज्ञान होतें; प्रापंचिक पदार्थ व्यर्थ आहेत आणि पारमार्थिक पदार्थ हितावह आहेत असें त्यां गोष्टिंवरून कळूं येतें. आपला पुनर्जन्म झाला पाहिजे, आपल्या कर्माने आपला उध्धार होत नाहीं, ख्रिस्ताचें पुण्य आपल्या उध्धारास आवश्यक आहे अशा अशा गोष्टी विशेषें करून समजूं लागतात. पश्चात्ताप कसा करावा, विश्वास कसा धरावा, प्रार्थना कशी करावी, सहनशीलता कशी धरावी इत्यादि गुण कळूं लागतात. शुभवर्तमानांत जीं जीं वचनें व शांतिकारक

बोध सांगितले आहेत ते काय कशो असें करून समाधान वाटतें. आणखी असें घडतें कीं खोट्या मतांचें निराकरण कसें करावें, सत्य सिद्धांत कसा प्रतिपादावा, व अज्ञान जनास कसा बोध करावा हें ही समजूं लागतें.

वि॰ — होय हें सर्व घडतें खरें. त्या अशा गोष्टी तुह्मापासून ऐकून मला मोठा आनंद होतो.

वा॰ — अहः हः अशा गोष्टी मनुष्यांस कळत नाहींत ह्मणून निरंतर जीवन देणारी श्रद्धा, व अंतःकरणांत ईश्वर कृपेचीं फळें हीं अवश्य असलीं पाहिजेत असें वाटत नाहीं; याजकरितां ते अज्ञानांत राहून नियमशास्त्रांत जीं कर्में सांगितलीं आहेत तीं ते करितात, परंतु तसल्या कर्मे करून कोणत्याही मनुष्यास दिव्य लोकींचें राज्य प्राप्त होत नाहीं.

वि॰ — पण बाबा या गोष्टी विषयींचें जें दिव्य ज्ञान तें ईश्वर कृपेनेंच प्राप्त होतें. कोणी ह्मणेल कीं तें ज्ञान मी आपल्या आपण स्वाधीन किंवा त्या ज्ञानाच्या गोष्टी बोलून तें संपादीन तर तें मिथ्या.

या० — खरें, हें मी जाणून आहें. ईश्वराने दिल्या वांचून मनुष्यास कोठून प्राप्त होईल. जें प्राप्त होणें तें त्याच्या कृपेनेंच प्राप्त होतें, कर्मेंकरून प्राप्त होत नाहीं. याजविषयीं व्हावीं तर मी आपल्यास शास्त्रांतील शेंकडों प्रमाणें दाखवून देतों.

वि० — बरें तर आतां कोणत्या विषयावर आपलें भाषण चालवितां ?

या० — आपल्यास व्हावें त्या विषयावर चालवावें: पारलौकिक, ऐहिक, नीतिरूप, स्वार्तिक, धार्मिक, सामान्य, भूतभविष्य, स्वदेशीय परदेशीय, सांसिद्धिक अथवा औपाधिक, यांतून कोणत्याही विषयावर मी बोलेन: इतकेंच कीं त्यापासून आपलें हित व्हावें.

हें पाहून विश्वासुला आश्चर्य वाटलें आणि तो त्या वाचाळास सोडून ख्रिस्तीच्याजवळ गेला आणि त्यास हळूच बोलतो, आपल्यास तर भलाशूर सोबती मिळाला, हा भलाच यात्रेकरू होईल.

हे शब्द ऐकून ख्रिस्ती अमळसा हांसून बोलतो

तुह्मी या पुरुषाच्या नादीं लागले आहां पण जे यास ओळखित नाहींत त्यांतील बहुत्येकांस हा आपल्या वाचेने फसवील.

वि॰ — तर आपण यास ओळखितां काय ?

खि॰ — मी जसा त्यास ओळखितों तसा त्याचा तो आपल्यास ही ओळखित नाहीं.

वि॰ — बरें तर तो कोण आहे.

खि॰ — त्याचें नाव वाचाळ, तो आपल्याच गावींचा आहे. तुह्मी हो त्यास कसें ओळखीत नाहीं. आपलें गाव मोठें आहे ह्मणून तुह्मी त्यास ओळखीत नसाल.

वि॰ — तो कोणाचा लेंक व तो कोठे राहतो ?

खि॰ — तो चांगुल बोल्याचा लेंक, तो बडबड गल्लींत राहतो. त्याच्या जे ओळखीचें आहेत ते त्यास वाचाळ या नामें करून ओळखितात; तो गोड बोलतो खरा परंतु तो केवळ हलका मनुष्य आहे

वि॰ — असें कां हो, तो तर चांगला दिसतो.

खि॰ — जे त्यास पुर्तेपणी ओळखीत नाहींत त्यांस

तो चांगला दिसतो; तो लोकांत मात्र चांगला परंतु एकां
तीं पाहिला असतां मोठा ओंगळ: तो चांगला दिसतो
असेंजें आपण बोलिलां त्याजवरून मला एक्या चित्रा
च्यांचें स्मरण झालें त्यांत जीं चित्रें काढावीं तीं अशीं
असतकीं दूरून पाहिलीं असतां तीं चांगलीं दिसावीं;
परंतु जवळ येउन निरखून पाहिलीं असतां तीं केवळ
वाईट दिसावीं. त्यां चित्रांच सारिखा तो आहे कळलें.
वि० — तुह्मी हांसून बोलिलां याजवरून मला वाट
तेंकीं आपण उगीच विनोद करितां.
रिव्र० — मी हासलों याजवरून काय विनोद झाला, हे
भगवान् माझ्या हातून याप्रसंगीं विनोद न घडो: त्या
चीमी काय उगीच निंदा करितों, त्याचे आणखी काय
गुण आहेत तें ऐका. तो पाहिजे त्या मंडळींत मिळेल
आणि पाहिजे ती गोष्ट करील; आतां जसा तो आप
ल्याशीं भाषण करितो तसाच तो कलालाच्या दुकानां
त असल्या तरी भाषण करील. आणि जसा तो अधि
क पीत जाईल तसा तो अधिक बोलेल, परंतु त्याच्या
अंतःकरणांत, किंवा घरांत किंवा बोलण्याचालण्यांत

धर्मास राहावयास ठिकाण मिळत नाहीं; तो सर्व एथ्या बोलण्याने संपादितो, आणि बोलूनच आपला धर्म प्रकट करितो.

वि० — आपण असें ह्मणतां काय तर मग मला त्याच्या स्वरूपाचें अगदीं विपरीत ज्ञान झालें.

ख्रि० — विपरीत ज्ञान झालें यांत संशय काय: शास्त्रांत असें आहे " ते बोलणें बोलतात परंतु करणें करीत नाहींत; देवाचें राज्य तर बोलण्यावरून नाहीं, सामर्थ्यावरून दिसून येतें " १०४ प्रार्थना, पश्चात्ताप, विश्वास, पुनर्जन्म, यांज विषयीं त्यास बोलतां मात्र येतें; परंतु त्यास काहीं समजत नाहीं. मी त्याच्या कुटुंबांत होतों आणि त्यास म्या घरीं पाहिलें आहे व बाहेर ही पाहिलें आहे; मी त्याज विषयीं जें सांगत आहें ती खरी गोष्ट आहे. जसा कोरड्या लांकडांत रस नाहीं तसा त्याच्या घरीं धर्म नाहीं. तेथें ईश्वराची प्रार्थना कोठली व पातका विषयीं पश्चात्ताप कोठला: किंबहुना त्याज पेक्षां ईश्वरास पशु चांगला भजतो: जे कोणी त्यास ओळखितात ते सर्व त्यास असें जाण

त्यात कीं धर्मास लांछन, धर्माची निंदा अपकीर्ति हीं सर्व याच्याकडून घडतात. हा ज्या गावीं राहतो त्या गावाच्या सीमेत धर्माची कोणी स्तुति करीत नाहीं असें होण्यास कारण हाच आहे. सामान्य लोक यास असें बोलतात कीं "बाहेर साधु, आणि घरीं पिशाच" आणि याच प्रकारें त्याच्या कुटुंबांतील मनुष्यांसही त्याचा अनुभव आहे. त्याचा स्वभाव वेंगळ, शिवरा, मनस्वी, ह्मणून याशीं कसें वर्तावें किंवा कसें बोलावें हें कांहीं त्यांस कळत नाहीं. ज्यां मनुष्यांस याज बराबर व्यवहार करण्याचा प्रसंग पडला आहे ते असें ह्मणतात कीं याशीं व्यवहार करणें त्याजपेक्षां केवळ लुच्चाशीं व्यवहार करणें बरें.

या बोलक्या मनुष्यास संधि सांपडली असतां याज बराबर व्यवहार करणारे जे त्यांस हा ठकवील, त्यांशीं हा कपट करील आणि त्यांस फसवील. आणखी असें आहे हा आपल्या मुलांसही आपल्याच सारिखें करावयास शिकवितो. आणि त्यांची बुद्धि प्रथमतः पाप करावयास जर भ्याली तर तो त्यांस मूर्ख, अज्ञा

न असें ह्मणतो आणि त्यांस मग बहुतशीं कामें सांग
त नाहीं, आणि लोकांसमक्ष त्यांची स्तुति ही करीत ना
हीं. मला असें वाटतें कीं त्याणें आपल्या दुष्ट आचरणें
करून बहुत जणास फसवून पाडलें आहे; आणि जर
ईश्वरानें त्यास आवरिलें नाहीं तर तो आणखी बहुते
कांचा नाश करील.

वि० — हा दा तुह्मीजें सांगितलें तें म्या सत्य मानावें अ
सें आहे. तुह्मीजें कांहीं त्याज विषयीं सांगितलें तें
त्यास जाणून सांगितलें आणि ज मा ख्रिस्तीजनाचे
गुण दोष सांगतो त्याच प्रकारें तुह्मी त्याज विषयीं सां
गितलें. तुह्मी दुष्ट बुद्धि धरून त्याज विषयीं बोलतां
असें नाहीं तर तुह्मी ह्मणतां त्याच सारिखा तो आ
हे.

ख्रि० — तुह्मी त्यास जितकें जाणतां तितकेंच म्या त्या
स जाणलें असतें तर तुह्मी त्यास प्रथम मानिलें हो
तें तसेंच म्या त्यास मानिलें असतें: किंबहुना जे ध
र्माचे द्वेष्टे आहेत त्यांनी जर त्याची कथा सांगितली
असती तरी त्याची निंदा केली असें म्यां मानिलें अ

सतें: कांतर जे चांगले मनुष्य आहेत त्यांच्या देवीं बहु धा असें असतें, त्यांची व त्यांच्या आचरणाची जे वाईट आहेत ते निंदा करीत असतात. परंतु त्याअविषयीं तरम्याज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या व आणखी ही बहुत वाईट गोष्टी आहेत त्या सर्व खऱ्या आहेत. आणखी असें आहे चांगले मनुष्यांस याअविषयींला जवारतें; ते यास बंधु किंवा मित्र असें काहीं एक बोलत नाहींत; त्यांअमध्यें याचें नाव निघालें असतां त्यांस मोठी लज्जा प्राप्त होते.

वि० — याअवरून असें दिसून येतें कीं बोलणें, आणि त्यासारिखें चालणें ह्या दोन्ही गोष्टी परस्परें अगदी वेगळ्या आहेत. आणि मी ही हा भेद लक्ष्यांत ठेवीन.

ख्रि० — जीव आणि शरीर हीं जशीं दोन्हीं वेगळीं आहेत तशीं तीं दोन्हीं वेगळीं आहेत. आणि शरीर असें जीवावांचून प्रेतरूप नसेंच बोलणें एकटें राहिलें असतां प्रेतरूप होतें. आचरण हें भक्तीचा जीव होय, जो देव व बाप त्याअर्वक शुद्ध व निर्मळ भक्ति हीच आहे कीं पोरटीं व

विधवांच्या, त्यांच्या संकटांत त्यांस भेटावें, आणि आपण जगाच्या मळापासून अलिप्त राहावें.[१०६] हें कांहींसा वाचाळास ठाउकें नाहीं; त्यास वाटतें कीं भक्तीच्या गोष्टी ऐकिल्या आणि सांगितल्या ह्मणजे उत्तम ख्रिस्ती होतो. याप्रकारें फसून तो आपल्या जीवाचा नाश करितो. ऐकणें हें बीज पेरणें होय, परंतु त्याचें फळ अंतःकरणांत आणि आचरणांत आलें असें एकट्या बोलण्यानेंच सिद्ध होत नाहीं. आपण असें निश्चित जाणावें कीं न्यायाचे दिवशीं मनुष्यांचा ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणें न्याय ठरेल.[१०७] तूं शास्त्र खरें मानीत होतास किंनाहीं याप्रमाणें न्यायाधीश पुसणार नाहीं, तर तूं त्याप्रमाणें चालत होतास किंवा उगीच तोंडाने गोष्टी सांगत होतास असें पुसेल. मग त्याप्रमाणें न्याय होईल: जगाचे अंतकाळास शेतकापणीची उपमा दिली आहे; कापणीच्या समयीं मनुष्याचें सर्वलक्ष्य पीकाकडेस असतें, याजवरून मी विश्वासास बट्टा लावितों असें नाहीं कारण कीं विश्वासापासून उत्पन्न झालेलें कर्म ईश्वर मान्य करील. सारांश न्यायाच्या दिवशीं वाचाळा

च्चें मत कसें निरूपयोगी पडेल हें माझ्या या बोलण्या
वरून समजावें.

वि० — मोशे याने शुद्ध पशूचें वर्णन केलें आहे त्याचें
मला आपल्या बोलण्यावरून स्मरण झालें. ज्याचा खु
र चिरून दोन भाग झाले आहेत, आणि जो चारट उल
टून काढितो तोच तो; ज्याचा खूर चिरून दोन भाग मात्र
झाले आहेत किंवा जो चारट मात्र उलटून काढितो तो
शुद्ध नव्हे. ससा चारट उलटून काढितो, परंतु त्याचा खु
र चिरून त्याचे दोन भाग झाले नाहींत ह्मणून तो अशु
द्ध.[१०८] याचप्रमाणें तो वाचाळ आहे; तो चारट उलटू
न काढितो, ज्ञानाचा शोध करितो, तो वाक्यचाबीत व
सतो; परंतु त्याचा खुर चिरून त्याचे भाग झाले नाहींत
ह्मणजे त्याने पातक्यांचा मार्ग एकीकडे टेविला नाहीं;
सशाप्रमाणें त्याला कुत्र्याचा किंवा अस्वलाचा पाय
आहे, ह्मणून तो अशुद्ध आहे.

ख्रि० — आपणतर त्या शास्त्रांच्या ओव्यांचा वास्त
विक पारमार्थिक अर्थ सांगितला. आणखी असें आ
हे, कित्येकजे मनुष्य फार बोलके ते वाजती पितळ आ

णि क्षण क्षणीत टाळ असे ते जाणावे असें पाल बो लतो. वाजती पितळ आणि क्षण क्षणीत टाळ ह्मण जे निर्जीव असून शब्द करणारे पदार्थ असा त्यानेंच एक्या दुसऱ्या ठिकाणी अर्थ केला आहे. निर्जीव या वरून असें जाणावें कीं खरा विश्वास आणि सुवर्त मान संबंधी ईश्वरी कृपा हें जीवन त्यांच्या हातीं नाहीं, याजकरितां त्यांच्या बोलण्याचा नाद दिव्य दूतांच्या वाणी सारिखा किंवा ध्वनी सारिखा असला तथापि परलोकींच्या राज्यांत जीवनाच्या लेंकरांमध्यें त्यांचें राहणें होणार नाहीं [१०९]

वि० — मला पहिल्या पासूनच त्याची संगत आवड ली नाहीं आतां मला त्याचा त्रासच आला आहे, बरें त्याची संगत तोडण्याविषयीं काय करावें.?

ख्रि० — त्याचा उपाय मी सांगतों, तसें केलें ह्मणजे ईश्वराने त्याच्या अंतःकरणांत प्रेरणा करून तें आपल्या कडेस फिरविलें नाहीं तर त्याला तुझ्या संगती चा लौकरच त्रास येईल.

वि० — तर मग म्या त्यास काय करावें?

ख्रि० — त्याच्याजवळ जाउन त्याशीं चांगलें प्रौढपणें धर्मापासून अंतःकरणांत व आचरणांत काय काय घडतें त्याजविषयीं भाषण करूं लाग; आणि तें भाषण तो मान्य करील ल्हणून, त्याणें तें मान्य केलें ह्मणजे त्यास असें विचार कीं आपण सांगतां त्याप्रमाणें आपल्या मनांत, घरांत बोलण्याचालण्यांत आहे काय?

ही युक्ति त्या ख्रिस्तीपासून ऐकून तो विश्वासू त्या बाचाला कडेस गेला, आणि बोलूं लागला कीं बाबा कसे आहां.

वा० — खरखरूप आहों, यावें. आपण माझ्याजवळून गेलां नसतां तर इतक्या वेळांत आपलें फार भाषण झालें असतें.

वि० — बरें तर आपली इच्छा असल्यास आतां आपलें भाषण होउं द्यावें. आपण पूर्वी मला सांगितलें होतें कीं म्या आपल्यास प्रश्न करावा त्याजवरून मी असें पुसतों कीं ईश्वराच्या तारक कृपेचा अंतःकरणास संस्कार झाला आहे असें कशावरून जाणावें.

वा० — मला असें दिसून येतें कीं आपलें भाषण कार्यकारणभाव प्रकरणी आहे: बरें; आपण चांगलाच प्रश्न केला, त्याचें उत्तर सांगण्या विषयीं मज कडून काहीं अनमान नाहीं, तें मीं थोडक्यांतच सांगतों, ऐकावें. प्रथम तर ईश्वर कृपेचा संस्कार अंतःकरणास झाला ह्मणजे त्या अंतःकरणीं पापाचा मोठा निषेध उत्पन्न होतो. नंतर, —

वि० — हां हां पहिल्याचाच विचार संपवावा; तो संस्कार झाला असतां जीवास आपल्या पापाचा त्रास होऊं लागतो असें आपण बोलिलां असतां तर आपलें बोलणें चांगलें नीट पडतें.

वा० — कां, निषेध करूं लागतो आणि त्रास होऊं लागतो हें एकच, यांत काय अंतर आहे.?

वि० — अहो त्यांत तर फार अंतर: कांहीं एक्या प्रसंगावरून मनुष्य पापाचा निषेध करितो, परंतु ईश्वर अनुग्रहा वांचून त्याच्या ठायीं पातकांचा त्रास उत्पन्न होत नाहीं; लो कांत उभें राहून पातकाचा निषेध करणारे म्यां बहुत पाहिले आहेत, परंतु पातक

त्यांच्या मनांतून, घरांतून बोलण्याचालण्यांतून गेलें असें तर अढळलें नाहीं. योसेफाच्या स्वामिणीनें तर केवळ पतिव्रतेच्या सारिखा पातकाचा निषेध केला परंतु तो योसेफ तिला वश झाला असता तर तिणें त्याजबराबर आनंदानें पातक केलें असतें ११० जशी आई आपल्या कडिवरल्या मुलास ह्मणाली तूं वाईट, ओंगळ, परंतु मागाहून त्याच मुलास आलिंगून त्याचा मुका घेती त्याच प्रमाणें कितीएक जण पातकाचा निषेध करितात.

वा० – तुह्मी शब्दाचें अर्थांतर करून अडथूं पाहतां.?

धि० – मी अडवूं पाहतों असें नाहीं. तर आपलें ज्या विषयावर भाषण चाललें आहे तो विषय चांगलेपणीं कळावा. ह्मणून मी असें बोलतों. बरें अंतःकरणास ईश्वरी कृपेचा संस्कार झाला आहे असें दुसऱ्या कोणत्या लक्षणांवरून जाणावें.?

वा० – शुभवर्तमानांत जीं गोष्टें आहेत त्यांचें वरुन ज्ञान झालें ह्मणजे ईश्वरी कृपेचा संस्कार झा

ला असें आणावें.

वि० — हें पहिलें लक्षण असावें; परंतु पहिलें अ
सो अथवा शेवटलें असो, हें तरी लक्षण खोटें,
शुभ वर्तमानांतील गोष्टींचें फार ज्ञान प्राप्त झालें
ह्मणून ईश्वर कृपेचा संस्कार जी वाच्या गयीं उत्प
न्न होतो असें नाहीं." मनुष्यास सर्वज्ञान प्राप्त झा
लें तथापि तो कांहींच नाहीं, मग तो ईश्वराचें लेंकरूं
नाहीं हें काय सांगायाचें आहे. ख्रिस्त असें बोलि
ला कीं तुह्मी ह्या सर्व गोष्टी जाणतां काय? शि
ष्यानी उत्तर दिलें कीं होय जाणतों, तेव्हां ख्रिस्त
ह्मणाला तुह्मी त्या प्रमाणें करीत असलां तर तु
ह्मी धन्य आहां. येथें त्या गोष्टी जाणणारांस ख्रि
स्त धन्य ह्मणत नाहीं करणारांस धन्य ह्मणतो. जे
थें ज्ञान आहे तेथें क्रिया अवश्य असती असें ना
हीं: तो आपल्या स्वामीची इच्छा जाणतो आणि
त्याप्रमाणें करीत नाहीं इत्यादि वाक्यें आहेत. म
नुष्यास दिव्य दूता सारिखें ज्ञान असतें परंतु तो ख्रि
स्ती असत नाहीं; ह्मणून आपण जें ख्रिस्तीचें ल

क्षण सांगितलें तें सत्य नव्हे. वाचाळ आणि आप आपल्यास नावाजणारे असे जे आहेत त्यांस जाण णें आवडतें; परंतु ईश्वरास करणें आवडतें. असें ही असतां ज्ञानावांचून अंतःकरण चांगलें होतें असें नाहीं; कांतर ज्ञानावांचून अंतःकरण कांहीं एक उपयोगास पडत नाहीं. ज्ञान दोन प्रकारचें; एक ज्ञान आहे तें वस्तूचा विचारमात्र करितें, आणि दुसरें जें ज्ञान आहे तें प्राप्त झालें असतां त्याजबरोबर विश्वास, व प्रीति उत्पन्न होती; तेणेंकरून मनुष्य ईश्वराचे इच्छेप्रमाणें अंतःकरणपूर्वक करूं लागतो: पहिलें ज्ञान वाचाळास मात्र उपयोगी, परंतु ख्रिस्तीजे आहेत त्यांस दुसरें ज्ञान प्राप्त झालें तरच ते तृप्त होतात. "तूं मला ज्ञान दे ह्मणजे मी तुझें शास्त्र पाळीन व अंतःकरण पूर्वक त्या प्रमाणें चालेन" ११२ ,,

वा० — तुह्मी अर्थांतर करून पुनः अडवूं पहातां, हा सुबुद्धि प्राप्त व्हावयाचा मार्ग नव्हे.

वि० — बरें तर अंतःकरणास ईश्वर कृपेचा संस्कार झाल्याचें दुसरें लक्षण सांगावें.

वा० – आतां दुसरें कशास सांगूं, तुमच्यें आमच्यें बनत नाहीं.

वि० – तुह्मी सांगत नसल्यां तर मला आज्ञा करावी; मी सांगतों.

वा० – सांगावें, तुह्मास आज्ञा आहे.

वि० – जीवास ईश्वरी कृपेचा संस्कार झाला असतां ज्याचा त्यास समजतो. अथवा इतरांस समजतो.

ज्याचा त्यास समजतो तो असा; मी पातकी, माझा स्वभाव दुष्ट, माझे अंतःकरणांत अविश्वास त्यामुळें मी नरकांत जावयास योग्य आहें. मीं येशूचे ठायीं विश्वास ठेवून ईश्वराची दया संपादिली तरच माझें कल्याण होईल असा त्याच्या अंतःकरणास बोध होतो. असें त्यास ज्ञान झालें ह्मणजे त्याच्या ठायीं पातका विषयीं दुःख व लज्जा उत्पन्न होती: मग त्याला अनुभव होतो कीं जगाचा तारक माझ्या ठायीं प्रकट झाला, आतां म्या आपल्या जीवना विषयीं त्याचें ऐकून त्याला अवश्य शरण जावें. त्या

विषयीं तो क्षुधित आणि तृषित होतो, असले क्षुधे तृषे विषयीं वचन आहे.[१७३] मग तारकाच्या ठायीं त्याचा विश्वास जसा जसा होतो तशी तशी आनंद, शांति, शुद्धते विषयीं प्रीति, तारकास आणण्याबिषयीं वयाजगांत त्याची सेवा करण्या विषयीं इच्छा, इत्यादि सद्गुण उत्पन्न होतात. असा कृपेचा संस्कार झाला असतां ज्याचा त्यास याप्रमाणें कळूं याव याजोगा आहे असें मी बोलिलों आहें खरें परंतु ज्याचा त्यास क्वचित् कळतो. कांतर त्याचा दुष्टस्वभाव व मलीन विवेक त्यामुळें त्यास ईश्वर कृपेचें यथार्थ ज्ञान होत नाहीं. याजकरितां आमच्याठायीं ईश्वरकृपा फलित झाली असा निर्धार शुद्धविवेकी आहेत त्यांलाच होतो.

आतां जीवास ईश्वर कृपेचा संस्कार झाला असतां तो इतरास ज्यां लक्षणांवरून समजतो तीं लक्षणें अशीं. प्रथम लक्षण, माझा विश्वास ख्रिस्ताच्या ठायीं आहे असें तो बोलतो, आणि तें बोलणें परीक्षेस उतराव याजोगें असतें. दुसरें लक्षण

या पूर्वोक्त बोलण्याप्रमाणें आचरण देखितो, तें अ सें. पवित्र आचरावें; अंतःकरण पवित्र ठेवावें, कुटुंब असल्यास कुटुंब संबंधानें पवित्र असावें आणि जनाशीं पवित्र मार्गानें वागावें; यापासून त्याला बोध होऊं त्याच्या अंतरीं पातकाचा त्रास उत्पन्न होतो आणि त्या पातकाविषयीं तो अंतर्यामी आपला हीत्रास करितो, आणि आपल्या कुटुंबांत पाप होऊं देत नाहीं, तो जनांत पवित्रमार्गाची वृद्धि करितो; हें हीढोंग्या सारिखें अथवा वाचाळा सारिखें उगेंच बोलून दाखवितो असें नाहीं तर ईश्वरी वाक्याचा विश्वास व प्रीति धरून आचरणें करून दाखवितो. या प्रकारें करून म्या लक्षणपूर्वक कृपासंस्काराचें थोडक्यांत वर्णन केलें, आतां याज विषयीं आपल्यास कांहीं दूषण सुचत असल्यास सांगावें. नाहींतर दुसरा प्रश्न पुसायास मला आज्ञा करावी.

वा० — हा आमचा दूषण घ्यायाचा वेळ नव्हे, ऐकून घ्यायाचा वेळ आहे: याज करितां आपला

दुसरा प्रश्न काय आहे तो मला ऐकवावा.

वि० – तो प्रश्न असा. म्यां जें हें निरूपण केलें त्याचा आपल्यास अनुभव आहे काय? म्यां जें सांगितलें तें आपल्या आचरणांत आणि बोलण्याचालण्यांत दिसतें काय? बोलण्यांत व वाग्पांडित्यांत आपले मत असतें, किंवा करण्यांत आणि खरेपणांत असतें याचें उत्तर करावें व जें उत्तर कराल त्याला ईश्वर साक्ष असें करावें, यांत तुमचें मन जें सांगत असेल तें बोला कां तर जो आपण आपल्यास चांगलें बोलतो तो मान्य होतो असें नाहीं, ज्यास ईश्वर चांगलें बोलतो तो मान्य होतो. आणखी असें आहे मी अमुक अमुक प्रकारचा आहें असें मीं बोललों व मी तसा नव्हे असें माझ्या सर्व शेजाऱ्यांच्या सांगीवरून दिसून आलें, तर मग माझें तसें बोलणें फार दुष्ट होय.

हें भाषण ऐकून वाचाल लज्जित झाला; मग कांहीं सावध होउन त्यानें उत्तर दिलें कीं तुम्ही तर आतां अनुभव, धर्मबुद्धि, ईश्वर, यांचा उच्चार करूं लागलां; आणि जें बोलावें त्याचे खरेपणाविषयीं

ईश्वराची आण घालूं लागलां, असलें भाषण आपण कराल असें मला ठाउक नव्हतें; आतां आपण जे प्रश्न करितां त्यांचीं उत्तरें द्यावींशीं मला वाटत नाहींत, तीं उत्तरें दिलींच पाहिजेत असें ही नाहीं, कांतर तुह्मी कांहीं धर्मोपदेष्टे नव्हां, आणि तुह्मी जरी असलां तरी आमचे तुह्मी शास्ते असें तर आह्मी तुह्मास मानणार नाहीं; बरें असले प्रश्न तुह्मी आह्मास कां करितां?

वि० — मीं असें पाहतों कीं तुह्मीं बोलायास पुढें पुढें सरसावतां, आणि तुह्मास शब्दज्ञाना वांचून दुसरें कांहीं कळलें नसेल असें मला वाटत होतें, ह्मणूनमी तुह्मास नसले प्रश्न करितों. आणखी माझ्या असें ऐकण्यांत आलें आहे कीं तोंडानें गोष्टीमात्र सांगाव्या हाच काय तो आपला धर्म, आणि त्या गोष्टी केवळ खोट्या असें आपल्या बोलण्या चालण्यावरून कळूं आलें. तुह्मीं ख्रिस्ती मंडळास लांछन आहां, आणि तुमच्या अमंगल आचरणावरून धर्माची उलटी निंदा होती; कित्येक जण तुमच्या, दुष्टपथास लागून फसून गेले, आणि दुसरे ही कित्येक जण फसून नाश पावण्याच्या

संधींत आहेत: मद्यपानाचें व्यसन, लोभ, अपवित्रता, दुरोक्ति, असत्यभाषण, दुस्संग इत्यादिकांच्या कर्दमांत तुमचा धर्म कालवला आहे. वेश्येची इतर सर्व स्त्रियांस जशी लाज येती तशी तुमची धर्ममार्गांत चालणारांस लाज येती.

वा० – तुह्मीं लोकांच्या गप्पा खऱ्या मानून विचार न करितां सिद्धांत करूं पाहातां, याजवरून मला असें वाटतें कीं तुह्मी कठिनहृदय अथवा खिन्नहृदय आहां ह्मणून तुह्मी भाषण करायास योग्य नव्हां, आतां तुह्मास नमस्कार असो. असें बोलून तो वाचाळ चालता झाला.

मग विश्वासूकडेस ख्रिस्ती येउन ह्मणतो कां दादा तुह्मास म्या सांगितलें होतें तसेंच झालेंना? तुमचे शब्द त्याच्या कामादिक विकारांस कसे सहन होतील. तो तुमची सोबत सोडून जाणार, तो काय आपणास सुधारून घेणार होता; तो गेला तर जाउं द्या, त्याची त्यालाच हानि झाली, कोणाचें काय गेलें; आतां त्याला आह्मी सोडावें असें नाहीं, तोच आह्मास सो

डून गेला. तो जर आपल्या संगातीं राहिला असता आणि त्याची बुद्धि अशीची तशीच असती तर त्याचें आपल्यास लांछन मात्र लागलें असतें; असल्या पासून दूर असावें असें प्रेषीताचें वचन आहे.

वि० — बरें पण आपलें थोडेंसें तरी त्याशीं भाषण झालें याजवरून मला संतोष वाटतो; कदाचित् तो त्या भाषणाचा आपल्या आपण पुढें विचार करील; म्या तर त्यास निक्षूण सांगितलें आहे, आतां त्याचा नाश झाला तर तो दोष मजकडेस नाहीं.

ख्रि० — तुह्मी त्यास तसें निक्षूण सांगितलें हें फार बरें झालें, अलिकडेस याप्रमाणें निक्षूण सांगणारे थोडके ह्मणून बहुत्येकांच्या हातून धर्माची अपकीर्ति होती, ते धर्माच्या गोष्टी मूर्खां सारिख्या मात्र सांगतात, ते व्यसनाच्या अधीन होउन वाईट आचरण धरितात. आणि धार्मिक लोकानी आपल्या मंडळींत त्यांचा स्वीकार केला ह्मणजे धर्मा विषयीं जगास भ्रांति उत्पन्न होती. आणि ख्रिस्ती मार्गाची निंदा होती. आणि जे शुद्ध अंतःकरण आहेत त्यांस खेद

उत्पन्न होतो. असले जे आहेत त्यांस आपण निरूण बोलिलां तसें जन बोलतें तर चांगलें होतें. तेणेंकरून जे वाईट लोक आहेत ते धार्मिक लोकांचे मंडळींत येउन धर्मास अनुसरून चालूं लागते अथवा त्रास पावूनती मंडळी सोडून देते. याप्रमाणें बोलून तो विश्वासू गाउं लागला.

आर्या

वाचाळडोल दावी, प्रथम जसा शूर त्यापरी बोले,
खंडन सकळांचें कीं, करीन गर्वें अशा बहुत डोले. १.
स्वानुभवात्मक बोले, विश्वासू त्यास ते धवां कैसा,
वाचाळ होय श्रीहत, सर्वकलाक्षीणचंद्रमा जैसा. २.
त्यांची अशी अवस्था, केवळ वाचाळ जे पुरुष लोकीं,
अंतःकरण अनुभवी, या समयीं तो टिकेल अवलोकीं.
३.

याप्रमाणें त्यां उभयतानी जें जें मार्गांत पाहिलें त्याज विषयीं ते भाषण करीत चालले तेणेंकरून त्यांस तो मार्ग सुगम झाला, ते अरण्यांतून जात होते याजकरितां ते जर तसलें भाषण करीत नसते तर त्यांस मार्ग जड जाता.

नंतर ख्रिस्ती आणि विश्वासू हे अरण्य सोडून पुढें जात आहेत इतक्यांत विश्वासूनें मागें पाहिलें, तों त्यास एकजण मागें येताना दिसला, त्यास ओळखून विश्वासू आपल्या बंधूस बोलतो, दादा मागें पहा कोण येतो आहे तो, त्याजवरून ख्रिस्ती मागें पाहून बोलिला अहो तो तर सुवार्तिक, आपला स्नेही, अहो तो माझा ही स्नेही होय, त्याणेंच मला दरवाज्याकडेस आण्याचा मार्ग दाखविला. इतक्यांत त्या सुवार्तिकानें त्यांचेजवळ येउन त्यांस आशीर्वाद दिला, तो असा;

अहो प्रियानो तुमचें कल्याण असो, आणिजे तुमचें साह्य करणारे त्यांचें ही कल्याण असो.

ख्रि० — यावें यावें सुवार्तिकानो; मला निरंतर जीवन प्राप्त व्हावें ह्मणून जे तुह्मी पूर्वी कृपा करून मजकरितां सतत श्रम केले त्यांचें मला तुमचें मुख पहातांच स्मरण झालें.

वि० — यावें महाराज! आजचा हा सुदिन होय, अहो सुवार्तिक, तुमचा संग आह्मा बापुड्यां यात्रेकरांस अतिप्रिय आहे कळलें.

मग तो स्वार्तिक पुसूं लागला, अहो माझ्या मित्रानो तुमची आमची सोबत सुटली त्या दिवसापासून आजपर्यंत कसें वर्तमान आहे? व तुमची कोण कोणाशीं गांठ पडली आणि तुह्मीं कसकसें वर्तलां? मग मार्गांत कायकाय घडलें व कसकशा अडचणी सोसून त्या स्थानी आले तें सर्व ख्रिस्तीने आणि विश्वासूने सांगितलें. तें ऐकून स्वार्तिक बोलतो, तुह्मास जेजे दुःखाचे प्रसंग प्राप्त झाले त्यांतून तुह्मी जय पावून पार पडलां, आणि तुह्मी बहुत्येक गोष्टी विषयीं असमर्थ असतां ही आजपर्यंत याच मार्गी चालत आहां हें पाहून मला आनंद झाला.

तुमच्या स्वार्था विषयीं मला आनंद झाला व माझ्या ही स्वार्था विषयीं मला आनंद झाला; कां तर म्यां पेरिलें आणि तुह्मी सांठवण केलें, आणि पेरणारा आणि सांठवण करणारा असे दोघे जण आनंद पावतील असा दिवस येत आहे; तुह्मी आरंभिल्याच प्रमाणें करीत जाल तर अशी गोष्ट घडेल, आणि तुह्मी थकून नगेलांत र तुमचें सांठवण ही होईल. मुकुट तुमच्या पुढें मांडि

ला आहे हा मुकुट अविनाशी होय," हा हातीं याव या करितां तुह्मी धांवा." कित्येक जण त्या मुकुटांकरितां बाहेर पडतात, आणि चांगली लांब मजल करितात, इतक्यांत दुसराच कोणी हा मुकुट घेउन जातो. याजकरितां जें तुह्मास प्राप्त झालें आहे तें बळकट धरून ठेवा, तो तुमचा मुकुट दुसरे कोणाच्या हातीं जाउं देउं नका" तुह्मी भुताचीजी बंदुक तिच्या गोळीच्या टप्याच्या बाहेर अझून पडलां नाहीं तुह्मीं पातकाशीं भांडत असतां रक्तनिघे तोंपर्यंत तुह्मी प्रतिरोध केला नाहीं. त्या दिव्य राज्याकडेस, तुह्मी आपलें लक्ष नित्य लागलेलें ठेवा आणि जे अदृष्ट पदार्थ आहेत त्यांअविषयीं दृढ निश्चय धराः तुह्मी आपल्या अंतरीं इहलोकींचें कांहीं आणू नकाः आणि आपलीं अंतःकरणें व विषयी कल्पना यांविषयीं फार जपा कांतरहीं सर्वांपेक्षां ठक आणि मोठीं दुष्ट आहेत;" तुह्मी आपला निश्चय आणि धैर्य पर्वतासारिखीं अचल ठेवा, तुह्मास दिव्य लोकींचें आणि इहलोकींचें सर्व सामर्थ्य अनुकूळ आहे.[११५]

हें ऐकून ख्रिस्ती त्यासुवार्तिकास ह्मणाला महाराज तुह्मी आह्मास हा उपदेश केला याजवरून तुमच्या आह्मावर मोठा उपकार झाला, परंतु अजून मार्ग चालावयाचा आहे याजकरितां पुढें आह्मास उपयोगी पडाव याजोगें आणखी कांहीं सांगावें; आपण तर आह्मास केवळ भविष्यवक्ते वाटतां, पुढें आह्मास जें जें प्राप्त होईल आणि ज्याचें आह्मास निवारण करावें लागेल तें आपणास कळतें, याजकरितां आह्मास सांगावें. याच प्रमाणें विश्वासुकानें विनंती केली, त्याजवरून सुवार्तिक सांगूं लागला.

तुह्मास फार क्लेश भोगून दिव्यराज्यांत गेलें पाहिजे, आणखी सर्व नगरांचे ठायीं बंधन क्लेशादिक प्राप्त व्हावयास सिद्ध आहेत.

हीं शुभवर्तमानांतील वाक्यें तुह्मीं तर वाचा ऐकिलींच असतील. याजकरितां यांतून थोडें बहुत प्राप्त झाल्यावांचून तुह्मास हा यात्रामार्ग क्रमणें कोठून घडेल. या गोष्टींचा थोडकासा अनुभव तुह्मास आला आहे, त्याप्रमाणें आणखी ही तुह्मास लौकरच प्राप्त

होईल; हें अरण्य आतां थोडकेंच राहिलें आहे, हें सोडलें ह्मणजे तुह्मास एक शहर लागेल, तेथें तुमचें आणें घडेल आणि तुह्मास शत्रूंपासून फार उपद्रव होईल, ते तुह्मास नानाप्रकारें पीडितील, आणि तुमची प्राणांत अवस्था करितील. आणि तुह्मी जो मार्ग धरिला आहे त्या मार्गाकरितां दोघे अथवा एक तरी प्राणास मुकाल, "तुह्मी मरणापर्यंत विश्वासू असा ह्मणजे राजा तुह्मास जीवनाचा मुकुट देईल."

जरी तुह्मास तेथील मरण बळत्कारें करून प्राप्त झालें व कदाचित् मोठें दुःखकारक असलें तथापि तें मरण जो पावेल त्यास त्याच्या सोबत्यापेक्षां चांगला वांटा मिळेल. कांतर दिव्यलोकास त्याचें जाणें लौकर होईल, आणि यात्रेच्या मार्गांत जीं दुःखें प्राप्त व्हायाचीं तीं त्याचीं बहुत्येक चुकतील. परंतु तुह्मी त्या शहरांत गेलां आणि म्यां सांगितलेल्या गोष्टी घडून आल्या ह्मणजे तुह्मी आपल्या इष्टाचें स्मरण करा, शूरासारिखे वर्ता, आणि आपल्या जीवांचा उत्तम कर्ता

ईश्वर असें जाणून आपले जीव त्या ईश्वराकडेस नि रवा."

नंतर म्या स्वप्नांत पाहिलें तों ते उभयतां अरण्य सोडून पुढें चालले आहेत इतक्यांत त्यांच्या दृष्टीस तें शहर पडलें, त्या शहराचें नाव मायापुर, तेथें एक बाजार आहे त्याचें नाव मायेचा बाजार; तो वर्षभर भरलेला असतो उलगडत नाहीं, तेथें जे पदार्थ विकले जातात आणि विकायास आणितात ते मायामय असतात ह्मणून यास मायेचा बाजार असें ह्मणतात. आणि शलमोन ह्मणून जो ज्ञानी पुरुष झाला त्याणें ही असेंच ह्मटलें आहे कीं जें सर्व घडून येतें तें व्यर्थच आहे. हा बाजार अलिकडेस वसला आहे असें नाहीं, प्राचीन आहे; मी याची तुह्मास उत्पत्ति सांगतों. सुमारें सहा हजार वर्षामागें असें झालें कीं सांप्रतकाळीं हे दोघे भले गृहस्थ यात्रेस जात आहेत या प्रमाणें लोक दिव्य नगरच्या यात्रेस जाऊं लागले; ते समयीं बियलज़िबूल व आपल्लयोन व लिजन यानी आपल्या सोबत्यां सुद्धां असा विचार केला कीं दिव्य न

गरास आतांनां यात्रेकरूंस मायापुरांतून आवें लागतें, याजकरितां येथें एक बाजार वसवावा, आणि त्यांत सर्वप्रकारचे मायामय पदार्थ विकावे, आणि तो वर्ष भर भरलेला ठेवावा, अशा बेताने हा बाजार मांडिला आहे; याजकरितां येथें घरें, जमीनी, व्यापार उदिम, जागा, मान महत्व, अधिकार, पदव्या, मुलूक, राज्यें, विषयसंकल्प, उत्साह, सर्वप्रकारचे आनंद, वेश्या, कुंटणी, भडवे, बायका, नवरे, मुलें, धनी, चाकर, प्राण, रक्त, शरीर, जीव, रुपें, सोनें, मोतीं, हिरे, माणिक इत्यादि सर्व पदार्थ विकतात.

आणखी सर्वप्रकारचे नाच, तमाशे, खेळ, कवायती, कसरती, लबाडया, ढोंगें, नकला, मस्कऱ्या, विनोद, सोधेगिरी, लुच्चाई, इत्यादि प्रकार जेव्हां व्हावे तेव्हां दृष्टीस पडतात,

चोऱ्या, छिनालक्या, खोटया शपथा, खुनें, हिंसक कर्में हीं तर या बाजारांत फुकट पहायास मिळतात.

इतर बाजारांत जशा वेगळाल्या पेठा असतात,

आणि त्या पेठांत वेगळाले पदार्थ मिळतात, त्याच प्रमाणें या बाजारांत पेठा आहेत, येथें ब्रीटन पेठ, फ्रेन्च पेंठ, वलंदेज पेंठ, पुणें पेठ, रोमी पेंठ, बंगाल पेंठ, अशा आहेत, त्यां पेठींत त्यां त्यां देशींचा मायामय जिन्नस लोकर सांपडतो. आणि इतर बाजारांत कितीएक जिन्नस फार स्वस्त मिळतो त्या प्रमाणें या बाजारांत रोम नगरींचा जिन्नस स्वस्त मिळतो आणि त्याचा येथें फार व्यय होतो, इंगलीश लोकांस व कित्येक इतर देशींच्या लोकांस मात्र या जिन्नसाचा त्रास आला आहे.

म्या तुह्मास सांगितलें कीं दिव्य नगरास जाण्याचा मार्ग माया पुरामधुन आहे आणि तेथें हा कामिक बाजार वसविला आहे, याजकरितां दिव्य नगरास जाणारा जर या मायापुरामधून जाणार नसला तर मग त्याणे या जगांतून बाहेर पडावें." राजांचा राजा जेव्हां येथें होता तेव्हां तोही आपल्या गावांस या पुरातून गेला. त्यावेळीं तरी हा बाजार फारच भरला होता; मला वाटतें या बाजाराचा मुख्य धनी ज्याचें नाव बियलझिबूल त्यानेच त्या राजाच्या राजास या बाजारांतले माया

मय पदार्थ विकत घ्यावयास बोलाविलें होतें. त्यानें जर बियलज्ञिबुलास नमन केलें असतें तर बियलज्ञिबुलानें त्यास त्या बाजाराचा धनी केलें असतें; कांतरतो मोठ्या योग्य तेचा गृहस्थ होता. बियलज्ञिबुलानें त्याला थोडक्यांतच गल्लोगल्लींत नेउन पृथ्वींतील अवघीं राज्यें दाखविलीं, कीं येणेंकरून तरी हा भुलून कांहींमायामयपदार्थ विकत घेईल; परंतु असल्यां पदार्थांकडेस त्याचें मन होईचना, याप्रमाणें ते मायावी जिन्नस एक दमडी ही खर्चून विकत न घेतां त्यानें तें गांव सोडून दिलें. सारांश हा बाजार पुरातन बहुत कालचा आहे आणि हा मोठा प्रसिद्ध आहे. ११८

म्या पूर्वीं सांगितलें कीं त्यां यात्रेकऱ्यांचें जाणें त्या बाजारांतून होईल, त्याप्रमाणें झालें, आणि ते बाजारांत शिरतांच बाजारांतले सर्व लोकांनीं किंबहुना त्या सर्व शहरानें त्यांज भोंवता एकच गलका केला; त्याचें कारण सांगतों.

प्रथम कारण असें आहे कीं त्यां यात्रेकरूंच्या आंगांत वस्त्रें होतीं तीं त्या बाजारांतील व्यापारी लोकांच्या

वस्त्रांहून केवळ वेगळीं होतीं ह्मणून सर्व जण यांजकडे सन्याहाळून पाहूं लागले; कोणी बोलूं लागले कीं हे मूर्ख आहेत. कोणी ह्मणूं लागले कीं हे वेडे आहेत, कोणी ह्मणूं लागले कीं हे विदेशी आहेत.

दुसरें कारण असें कीं ते जी भाषा बोलत ती कोणास न कळे, याजकरितां त्यांच्या त्यां वस्त्रांवरून असें लोकांस नवल वाटलें त्याच प्रमाणें त्यांच्या भाषणावरून ही नवल वाटलें. ते स्वभावतः स्वनानी भाषा बोलत, परंतु आनी तो बाजार वसविला ते सर्व याजगांतले मनुष्य, याजकरितां असें झालें कीं त्या बाजाराच्या ह्या शेकटा पासून तर त्या शेवटा पर्यंत हे कोणी अन्यदेशींचे अमंगळ लोक आहेत असें मानूं लागले.

तिसरें कारण असें आहे कीं त्यां यात्रेकन्यानी बाजारांतील पदार्थांची अवगणना केली त्याजवरून त्या बाजारकन्यांस फार आश्चर्य वाटलें. त्यां यात्रेकन्यानी त्यां जिनसांकडेस तोंड ही फिरवून पाहिलें नाहीं: त्यांस कोणी त्या जिनसा विकत घ्यावयास सांगितल्या ह्मणजे ते कानांत बोटें घालून ईश्वरास प्रार्थीत, कीं आमची

दृष्टि या मायामय पदार्थाकडेस जाउं देउनको आणि वर पहात, येणेंकरून त्यानी असें रूचविलें कीं आमचा व्यापार उद्मदिव्यलोकीं आहे.

नंतर त्या बाजारांतील कोणी एक त्यांची अशी स्थिति पाहून त्यांस उगेंच विनोदार्थ पुसूं लागला, अहो तुह्मी काय विकत घेतां? त्याजवरून त्यां यात्रेकऱ्यानी त्याजकडेस प्रौढपणें पाहून उत्तर केलें कीं आह्मीं सत्य विकत घेतों. [१२०] ह्या भाषणावरून त्यांचा अधिकच धिक्कार होउं लागला. कोणी त्यांची टवाळी करूं लागले, कोणी त्यांस वांकोल्या दाखवूं लागले, कोणी निर्भर्त्सना आरंभिली, अरे पहातां काय धरा मारा यांस या प्रकारें कोणी बोलूं लागले. तेसमयीं मोठी गलबल होउन त्या बाजारांत एकच गर्दी झाली, सर्व गोंधळ होउन गेला. असें होतांच त्या बाजाराच्या थोरल्या धन्यास खबर पोंहचविली, त्याने ताबडतोब येउन आपले जे मोठे खात्रीचे मित्र होते त्यांस सांगितलें कीं अहो यां मनुष्यानी बाजारांत मोठी धुंधळ केली यांस धरून यांची चौकशी करा. त्याजवरून त्यांची चौ

कशी आरंभिली; ते समयीं चौकशी करणारानी त्यां
स विचारलें कीं तुह्मी कोठून आलां, कोठेजातां, असा वि
परीत वेश घेउन या बाजारांत काय केलें. ते समयीं त्या
नी उत्तर केलें कीं आह्मीं यात्रेकरू आहों, ह्या जगांत आ
मचें गांव नाहीं, आमचें गांव दिव्य यरूसालिम, [१२१] तेथे
आह्मी जात आहों; आमची या प्रकारें हेलना करून आ
ह्मास आमच्या मार्गांत अडवावें अशीं आह्मी या
गांवकऱ्यांची व व्यापाऱ्यांची कांहीं खोडी केली नाहीं,
आह्मास एकाने विचारलें कीं तुह्मी काय विकत घेतां,
आह्मी उत्तर केलें कीं सत्य विकत घेतों, इतकेंच काय तें
आमच्या कडून घडलें. परंतु असलें त्यांचें भाषण त्यां
चौकशी करणारांस खरें वाटलें नाहीं, त्यांस वाटलें कीं
हे कोणी भ्रमित वेडे असावेत, अथवा हे या बाजारांत धुं
धळ करावयास आले असावेत, ह्मणून त्यांस मारू
न त्यांचें आंग मळाने माखविलें आणि ते बाजारांती
ल सर्व लोकांच्या दृष्टीस पडावे ह्मणून त्यांस एका पिं
जऱ्यांत कोंडून ठेविलें. मग तेथें जो कोणी आला त्याने
त्यांची विटंबना करावी त्यांजवर आपला द्वेष अथवा

हटउगवीत असावा आणि त्या बाजाराचा जो मुख्य-
धनी त्याने ते हाल पाहून हांसत असावें; असें होउं
लागलें परंतु ते यात्रेकरू मोठे सहनशील, त्यांची जी वि
टंबना केली तशी उलटून करायाची इच्छा न धरितां ते
उलटे आशीर्वाद देउं लागले, वाईट बोलणारांस चांग
लें बोलूं लागले, दुःख देणारांस सुख चिंतूं लागले; ते स
मयीं त्या बाजारांत कित्येक जे काहीं से विचारवंत हो
ते, व फार दुराभिमानी नव्हते ते अति नीच लोकांस
मनाई करून निषेधूं लागले कीं तुह्मी काय ह्मणून त्यां
गरिबांच्या एक सारिखे पाठीस लागले आहां; परंतु
ते आइकत ना ह्मणून रागें भरून बोलूं लागले, जा तु
ह्मास ह्मावें तसें करा, पिंजऱ्यांत घातले आहेत
त्याच सारिखे तुह्मी आहां, त्यांचेच तुह्मी विभागी,
तुमच्याही त्यांचेच सारिख्या विपत्ति केल्या पाहिजे
त. दुसरे कित्येक बोलूं लागले अहो पाहिलें असतां हे
दोघे मनुष्य निरपराधी गरीब दिसतात, कांहीं अम
ली नव्हत आणि कोणाचें वाईट ही करूं पाहत नाहीं
त. बहुतेक या बाजारांत व्यापार करणारे आहेत

त्यानी यां मनुष्यांस उपद्रव दिला परंतु त्यानी आप ल्याकडच्या बहुत्येकांस पिंजऱ्यांत घातलें असतें आणि यांस घातलें नसतें तर नीट होतें. याप्रमाणें आप आपल्यांत बोलणीं होउं लागलीं, शेवटीं हाणामारीवर येउन आपआपल्यांतच अनर्थ करून घेतले . परंतु हें इतकें कृत्य होई तोंपर्यंत ते दो घेजण अशा स्थितींत राहिले कीं त्यानी आपल्या विचारांत, सावधपणांत कमी पडूं दिलें नाहीं. मग त्यां बापुडयांस पुनः चौकशी करणारांच्या पुढें उभें केलें आणि बाजारांत जी धुंधळ झाली ती तुह्मी केली असा त्यांजवर आरोप ठेउन त्यांस मरसमरे असें मारून त्यांस सांखळांनी बांधून त्यांच्या पायीं बिडया ठोकून त्यांस बाजारांत फिरविलें. त्यांस पाहून लोकांस भय प्राप्त व्हावें आणि कोणी त्यांच्या वतीनें बोलूंनये आणि त्यांचे मतास मिळूंनये ह्मणून असें केलें. या प्रमाणें होत असतांही ते दो घेजण फारच शाहणपणानें वागले, त्यांची जी विटंबना व हेलना केली ती त्यानी मोठया नम्रतेनें व सहनशीलतेनें सहन केली, तें पाहून त्या

बाजारांतील कित्येक जण त्यांच्या कडचे झाले. परंतु असे त्यांजकडेस झालेले फारच थोडे निघाले. त्या जवरून बाकीच्या लोकानी फारच संतप्त होउन असा निश्चय केला कीं यां दोघांजणांस मारून टाकावें. मग त्यानी त्यांस धमकावून सांगितलें कीं तुह्मीं बाजारांत धुंधळ केली व बाजारांतील लोकांस मोहनी घातली. या अपराधाचा दंड पिंजरा खिड्या यानी होत नाहीं या स्मरण पाहिजे. आतां दुसरा हुकूम होईपर्यंत यांस पुनः पिंजऱ्यांत घालून ठेवावें, या प्रमाणें आज्ञा होतांच त्यांस नेउन पिंजरांत ठेविलें आणि त्यांचे पाय खोड्यांत घातले.

असें झालें ते समयीं स्वार्तिक जो त्यांचा विश्वासू मित्र त्यानें त्यांस ज्या गोष्टी सांगितल्या होत्या त्यांचें पुनः स्मरण झालें. आणि त्यानें सांगितल्या प्रमाणें घडून आलें हें पाहून आपल्या मार्गा विषयीं व दुःख भोगण्या विषयीं त्यांचा अधिक निश्चय झाला. मग ते परस्परें सांतवन करून बोलूं लागले कीं आपल्या दोघांतून ज्याचें मरण

निश्चित झालें असेल त्यास चांगलाच वांटा मिळेल; याजकरितां एक आपल्यामनात इच्छूंलागला कीं तो वांटा मला प्राप्त व्हावा, एक इच्छूंलागला कीं तो मला मिळावा. मग सर्वज्ञ सर्वनियंता जो ईश्वर त्याकडेस त्यानी आपणास निरखून घेतलें आणि त्यांस ज्या अवस्थेंत ठेविलें होतें त्याच अवस्थेंत तो दुसरा हुकूम होईतोंपर्यंत केवळ संतुष्ट वृत्तीनें राहिले.

मग चांगली सोयची वेळ पाहून ख्रिस्ती आणि विश्वासू यांचा न्याय करून यांचा अपराध यांच्या पदरीं घालावा ह्मणून त्यांस बाहेर काढून त्यांच्या शत्रूंच्या पुढें उभें केलें. आणि त्यांचा न्याय करावयास जो न्यायाधीश बसला त्याचें नाव उत्तमद्रोही. त्यां दोघांवर आरोप होता त्यांतील भाव पाहिला असतां एकच, तो आरोप लिहिण्यांत मात्र काहींसें अंतर होतें: तो वाचला त्यांतील मजकूर येणें प्रमाणें.

"हे आमच्या व्यापाराचे शत्रु, आणि यानी त्या व्यापाराची गलबल केली: याणी गावांत धुंधळ मांडून फूट केली व आमच्या राजाचे नियम मोडून काहीं

लोक आपल्या दुष्ट मताकडेस फितविले." त्याजवरून विश्वासुकानें उत्तर केलें कीं जो सर्वांहून श्रेष्ठ त्याजवर जो कोणी उठला आहे त्या उठणारावर मात्र मी उठलों आहें. धुंधळ केली असें ह्मणतां त्यास धुंधळ करावयाचा मी मनुष्य नव्हें म्यां शांति धारण केली आहे; लोकांस आह्मी फितवून आमच्या नादीं लाविलें, असें ह्मणतां त्यास ते आमचा खरेपणा व निर्दोषपणा पाहून आह्माकडेस आले; त्यांत काय नासलें, ते वाइटा पासून बऱ्याकडेस आले. आपण आपल्या राजा विषयीं ह्मणतां तर तो बियल्जिबूल, तो आमच्या स्वामीचा शत्रु होय, त्यास व त्याच्या सेवकांस मी कांहींच मानीत नाहीं.

मग असा डांगोरा पिटला कीं बंदिवानाची चोकशी होत आहे, त्यास ज्या कोणास आपल्या राजाच्या पक्षीने साक्षी द्यावयाची असेल त्यानीं हजीर होउन साक्षी द्यावी. त्यावेळीं द्वेषजी, कर्मठजी, आर्जवजी, असे तीन साक्ष हजीर झाले; त्यांस पुसलें कीं तुह्मी या बंदिवानास ओळखितां काय? आणि तुमच्या राजाच्या

र्तीने तुह्मास या बंदिवानावर काहीं आरोप सांगा याचा आहे काय ?

ते समयीं द्वेषजी येउन उभे राहिले आणि त्याणें साक्षी दिली ती येणें प्रमाणें. महाराज मी या मनुष्यास बहुत दिवस जाणतों आणि मी या थोरल्या दर्बारांत माझ्या सत्यावर सांगतों कीं हा. न्यायाधीश बोलतो थांब, थांब, अरे यास शपथ द्या.

त्याजवरून त्या साक्ष्यास शपथ दिली. मग तो साक्षी देउं लागला कीं, महाराज या बंदिवानाचें नाव मात्र चांगलें दिसतें, परंतु आपल्या गावांत जे अत्यंत दुष्ट आहेत त्यांतलाच हा एक होय; राजा, प्रजा, नियम, परंपरागत चाल, यांतून हा कोणे एकासही मानीत नाहीं; सर्व लोकांस आपल्या अविश्वासक मतांच्या नादीं लावावें हेंच कायतें याचें कर्म. या असल्या कर्मास पवित्र कर्म श्रद्धेचें कर्म असें हा मानितो. एकदां तर म्यां आपल्या स्वकानीं यास बोलतां ऐकिलें कीं ख्रिस्ती मत, आणि आपल्या या मायापुराच्याचाली हीं दोन्हीं परस्परें केवळ विरुध्द आहेत, आणि

यां दोघांचें ऐक्य कदापि व्हायाचें नाहीं. या असत्याभा षणावरून महाराज आपलीं सर्व सत्यकर्मे हा दूषितो, आपल्यासही दूषितो. हें ऐकून न्यायाधीश त्यास बोलिले कीं तुला आणखी काहीं बोलायाचें आहे.

द्वेषजी.— मलातर महाराज फारच बोलायाचें आहे, परंतु माझें बोलणें आपल्यास लांबचेंगट असें वाटून ये ह्मणून मी थोडक्यांतच आटोपिलें. परंतु बाकीचे दुसरे साक्षी दारानी साक्षी दिल्या असतां त्यां साक्षीनें याच्यावर अपराध ठरत नसल्यास मलाजें आणखी बोलायाचें आहें तें सांगून देईन. त्याजवरून त्यास एकीकडेस उभे राहायास सांगितलें.

मग कर्मठजीस साक्षी द्यावयास बोलावून त्यास सांगितलें कीं या बंदिवाना कडेस पहा, आणि त्यास पुसलें कीं तुला आपल्या स्वामीच्या पक्षाचें कांहीं बोलायाचें आहे? मग त्यास शपथ दिल्या नंतर तो बोलूं लागला तें येणेंप्रमाणें.

महाराज या मनुष्याचा माझा फार परिचय नाहीं, व याजबरोबर फार परिचय व्हावा असें ही मी इच्छि

त नाहीं; या गावांत त्या दिवशीं याचें मासें काहींसें भाष
ण झालें त्याजवरून हा मोठा उपद्रवी आहे असें
मला वाटतें; कांतर ते समयीं हा बोलूं लागला कीं " तु
मचा धर्म व्यर्थ आहे, आणि तेणें करून मनुष्यावर ई
श्वर प्रसन्न होणार नाहीं." महाराज असल्या बोलण्या
वरून काय सिद्ध होतें त्याचा आपण विचार करावा. या
च्या बोलण्याचा भाव असा कीं आपण ईश्वराचें भजन
करितों तें व्यर्थ, आपण पातकांतच आहों, आणि
अंतीं अपराधी ठरले जाऊं: मला याज विषयीं इतकें
च बोलायाचें आहे.

त्यानंतर आर्जवजीस शपथ देऊन सांगितलें कीं
तुला काहीं आपल्या स्वामीच्या पक्षाचें बोलायाचें अ
सल्यास बोलावें, हा बंदिवान दरबारांत हजीर आहे.
आर्जवजी – महाराज आपण ऐकावें व तुम्ही जे गृ
हस्थ बसले आहां तुम्ही ही ऐकावें. मी या मनुष्या
स बहुत दिवसांपासून ओळखीत आहें. याणें अ
सल्या गोष्टी बोलिल्या आहेत कीं त्यांचा उच्चार ही क
रवत नाहीं; आपले जे स्तुत्य राजे बियलसिबूल त्या

ची याने निंदा केली, जीर्ण मनुष्यजी, शारीरानंदजी, भोगजी, डोलजी, कामजी, लोभजी, असे जे नामांकित आपल्या त्या राजाचे मित्र त्यांची व त्याचे मान कऱ्यांची याने निर्भर्त्सना केली आणखी असें बोलिला कीं "जर सर्व मनुष्यांचीं मनें माझ्या मनासारिखीं असतीं तर त्यां मानकऱ्यांतून एकही या गावांत जीवंत राहिला नसता." महाराज फार काय सांगावें, आपण न्यायाधीश असतां ह्मीं असली आपली निंदा करायास हा भ्याला नाहीं. आपणास अधर्मी दुष्ट व न सलेच दुसरे अपशब्द हा बोलिला व या आपल्या गावांतील मोठे मोठे गृहस्थांस ही याणें शिव्या दिल्या.

या प्रमाणें आर्जवजीने साक्षी देतांच न्यायाधीश आपलें मुख बंदिवाना कडेस फिरवून बोलूं लागला अरे धर्मभ्रष्टा, पाखांडया, फितुरखोरा ह्या भल्या गृहस्थानी तुजवर काय साक्षी दिली ती ऐकिलीस ना?

वि० — बरें मी माझ्या कडचे दोन शब्द बोलतों मला आज्ञा करावी. ?

न्यायाधीश. — अरे तुला काय आज्ञा करावी, तुला

तर या जागींच मानून टाकावें; बरें पण आमचा भले पणा सर्वांस विदित व्हावा ह्मणून तुला बोलायास आज्ञा देतों, बोल काय तुझा मजकूर असेल तो.

वि० — द्वेषजीने जी साक्ष दिली आहे त्याचें उत्तर ऐकावें. मी मात्र इतकेंच बोललों, जी पद्धति, नियम, चाल अथवा जे लोक ईश्वर वाक्यास अनुसरून नाहींत, तीं सर्व ख्रिस्ती मतास विरुद्ध होत. मी जर यांत काहीं खोटें बोलिलों असेन तर माझ्या पदरीं घालावें. मी तुह्मास मक्ष माझी चुक कबूल करीन.

कर्मठजीने मजवर जो आरोप घातला आहे त्याचें उत्तर ऐकावें. मी इतकें मात्र बोलिलों कीं ईश्वराचें भजन शुद्ध विश्वासानें केलें पाहिजे आणि ईश्वराची इच्छा ज्या शास्त्रांत प्रकट केली आहे त्या शास्त्रानेच शुद्ध विश्वास घडतो, दुसऱ्या कशाने घडत नाहीं. याज करितां ईश्वराने जे नियम लाविले आहेत त्याजपेक्षां अधिक नियमावर विश्वास ठेवुन ईश्वराचें भजन केलें असतां त्या विश्वासास मनुष्य वचनाचा मात्र आधार आहे आणि तो निरंतर जीवनाच्या प्राप्तीस उपयोगी पडत

नाहीं

आर्जयजी सांगत आहेत त्याप्रमाणें निंदादिअ पंशब्द न बोलतां असें बोलिलों कीं या गावींचा राजा, व आर्जयजीनें ज्यांचीं नांवें घेतलीं ती सर्व मंडळी अशी हीं नरकांत रहावयास योग्य आहेत, या गावांत व या देशांत रहावयास योग्य नव्हत. याप्रमाणें तर मी बोलिलों, आतां ईश्वर मजवर दया करो.

नंतर जी पंचायित हा सर्व प्रकार ऐकत बसली होती त्या पंचायतीस न्यायाधीश बोलूं लागले कीं अहो या गावांत ज्याच्या विषयीं इतकी मोठी गलबल झाली तो हा मनुष्य कळलें: याजवर ज्यां थोर थोर गृहस्थानीं साक्षी दिल्या त्या तुह्मी ऐकिल्या; व याणें जें उत्तर दिलें व ज्या गोष्टी कबूल केल्या त्याही तुह्मी ऐकिल्या: आतां यास फांशीं द्यावें, हें तुमच्या हातीं आहे. परंतु याज विषयीं शास्त्रार्थ काय आहे तोही सांगतों ऐकावा.

फारो ह्मणून आपल्या राजाचा एक थोरला सेवक होउन गेला, त्याच्या वेळीं असा कायदा झाला आ

हे कीं आपआपल्या मतास विरुद्ध ज्यांचें मत त्याचा वं
श वाढून बलवान् न व्हावा ह्मणून त्या वंशींचे पुरुष ज
न्मतांच त्यांस नदींत टाकीत जावें. आणि नेबुखद्ने
ज्जार ह्मणून जो प्रसिद्ध सेवक होउन गेला त्याच्या वेळीं
असा ठराव झाला कीं, जो कोणी त्याचे सुवर्ण मूर्तीच्या
पायां पडून तीचें भजन करणार नाहीं त्यास अग्नीचे भ
ट्टींत टाकावें. आणि दारेयावेश याच्या वेळीं असा नि
यम ठरला कीं जो कोणी त्याज शिवाय इतर देवांची प्रा
र्थना कांहीं वेळ करील तर त्यास सिंहाच्या गुहेंत टाका
वें. आतां या बंड खोराने हे सर्व कायदे मोडून टाकिले,
केवळ मनेंकरून मोडिले असें नाहीं, तर आपल्या वा
णीकरून व कर्मेंकरून मोडून टाकिले. असले दोष त
र सर्वथा होउं देउं नयेत .

काहीं अपराध झाला नव्हता, अनर्थ होईल अ
सामात्र भास होता त्यावरून फारोने कायदा ठरविला,
परंतु येथें तर प्रत्यक्ष अपराध घडला आहे. दुसरा
नेबुखद्नेज्जराने कायदा ठरविला आणि तिसरा फा
रोने कायदा ठरविला. त्याजवरून पाहतांना हा आप

त्या मतावर दूषणें देतो आणि मीं बंडखोर असें त्या णें तर स्वमुखें कबूल केलें, याजकरितां हा मरणास योग्य आहे.

त्यानंतर ती पंचायित एकांतीं विचार करावयास गेली त्यांचीं नावें. अंधजी, अनुत्तमजी, मत्सरजी, कामप्रियजी, अनाचारजी, हट्टजी, अभिमानजी, द्वेषजी, कृत्रिमजी, प्रकाशद्वेषजी, अक्षमजी, यांतून प्रत्येकाचा असा सिद्धांत ठरला कीं हा अपराधी खरा. मग त्यां सर्वांनीं असें ठरविलें कीं याच प्रमाणें आपलें अनुमत न्यायाधीशास कळवावें. मग त्या पंचाच्या मंडळांत अंधजी ह्मणून जे प्रमुख होते, ते पुढें होउन पहिल्यानें बोलूं लागले कीं हा मनुष्य पाखंडी आहे असें तर मला स्वच्छ दिसून येतें. नंतर अनुत्तमजी बोलूं लागले असला मनुष्य या पृथ्वीवर नसावा. मत्सरजीनें उत्तर केलें अहो मला तर याच्या तोंडाकडेस देखिल पाहूं नये असें वाटतें. मग कामप्रियजी सांगूं लागले मला तर याचा सहवास कदापि सहन होईना. नंतर अनाचारजी बोलिले मला ही याचा प

रमभास आहे कांतर हा माझ्या मार्गाचा नित्य निषेध करीत असे. हट्टजी आपला अभिप्राय सांगूं लागले अहो यास तर फांशींच द्यावें. अभिमानजी सांगूं लागले कीं हा नीच पामर याचा धिक्कार असो. नंतर द्वेषजी बोलूं लागले कीं याचा मला फार कंटाळा येतो. त्याजवरून कृत्रिमजीची वाणि निघाली हा सोदा लुच्चा आहे. तेसमयीं क्रूरजी बोलते झाले, याला फांशीं दिलें असतां ही याजवर कृपाच केली असें जाणावें. प्रकाश द्वेषजीचें अनुमत असें पडलें कीं हाजवळ असल्यामुळें आमचीं कर्मे यथास्थित घडत नाहींत, म्हणून यास दूर करून टाकावें. तें ऐकून अक्षमजी बोलिले मला तर ही अवघी पृथ्वी दिली तरी याचें माझें पडणार नाहीं; याजकरितां याला अपराधी ठरवून मारून टाकावें. नंतर त्यास अपराधी ठरवून जेथून आणिलें होतें तेथें नेउन त्याठिकाणी अत्यंत क्रूरतेने व निर्दयतेनें मारून टाकावें असा हुकूम केला.

मग त्या गावींच्या नियमा प्रमाणें त्यास दंड करावयास बाहेर आणिलें, प्रथम त्यास छड्या मारिल्या,

मग बुक्या मारिल्या, मग त्याचें मांस कऱ्यानीं कापिलें, नंतर त्यास दगड मारिले, मग तरवारीनें भोसकिलें, शेवटीं त्यासजाळून त्याच्या शरीराची राखाडी केली. या प्रमाणें त्या विश्वासूकाचा परिणाम झाला.

मग म्यां पाहिलें तों त्या विश्वासूकाचा त्याच्या शत्रूनें वध करितांच त्यालोकांचे समुदायाच्या मागें एक रथ उभा होता, त्यास दोन घोडे ओडले होते त्या रथांत त्यास बसवून करणा वाजवीत झटकण अभ्रांत नेलें, हा दिव्यनगरास जावयास अत्यंतजवळचा मार्ग. ख्रिस्तीस मागाहून शिक्षा करावी या बेतानें त्यास मागें पाटवून कैदेंत ठेविलें. परंतु सर्वांचा नियामकजो ईश्वर, ज्याच्या हातीं क्रोधादिकांची प्रवृत्ति निवृत्ति त्यानें असें घडूं दिलें कीं त्या ख्रिस्तीया तेथून सुटका होउन तो आपल्या मार्गानें गात गात चालिला.

आर्या

विश्वासु धन्य तूंकीं, तां विश्वासें तुझ्या प्रभूलागीं.
सेवियलें ह्मणुनियां, प्रभुसमसुखभोगिं आपुल्या
अंगीं. १ विश्वास हीनजेकीं, व्यर्थानंदीं सुखा

नुभव घेती, परि ते नारक दुःखें, व्याकुळ हो
उन निश्चयें रडती: २ गा गा विश्वासूबा, वि
श्वासू नाव हें तुझें राहो, मारियलें तुज परि
तूं, यांत शी आश्चर्य लोक हें पाहो. ३

मग म्यां त्या स्वप्नांत पाहिलें तों तो ख्रिस्ती एकटाच
निघून चालला असें नाहीं, तर त्याच्या समागमें दुसरा
कोणी आहे, त्याचें नाव आशावान्. याणें त्या बाजारां
त ख्रिस्ती व विश्वासूक काय काय बोलले, कसें कसें
वर्तलें, त्यांस कस कशीं दुःखें प्राप्त झालीं हें सर्व पा
हून त्याच्या ठायीं आशा उत्पन्न झाली. असा हा आ
शावान् येउन तो ख्रिस्तीस भेटला आणि त्याने ख्रि
स्ती बराबर करार करून त्यास सांगितलें कीं मी आ
पल्या समागमें राहीन. या प्रमाणें एक सत्यास्तव मर
ण पावतांच दुसरा जाणूं त्याच्याच राखे पासून उठून
यात्रेस जाण्या विषयीं ख्रिस्तीचा सोबती झाला. मग त्या
आशावानानें ख्रिस्तीस सांगितलें कीं त्या बाजारांतील
बहुत्येकजण विचार करून काहीं वेळाने, आपल्या मा

गें येतील.

नंतर मी पाहतों तों ते उभयतां बाजार सोडून पुढें चालले नाहींत इतक्यांत पुढें एक गृहस्थ चालला होता त्याची त्यांची गाठ पडली, त्याचें नाव छत्रिम हेतुक, त्यास यानी विचारलें कां महाराज आपला गांव कोण, आणि आपण किती दूर चालिलां. त्याजवरून त्याने उत्तर दिलें कीं मीं मधुरवाणि पुराहून आलों आणि दिव्य पुरास जात आहें, या प्रकारें तो बोलिला परंतु त्याणें आपलें नाव सांगितलें नाहीं.

ख्रिस्ती पुसतो, अहो आपण मधुरवाणि पुराहून आलां काय? त्या पुरांत कोणी चांगला गृहस्थ राहतो काय ? छत्रिम हेतुकानें उत्तर केलें होय राहतोसा वाटतो.

ख्रिस्ती॰ — बरें महाराज आपलें नाव काय ?

छत्रिमहेतुक॰ — तुमची आमची ओळख नाहीं: आपण या मार्गाने जात असलां तर मी आपल्या समागमें येईन, आपण जर जात नसलां तर मग एकटेंच जाणें प्राप्त.

ख्रि॰ — म्यां असें ऐकिलें आहे कीं मधुरवाणिपुरमो ठें मातबर शहर आहे.

ह्र॰ — होय, मोठें मातबर आहे, व माझीं तेथें मो ठीं मोठीं मातबर सोयरीं आहेत.

ख्रि॰ — आपलीं तेथें कोणकोण मातबर सोयरीं आ हेत.

ह्र॰ — माझीं तेथें बहुधा सर्वगांवभर सोयरीं आ हेत; त्यांतून कित्येकांचीं नावें सांगतों. बहुमतरा व, कार्यसाधकराव, मधुरवाणिराव. या मधुवाणि रावजीच्या नावावरून आमच्या नगराचें नांव मधुरवाणी असें पडलें. , सरळजी, द्विमार्गचर जी, उत्तमानुत्तमसमजी, हेही आमच्या गावीं आ हेत. द्विमुखजी, हे आमच्या गावींचे धर्मोपदेष्टे आ णि आमच्या आईचे बंधु वर्गातील आहेत. आह्मी आत्तांकडेस कुळीन झालों. आमचा पणजा तर वल्हीं मारणाराच होता. तो पुढें पाही आणि मागें जाई, व त्याच धंध्याने मला इतकी संपत्ति मिळाली.

ख्रि॰ — आपलें लग्न झालें आहे काय?

ख्रि० — होय, माझी स्त्री मोठी पतिव्रता आहे. तीची आई ही तशीच पतिव्रता होय ती कृत्रिमेची कन्या ह्मणून ती मोठे कुलीन कुटुंबांतील होय. तीची शिक्षा फार उत्तम आहे, त्या शिक्षेचे योगानें, कुळवाडया पासून तर राजापर्यंत सर्वांशीं कसें वर्तावें हें तिला कळतें. आमच्या व जे धर्मांत नियमानें चालणारे त्यांचा भेद आहे खरा, पण फारसा भेद नाहीं, इतकेंच कीं वायु आणि भरती हीं प्रतिकूळ असल्यास आह्मी कधीं चालावयाचा प्रयत्न करीत नाहींत आणि धर्माची प्रवृत्ति श्रीमंतांकडेस झाली ह्मणजे आह्मी धर्माविषयीं फार निर्भर दाखवितों. संपत्तिरूप सूर्य धर्मावर प्रकाशूं लागला आणि लोक त्याची स्तुती करूं लागले तरच आह्मी धर्माच्या संगतीनें बाहेर चवाठ्यांत चालावयाची फार आवड धरितों.

नंतर ख्रीस्ती कांहींसा एकीकडेस होउन आपल्या आशावान् सोबत्यास बोलतो, अहो हा गृहस्थ तर मला मधुरवाणि पुरांतील कृत्रिम हेतुक दिसतो; आणि ह्याजर तोच गृहस्थ असला तर येथें जे सोध

आहेत त्यांमध्यें यांपेक्षां कोणी मोठा सोधा नाहीं. आशावान् उत्तर देतो तो कोण आहे हें त्यास पुसावें, मला वाटतें त्याणें आपलें नाव सांगायास लाजूं नये त्याजवरून ख्रिस्ती त्याच्याजवळ जाउन ह्मणतो आपल्या बोलण्यावरून तर आपण असें दाखवितां कीं आपणास जगांतील सर्व लोकांपेक्षां कांहीं विशेष कळतें, पण मी जें अटकळेनें सांगतों तें नीट असावें. अहो आपलें, मधुर वाणि पुरांतील कृत्रिम हेतुक हें नाव नाहीं काय?

कृ॰ — तें माझें वास्तविक नाव नाहीं, तें आड नाव ठेविलें आहे. असो तें निंदेचें नाव म्या सहन करून उगेंच असावें. पूर्वी जे उत्तम गृहस्थ होउन गेले त्यानी अशींच नावें साहलीं आहेत.

ख्रि॰ — वरें पण असलें नाव पडायाजोगी आपण लोकांबरोबर वर्तणूक तर केली नाहींना?

कृ॰ — नाहीं, नाहीं, बाबा. माझा दोष काय तो इतकाच कीं जोजो मार्ग ज्याज्या काळीं प्रवृत्त असे, त्या त्या मार्गास माझें मत मिळत असे, त्याजवरून मला हें

वयोगानें प्राप्ति होत असे, त्याअर्थ्री माझी निंदा करीत, परंतु ती निंदा असें मी मोजीत नसें, मला आशीर्वाद देतात असें मी मानी. असा प्रकार आहे याजकरितां माझे जे द्वेष्टे त्यांनी माझा तिरस्कार करावा हें योग्य नव्हे.

खि० — अहो ज्याचें म्या नाव ऐकिलें होतें तेंच ते तुह्मी गृहस्थ, असें मला वाटत होतें तें सत्य. तुह्मास वाटतें कीं छत्रिमहेतु हें नाव आपल्यास योग्य नाहीं, परंतु आमच्या मतें हें नाव आपल्यास सर्वप्रकारें शोभतें.

छ० — आपलें मत तसें असलें तर असो, पण मी काहीं तसा नाहीं आपण जर मला सोबतीस वागवूं लागलां तर मी चांगला सोबती आहें असें आपणास कळून येईल.

खि० — जर तुह्मी आमची सोबत धरली तर तुमच्या मतें जें दुर्घट तें तुह्मास करावें लागेल. ह्मणजे वायु आणि भरती हीं प्रतिकुळ असल्यास तुह्मास चालावें लागेल. परंतु असलें दुर्घट कर्म करूं नये

असा तुमचा अभिप्राय आहे. असें आहे धर्म भूष णादिकें करून विराजित असतांच त्यास मानावें अ सें नाहीं, तर तो चिंध्या पांगरला असतांही त्यास मा नावें. स्त्रोरत्नीं धर्म मिरवत चालिला असतांच त्याची सोबत धरावी असें नाहीं, तर धर्माच्या पायीं बिड्या पडल्या असतांहीं त्यास सोडूं नये.

ह्र० – ज्यावर आमचा विश्वास बसत नाहीं तें बळें च आमच्या मनांत घालूं नका, आमच्या इच्छेस येईल तें आह्मास करूं द्या आणि तुमच्या समा गमें चालूं द्या.

ख्रि० – मीं सांगतों त्या प्रमाणें तुह्मी जर न कराल तर तुह्मास एक पाउल पुढें चालूं देणार नाहीं.

ह्र० – असें आहे तर मग मी माझें बहुत दिवसांचें मत आहे तें कदापि सोडणार नाहीं. त्याची काहीं पाठीस दगदग नसतां त्यापासून लाभ होतो. जर माझें तुमच्या सोबतींत आणें झालें नाहीं तर मग तुमची आमची गांठ पडल्याच्या पूर्वीं मी जसा ए कटा जात होतों तसाच मी एकटा जाईन. मग

माझीसोबत त्यास गोड लागे असा कोणी मला भेटला ह्मणजे मी त्याच्या संगतीने जाईन.

नंतर मी स्वप्नांत पाहतों तों ख्रिस्ती आणिआशावान् हे त्या कृत्रिमहेतुकास सोडून पुढें चालते झाले. मग त्यांतून एकाने मागें पाहिलें तों त्या कृत्रिमहेतुकाच्या मागाहून तीन मनुष्य येत आहेत असें त्याच्या दृष्टीस पडलें. नंतर त्यां तिघां जणाची व कृत्रिमहेतुकजीची गांठ पडतांच त्याने त्यांस अतिनम्रतेने नमस्कार केला, तो त्यानी घेतला. त्यां तिघांजणांचीं नांवें. प्रपंचधारक, द्रव्यकाम, आणि त्याज्यरक्षक. यांचा आणि कृत्रिमहेतुकजीचा पूर्वींचाच परिचय होता; कां तर लोभग्रामीं कामलाभ करब्यांत ग्राहकपंत ह्मणोन पंतोजी आहेत त्यांच्याशाळेंत हे सर्व बाळपणीं जात होते. बलात्कार, कपट, स्तुति, लबाडीकरून अथवा धर्माचें सोंग घेउन आपलें कार्य साधण्याची विद्या त्यापंतोजीनें त्यांस शिकविली होती; आणि प्रत्येकाने स्वतां शाला घालू

न शिकावें असे ते चौघेजण त्यांच्या गुरूने शिकवि लेल्या विद्येंत निपुण झाले होते.

मग त्यांचा परस्परें नमस्कार होउन द्रव्यकामजी कृत्रिमहेतुकजीस ह्मणूंलागले, अहो ते पुढें कोण जा त आहेत? (कांतर ख्रिस्तीव आशाधानूफारलांब गे ले नव्हते असुन दिसतच होते.)

कृ० - ते दोघेजण दूरदेशींचे आहेत, ते त्यांच्याचाली प्रमाणें यात्रेसजात आहेत.

द्रव्यकामजी - अहो ते थांबले असते तर त्यांची आपल्यास चांगली सोबत मिळाली असती. ते या त्रेसजात आहेत आणि आपणही यात्रेस जात आहों.

कृ० - होय खरें, पण ते मोठे हट्टी आहेत आणि त्यांस आपलेंच मत आवडतें, दुसऱ्याचेमतास ते मानीत नाहींत. कोणी उत्कृष्टही धर्मवान् असला आणि त्यांसारिखीं सर्व कर्मे जर न केलीं तर ते त्या स आपल्या सोबतींतून होकून लावितात.

त्याज्यरक्षकजी ह्मणतात - हें तर फारचाईट

ग्रंथांतरीं असें आढळतें कीं कित्येकजण अतिश य धार्मिक असतात, त्यामुळें ते आग्रहानें इतरां चे मात्र गुणदोष पाहून त्यांचा निषेध करितात: आपला निषेध करीत नाहींत, बरें पण तुमचें त्यांचें कोणते गोष्टीविषयीं बनत नाहीं?

कृ० — ते आपल्या मार्गांत चालूं लागले असतां शी तउष्ण याचा कांहीं विचार करीत नाहींत. परंतु सर्व गोष्टी अनुकूल होत तोंपर्यंत आह्मी पुढें पाउल टाकीत नाहीं; ते आपलें सर्वस्व ईश्वराकरि तां तत्क्षणींच तुच्छ करितात, आह्मीं संधी पा हून आपला जीव व वित्त विषय यांचें संरक्षण करितों. त्यांचें मत जरी सर्व लोकांस आवडत न सलें तरी ते तें सोडीत नाहींत, आह्मी आपल्या रक्षणास धक्का न लागे असा वेळ व तारतम्य पा हून धर्म आचरतों. गोरगरिबांकडेस व तुच्छलो कांकडेस जरी धर्म असला तथापि ते त्यास सोडी त नाहींत. श्रीमान् अशा थोरांकडेस धर्म अ सला तरच आह्मी त्याचा स्वीकार करितों.

प्रपंचधारक — फार चांगलें स्वार्थी बाबा, असेंच करीत जावें; आपल्या जवळ जें कांहीं असेल तें आपल्या संग्रहीं ठेवण्या विषयीं मोकळीक असतां तें अविचारामुळें जो कोणी आपल्या पासून दवडून टाकितो तो माझ्या मतें वेडा. आपण सर्पा सारिखें धूर्त व्हावें; जों पर्यंत आपल्यास काळ अनुकूळ आहे तों पर्यंत चार पैसे मिळवून ठेवावे. मधमाशी पहा, ती शीत काळीं उगीच बसून राहती. जेव्हां मध मिळवावयाची वेळ येतो तेव्हांच ती उद्योग करिती. ईश्वरकृपेनें कांहीं दिवस पाउस पडतो व कांहीं दिवस उघाड असती जे कोणी वेडे होउन पावसांत दाटून भिजत जातील तर जावोत. आपण तसें करूनये आपण उघाड पडली असतां फिरावें. ईश्वराने दिलेले जे उत्तम पदार्थ ते आपल्या पासून नजावूं देई असा जो धर्म तो मला आवडतो. याला कीं आपल्यास ईश्वराने उत्तम पदार्थ दिले आहेत ते आपल्या जवळ रहावें ह्मणून ते दिले आहेत असाच ईश्वराच्या

घरचा नियम असेल असें कां ह्मणूनये. आब्राहाम व सालोमोन हे धर्म आचरत असतां सधन झाले. आणि योब असें बोलतो कीं जो चांगला मनुष्य तो मातीजशी रस्त्यांत पुष्कळ असती त्याप्रमाणें आपल्या घरीं सोन्याचें पुष्कळ सांटवण करितो. हे जे पुढें चालले आहेत ते आपण सांगतां तसेच जर असले तर जो चांगला मनुष्य तो त्यांच्या सारिखा वर्तणार नाहीं.

त्याज्यरक्षक – हें मत आपण अवघेजण मान्य करितों ह्मणून याज विषयीं कांहीं आणखी बोलणें नलगे.

द्रव्यकाम – खरें आणखी बोलण्याचें काय कारण: शास्त्र जें सांगतें तें ज्यास खरें वाटत नाहीं, आणि बुद्धि जें सांगती तेंही खरें वाटत नाहीं त्यास आपल्याला कायं काय करण्या विषयीं मोकळीक आहे हें कळत नाहीं, व तो आपलें रक्षणही करून घेत नाहीं, आपण तर शास्त्र व बुद्धि यां दोहींस अनुसरून आहों.

कृत्रिमहेतुक० — बाबा पहा आपण अवघे जण यात्रेस जात आहों. याजकरितां वाईट गो ष्टी न निघतां आपली चांगल्या प्रकारें कर्मणुक व्हावी ह्मणून मी आपल्यास एक प्रश्न करितों मला आज्ञा करावी.

अहो धर्मोपदेष्टा अथवा व्यापारी अथवा दुसरा कोणी मनुष्य, यास या लोकांतील उत्तम पदार्थ मिळायाचा योग आला असला, व धर्म प्रकरणीं पूर्वीं जीं मतें सांगितलीं नव्हतीं तीं अति निर्भराने सांगितल्यावाचून ते उत्तम पदार्थ मिळून येत, असें असलें तर आपला अर्थ साधण्याकरितां त्याणें तीं धर्मसंबंधी नवीं मतें सांगून येत काय? असें केल्यानें त्याच्या भलेपणास काय बट्टा लागेल?

द्रव्यकाम — मला आपल्या प्रश्नाचा अभिप्राय कळला; हे जर गृहस्थ मला आज्ञा देतील तर मी त्या प्रश्नाचें उत्तर देतों. पहिल्याने धर्मोपदेष्ट्याविषयीं सांगतों. एखादा धर्मोपदेष्टा चांगल्या योग्यतेचा असून त्यास प्राप्ति थोडकी अस

ली आणि अधिक प्राप्ति व्हावी असें त्याच्या मना
तून असलें, आणि तसा योगही आला असला, ते
समयी तो जर त्या प्राप्तीकरितां अधिक मननशी
ल झाला, लोकांस वारंवार व मोठ्या निर्भरानें ध
र्म सांगूं लागला, आणि लोकांच्या समजुतीप्रमा
णे बोलल्याचालल्या विना लोक रिझत नाहींत ह्मणून
त्याणे नवीन मतें काढिलीं तर त्यास काहीं दोष आ
हे काय ह्मणून आपला प्रश्न, त्यास जर त्याला त-
सा प्रसंग प्राप्त झाला असला तर त्याणे तसें तर
कायपण आणखींही अधिक केलें तथापि त्या-
च्या भलेपणास बट्टा लागत नाहीं, त्याचें कारण
१ त्यास अधिक प्राप्ति व्हावी असा ईश्वरानें यो
ग घडून आणिला ह्मणून त्यास अधिक प्राप्ती-
ची जी इच्छा झाली ती नीट आहे. त्याचा कोण नि
षेध करील; याजकरितां हरएक प्रयत्नानें त्याणें
ती अधिक प्राप्ति करून घ्यावी, आणि मनांत का
हीं संशय उत्पन्न होईल याजकरितां काहीं विचा
र करूं नये आणि प्रश्न करूं नये ●

२ दुसरें कारण असें आहे. त्यास त्या प्राप्तीची इच्छा झाल्यामुळें तो अधिक मननशील होतो, मोठ्या निर्भराने धर्म सांगूं लागतो व अशींच दुसरीं कर्में करूं लागतो. तेणेकरून तो अधिक सुधारतो आणि अधिक बुद्धिमान् होतो. असें व्हावें असाच ईश्वराचा संकल्प आहे.

३ तिसरें कारण त्याणे आपल्या मतांचा लोप करून लोकांच्या समजुती प्रमाणे नवीन मतें काढलीं त्यावरून असें सिद्ध होतें कीं तो दुराग्रही नव्हे, समन्जस आहे कां तर तो आपलें मत सोडून दुसऱ्याचें मत सांगूं लागतो. ही जी अशी त्याची वृत्तिही केवळ प्रिय व मनोहर होय, ही वृत्ति धर्मोपदेष्ट्यास फार योग्य आहे.

४ सारांश बहुत प्राप्ति व्हावी ह्मणून जर धर्मोपदेष्ट्याने अल्प प्राप्तीचा त्याग केला तर तसें केल्यामुळें त्यास लोभी असें ह्मणूं नये; तसें केल्याने त्याचें ज्ञान वृद्धिंगत झालें, व तो अधिक उद्योग करूं लागला, ह्मणून त्यास असें ह्मणावें कीं हा जें कांहीं करि-

तो तें प्रसंगानुरूप करितो आणि याचे हातून लोकांचें बरें होत आहे.

आतां व्यापाऱ्याविषयीं जो आपला प्रश्न त्याचें उत्तर सांगतों; कोणेके व्यापाऱ्याचा व्यापार गरीबीनें चालत असला आणि त्याच्या मनांत आहे कीं आपण धर्म आचरूं लागलों असतां आपला व्यापार चांगल्या प्रकारें चालूं लागेल, आपल्यास कदाचित् सधन स्त्री मिळेल व आपल्या दुकानावर पुष्कळ मातबर गिराईकें येउं लागतील, तेव्हां अशा प्राप्तीकरितां धर्म आचरूं लागलें असतां काहीं दोष आहे काय ह्मणून आपण पुसलें, त्यास माझ्या मतें तसें केल्यास काहीं दोष नाहीं त्याचें कारण.

१ कोणत्याही हेतूनें धर्म आचरो, पण धर्म आचरणें हा उत्तम गुण होय.

२ द्रव्यवान् स्त्रीशीं लग्न केलें असतां, अथवा दुकानावर पुष्कळ गिराइकी मिळविली असतां काहीं पाप होतें असेंही नाहीं.

३ चांगली बायको, चांगली गिन्हाइकें, चांगली प्राप्ति हीं सर्व धर्माच्या पाईं मिळतात, ह्मणून धर्मवान् होणें हें चांगलें आहे; सारांश हे सर्व पदार्थ मिळावे या हेतूनें जो कोणी धर्म आचरतो तो त्याचा हेतु चांगला हितकारक असें जाणावें.

या प्रकारें द्रव्यकामाने स्वार्थ्याच्या प्रश्नाचें उत्तर सांगितलें त्याजवरून त्यामंडळींत त्याची फारच वाहवा झाली आणि त्यांच्यामतें ठरलें कीं हें जें उत्तर सांगितलें हें फारच चांगलें व मोठें हितकारक होय. मग त्यांस असें वाटलें कीं या प्रश्नावर जें बोलणें तो बोलिला, त्याचें खंडण कोणाचानें होणार नाहीं. ख्रिस्ती आणि आशावान् यानी पूर्वी स्वार्थ्यास बोलण्यांत अडविलें होतें ह्मणून हा प्रश्न आतां त्यांस करून पहावा. या प्रकारें द्रव्यकाम व त्याचे सोबतीयानी तो निश्चय करून ख्रिस्ती आणि आशावान् जे एक्या हांकेच्या पल्ल्यावर पुढें चालत होते त्यांस हांक मारून मागें बोलाविलें. ते यांच्या जवळ येत तोंपर्यंत हे थांबून राहिले. आ

णि असा ठराव केला कीं स्वार्थ्यानें प्रश्न करूं नये; प्रपंच धारकानें प्रश्न करावा, त्यानें प्रश्न केला असतां ख्रिस्ती व आशावान् यानीं स्वार्थ्यास जसें आवेशानें उत्तर दिलें होतें तसें ते यास देणार नाहीं.

मग यांची त्यांची भेट होऊन परस्परें नमस्कार होतांच प्रपंच धारकानें तो योजलेला प्रश्न ख्रिस्तीस व त्याच्या सोबत्यास केला आणि म्हणूं लागला कीं तुह्मास सामर्थ्य असल्यास या प्रश्नाचें उत्तर सांगा पाहूं.

त्यावरून ख्रिस्ती बोलतो आहो एखादें धर्मातलें पोर असलें तरी तें तुमचे असले हजारो प्रश्न सांगून देईल, ये क्या प्रश्नाची कथा काय सांगतां. अहो भाकरीसाठी ख्रिस्ताच्या पाठीस लागलें असतां दोष आहे, मग प्रपंच साधायाकरितां धर्माचें सोंग घेतलें असतां दोष आहे यांत काय सांगावें. योहन ६ पर्व पहा. अन्य धर्मी, ढोंगी, भूतें, जादुगर, हे असले लोक मात्र त्या मतानें वागतात.

अन्यधर्मी जे त्यांविषयीं सांगतों. हमोर व शखेम या दोघां अन्यधर्म्यांच्या मनांत आलें कीं याकोबाची कन्या व गुरें आपल्यास मिळावीं. परंतु पहातात तों आपण आपल्यास सुंता केल्याविना तीं आपल्या हातीं येत नां, तेसमयीं ते आपल्या सोबत्यांस बोलूं लागले, अहो आपल्यातून प्रत्येक पुरुषाने यां लोकांप्रमाणें सुंता केली तर त्यांचीं ढोरें, त्यांची संपत्ति व त्यांचे पशुहीं आपलीं होणार नाहींतकाय? सारांश त्या अन्यधर्म्यांचें मन त्यां लोकांच्या लेंकीकडेस व गुरांकडेस लागतांच तीं मिळविण्याकरितां त्यानीं धर्माचें सोंग घेतलें. हें सर्व वर्तमान वाचून पहा.[१२४]

आतां ढोंग्यांची गोष्ट ऐका: येरोशीलोक मोठे ढोंगी होते, त्यांचेंही मत असेंच होतें. ते लोकांस असें दाखवीत कीं आह्मी फार वेळ ईश्वराची प्रार्थना करितों, परंतु आंतून पहातां नां विधवा स्त्रियांचीं घरें बुडवावीं हेंच कायतें त्यांच्या लक्ष्यांत असे. अशांचा न्यायकाळीं मोठा नाश होईल.[१२५]

आतां भुत्यांची गोष्ट ऐकून घ्या. तो फितुरीथ फुदा भुत्या होता; त्याचेंही असेंच मत असे, तो पैशांचे ठेलीच्या लोभ धरून धर्म आचरूं लागला; पण शेवटीं तो आपल्या स्वार्थास मुकला. त्याच्यात्याग होऊन केवळ नाश झाला.

आतां ज्यादुगराची गोष्ट. जादुगर सिमन तरी असल्यास्व मताच्या भरीं पडला होता, आपल्यास पवित्रात्मा प्राप्त झाला असतां द्रव्य मिळूं लागेल असें सिमन मनांत आणून पवित्रात्म्याची इच्छा करूं लागला. तेसमयीं पेत्रसाने त्याला तसाच दंड सांगितला.[१२६]

अहो प्रपंच साधावा ह्मणून जो कोणी धर्म आचरूं लागतो, तो प्रपंच साधावा ह्मणून त्या धर्माचा त्यागही करील, हें जें माझ्या मनांत वसलें आहे हें जात नाहीं. यहुदा हा प्रपंच बुधीने धर्म आचरूं लागला, शेवटीं त्याने त्याच बुधीने धर्मास व आपल्या गुरूस विकलें. तुह्मी ज्या रीतीनें त्या प्रश्नाचें उत्तर सांगितलें त्या रीतीनें सांगणें आणि तें उत्तर मान्य

करणें हें अन्यधर्मी, ढोंगी, भूते यांचें कर्म. त्यारां
दा तुह्मास तुमच्या कर्माप्रमाणें फळप्राप्त होईल.
असें बोलतांच ते एकमेकाकडेस टकमक पाहत
राहिले, या ख्रिस्तीच्या उत्तरानें प्रत्युत्तर करा
वयास त्याला कांहीं सुचेना अशी त्यांची अव-
स्था झाली. तशांत तो आशावान् त्या ख्रिस्ती-
च्या उत्तराची प्रशंसा करूं लागला, त्याजवरून
तर त्याचीं तोंडें फारच उतरलीं, व ते स्तब्ध होऊन
राहिले. ते समयीं स्वार्थीबाबा व त्यांची दुसरी मं
डळी हे हीं गांगरून गेले, आणि ख्रिस्ती व आशा
वान् यांनीं आपल्या पुढें जावें ह्मणून मागें मागें
सरूं लागले. तें पाहून ख्रिस्ती आपल्या गड्यास
बोलतो दादाही माणसें मनुष्यवाक्यापुढें ठिकतना
हींत तर ईश्वरवाक्यापुढें कशीं टिकतील? मडक्या
तून शब्द निघाला असतां त्यांचीं तोंडें मिटून जाता
त, तेव्हां त्या कालांतक अग्नीच्या ज्वाळेतून भया
नक शब्द निघाला असतां हीं काय करतील?

या प्रमाणें ख्रिस्ती आणि आशावान् हे त्या मं

डवीवर पुनः चढ करून पुढें चालते झाले ते एक सुंदर तळवट होतें तेथें येऊन पोंहचले. त्या तळ वटाचें नांव विश्रांतिः तेसमयीं ते अंतरीं संतुष्ट होऊन त्या तळवटावरून चालूं लागले, परंतु तें लांब नव्हतें ह्मणून तें त्यानीं लौकर टाकिलें. त्या तळवटाचे पलीकडेस एक लाहनसा डोंगर लागला त्याचें नांव लाभ, त्या डोंगरांत एक रूप्याची खाण दृष्टीस पडली ती चमत्कारीक खाण असें जाणून पूर्वीं त्या मार्गीने जे जाणारे त्यांतून कित्येक जण आपला मार्ग सोडून ती खाण पहावयास गेले. परंतु तीच्या अगदी कांठावर जातांच तीजमीन खुसखुशीत ह्मणून खोंसळून कित्येक मरून गेले, कित्येकानीं आपले हातपाय मोडून घेतले. ते पुनः बरे झाले नाहींत शेवटीं तसेच मेले.

मग मी आपल्या स्वप्नांत पाहतों तों त्या मार्गाच्या एकीकडेस त्या खाणीजवळ देमास ह्मणून कोणी एक जण गृहस्थासारिखा उभा आहे. आणि जे वाटसरू येतात त्यांस ती खाण पहावयास

बोलावीत आहे. तो ख्रिस्तीस व त्याचे सोबत्यास हाका मारूं लागला. अहो इकडे या इकडे या, मी तुह्मास एक वस्तु दाखवितों.

ख्रि० – हा आमचा मार्ग सोडून ती वस्तु पहायास जावें अशी ती काय अमोलिक वस्तु आहे.

देमास बोलतो. ही रुप्याची खाण आहे, ईत कित्येकजण द्रव्य काढीत आहेत; तुह्मी येथें आलतर अल्प अयासाने तुह्मास पुष्कळ द्रव्य मिळेल

त्यावरून आशावान् बोलूं लागला असें आहे तर चला आपण तेथें जाऊं.

ख्रि० – मीतर येत नाहीं, या जागेचा प्रताप म्या पूर्वींच ऐकिला आहे. व ईणे कितीजणाचे प्राण घेतले, तेही मला ठाऊकें आहे; तेथल्या द्रव्याच्या नादीं जे लागतात त्यांस तें द्रव्य पाश रूप होतें. त्यांचे यात्रेच्या जाण्यांत तें अडथळा करितें.

ख्रि० – अरे देमास ह्या जागेंत काहीं भय नाहीं काय ? इणे बहुत्येकांचे यात्रेस विघ्न केलें नाहीं

काय ?

दे० — याजागेंत कांहीं मोठें भय नाहीं, जे सावध नाहींत त्यांस मात्र याजागेचें भय; पण हे शब्द तो लाजून बोलिला.

त्याजवरून ख्रिस्ती अनाशावानास बोलतो, दादा आपण या आपल्या मार्गाबाहेर एक पाउल देखील टाकूं नये, सरळच पुढें चालावें कळलें.

अना० — पण येथें तो स्वार्थी आला असतां आपल्यास जसें बोलाविलें तसें त्यास बोलविलें तर तो ती खाण पहावयास गेल्यावांचून राहणार नाहीं.

ख्रि० — आपण सांगतां त्यांत संशय नाहीं, त्याचें मत तसें आहे ह्मणून तो तिकडेस जाईल, पण तिकडे गेला असतां तो बहुधा मेल्यावांचून राहणार नाहीं.

शेवटीं देमास त्यांसी बोलिला, अहो तुह्मी येथें येऊन हीं खाण पाहणार नाहींच काय ?

तेसमयीं ख्रिस्तीनें त्यासउत्तर केलें, अरे देमासा यामार्गाच्या स्वामीचेजे नीटमार्ग आहेत त्यां

ज विषयीं तूं ज्ञात्रु आहेस, त्या प्रभूचे न्यायाधि-
शातून एका न्यायाधिशाने त्यां तो मार्ग सोडि-
ला ह्मणून तुला दूषित केलें आहे: असें असतां
आह्मास तूं आपल्या सारिखें दूषीत कां करूं
पाहतोस? अरे आह्मी जर या मार्गाबाहेर एक
पाउल टाकिलें तर आमचा प्रभू जो राजा त्यास
तें समजल्यावांचून राहणार नाहीं. मग आह्मी
त्याच्यापुढें धैर्यानें कसें उभे राहूं तो तर आह्मास
लज्जित करून सोडील.[१२८]

तें ऐकून देमास ओरडून बोलूं लागला. अहो मी
तुमच्याच मंडळांतला आहे; तुह्मी जरा थांबाल, तर
मीही तुमच्या समागमें येईन.

ख्रि०— तुझें नाव काय? ज्याज्या नांवाने तुला पुस
लें. तेंच तुझें नाव ना?

दे०— होय, माझें नाव देमासच आहे. मी आब्रह
माचा लेंक.

ख्रि०— मी तुला ओळखतों, तुझ्या आजाचें ना
व हाझी. तुझ्या बापाचें नाव यहुदा. तूं त्यांच्याच

सारिखा चालत आहेस; तुझ्या युक्तितर केवळ शुतासारिख्या आहेत; तुझ्या बापाने फितुराई केली त्याजवरून त्याला फांशीं दिलें, तूंही त्याच फळास योग्य आहेस. आह्मी त्या राजाजवळ गेलों ह्मणजे आह्मी तुझीही वर्तणुक त्यास विदीत करूं कळलें. या प्रमाणें बोलून ते चालते झाले. १२९

इतक्यांत स्वार्थी व त्याचे सोबती तेथें येऊन पोंहचले, ते देमासाचे दृष्टीस पडतांच देमासाने त्यांस या ह्मणून मानहालविली त्याजवरून ते लागलेच त्याच्या जवळ गेले. मग त्या खाणीच्या कांठावर उभेराहून त्याखाणींत पाहूं लागल्याबरोबर आंत उलटले, किंवा तें रुपें काढायास आंत उतरले, किंवा त्याखाणीतून वाईट वाफा उठतात, त्यां वाफांनी तळीं घुसमटून मेले किंवा कसें झालें हें मला नकळे: पण नंतर ते त्या मार्गांत पुनः दृष्टीस पडले नाहींत. मग ख्रिस्ती गातगात चालिला.

आर्या

कृत्रिमहेतुकआणिक,सरोप्यदेमास
एकमतझाले एकाच्याहांकेने,धांव
तसेएकतेअसेभुलले १ चित्तींधरि
लीइच्छा,लाभाचीह्मणुनतेचयालो
कीं,राहतीगुंतुनदोघे. त्यांचेंजाणें
पुढें नझालेंकीं २

मगमी पाहतों तों ते यात्रेकरून त्यातळवटा च्या पलिकडेस जातांच त्यांस मार्गाच्या जवळच एकपुरातनआकृति उभी आहे असें अटळलें. ती पाहतात तों केवळ विपरीत जसा काय कोणे स्त्रीस स्तंभाचा आकार प्राप्त झाला आहे असें त्यांस वाटलें ह्मणून त्याचा शोध करूं लागला. मगउभे राहून ती अकृति न्याहाळून न्याहाळून पाहतात, पण काहीं थांग लागत नाहीं. इतक्यांत त्या आकृतीच्या कपाळावर काहीं लिहिलेलें आशावानाच्या दृष्टीस पडलें, तें त्यास वाचवेना परंतु येंही काहीं विद्वान् नाहीं, ख्रिस्ती चांगला जाणता तो काहीं

तरी याचा भाव काढील असें समजून त्याणे ख्रिस्तीस तो लेख पाहायास बोलाविलें. त्याणे येऊन तीं अक्षरें शोधून काढिलीं त्यांतून असा अर्थ निघाला कीं "लोटाचे बायकोचें स्मरण ठेवा". याप्रमाणें तें त्याणे आपल्या सोबत्यास वाचून दाखवितांच त्यां उभयतांनी असा निर्णय केला कीं लोटाची स्त्री सेदोम नगर सोडून आपल्या रक्षणाकरितां बाहेर जात असतां तिणे लोभाने मागें न्याहाळून पाहिलें तों ती मिठाचा खांब झाली, ती चही आकृति होय. ह्री जी अकस्मात् झालेली चमत्कारक आकृति त्यांच्या दृष्टीस पडली त्याजवरून ते परस्परें भाषण करूं लागले तें असें.

ख्रि० — अहः हः दादा हें आपल्यास उत्तम समयीं दृष्टीस पडलें: कां तर मासीचा डोंगर पहाण्याविषयींचें आपल्यास देमासाचें आमंत्रण झाल्यानंतरच हें आपण पाहिलें. तुमच्या मनांत तर तो डोंगर पहावयास जावें असें आलें होतें. आणि आपण जर त्याच्या अग्रहावरून गेलों अस

तों तर आपण या स्त्रीसारिखे मिठाचा खांब झा
लों असतों. मग आपल्या मागाहून जे येते तेआ
पण जसे, या आकृतीस पाहत आहों त्याप्रमाणे
आपणास पाहते.

आ० — अहः हः किती मूर्ख मी, मी लोटाच्या
स्त्रीसारिखा मिठाचा खांब झालों नाहीं हें मोठें आ
श्चर्य; आहो तिच्या पातकांत व माझ्या पातकांत
काय अंतर आहे. तिणें मागें मात्र पाहिलें, मलात
र तो डोंगर पाहूं जाण्याची इच्छा झाली. अहः हः
ईश्वरानेंच कृपा करून मला रक्षिलें, माझ्या मनां
त तशीती कल्पना आली, त्याजवरून मला पश्चा
त्ताप वाटतो.

खि० — आपण ही आकृति पाहिली याजवरू
न विचार करून पुढें सावध राहवें. सदोमचा विध्वं
श झाला, त्याबरोबर त्या स्त्रीचा नाश झाला ना
हीं, याजवरून असें आणावें कीं एकवेळ तिचें ई
श्वरी क्षोभापासून रक्षण झालें, परंतु पुनः त्या
च क्षोभाने तिचा नाश झाला. पहा ती केवळ

मिठाच्या खांब होऊन गेली.

अना० — खरें तिचीही आकृति पाहून आपणसा वध होऊन चांगल्या रीतीनें चालावें, तिच्यासारिखें पाप करूं नये, आणि असें जाणावें कीं जे कोणी हें कृत्य पाहून सावध न होतील तर त्याजवर ईश्वरी क्षोभ होईल. कोरा, डाथान्, व आबिराम, हे व यांचीं अडीचशें माणसें या सर्वांच्या त्यांच्या पातकामुळें नाश झाला. त्यांची हीती अवस्था पाहून सावध व्हावें, पण मला एक्या गोष्टीवरून फारच आश्चर्य वाटतें. अहो त्या स्त्रिनें द्रव्याकरितां मागें मात्र पाहिलें, ती आपला मार्ग सोडून एक पाउलही मागें गेली नाहीं, तों ती मिठाच्या खांब झाली. याप्रकारें तिजवर जो क्षोभ झाला तो पहायास जावें नलगे, जवळच आहे, डोळे उघडून मात्र पाहवें, असें असतां त्या देमासास व त्याचे गड्यांस त्या द्रव्याचा शोध करावयास धीर तरी कसा होतो.

स्त्रि० — होय याजवरून नरमोठें आश्चर्य वा

रतें आणि असें सिध होतें कीं तें कर्म करण्याविषयीं त्यांच्या अंतःकरणास भय ह्मणून राहिलें नाहीं, त्यांच्या उपमेस मला कोणी दुसरे योग्य दिसत नाहींत. जे न्यायाधिशाच्या समक्ष लोकांचे विशे कापणारे किंवा फांशीद्यायाच्या जागेवर द्रव्य हरण करणारे, ते मात्र त्यांचे उपमेस योग्य आहेत. सेदोमातील लोकांविषयीं असा लेख आहे कीं "ते अत्यंत पातकी होते". कां तर येदेनाचा बाग जसा पूर्वीं होता तसा सेदोमाचा देश केला. अशी ईश्वराची कृपा झाली असतांही त्यांनी ईश्वरासमक्ष पाप केलें. त्याजवरून ईश्वराचा मोठा क्षोभ होऊन ईश्वराने त्यांजवर आकाशांतून अत्यंत प्रज्वलीत अग्नीची वृष्टि केली, तेणेकरून त्यांचा नाश झाला. याजवरून असें सिध होतें कीं असे जे ईश्वराच्या समक्ष पापकरणारे; व पाप करूं नये अशी नित्य सूचना होत असतां जे पाप आचरणारे ते महान् घोर दंडास अधिकारी होत.

आ० – आपण ह्मणतां तें खरें त्यांत संशय ना

हीं. माझा तर अवश्य मिठाच्या खांब व्हावा परंतु मी किंवा तुह्मी मिठाच्या खांब झालों नाहीं ही ईश्वराने मोठी आपल्यावर दया केली. याजवरून आपण ईश्वराचे कृपेचा स्तव करावा, त्याचें भय धरावें, आणि लोटाच्या स्त्रीस जें प्राप्त झालें त्याचें स्मरण ठेवावें.

मग मी पाहतों तों ते एके रमणीय नदी कडेस गेले. त्या नदीस दावीद राजाने ईश्वराची नदी, आणि योहनाने जीवनाचे जलाची नदी असें ह्मटलें आहे. त्यांच्या जाण्याचा मार्ग या नदीचे तिरावरून होता, ते येथें येतांच मोठ्या आनंदानें चालूं लागले; ते या नदीचें पाणी प्याले तें यांस फार मधुर लागलें, तेणेंकरून त्यांचा भागशीण जाऊन ते चांगले हुशार झाले. त्या नदीचीं दोन्ही तीरें पाहतात तों झाडानें हिरवीं गार होऊन गेलीं आहेत, व त्यां झाडांस सर्व प्रकारचीं फळें आलीं आहेत. आमांश आणि पाटसरूस उष्णता होऊन जे इतर रोग होतात, ते त्या झाडांचा पाला खाल्ला असतां होत

नाहींत. [१३५] त्या नदीच्या दोन्ही तटाच्या पलीकडे स पहातात तों दोन कुरणें लागून गेलीं आहेत, त्यांत रमणीय चमत्कारी फुलझाडें आहेत. त्यां झाडांमुळें तीं हिरवींगार कुरणें बाराही मास सुशोभित दिसतात. मग त्या कुरणांत ते उतरून निजले, कांतर येथें निजलें असतां भय नाही. [१३६] त्यानी निजून उठल्यानंतर पुनः त्यां झाडांची फळें गोळा केलीं, आणि पुनः त्या नदीचें पाणी प्राशन केलें. याप्रमाणें नित्य करीत असत. असे ते तेथे कित्येक दिवस राहत असतां याप्रकारें गाऊं लागले

चाल दिंडी

पहा तुह्मी निर्झर स्वच्छ कीती, थोर
मार्गासमीप हे वहाती, हरितवर्णेंउ
पवनें शोभताती, मधुर गंध यांतून
केसे येती. १ सुरस ऐशा उत्तम व
स्तू येथें, यात्रेकरू भोगिती याच पं
थें, समाधान व्हावयात यांलागीं,

निर्मियेलेउपभोग याचीजागीं. २ हे
वृक्षगोमटीं फळेंदेती, गोडपत्रें
वाणुमीयांसकीती, स्वाद यांचाला
गतांजयाजना, विकुनीसर्व घेईल
याचीवना. ३

अझून पुढें मार्ग चालावयाचा आहे, असें जाणून ते खावून पिवून तेथून निघाले.

मग मी आपल्या स्वप्नांत पाहतों तों ते जरा पुढें चालले नाहींत. इतक्यांत ती नदी त्या मार्गापासून काहींशी एकीकडेस झाली. त्याजवरून ते फार खिन्न झाले, परंतु ते ज्या मार्गानें चालले होते तो त्यांनी मार्ग सोडिला नाहीं. त्या नदीपासून जो मार्ग एकीकडेस झाला होता तो फार कठिण. तशांत मागील मार्ग चालल्या मुळें त्यांच्या पायांस विकृति झाली होती ह्मणून "यात्रेकऱ्यांचे जीव त्या मार्गामुळें फार त्रासले". [१३७] नंतर चांगल्या मार्गाची आशा धरून ते चालते झाले. ते काहींसे पुढें गेले तों पाहतात तर त्या मा.

र्गाच्या डावेकडेस एक कुरण व तेथें कुपणावरू-
न जावयास पायऱ्या आहेत. त्या कुरणाचें ना
व आडवाटेचें कुरण. तेसमयीं ख्रीस्ती आपल्या
सोबत्यास बोलतो अहो हें कुरण आपल्या मार्गा
लगत आहे, त्यास चला आपण तेथें जाउं. मग तो
ख्रिस्ती त्या पायऱ्यांकडेस गेला आणि पाहतो तों
आपल्या मार्गालगत्त कुपणाचे पलिकडेस एक
वाट आहे. तें पाहून ख्रिस्ती बोलतो, अहो माझा
इच्छेच प्रमाणें झालें, ही तर चांगली सोपी वाट आ
हे. कां आशावान् दादा, आपण या वाटेने जाऊं.
आ० — जाउं खरे, पण ही वाट आपल्यास आ
पला मार्ग चुकवील तर ?
ख्रि० — च्छे तसें होणार नाही, पहा ही वाट
आपल्या मार्गलगत आहे. तें ऐकून आशावा
नही ख्रिस्तीच्या मागून त्यां पायऱ्यांवरून चा
लता झाला. नंतर पुढें जाउन त्या वाटेस लागतां
च पाहतात तों पायांस कोठे काहीं लागून येअ
शी ती वाट चांगली सोपी. तेसमयीं पुढें एक म

नुष्य चालतांना त्यांच्या दृष्टीस पडला त्याचें नाव व्यर्थविश्वास. मग त्यानीं त्यास हांक मारून पुसलें कीं अहोही वाट कोठें जाती, त्यानें उत्तर दिलें दिव्य नगरच्या दरवाज्याकडेस जाती. त्याजवरून ख्रिस्ती आपल्या सोबत्यास बोलतो. पाहा मींही तुह्मांस असेंच सांगितलें होतें ना? याजवरून असें जाणावें कीं आपण सरळ मार्गांत आहों. मग तो पुढें चालत असतां हे त्याच्या मागून जाऊं लागले. नंतर संध्याकाळ होऊन रात्र पडली, ह्मणून असें झालें कीं हे मागें होते यांस तो पुढला दिसेनासा झाला.

ते समयीं तो व्यर्थविश्वास जी पुढें जात होता त्यास पुढला मार्ग दिसेना असें होऊन तो एक्या खोल खंदकांत पडला तेणेकरून त्याचा चुराडा झाला. जे कोणी व्यर्थ अभिमान वागविणारे त्यांस शिक्षा प्राप्त व्हावी ह्मणून तेथें तो खंदक तेथील जागेच्या प्रभूनें केला आहे. १३८

त्याच्या पडल्याचा ख्रिस्तीनें व त्याच्या

सोबत्याने शब्द ऐकून तेपुसूं लागले अहो काय होझालें, परंतु त्यास तेथें उत्तर कोण देतें, त्यांच्या कानीं कुंथण्याचा शब्दमात्र पडला. ते समयीं आशावान् बोलतो दादा, आपण आतां कोठें आहों. तें ऐकून ख्रिस्ती उगाच चूप राहिला आ पल्या आपण बोलतो, मी यास नेऊन आडराणां त घातलें खरें. त्यावेळीं असें झालें कीं पाऊस सुटला, गर्जना होऊं लागली, वीज चमकूं लाग ली, आणि पाण्याचा पूर लोटला.

तें पाहून आशावान् कुंथून बोलतो, अरे अरे कसा मी माझा मार्ग सोडिला !

ख्रि॰ — या वाटेने गेलें असतां आपण आपल्या मार्गास मुकूं असें कोण्णास कळलें होतें.

आ॰ — मला वाबा हें प्रथमच भविष्य कळलें हो तें, ह्मणून मी तुह्मास काहींशी सूचना केली. तु ह्मास स्पष्ट निषेधून सांगावें परंतु तुह्मी माझ्या पेक्षां वाड ह्मणून म्यां तसें सांगितलें नाहीं.

ख्रि॰ — दादा मजवर आपला राग होऊं नये मी

तुह्मास आपल्या मार्गातून काढून या असल्या घोरसंकटांत आणून घातलें, याजवरून मला फार वाईट वाटतें. पण दादा मला क्षमा करावी, मी हें दुष्ट बुधीनें केलें नाहीं बरें.

आ० — याचा दादा खेद मानूं नको, तुमच्याविषयीं माझ्या मनांत काहीं नाहीं, हें जें झालें हें आपल्या बऱ्याच करितां झालें.

खि० — तुमच्या सारिखे दयाळू बंधू मला प्राप्त झाले हें पाहून मला मोठा आनंद होतो. पण दादा आपण येथें असेंच राहूं नये, आपण मागें जाण्याचा उद्योग करावा.

आ० — दादा मला पहिल्यानें जाऊं द्या.

खि० — नाहीं मी पहिल्यानें जातों, माझ्यामुळें आपण दोघेजण आपल्या मार्गाबाहेर पडलों, ह्मणून काहीं विघ्न व्हावयाचें असल्यास तें मलाच पहिल्यानें होईल.

आ० — तुह्मी पहिल्यानें जाऊं नये: तुमचें मन व्यग्र झालें आहे, तुह्मी भलतेंच कडेस जाल.

ते समर्थी त्यांस धैर्य यावें ह्मणून एक शब्द झाला तो असा "अरे तुझें अंतःकरण थोर मार्गाकडेस असूं दे, तूं ज्या वाटेनें जात होतास तेथें परत जा."[११०] मग पाहतात तों त्या पाउसाच्या पूर आल्या मुळें असें झालें कीं परत जाणें होईना, वाटेचें माठें भय वाटूं लागलें. त्यावेळीं असें मनांत आलें कीं आपला मार्ग सोडून आडराणांत जाणें सहज होतें, परंतु आडराण सोडून सरळ मार्गास लागावयास आयास लागतात. त्यानी परत जाण्याविषयीं कंबरा बांधिल्या, परंतु रात्र येऊन पोंहचली, तशांत पूर येऊन चहूंकडेस पाणि चढलें, त्यामुळें असें झालें कीं ते नवुदा दहावेळ बुडतां बुडतां वांचले.

त्यानी आपली सर्व पराकाष्ठा केली पण त्यारात्रीस त्या पायऱ्या त्यांच्या हातीं आल्या नाहीं. मग एक लहानसा आश्रा पाहून तेथें ते उतरले, आणि तेथें रात्र घालवावी या बेताने बसले परंतु श्रम होऊन थकून गेल्यामुळें त्यांस झोंप येऊं लाग

ली ह्मणून ते तेथेंच निजले. तेसमयीं असें झालें कीं तेथून काहींसा दूर एक किल्ला होता, त्याचें नाव संशयदुर्ग, त्याच्या धन्याचें नाव आशानाश, तो कोणी एक राक्षस असे, आणि हे जेथें निजले होते तीजागा त्याजकडेस असे, तो मोठ्या पाहटेस उठून आपल्या त्याजागेंत फिरायास आला आणि पाहतो तों आपल्या जागेंत ख्रिस्ती आणि आशावान् असे दोघे निजले आहेत ह्मणून त्याणे त्यांस धरिलें. आणि मोठ्या कठोर व भयानक शब्दें करून तो पुसूं लागला. अरे डोळे उघडा, निजले आहां काय, आलांत तरी कोठून, या माझे जागेंत तुह्मी काय करीत आहां, त्याजवरून त्यां उभयतानी उत्तर दिलें कीं आह्मी यात्रेकरू आहों, आह्मी आपला मार्ग चुकून गेलों. राक्षस बोलतो बरें तर तुह्मी रात्रीस या माझे जागेंत शिरलां, आणि ही जमीन पायानी तुडवून येथें निजलां, ह्मणून आतां मी तुह्मास नेतों, माझ्या बरोबर चला पाहू. तो राक्षस त्यांजपेक्षां बळकट ह्मणून तो त्यांस बलात्काराने नेऊं लागला

त्यानीं पाहिलें कीं आपण याच्या अपराधांत मिळालों खरे ह्मणून कांहीं न बोलतां ते चालते झाले. त्या राक्षसानें त्यांस पुढें घालून आणिलें, आणि जेथें फार अंधकार, दुर्गंधी, ओसाडी, अशा त्या किल्ल्यातील एक्या कोठडींत टाकिलें. ते तेथें बुधवाराच्या प्रातःकाळापासून तर शनिवाराच्या संध्याकाळापर्यंत अन्नउदकावांचून त्या निबीड अंधकारांत होते. ही त्यांची मोठी दुःखाची अवस्था. येथें त्यांस मित्र कोठले, ओळखी देखी कोठलें. १४० ख्रिस्तीनें मनांत आणिलें कीं मी आशावानाचें न ऐकतां उतावेळ केली त्यामुळें अशा संकटांत येऊन पडलों. अशा विचारावरून ख्रिस्तीस तर दुप्पट दुःख झालें.

इकडे आशानाश राक्षस रात्रीच्या निजावयास गेला, ते समयीं अश्रद्धा ह्मणून जी याची स्त्री तीस वर्तमान सांगत आहे. अगे आज मला दोन मनुष्यें सांपडलीं, तीं येऊन आपल्या जागेंत शिरलीं होतीं ह्मणून म्या त्यांस धरून अंधारी कोठडींत टाकिलें आहे. अगे मी त्यांस काय करूं; बरें तुला कांहीं

रून्चत असल्यास सांगावें. त्याजवरून ती पुसती, आहो ते आहेत तरी कोण, आले कोठून, जाणार कोठें? त्याचें उत्तर सांगितल्यानंतर तिणे आपल्या पतीस विचार सांगितला. तुह्मी उद्यां पाहटेस उठतांच त्यांस मरमरेसा मारद्या मग त्याप्रमाणे तो उठून चिंचेचे चांगले फोक काढून त्यांस बंद केलेल्या कोठडींत शिरून जसें कोणे एक्या जनावरास मारिता त त्याप्रमाणे निर्दयेने मारित रूटला. परंतु त्यानी ही आपल्या तोंडातून दुरोत्तर काढिलें नाहीं. शेवटीते भूमीवर पडून त्यांच्याने इकडून तिकडे हालवेना असे ते झाले तो पर्यंत त्याने त्यांस मारायाचे सोडलें नाहीं. या प्रकारें त्यांस मार देऊन त्याला तेथल्या तेथेंच त्यांच्या मोठ्या दुःखीत अवस्थेंत वेदनानेंव्या कुळत ठेऊन आपण निघून गेला, मग त्यानी अवघा दिवस मोठा विलाप केला. मग दुसऱ्या रात्रीस त्या राक्षसाची स्त्री पुनः आपल्या पतीस विचार सांगू लागली कीं अहो ते अजून मेले नाहींत जीवंत आहेत याजकरितां त्यांस आपल्या जीवाच्या

त्याग करण्याविषयीं बोध करावा. मग पाहाट हो तांच तोराक्षस पूर्ववत क्रूरतेने त्यांच्या जवळ जाऊ न पाहतो तों त्यांस जे अगोदरच्या दिवशीं फटके मारले होते तेणेकरून ते रुजून गेले आहेत, असें पाहून त्यांस बोलतो, अरे तुमची येथून सुटका होई ल असें दिसत नाहीं, याजकरितां चाकूनें, दोरानें, अ थवा विषानें आपल्या प्राणाचा त्याग करावा हेंच आ तां बरें आहे. अरे अशीं घोर दुःखें असतां तुह्मी वां चण्याची तरी इच्छा कां धरितां ? आपल्यास मारू न कां घेत नाहींत. त्याजवरून ते बोलतात. बरें त र आह्मास आतां सोडावें. तें ऐकून तो राक्षस त्यांज कडेस क्रूरदृष्टीने पाहून त्यांच्या आंगावर धाऊन येऊं लागला परंतु उत्तम ऋतूच्यासमयीं त्यास मू र्च्छा येत असे, त्याप्रकारें त्यास मूर्च्छा येऊन त्या चा हात राहिला. असें जर त्यास घडलें नसतें तर त्या णें त्यांस ठार केलें असतें. मग तो पूर्ववत् त्यांस टाकू न चालता झाला. तेसमयीं ते बंदीवान् आपआप त्यांत विचार करूं लागले. कां करें हा सांगतो आहे

त्याप्रमाणे आपण करावें काय ?

ख्रिस्ती बोलतो, दादा आपल्या जीवास तर येथें मोठें घोर दुःख प्राप्त झालें आहे. अशा दुःखांत राहावें किंवा मरून जावें यांतून कोणतें चांगलें हें मला कळत नाहीं. मला तर जीवंत राहण्यापेक्षां प्राण काढून टाकणें बरें वाटतें, आणि या खोडीपेक्षां श्मशान भूमि चांगली वाटती. कसें तो राक्षस सांगत आहे त्याप्रमाणे करावें काय ?

आ० - आपण सांप्रतकाळीं तर मोठ्या दुःखाच्या अवस्थेंत आहों. अशा दुःखांत नित्य राहणें त्याजपेक्षां मरण चांगलें आहे खरें परंतु पाहिलें असतां आपण ज्या गावांत जात आहों तेथल्या प्रभूनें असें सांगितलें आहे कीं तूं खून करूं नको. अहो इतरांच्या वधाविषयीं निषेध केला असतां आपण आपला वध करण्याविषयीं निषेध केला असेल यांत काय सांगावें. जो कोणी दुसऱ्याचा खून करितो, त्या दुसऱ्याचें शरीरमात्र नष्ट होतें परंतु आपला आपण खुन केला असतां शरीर आणि आत्मा अशीं

दोन्ही नष्ट होतात. आपण सांगतां कीं श्मशानां
त चांगलें,पण खुन करणारे नरकांत जातात हें
दादा विसरलां काय ? निरंतर जे जीवन तें खुनक
रणारांस नाहीं आणखी असें पाहावें कीं सर्वस
त्ता या आशानाश राक्षसाच्या हातीं नाहीं. आ
पल्यास जसें याणें धरिलें तसेंच याणे इतरांस
धरिलें होतें,पण ते याचा हातातून सूटून गेले.अ
हो सृष्टि उत्पन्न कर्ता जो ईश्वर त्याने या आशानाश
राक्षसास नाहीसें केलें अथवा कोणे एके वेळीं आ
पल्यास बंद केलेल्या कोठडीस हा कुलूप घालू
विसरला, अथवा पुनः यास मूर्च्छा येऊन याचे
हात पाय राहिले तर मग आपली सुटका होणार
नाहीं काय ? तसें झालें असतां मी तर आपलीस
र्व पराकाष्टा करून निघून जाईन. मी सूटून जा-
ण्याचा उद्योग पहिल्यानेच केला नाहीं हा माझा
वेडेपणा. असो पण दादा आपण धैर्य धरून हें
संकट सोसून काढावें. वेळ आला ह्मणजे आप-
ली सुटका सुखानें होईल. ह्मणून आपण आप

लाखुन करूनये. याप्रकारें आशावानानें खिन्न स्तांचें समाधान केलें. मग ते उभयतां त्या दिवशीं अंधकारांत आपल्या शोकमय अवस्थेंत तसे च राहिले.

नंतर बंदिवानानें आपल्या सांगितल्याप्रमाणें आपल्यास मारून घेतलें आहे किंवा नाहीं असें पाहण्याकरितां तो राक्षस संध्याकाळ होतां च पुनः त्या कोठडींत आला, आणि पाहतो तों ते जीवंत आहेत, जीवंत ह्मणण्याचा भाग इतकाच कीं त्यांस प्राणमात्र राहिले होते, एकतर त्यांस अन्न उदक मिळालें नव्हतें, तशांत त्यांस मार बसला त्याच्या जखमा पडल्या होत्या असें असतां ते चांगल्या स्थितींत कोठून असतील. परंतु त्यांस जीवंत मात्र पाहिलें तितक्यानेंच त्या राक्षसास क्रोध येऊन तो त्यांस बोलूं लागला, अरे म्या सांगितल्या प्रमाणें तुह्मी केलें नाहींना, बरें तर आतां महाकाय होतें तें, तुह्मी जन्मले नसतां तर बरें होतें.

हे शब्द ऐकतांच ते थरथर कांपूं लागले, खिन्न

स्तीनर त्या भयाने मूर्च्छित पडला. मग कांहींसा सावध जाला ते समयीं ते उभयतां राक्षस जें बोलिला होता त्याचा विचार करूं लागले. खिस्ती बोलतो आतां हा जीव काढून टाकावा. त्याजवरून आशाधानू उत्तर करितो.

दादा हें काय बोलतां, आपण जे आजपर्यंत पराक्रम केले ते सर्व विसरलां काय? आपालियनासारिख्यानें तुह्मावर काहीं चाललें नाहीं, आणि मृत्य च्छायेचे खिंडींत जें तुह्मी कानी ऐकीलें व डोळ्यानी पाहिलें तेणेंकरूनही तुह्मास काहीं झालें नाहीं. आपण मोठमोठ्या दुःखातून व संकटांतून पार पडलां, असें असतां आपल्यास आतां भयानें केवळ व्यापिलें याजवरून आश्चर्य वाटतें.

मी आपल्यापेक्षां अतिदुर्बळ असतां, मलाही आपल्यासारिखें या अंधकाराच्या कोठडींत टाकिलें आहे. आपल्यास केवळ जखमा केल्या आहेत असें नाहीं, मलाही जखमा केल्या आहेत. आणि अन्नपाणि बंद केलें आहे. मी आपल्याच सारि

खा या अंधकारांत शोक करीत बसलों आहे. अं शीं आपल्यास अवस्था प्राप्त झाली ह्मणून आतां काय थोडक्या करितां धैर्य सोडावें. आपण माया बाजारांत जें शूरत्व दाखविलें त्याचें आपल्यास स्मरण आहेना. आपण तर सांखळीस, पिंजऱ्यास, व भयंकारक मरणास भ्याला नाहीं. सारांश खिस्तीजनास योग्य नव्हे अशीजी अपकीर्ति ती आपल्यास प्राप्त नव्हावी ह्मणून आपलें जें धैर्य असेल तें या प्रसंगीं दाखवावें

इकडे रात्रीस राक्षस व त्याची स्त्री अशीं उभयतां बिछान्यावर निजलीं आहेत, ते समयीं ती आपल्या पतीस पुनः पुसत आहे, अहो त्यां बंदिवानाचें काय झालें, तुह्मी सांगितल्या प्रमाणें त्यानी आपला प्राण दिल्हा किं नाहीं? त्याजवरून राक्षस बोलतो ते मोठे दांडगे लुच्चे आहेत, त्यांस नानाप्रकारचीं दुःखें सोसून घेणें बरें वाटतें परंतु आपल्यास मारून घेणे बरें वाटत नाहीं, तर त्यांस उदईक किल्यातील वाड्यांत नेउन आपण ज्यांस मा

रून ठाकिलें आहे त्यांचीं हाडें वडो कीं असें त्या स दाखवावें आणि पूर्वीं म्या तुमच्या सोबत्यांचा जसा मारून चुराडा केला त्याप्रमाणे हा अठवडा संपतांच मी तुमचा चुराडा करीन, असें त्यांच्याम नांत बिंबवून द्यावें.

मग उजेडतांच तो राक्षस पुनः त्यांच्याजवळ जाऊन त्यांस किल्यांतल्या वाड्यांत नेऊन आप ल्या स्त्रीने सांगितल्याप्रमाणें तीं हाडें दाखविलीं आणि ह्मणूं लागला कीं हेही तुमच्या सारिखे यात्रे करू होते. तुह्मी माझ्या जागेंत जशे शिरलां त्याप्र माणे ते शिरले ह्मणून म्या त्यांस धरून माझ्याम जीस आलें तेव्हां म्या त्यांस चिरून त्यांचा चुराडा केला, असेंच मी तुमचें दाहा दिवसांत करीन. आतां चला तुह्मी त्या तुमच्या आंधाराच्या कोठ डींत जा, असें बोलून त्यांस मारीत मारीत त्या को ठडींत नेलें, तेथें शनीवारीं अवघा दिवस पहिल्या च प्रमाणें मोठ्या दुःखांत राहिले. नंतर पुनः रा त्रीस राक्षस व त्याची स्त्री अश्रद्धा अशीं उभय-

तां निजून गोष्टी करूं लागलीं. राक्षस बोलतोम्या त्यां बंदिवानास इतकें मारिलें, मरून जा असेंही सांगितलें तथापि ते मरत नाहीं याजवरून मोठें आश्चर्य वाटतें. त्याजवरून अश्रधा उत्तर देती. मला असें वाटतें कीं आह्मास कोणी सोडवावयास येईल अशी त्यांस आशा आहे, किंवा त्यांच्याजवळ किल्ली असेल तेणेकरून ते पळून जाण्याच्या बेतांत असतील, ह्मणून ते आपल्यास मारून घेत नाहींत. त्याजवरून तो उत्तर देतो, कुलूप उघडावयाची त्यांच्याजवळ किल्ली असेल असें तुला वाटत असलें, तर मी उद्यां पहाटेस त्यांचा झाडा घेतों.

ते समयीं ते बंदीवान् शनिवारीं अर्धे रात्रीपासून ईश्वराची प्रार्थना करूं लागले, ते दिवस उजडे तोंपर्यंत एकसारिखे प्रार्थना करीत होते.

नंतर पहाट होतांच ख्रिस्ती कांहींसा विस्मित होऊन मोठ्या आवेशानें बोलूं लागला, अरे मला मोकळीक असतां मी अशा घाणेऱ्या को

ठडींत पडून राहिलों आहें, हा काय माझा मूर्खपणा. माझ्याजवळ किल्ली आहे तिचें नाव वचन, ती मी हृदयाशीं धरून ठेविली आहे. या किल्लीने या संशयदुर्गांतील ह्यावेंतें कुलूप उघडेल. तें ऐकून आशावान् बोलतो दादा आपण चांगलें वर्तमान सांगितलें, असें आहे तर मग ती किल्ली काढून पाहावें. त्याजवरून ख्रिस्तीने ती किल्ली हृदयाशीं धरून ठेविली होती, तेथून काढून तो त्या अंधारी कोठडीचें कुलूप उघडूं लागला, ते समयीं तें कुलूप उघडून झडकण दार उघडलें. तें पाहून ख्रिस्ती, व आशावान्, असे दोघे बाहेर पडले. मग त्या किल्ल्याच्या परसांत जायाचा दरवाजा होता तेथें तो ख्रिस्ती येऊन त्याने त्या किल्लीने तो दरवाजा उघडिला. नंतर ते एकलोखंडाचा दरवाजा होता तेथें आले, त्याचें कुलूप अगदी गच्च बसलें होतें, असें असतां तेंही उघडलें आणि तेथून लोकर निघून जाण्याच्या वेधामुळें त्याणें त्या दरवाज्यावर धसणी मारली, त्या बराबर तो दरवाजा धडदिशीं उघडला पण त्याचा जो अवाज झाला

तेणेंकरून तो आशानाश राक्षस इनटकूण जागा होऊन त्या बंदिवानांचा पाठलाग करावयास त्वरे ने उठूं लागला परंतु त्यास मूर्च्छा येत असे त्याप्र माणे त्या वेळीं मूर्च्छा येऊन त्याचे हात पाय आख डून पुढें पाऊल टाकवेना असें त्यास झालें, इतक्यां त ते बाहेर पडून त्यानी राजाच्या थोरला मार्ग धरि ला. या प्रकारें ते त्या राक्षसाचे हद्देतून बाहेर पडून निर्भयपणें चालूं लागले

ते ज्या पायऱ्या सोडून संशयदुर्गाकडेस गेले होते त्यां पायऱ्यांवरून परत आले असतां विचा र करूं लागले कीं आपल्या मागाहून कोणी येणारे फसून या आशानाश राक्षसाच्या हातीं पडतील ह्मणून त्यांस येथें काहीं सूचना करून ठेवावी. म ग त्यानी तेथें एक खांब उभा करून त्यां पायऱ्यां वरून असें लिहून ठेविलें कीं यां पायऱ्यांच्या प लिकडेस वाट आहे ती संशयदुर्गाकडेस जाती, संश यदुर्ग आशानाशराक्षसाच्या स्वाधीन आहे, तो दिव्यदेशींच्या राजाचा धिक्कार करून त्याचे जे प

पित्र याचे करून यांचा तो राक्षस नाश करूं पाहतो.

नंतर त्यांच्या मागें त्या मार्गानें बहुत जण आले त्यांनी त्यां पायऱ्यांवरील लेख वाचिला ह्मणून त्यांचें त्या भयापासून रक्षण झालें. ते समयीं ते गाउं लागले.

केकावली

स्वमार्गगति सोडुनी क्रमियली पहा भूमि ती,
निषिद्ध ह्मणुनीच दुःख तरि भोगिलें हो किती,
परंतु जन येति जे स्वमन आमुच्या मागुतें,
धरोत अवधान तत्पर सदाच राहोत ते. १
असें न करतील ते अनवधान त्यांलागुनी,
जसें भ्रमविलें अह्मास भ्रमवील हो त्यासुनी,
प्रभुत्व भ्रम दुर्गिचें मिरवि नष्ट आशा करी,
अशा प्रभु अधीन होति पथ सांडिती ते जरी. २

मग ते पुढें गेले तेव्हां त्यांस रमणीय पर्वत लागले, पूर्वी ज्या पर्वताचें वर्णन केलें त्या पर्वताच्याच

प्रभूचे हे महा पर्वत. त्या पर्वतांवर नानाप्रकारचे बाग लागले आहेत, द्राक्षांचे मंडप आहेत, पाण्याचे झरे वाहत आहेत. तेथें ते जाऊन त्यां झऱ्यांतील पाण्याने आपलीं आंगें धुवून घेतलीं आणि पाणी प्याले आणि द्राक्षेच्या बागेतील द्राक्षा मिळाल्या त्या त्यानी येथेष्ट भक्षिल्या. त्यां पर्वतांवर मेंढके मेंढरें चारीत होते ते त्या थोरल्या मार्गाच्या कडेने उभे होते, त्यांच्या जवळ ते ख्रिस्ती आणि आशावान् जाऊन जसे श्रमलेले यात्रेकरू मार्गांत कोणाशीं बोलायास उभे राहिले असतां काठीच्या आधार धरून उभे राहतात त्याप्रमाणे काठीच्या आधाराने उभे राहिले, आणि पुसूं लागले कीं हे रमणीय पर्वत कोणाचे व यांजवर हीं मेंढरें चरत आहेत हीं कोणाची.

मेंढके उत्तर देतात हे पर्वत इमानुयलची भूमी आणि याजवरून त्याचें नगर दिसतें हीं मेंढरें ही त्याचीं आहेत त्याणे यांच्या करितां आपला जीव अर्पण केला.

ख्रि० – दिव्यनगरास जाण्याचा हाच मार्ग काय ?

मे० — होय हाच.

ख्रि० — बरे येथून तें नगर किती लांब आहे ?

मे० — येथें जे जाणारे त्यांस सोडून दुसऱ्यां सर्वांस ते फार लांब आहे.

ख्रि० — बरें पुढें हा मार्ग चांगला सुरक्षित आहे किंवा या मार्गास भय आहे ?

मे० — ज्यांस सुरक्षित असायाचा त्यांस मात्र हा सुरक्षित आहे." जे अन्याय करणारे आहेत त्यांचें तर त्या मार्गांत पतन होईल."[१७२]

ख्रि० — बरें, मार्गांत येताना जे शिणलेले थकलेले अशां यात्रेकऱ्यांस या जागेंत काहीं विसाव्यां करितां स्थळ आहे काय ?

मे० — यां पर्वतांच्या प्रभूची आज्ञा स अशी सांगी आहे. कीं "कोणी मार्गस्थ येईल त्याचें आतिथ्य करायास विसरूं नका" याजकरितां येथें जे उत्तमउत्तम पदार्थ आहेत ते तुमचे आहेत[१७३]

मग मी स्वप्नांत पाहतों तों त्या मेंढक्यांनी ख्रिस्तीस व आशावानास मार्गस्थ असें जाणून कित्येक प्र

श्न पुसिले त्यांचीं त्यानीं जशीं इतर ठिकाणीं उत्तरें दि लीं होतीं त्याप्रमाणें दिलीं. ते प्रश्न असे तुह्मी कोठून आलां ? तुह्मी या मार्गास कसे लागलां ? तुमचें या मार्गांत रक्षण कसें झालें ? या मार्गाने जे येऊं लागता त त्यांतून थोडके या पर्वतापर्यंत येऊन पोहचतात, या सर्व प्रश्नांचीं उत्तरें ऐकून ते मेंढके संतुष्ट झाले, आणि त्यांजकडेस प्रीतिपूर्वक पाहून बोलूं लागले कीं तुमचें या पर्वतावर येणें झालें हें पाहून परम आनंद झाला.

त्यां मेंढक्यांचीं नावें ज्ञानी, अनुभवी, सावध, निष्कपटी, यानी त्यां उभयतांस हातीं धरून आपल्या तंबूंत नेलें आणि तेथें जें त्यावेळीं सिद्ध होतें तें त्यांस दिलें आणि ह्मणू लागले कीं आपण येथें काहीं वेळरा हावें ह्मणजे तुमचा आमचा चांगला परिचय होईल. आणि या रमणीय पर्वतावर ज्या उत्तम वस्तू आहेत. त्याचा ही तुह्मास उपभोग घडेल. त्यानी उत्तर दिलें येथें आह्मी संतोषाने राहतों; मग रात्र फार झाली असें पाहून ते झोपी गेले.

नंतर मी आपल्या स्वप्नांत पाहतों तों पाहटेस

ते मेंढके उठून त्यानी ख्रिस्ती आणि आशावान् यांस
त्या पर्वतांवर फिरावयास नेलें, ते त्यांच्या समागमें जाऊ
न कांहीं वेळ फिरले आणि चहूंकडेस जें रमणीय दिसत
होतें तें त्यानी पाहिलें. मग ते मेंढके आपआपल्यांत
बोलूं लागले कीं यां यात्रेकऱ्यांस कांहीं चमत्कार दाख
वावे कीं नाहीं, दाखवावे असें ठरतांच भ्रम नामक पर्व
ताच्या शिखरावर त्यानी त्यांस नेलें. तो पलीकड
च्या बाजूने पाहिला असतां जसा काय कडाच तुट
ला आहे. त्याजवरून त्यांस खालीं पहावयास सां
गितलें. तेथून ख्रिस्ती आणि आशावान् पाहता
त तों कित्येक मनुष्य त्या पर्वताच्या शेंड्यावरून
खालीं पडून त्यांचे चुराडे झाले आहेत. तेसमयीं
ख्रिस्ती पुसतो याजवरून काय समजावें. मेंढके उ
त्तर देतात कीं हैमेनेअस व फिलेटस यांचें ऐकून
जीं मनुष्यें शरीराच्या पुनरुत्थानाविषयीं भ्रमांत
पडलीं त्यांची गोष्ट तुह्मी ऐकिली नाहीं काय ? होय
ऐकिली आहे ह्मणून यात्रेकऱ्यांनी उत्तर केलें त्या
जवरून मेंढके बोलतात कीं हा जो तुह्मी या पर्वता

च्याखालीं हाडांचा चुराडा, पाहतो हा त्यां मनुष्यांचा, ते जि तके या शिखरावर उंच चढले होते किंवा या पर्वता च्या कांठास जितके जवळ गेले होते तसे कोणी दु सऱ्याने त्यांचीं हीं हाडें पाहून फरूं नये ह्मणून त्यां स आजपर्यंत पुरलें नाहीं उघडेंच ठेविलें आहे.

मग मी आपल्या स्वप्नांत पाहतों तों त्या मेंढ- क्यानी त्यांस एक्या दुसऱ्या पर्वताच्या शिखरावर नेलें, त्यानें नाव अवधान, तेथून त्यांस पुढें दूर पा हावयास सांगितलें. ते पाहतात तों असा भास झा लाकीं कित्येक मनुष्यें कबरीमधून अडथळत अ डथळत फिरत आहेत आणि तीं आंधळीं आहेत त्यांस बाहेर पडायास मार्ग सूचत नाहीं. तें पाहून ख्रिस्तीपुसतो त्यांचें मेंढके उत्तर देतात. येथें ये- ण्याचें मार्गाच्या डावे हातावर यापर्वताच्या खा- लीं कुरणांत जावयास पायऱ्या आहेत त्या तुह्मी पाहिल्या नाहींत काय?

ख्रि० - होय पाहिल्या आहेत.

मे० - तर त्यां पायऱ्यांच्या पलिकडेस एकवा

ट लागती ती संशयदुर्गाकडेस जाती, तो दुर्ग आशानाश राक्षसाच्या स्वाधीन आहे. हेजे तुह्मी कबरामध्यें मनुष्य फिरतांना पाहत आहां हे तुमच्याच सारिखे यात्रेकरू होऊन त्यां पायऱ्यांपर्यंत आले आणि त्या ठिकाणीं त्यांस पुढें जावयाचा मार्ग चांगलासा सपाट नव्हता ह्मणून ते त्या कुरणांत गेले, तेथें त्यांस त्या आशानाश राक्षसानें धरून संशयदुर्गांत टाकिलें. मग त्या दुर्गांतील अंधारी कोठडींत कांहीं वेळ ठेऊन शेवटीं त्या राक्षसानें त्यांचे डोळे काढून त्यांस त्या कबरांमध्यें सोडून दिलें, तेथें हे आजपर्यंत भ्रमण करीत आहेत. हेंजें असें त्यांस घडलें हें शलमनाच्या वचनाप्रमाणेंच घडलें. तें वचन असें "जो कोणी जाणिवेच्या मार्गापासून भ्रष्ट होतो तो मेल्यांच्या समाजांत राहील."[१२५] हें ऐकून ख्रिस्ती आणि आशावान् हे एकमेकांच्या तोंडाकडेस पाहूं लागले आणि त्यांच्या डोळ्यांत आंसवें आलीं, परंतु ते कांहीं त्या मेंढक्यास बोलले नाहीं.

मग मी आपल्या स्वप्नांत पाहतों तों त्या मेंढक्या

नी पर्वतांच्या खालीं एक स्थळ होतें तेथें त्यांस नेलें. तेथें त्या पर्वताच्या अंगास एक दार आहे तें उघडून त्यांस आंत पहावयास सांगितलें; ते आंत पाहतात तों मोठा अंधकार पडला आहे आणि धूर झाला आहे, ते समयीं अग्नीच्या आणि दुःखाने पीडित मनुष्यांच्या शब्दा सारिखें त्यानी कांहीं ऐकिलें आणि त्यांस गंधका सारिखा वास आला. त्याजवरून ख्रिस्ती पुसतो हें काय आहे ? मेंढके सांगतात, ही नरकांत जाण्याची आडवाट, या मार्गाने ढोंगी नरकांत जातात. ऐसावा सारिखे आपला जन्म संबंधी अधिकार विकणारे, यहुदा सारिखे आपल्या गुरूस विकणारे, आलिक्सन्डरा सारिखे सुवर्तमानाची निंदा करणारे, आनानियस व साफिरा त्याची स्त्री, यां सारिखे लबाडी बोलून कपट करणारे, असे जे ते या वाटेने जातात.

त्याजवरून आशावान् मेंढक्यांस बोलतो, अहो यां सर्वांनी तर आमच्या सारिखा यात्रेकरूचा वेश घेतला होता.

मे ० - होय बहुत दिवस घेतला होता.

आ ० - बरें यांचा परिणाम असा दुःखकारक झाला तेव्हां हे या यात्रेच्या मार्गांत तरी कोठवर आले होते.

मे ० - कित्येकानी कांहींसा मार्ग क्रमिला, कित्येक यां पर्वतां पर्यंत येऊन पलिकडेस गेले, कित्येक यां पर्वतां पर्यंत आलेही नाहीं.

त्याजवरून ख्रिस्ती आणि आशावान् हे एकमेकास बोलूं लागले, असें आहे त्यापेक्षां शक्तिमान् जो प्रभू त्याजवळ आपल्यास शक्ति मागितली पाहिजे.

मे ० - शक्ति मागितली पाहिजे खरी. आणि त्या शक्तीचा उपयोग केल्या वांचून परिणाम नाहीं.

मग त्यां दोघां यात्रेकऱ्यांच्या मनांत आलें कीं आतां आपण पुढें चाल करावी: आणि तसेंच त्यां मेंढक्यांचे मनांत होतें. ते समयीं ते त्यां मेंढक्यां सहित पर्वतांच्या शेवटांकडेस चालते झाले. नंतर ते मेंढके आपआपल्यांत बोलूं लागले कीं जर यां

यात्रेकऱ्यांस या आपल्या दुर्बिणीने पाहतां येईल तर यांस दिव्यनगराचा दरवाजा दाखवावा, त्याज वरून ते यात्रेकरू तो दरवाजा पहावयास प्रीतिपूर्वक उत्सुक झाले. मग त्यां मेंढक्यांनी त्यांस स्वच्छ ह्मणून पर्वत होता त्याचे शिखरावर नेऊन त्यांच्या हातीं दुर्बीण दिली; त्या दुर्बिणीने ते पाहूं लागले परंतु मेंढक्यानी त्यांला नुक्तेंच जें काही दाखविलें होतें त्यांची आठवण होऊन त्यांचा हात कांपूं लागला ह्मणून त्यांस चांगलें नीट दिसेंनासें झालें. असें असतां ही दरवाजा दिसलासा वाटला व त्या स्थळींचें तेजही काहीं दिसलेंसें वाटलें. मग ते गात गात चालते झाले.

श्लोक

शोभे नाम निमेष पालक जयांदावीत गोप्यें किती,
त्यांचीणें इतरां जनां न कळती त्यांतें चिते सांगती,
गूढार्थीच अतर्क्य गुप्त असती ज्या वस्तु जाणावया,
इच्छितांत रिमेषपालक चिजे त्यां दर्शनाजाउं या. १

ते समयीं एक्या मेंढक्याने त्यांस त्या मार्गा विषयीं सूचनापत्र दिलें. दुसऱ्याने त्यांस सांगितलें कीं जो कोणी उगीच स्तुति करील त्याच्या नादीं लागूं नका. तिसरा बोलूं लागला कीं मोहक स्थळीं निजूं नका. चोथ्याने आशीर्वाद दिला कीं ईश्वर तुह्मास सुखरूप नेवो. इतक्यांत मी आपल्या स्वप्नांतून जागा झालों.

नंतर मी झोंपी गेलों, ते समयीं मला स्वप्न पडलें आणि पाहतों तों ते दोघे यात्रेकरू त्या दिव्य नगराकडेस थोरल्या मार्गाने पर्वतांवरून उतरत आहेत. त्यां पर्वतांच्या कांहींसे डावलचे अंगास एक गांव आहे त्याचें नाव स्वमताभिमान. त्या गावांतून एक वांकडी गल्ली निघाली आहे ती या यात्रेकरांच्या मार्गास मिळाली आहे. त्या गल्लींत त्यांस एक चांगला चपळ मुलगा भेटला त्याचें नाव अज्ञान, तो त्या गावांतून येत होता. त्यास पाहून खिस्ती पुसतो अरे तूं कोठून आलास कोठे जात आहेस ?

अज्ञान - महाराज या मार्गाच्या डाव्या हाता वर गांव आहे तेथून मी आलों, ती माझी जन्म भूमि, मी दिव्य नगरास जात आहें.

खि० - तुझें त्या दिव्यनगराचे दरवाजांत जाणें कसें घडेल. तुझ्या जाण्यास कांहीं हरकत झाली तर ?

अ० - हरकत कश्चि, जसे दुसरे भले लोक जातात त्याप्रमाणे मीही जाईन.

खि० - तुझ्या करितां तो दरवाजा कसा उघडतील, तेथें दाखवावयास तुझ्या जवळ काय आहे?

अ० - माझ्यास्वामीची काय आज्ञा आहे, तीम लाठाऊक आहे; जें ज्यास देणें तें मी देतों, मी ईश्वराची प्रार्थना करितों, उपोषण करितों, माझ्याउत्पन्नांतून जो अंश द्यावयाचा तो मी देतों, मी धर्मही करितों, आणि मी आपलें गांव सोडून दिव्य नगरास जायास निघालों आहें.

खि० - पण बाबा या मार्गाच्या आरंभीं खिडकी चा दरवाजा आहे त्या मधून तूं येथें आला नाहीं

स, तूं या वांकड्या गल्लीतून आलास. तूं आप ल्यास व्हावें तसें बोल. परंतु त्यायाच्या दिवशीं त्या नगरांत तुला जाऊं देणार नाहींत, तुला चोर या. खुशाल ठरवितील.

अ० — महाराज! तुह्मी मला तिळमात्र जाण त नाहीं, आणि मीही तुह्मास जाणत नाहीं; याजक रितां तुमचें जें मत असेल त्याप्रमाणें तुह्मी चाला, मी आपला माझ्या मताप्रमाणे चालेन, ह्मणजे अवघें नीट होईल. आपण ज्या खिडकीच्या दरवाज्या वि षयीं बोलतां तो आमच्या गावांपासून फार दूर आ हे, असें सर्व लोकांस ठाऊक आहे. त्या दरवाजाचा मार्ग आमच्या गावांकडील कोणी लोक जाणतात असें मला तर वाटत नाहीं. आणि त्यानी तो मार्ग न जाणला ह्मणून त्यांचें काहीं वाईट होतें असें ही नाहीं. ही चांगली सुंदर गल्ली आमच्या गावांवरून येऊन या मार्गास लागली आहे, कोणेकडून येऊ न या मार्गास मिळालें ह्मणजे झालें.

ख्रिस्तीने पाहिलें कीं हा आपण आपल्यास चे

शाहाणा ह्मणवितो त्याजवरून तो हळूच आशा यानाच्या कानाशीं लागून बोलतो "मूर्ख कदाचित् चांगला होईल परंतु आपण आपल्यास च शहणा ह्मणविणारा तो चांगला होणार नाहीं[१७६]· आणखी असें आहे मूर्ख मार्गाने जाऊं लागला ह्मणजे त्याचें मूर्खपण बाहेर पडतें, मग मी मूर्ख असें तो आपल्या आपण सर्वांस सांगतो." आत्तां कसें करावें, आपण याला आणखी काहीं सांगावें, किंवा प्रस्तुत लौकर चालून याच्या पार जावें आणि यानेजें ऐकिलें आहे त्याचा याने विचार केला ह्मणजे यास थांबवून पाहावें किं आपल्या हातून याचें हळू हळू कल्याण होत आहे किंवा नाहीं, कां या विषयीं आपण काय सांगतां· त्याजवरून आशावान् बोलूं लागला.

आर्या

अज्ञानामत कथिलें जें त्यावरि तो विचार काहिं करो, स्वीकारो बोधामृत त्यागत याच्या मनीं कुधीं न धरो· १ ऐसें न करी जरि तो रा

हिलअज्ञानेंसुख्यलाभातें, ऐशा विष-
यींवदतों, श्रवणकरासुख्यदेववाक्यातें.
२ नाहींबुधिजयांला निर्मियलेंम्या त
थापित्यांलागीं, उद्धरिनांमीत्यांतेंनेई
नात्यांअखंडसुखभोगीं. ३

नंतर तो आणखी असें बोलिला कीं माझ्याम
तें त्यास एकदांच बोध करावा हें नीट नव्हे त्यास
सोडून जरा पुढें चलावें, मग तोजरता ऐकेलतरें
त्यासपुनः लौकरच सांगावें

याप्रमाणे बोलून तेउभयतां चालते झालेआ
णि अज्ञान त्यांच्या मागाहून येऊं लागला. मगजे
थें काळोख पडत होता अशा एक्या गल्लींत तेशि
रले, तेथें त्यानी एक मनुष्य पाहिला. त्यास सा
तभुतानी सातां बळकट दोरानी बांधिलें आहे,आ
णि मागें पर्वताच्या अंगास जें दार पाहिलें होतें ते
थें नेत आहेत याप्रकारें त्यास पाहतांच ख्रिस्ती
तर कांपूं लागला, आणि आशावानूजो त्याचा

सोचती त्याची ही तशीच अवस्था झाली. मग त्याची ओळख पटाया करितां त्यास निरखून पाहूं लागला, परंतु जसें चोरट्यास धरिलें असतां तो आपलें तोंड लपवितो त्याप्रमाणें त्यानें आपलें तोंड लपविलें होतें ह्मणून तें पुरतेपणीं खिस्तीच्या दृष्टीस पडलें नाहीं, तथापि खिस्तीस असें वाटलें कीं हा कोणी मार्गभ्रष्ट नामक मनुष्य भ्रष्टता नगरींत राहिला होता तोच असेल. या प्रकारें त्यास भूतें नेत असतां आशावानाची त्याच्या पाठीकडेस दृष्टी लागली. तों त्याच्या पाठीवर एक कागद दिसला त्याजवर लिहिलें आहे, "विषयासक्त भक्त आणि निंद्य भ्रष्ट." तेसमयीं खिस्ती आशावानास बोलतो, या जागेंत एक्या भल्या गृहस्थास अपाय झाला असें म्यां ऐकिलें होतें, त्या गोष्टीचें आतां मला स्मरण झालें. त्या गृहस्थाचें नाव अल्पविश्वास परंतु तो चांगला मनुष्य असे आणि निष्कपट नगरांत राहत असे. तेव्हां असें झालें कीं या काळोखाच्या गल्लींत शिर

तांच एक दुसरी गल्ली लागती, ती रुंद मार्गाच्या दरवाजापासून आली आहे तीचें नाव मृत मनुष्य गल्ली, या गल्लीचें असें नाव पडण्याचें कारण असें आहे कीं या गल्लींत बहुत करून खुन होतात. त्या काळीं तो अल्पविश्वास आपल्यासारिखा यात्रेस जात असतां या गल्लींत येऊन बसला, मग तो तेथेंच निजला. तेसमयीं त्या रुंदमार्गाच्या दरवाज्याकडून तिघे दांडगे लुच्चे आले. त्यांची नावें भीतांतःकरण, अविश्वास, आणि अपराध, हे तिघे बंधू होत, यांनी त्या अल्पविश्वासास पाहून हे त्याजवर दुडदुडां धावत आले, यासंधीस तो बापुडा अल्पविश्वास नुक्ता निजेतून उठून आपला पल्ला रेटण्याच्या तयारींत आहे, इतक्यांत त्यास येऊन साधिलें, आणि दराचून बोलूं लागले, पहा तोस काय उभा राहा. त्याजवरून तो गरगरां उतरून पांढरा फिकट झाला, त्यांशीं भांडायाचें किंवा त्यांजपासून पळून जायाचें त्यास काहीं सामर्थ्य राहिलें नाहीं तेसमयीं भीतांतःकरण म्हणतो तुझ्याजवळ रु

पयांची थैली आहे ती काढ, तेव्हां आपल्यापदर
च्या पैसा सोडायास त्याच्या जीचावर आलें, ती
थैली काढावयास कांकूं करूं लागला, असें पाहू
न त्या अविश्वासानें त्याच्या खिशांत हातघा
लून ती थैली बाहेर काढिली, त्याजवरून तो चोर
चोर असें ओरडूं लागला. तें पाहून त्या अपराधा
च्या हातांत सोटा होता तो त्याच्या मस्तकीं घात
ला त्या फटक्याबराबर तो अल्पविश्वास भूमीवर
पडून जीव जाई असें त्याच्या डोंकीतून रक्त वाहूं
लागलें. अशी त्याची अवस्था झाली पण ते चोर
टे त्याजपासून खिचले नव्हते, इतक्यांत कोणी
मार्गांतून येत आहे असा त्यानी खडका ऐकिला
तेव्हां उत्तम विश्वास नगरांत परमात्नु गृहीत राह
तो तो येत असेल असें त्यांस वाटून त्याला तसेंच
तेथें टाकून ते पळाले. मग तो अल्पविश्वास का
हीं वेळाने सावध होऊन हळूहळू आपल्या मार्गा
ने जाऊं लागला. अशी ह्या गोष्ट ऐकिली आहे.
आ० - त्यानें सर्वस्व त्यां चोरट्यानी हरण के

लेकाय ?

खि० — नाहीं, त्याच्याजवळ रत्नें होतीं तीं त्याच्या हातास लागलीं नाहीं, ह्मणून तीं त्याणे जशीचीं तशींच ठेउन घेतलीं परंतु त्यानी त्याचा वाटखर्चीच्या ऐवज बहुधा नाहींसा केला त्याजवरून त्यास फार खेद वाटला. पाहिलें असतां त्यानी त्याचीं रत्नें नेलीं नाहीं, व त्यांची नजर चुकून त्याच्याजवळ काहीं ऐवजही राहिला होता. परंतु तो फार थोडका, तेणेंकरून वाटेच्या खर्च निभेना ह्मणून आपला प्राण वांचवावयाकरितां त्यास भीक मागावी लागली असें ऐकतों. रत्नें जर विकावीं तरतीं विकितां येत नाहींत. मग कोठे खावें कोठे भीक नमिळाल्यास उपोषण करावें याप्रमाणें त्याणे बहुत उपोषणें काढून आपला बाकीचा मार्ग कंठिला.

आ० — दिव्यनगराच्या दरवाज्यांत त्याचा प्रवेश व्हावयाकरितां त्यास जो दाखला दिल्हा होता तो त्यापासून त्यां चोरट्यानी नेला नाहीं हें मोठें आश्चर्य ?

ख्रि० - आश्चर्य खरें, तो दारवला त्यास सापड
ला नाहीं, परंतु तो त्याच्या हुशारीमुळें त्यांस सांप
डला नाहीं असें नव्हे. तो दारवला एक ईश्वरानेंच १५०
त्यांचे हातीं जाऊं दिला नाहीं वरकड त्याच्या यत्नानें
राहिला असें ह्मणावें तर तो त्यांस पाहून इतका घा
बरून गेला होता कीं त्यास शुद्धि देखील राहिली न
व्हती, मग लपवावयास त्यास कोठून सुचेल.

आ० - बरें पण त्यां चोरट्यांच्या हातीं त्याचीं र
त्नें गवसलीं नाहीं त्याजवरून त्याच्या जीवास का
हीं समाधान वाटलें असेल.

ख्रि० - त्याणें त्यां रत्नांचा जसा उपयोग करावा-
याचा तसा केला असता तर त्याच्या जीवास समा
धान वाटलें असतें खरें. परंतु ज्यांनीं मला ही गोष्ट सां
गितली ते सांगतात कीं त्यांजपासून त्याचा ऐवज हि
रावून नेला, त्याची त्यास भीति बसली होती ह्मणून
त्याणें पुढें मार्गांत त्यां रत्नांचा फारसा कांहीं उपयोग
केला नाहीं, तें समयीं असें झालें कीं त्यां रत्नांचें त्यास ब
हुतकाळ मार्गांत स्मरणच राहिलें नाहीं. कोणे समयीं

त्यांचें त्यास स्मरण होऊन तो आपल्या जीवास धीर देऊं लागे तेव्हां द्रव्य गेल्याच्या कल्पना त्याच्या मनां त येऊन इतर सर्व कल्पना नाहींशा होत असत.

आ० - याजवरून तर त्या बिच्याऱ्यास फार दुःख झालें असेल ?

खि० - फार दुःख यांत काय सांगावें त्याजवर जसा त्या मार्गांत दरोडा पडून त्यास जखमा केल्या तसें जर आपल्यास घडलें असतें तर तसें दुःख आपल्यास झालें नसतें काय ? असो पण तो बापु डा त्या दुखानें मेला नाहीं हें मोठें नवल. माझ्या अ सें ऐकण्यांत आहे कीं मार्गांत जो कोणी भेटला म्हण जे त्यास असें सांगावें कीं मला अमुक ठिकाणीं अ सें लुटलें, लुटणार अमुक अमुक जण होते, त्यानीं मा झें अमुक नेलें, मला अशा जखमा केल्या, माझी के वळ जीवावरची पाळी गुजरली असें सांगत व बहु धा कांथत कुंथत व दुःखाचे उद्गार टाकीत त्याणें आ पला बाकीचा मार्ग कंठिला.

आ० - अशा संकट अवस्थेंत असतां मार्गांत

आपला निर्वाह करण्या विषयीं त्याणे आपलीं तीं रत्नें विकलीं नाहीं अथवा गाहाणही ठेविली नाहीं हें मोठें विपरीत.

ख्रि० — तुमचीतर समजूत जशी बाळ व त्यांतल्या पोरासारिखी त्याणे बरें तीं रत्नें कशाकरितां गाहाण ठेवावीं, तीं त्याणें कोण्हास विकावीं. ज्यागावीं त्याला तुटलें त्यागावींतर त्या रत्नाचा खप नव्हता, तीं विकिलीं तरच त्याचा निर्वाह होतो नाहीं तर होत नाहीं असें काहीं नव्हते तशांत जरत्याचीं तीं रत्नें दिव्य नगराच्या दरवाजाजवळ नाहींशीं झालीं असतीं तरमग त्यास त्या दिव्य नगराचा वारसा कोठून मिळता, ही गोष्ट त्यास पुरतेपणी ठाऊक होती. त्यास तो वारसा न मिळण्यापासून फारच दुःख होतें, तितकें दुःख त्यास हजारो चोर येऊन लुटिते तरी झालें नसतें.

आ० — दादा आपण इतके संतप्त होऊन कां बोलतां ? एसावाने आपला जन्मसंबंधी अधिकार विकला किं नाहीं, त्यास तरतो अनमोलिक रत्नांचे

ठिकाणीं होता असें असतां त्याणें तो जेवणा करि- तां विकला, मग अल्पविश्वासानें आपलीं रत्नें कां विकूं नये ? [१५५]

मित्र ० — एसावानेंही आपला अधिकार विकला व तसेंच दुसरे बहुत जण पण करितात याजकरि- तां त्यांस मुख्य आशिर्वाद मिळत नाहीं. आपण केव ळ एसावासारिखें अल्पविश्वास मानूं नये व एसावा ची व अल्पविश्वासाची स्थिति एक्याच प्रकारची असें जाणूं नये. एसावाचा अधिकार पाहिला अस तां तो लाक्षणिक होता, अल्पविश्वासाचीं रत्नें तशीं नव्हतीं. एसावाचा देव काय तो पोट, पण अल्पवि श्वासानें आपल्या पोटास तसें मानिलें नव्हतें. आ पलीं इंद्रियें तृप्त करावीं हीच काय ती एसावाची अ पेक्षा, अल्पविश्वासास या विषयीं अपेक्षा नव्हती. एसावा बोलूं लागला कीं "मी ज्या जीव चालिला,मला या माझ्या अधिकारापासून काय हित होईल." [१५६] म्हणून मी राशा आपल्या विषय वासना पूर्ण कराव्या याजविषयीं मात्र एसावाचें लक्ष्य होतें. अल्पविश्वासाच्या पर

रीं कायत्तो इतका दोष किं त्याच्या ठायीं विश्वास म्ह
णजे भाव अल्प परंतु त्या अल्प विश्वासाने त्याचे
हालून एसायासारिखा अनाचार घडूं दिला नाहीं
व त्याचे ठायीं अशी मति उत्पन्न केली कीं या आप
ल्या रत्नांची चांगल्या रीतीने जतन करावी, यांस
एसायाने आपला अधिकार विकून टाकिला तसेंवि
कूं नये. एसायाने विश्वास धरिला होता असें शा
स्त्रांत तर कोठे अढळत नाहीं. त्याच्या ठायीं तिळ
मात्र विश्वास नव्हता. याजकरितां विषयवासनेस
आकळायास भाव नसला तर विषयवासनेचें प्रा
बल्य होईल. अशा मनुष्याने नरकांतल्या भुता
सही आपला अधिकार, आपला जीव, किंबहुना
आपलें सर्वस्व विकलें तर त्याचें काय आश्चर्य.
जी गादची तिच्या ऋतुकाळीं मागें फिरवितां येत
नाहीं तसा तो जाणावा. असे जे आहेत त्यांची म
नें विषयाकडेस लागलीं आहेत, ते आपलें सर्वस्व
वेचून विषयांची प्राप्ति करून घेतात; परंतु अल्प
विश्वासाची अशी वृत्ति नव्हती, त्याचें मन देविसं

पत्तिकडेस लागले होतें. पारमार्थिक, पारलौकिक, अशां पदार्थांविषयीं तो भुकेला होता. याजकरितां अशा वृत्तीचा जो मनुष्य त्याच्या रत्नांस जरी गिऱ्हाइक मिळालें तथापि तो तीं आपलीं रत्नें विकून क्षुल्लक पदार्थ घेईल काय? अहो कोणी पैसा देऊन आपलें पोट मातीनें भरून घेईल काय? अथवा काय ज्या जे निंद्य पदार्थ खाऊन राहतो तसले पदार्थ कबुल करून खाऊन राहील काय? ज्यांच्या ठायीं विश्वास नाहीं ते विषयवासनेचे तृप्तिकरितां आपलें सर्वस्व गाहाण ठेवितील किंवा विकून टाकितील किंबहुना ते आपला देहही विकून टाकितील परंतु सर्व उद्धार करण्याविषयीं योग्य असा ज्याणें विश्वास धरिला आहे किंबहुना असा विश्वास ज्याच्या ठायीं थोडका आहे तो तसें करणार नाहीं. याजकरितां आपण अल्पविश्वासाविषयीं बोलिलां तें नीट नव्हे.

आ०.— नीट नव्हे हें मला आत्तां कळूं आलें परंतु आपण काहींसें टाकून बोलिलां त्याजवरून मला वाईट वाटलें.

ख्रि० – मी आपल्यास कायराकून बोलिलों; म्या आपल्यास कायती बाळ व त्यांतल्या पोराची उपमा दिली; परंतु तें आपण मनात आणूनये. सांप्रत आपलें बोलणें ज्या प्रकरणीं चाललें आहे त्याचाच विचार करावा ह्मणजे तुमचें आमचें नीट बनेल.

आ० – पण ख्रिस्ती दादा मला वाटतें ते तिघेजण केवळ गांडू होत. ते जर गांडू नसते तर मार्गांत कोणाचा येताना खडका ऐकिला तितक्यानेच ते पळून जाते काय? बरें पण अल्पविश्वासानें जरा धैर्य कां दाखविलें नाहीं? त्याणे प्रथम त्यांच्या बराबर कंबर बांधायाची होती, जर काहींएक न चालतें तर मग त्यांचें सांगितलें ऐकायाचें होतें.

ख्रि० – ते गांडू असें बहुतजण तोंडाने बोलतात, परंतु त्यांशीं जेव्हां प्रसंग पडतो तेव्हां ते गांडू असें वाटत नाहीं. धैर्य ह्मणावें तर अल्पविश्वास्याठायीं धैर्य नव्हतें. आणि तशा प्रसंगीं प्रथम कांहीं वेळ आवेशानें भांडावें नंतर त्यांजबरोब

र भांडणें सोडून द्यावें हें आपल्या सही नीट वाटतें. आतां ते दूर गेले असतां ही तुमची इतकीच उडी दिसती, पण ते जसे त्या अल्पविश्वासावर येऊन पडले त्याप्रमाणे तुह्मावर येऊन पडतील तर तुमची काय गति होईल तें न कळे.

आणखी असें आहे ते स्वतां चोर नव्हत, दुसऱ्याच्या हाताखालचे चोर आहेत, ते नरकाच्या राजाच्या अधीन आहेत; तो राजा प्रसंगीं स्वतां उडी घालून येऊन त्यांची मदत करीतो, त्याचा शब्द गर्जना करणार सिंहासारिखा आहे. या अल्पविश्वासासारिखा मजवरही प्रसंग पडला होता त्या वेळीं मीतर भयभीत होऊन गेलों. ते समयीं असें झालें कीं ते तिन्ही लुच्चे मजवर येऊन पडले, तेव्हां मी ख्रिस्ती सारिखी त्यांशीं कंबर बांधिली तें पाहून त्यानी आपल्या धन्यांस हांक मारिली तो त्या हाकें सारिखा येऊन उभा राहिला. त्या समयीं तर मला प्राणांत अवस्था प्राप्त झाली होती, परंतु ईश्वरकृपेने असें झालें कीं माझ्या आंगांत प्रमा

णाचें कवच होतें ह्मणून बरें झालें. फार काय सांगूं माझ्या आंगांत कवच असतांही मला त्यांजबराबर पुरें पडावयास विचार पडला होता. त्या युद्धसमयीं जें घडलें तें तोंडानें कोठवर सांगावें ज्याजवर तो प्रसंग घडला तोच एक जाणे.

आ० — खरें पण परमानुगृहीत येत आहे असें त्यांस वाटल्यानेच ते पळून गेले ना ?

रि० — होय गेले, ते झाले काय, त्यांचा धनी झाला काय, हे परमानुगृहीत येतांच पळून गेले आहेत असें वारंवार घडलें आहे. परंतु याजवरून आश्चर्य मानूं नये, कांतर परमानुगृहीत हा राजाचा मोठा वीर होय. आपण याची अल्पविश्वासाशीं बरोबरी करूं नये. राजाची जी सर्व प्रजा आहे ते अवघेच वीर आहेत असें नाहीं आणि परीक्षेच्या वेळीं ते त्या परमानुगृहीतासारिखे भांडतील असें ही नाहीं. अहो एखादें लहान मुलगें दाविदासारिखें गल्याथास मारील काय ? बैलाचें सामर्थ्य चिमणीत असेल काय ? कितीएक बळवान् आहे

न, कितिएक दुर्बल आहेत; कितीएकांस विश्वास अधिक, कित्येकांस उणा असें आहे: अल्पविश्वास दुर्बळ होता ह्मणून त्याचा पराभव झाला.

आ० - तेथें अल्पविश्वास नसता आणि परमानुगृहीत असता तर त्यानें त्या तिघांस चांगला मार दिला असता

खि० - परमानुगृहीतासही फार आयास पडले असते, परमानुगृहीत पाहिला असतां शस्त्रेंकरून भांडण्यास मोठा कुशल आहे, आणि आपली तरवार परजून त्यांस आपल्या आंगाशीं भिडूं दिलें नाहीं तोंपर्यंत कायती त्याची हुशारी, पण भीतांतःकरण, अविश्वास किंवा अपराध यांतून एकादा येऊन त्यास एकदां बिलगला तर मग विचार पडेल. फार काय सांगावें पण तो त्या परमानुगृहीतास पाडून टाकील आणि एकदां मनुष्य पडलें ह्मणजे मग त्यानें काय चालणार आहे.

जो कोणी परमानुगृहीताच्या मुखावर पाहील तर त्यास जखमाचे डाग दिसतील, त्याजवरून मी

जें सांगतों तें खरें अशी सहजांत खाची होईल. त्यास एक वेळ युद्धप्रसंग प्राप्त झाला होता त्यावेळीं त्यास भ्या असें बोलतां ऐकिलें कीं आह्मास जीवाची आशा राहिली नाहीं. अहो त्यां लुच्यानी व त्यांच्या दुसन्यां सोबत्यानी दाविदास कसें दुःख दिलें, कसें कुथविलें, कसें त्रासविलें तें आपण ऐकिलेंच असेल. हे मान वहे शिकिया हे मोठे वीर असतांही यांशीं जेव्हां त्या लुच्यानी कंबरा बांधिल्या त्याकाळीं यांसही आपल्या प्रयत्नाची पराकाष्ठा कराची लागली. असें केलें तथापि हे मार खाल्या यांचून राहिले नाहीं. पेत्रसाच्या एक वेळ मनांत आलें कीं आपल्या बळाची आपण परीक्षा पहावी, त्याजवरून त्याने त्यांशीं कंबर बांधिली त्याकाळीं कित्येकांच्या सांगण्या प्रमाणें पेंत्रेस प्रेषितांचा राजा असतांही त्याजवर त्यानी चढाव करून त्यास एक्या पोरगीच्या हातून भय घातलें.

यां लुच्यांचा जो राजा आहे तो यांनी शिपुळ वाजिवली ह्मणजे धावत येतो. तो यांस कदापि अंतरतनाहीं. आणि यांची जर हल्ला की झाली तर तो येउन यां

ची मदत करितो. त्याविषयीं असें सांगतात कीं त्या
जवर तरवार टाकिली तर चालत नाहीं, भाला चाल
नाहीं, लोखंडास तो पेंढ्या सारिखें मोजितो आणि पि
तळेस कुजलेल्या लांकडासारिखें मोजितो. त्याजवर
तीर सोडले तरी तो हटत नाहीं. गोफणीच्या दगडास
१५५
तृण सारिखें मानितो. तेव्हां त्याच्यापुढें मनुष्यानें
कायबरें करावें. जर मनुष्यास त्याजबराबर भांडाया
स नेहमी योवाचा घोडा मिळाला आणि जर त्या घोड्या
वर बसतां आलें तर मग तो मनुष्य मोठी ख्याती करी-
ल. कां तर त्या घोड्याचें मानेस गर्जनेचें आच्छादन
आहे. गंवतावर उडणारे किटका सारिखा तो भीत ना-
हीं. त्याच्या नाकपुडीचें तेज भयानक आहे. तो खिं-
डींतून जातां नखरा करितो, आपलें सामर्थ्य पाहून आ
नंदत असतो, शस्त्रयुक्त मनुष्यांवर जातो, तो भयास
तुच्छ मानितो, तो अंतरीं जरा डळमळत नाहीं. तरवार
पाहून मागें हटत नाहीं, बाणाचें भाते, तीक्ष्ण भाला, ढा
ल हीं त्याला पाहून उगीच खणखणा करितात. तो क्रूरते
नें व कोपानें भूमीस ग्रासितो, तो करण्याच्या शब्दास

ही गणीत नाहीं. तो करण्यामध्यें हाहा शब्द करितो; सु
ड्याचा व योद्ध्यांच्या गर्जनांचा दूरूनच वास काढितो.

तुह्मा आह्मासारिखे जे पायदळ शिपाई आहेत त्या
नी शत्रूबरोबर कंबर बांधायाची इच्छा करूं नये व आह्मी
त्याजवर चढ करूं अशीही कल्पना करूं नये. अथवा
आपल्या पौरुषांत डुलूं नये, कांतर अशा नादांत जे डु
लणारे ते परीक्षेच्या अंतीं बहुधा टिकत नाहीं. कां इत
रांचा पराजय झालेला आपण ऐकिला आहे किं नाहीं.
पेचेसाची महाकाय अवस्था झाली. याची गोष्ट पूर्वी
निघाली होती. माझ्या हातून इतर सर्व जनांपेक्षां चांग
लें होईल व आपल्या स्वामीची सेवा अधिक घडेल या
प्रमाणे त्याच्या दांभिक मनांत येऊन तो तशें आपल्या
तोंडानें बोलूं लागला परंतु त्यां लुच्चानी त्यास जिंकू
न त्याची जशी दुर्दशा केली तशी दुसरे कोणाची दुर्द
शा केली आहे ?

याप्रकारचे दरोडे राजाच्या थोरल्या मार्गावर प
डल्याचें वर्तमान आपण ऐकतों ह्मणून अंगांत क
वच घालून व बराबर ढाल घेऊन बाहेर पडावें, या दो

न गोष्टीविषयीं फारजपावें. हीं दोन साधनें नव्ह तीं ह्मणून लेव्याथानावर हल्ला केला, तेसमयीं त्या जवर अमल बसला नाहीं. आणि जर तीं दोन साधनें नसलीं तर तो लेव्याथान आपल्यास भिणारच नाहीं. याजकरितां ज्याच्या जवळ कुशलता होती, त्याणें सांगितलें आहे, "विश्वासाची ढाल अवघ्या अंगावरून घ्या, तेणेंकरून दुष्टाचीं जीं अग्निरूप शस्त्रें तीं तुमच्या हातून विझतील"[१५८].

राजाने आपल्यास पोंहचवावयास पाहरा द्यावा किंबहुना आपणच यावें अशीही आपण विनंति करावी; तो पोंहचवावयास स्वतां आपल्या समागमें येईल. तो आपल्या बरोबर आला आहे असें दाविदाने मनांत आणल्यावरून तो मृत्युछायेच्या खिंडींत असतांही त्यास आनंद वाटला. मोशाला तर असें वाटलें कीं ईश्वराचांचून पुढें पाऊल टाकणें त्याजपेक्षां मरणें बरें. दादा तो जर आपल्या समागमें असला तर मग आपल्यावर दाहा हजार जरी उठले त

थापि त्यांचें भय नाहीं; परंतु त्याजवांचून मोठे "अभिमानी साह्यकर्ते असले तथापि ते मेल्या चे हातून मरतील[१५८]."

माझेविषयीं ह्मणाल तर मला तो तसा सुख प्रसंग पूर्वीं प्राप्त झाला होता, मी त्या सर्वोत्तमा च्या कृपेने वांचलों मी माझा पराक्रम कांहीं वा णीत नाहीं. आपण आतां सर्व अरिष्टांतून पा र पडलों असें नाहीं, पण तसला प्रसंग पुनः प्रा प्त न झाला असतां मला मोठा आनंद होईल. अ झून पर्यंत तर मलासिंहाने व अस्वलानें खाऊन टाकिलें नाहीं. त्याजवरून अशी-अशा धरितों कीं ज्याला सुंता घातली नाही अशा फिलिस्तीपा- सून ईश्वर माझें रक्षण करील. मग खिस्ती गा ऊं लागला.

चाल

बापुडापहा अल्पभावतो, तस्करां
करींतो विगंवसतो, जायलूटला
तोतयांकरें, भावधारकाहेंमनीं

स्मरें. १ पूर्णभाव जें तूं त्य पाव शी.
दश सहस्त्र जे त्यांस जिंकिशी, पूर्ण
भाव तो दूर रे जरी, अजित ते तुनें ती
नहीं तरी. २

मग ते पुढें चालते झाले, आणि अज्ञानी त्यां
च्या मागाहून जाता झाला. मग ते कांहीं चाल-
ल्या नंतर त्यांस असें अढळलें कीं आपला जोजा
वयाचा मार्ग त्या शींच लगत सरळ असा एक दु
सरा मार्ग लागला आहे. दोन्ही मार्ग पाहतात तों
नीट धोपट पुढें लागले आहेत, त्यांतून कोणत्या
मार्गाने जावें हें कांहीं कळेना. ते समयीं ते विचार
करीत उभे राहिले. इतक्यांत तेथें एक मनुष्य आ
ला त्याचें शरीर पाहिलें तर काळें, परंतु आंगांत ए
क अगदी पांढरा झगा घातला आहे. असा एक
जण येऊन त्यांस पुसतो तुह्मी येथें कां उभे राहि
ले आहां? त्यानी उत्तर दिलें आह्मी दिव्य नगरा-
स जात आहों परंतु या दोहों मार्गांतून कोणत्या
मार्गे जावें हें आह्मास समजत नाहीं. तर माझ्या

मागें या मीही तेथेंच जात आहें. मग ते त्याच्या मागें चालते झाले पण पाहतात तों तो मार्ग त्या दिव्य नगरापासून थोडका थोडका करितां फारच एकीकडेस झाला आहे. याप्रमाणे ते त्याच्या मागें जात असतां त्यांचीं तोंडें थोडक्यांतच त्यानगरापासून एकीकडेस झालीं. मग असतांअसतां त्यांस अचानक नेऊन एक्याजाळ्यांत घातलें, तेथून त्यांस निघवेना असे ते तेथें गुंतले, इतक्यांत पाहतात तों त्या मनुष्याच्या पांढरा झगा अंगातून खालीं पडून त्याची पाठ दिसली ते समयीं ते आपली स्थिती जाणून मनांत चमकले. मग त्यांस त्या जाळ्यांतून बाहेर निघवेना ह्मणून ते तेथेंच कांहींवेळ रडत बसले.

ते समयीं ख्रिस्ती आपल्या सोबत्यास बोलतो आतां माझी चुकी झाली खरी. जो उगीच स्तुति करणारा त्याजपासून तुह्मी सावध असा असें मेंढक्यानी आपल्यास सांगितलें नव्हतें काय ? ज्ञात्या पुरुषानें जसें सांगितलें होतें, तसेंच आज आपल्यास घडलें. "जो कोणी आपल्या सेजाऱ्याची उगीच स्तुति करितो

तो त्याचे पाय गुंतण्याविषयीं जाळ मांडितो. १५१

आ० — आपला मार्ग आपल्यास चांगलेपणीं सांपडावा ह्मणून त्यां मेंढक्यांनी आपल्यास एक सूचनापत्र दिलें होतें; परंतु तेंही वाचावयास आपण विसरलों, आणि नाशकरणाराच्या मार्गांत येऊन पडलों. दाविद आपल्यापेक्षां सूज्ञ होय; त्याचें असें ह्मणणें आहेकीं मनुष्यांच्या कर्माविषयीं ह्मणालतर नाशकरणाराच्या मार्गापासून मी तुझ्या वाक्याच्या योगानें वेगळा होऊन राहिलों १६०

याप्रकारें ते त्या जाळ्यांत रडत बसले, शेवटीं त्यानी एक प्रकाशवान् हातीं दोरीचा च्याबूक घेऊन त्यांजकडेस येताना पाहिला. तो त्याजपाशीं येऊन ह्मणतो कांतुह्मीं कोठून आलां आणि कोठे जातां. त्यानी उत्तर दिलेकीं आह्मी गरीब यात्रेकरू आहों, आह्मी सियनास जात होतों, परंतु एक काळा मनुष्य पांढरीं वस्त्रें ल्यालेला भेटला, त्यानी आह्मास भलत्याच मार्गी लाविलें. तो असें बोलिला कीं माझें मागें चला, मीही सियन नगरास जात आहें. ते समयींज्या

त्या हातीं चाबूक होता, तो बोलिला कीं तो खोटा स्तु
तिकरणारा आहे, ज्याणे तेजस्वी देवदूताचें रूप धरि
१६१
लें आहे असा खोटा प्रेषीत तो आहे. मग त्या
णें तें जाळें तोडून त्यांस मोकळें केलें. आणि त्यांस
बोलिला कीं तुह्मी माझे मागें या मी तुह्मास तुमच्या
मार्गीं लावितों; असें बोलून त्यानी स्तुतिकरणारा
च्या नादीं लागून आपला मार्ग सोडिला होता, त्या
मार्गाकडेस त्यांस नेलें. नंतर तो त्यांस पुसूं लागला
कीं तुह्मी कालच्या रात्रीस कोठें होतां, त्यानी उत्तर दि
लें रमणीय पर्वतांवर मेंढक्यांचे येथें होतों. त्याजवरू
न त्याने प्रश्न केला, बरें त्यानी तुह्मास मार्गाविषयीं
कांहीं सूचनापत्र दिलें नव्हतें काय? त्यानी उत्तर
केलें होय दिले होतें. तें ऐकून तो बोलला, बरें तर
तुह्मास मार्ग सुचेना असें झालें तेसमयीं तें सूचना
पत्र काढून तुह्मी वाचलें किं नाहीं. ते ह्मणतात
आह्मी वाचलें नाहीं. कां वाचलें नाहीं बरें, असें तो
विचारूं लागला. तेसमयीं ते उत्तर देतात कायकरा
वें आह्मी वाचावयास विसरलों. शेवटीं त्याणे त्यांस

एक गोष्ट पुसली बरें तुह्मी स्तुति करणारापासून सं
भाळून असा असें तुह्मा त्यां मेंढक्यानीं सांगितलें
होतें किंनाहीं? त्याजवरून ते बोलतात, होय सांगित
लें होतें परंतु काय करावें हा असा भला गोड बोल-
णारा गृहस्थ खोटी स्तुति करणारा नसेल असें आ
ह्मास वाटलें, नाहींतर आह्मी त्याच्या नादीं लागलों
नसतों.

मग मी आपल्या स्वप्नांत पाहतों तों त्याणें त्यांस
भूमीवर पडावयास सांगितलें, ते भूमीवर पडतांच
त्यांस उत्तम मार्गांत जाण्याविषयीं बोध व्हावा ह्मणू
न त्यांस चांगला मार दिला.[१६२] मारते वेळीं तो त्यांस अ
सें बोले कीं ज्यांजवर मी प्रीति करितों त्यांस मी शब्दला
वून दंड करितों,[१६३] याजकरितां तुह्मी फार उद्युक्त व्हा आ
णि पश्चात्ताप करा. याप्रमाणें त्यांस शिक्षा करून
सांगितलें कीं आतां आपल्या मार्गानें चालते व्हा,
आणि मेंढक्यानीं ज्या गोष्टी निषेधिल्या आहेत त्यांवि
षयीं फार संभाळून असा. असें त्याचें भाषण ऐकून
त्यानीं त्याच्या कृपेचा स्तव करून आपल्या सरळ

मार्गानें गालगात चाललें.

श्लोक

सत्पंथीं विचराह्मणून रत्तवितों ऐका तुह्मी ही कथा, कैशी याविकदुर्गतीत पडतीजे सांडिती सत्पथा, कल्याणावह बोधजो कथियला त्यातें कुतर्कें करे, गेले ते विसरून यास्तव तयां तें जाळ ग्राशीं तरे. १ ज्याच्यापासुन मुक्ति दुष्करतयामध्येंच ते गुंतले, त्या मोहास्पद जाळ तें परिपहा निर्मुक्त ते जाहले, ऐसें त्यां घडलें खरेंच परि ते दंडास हो भोगिती; तुह्मी यास्तव ध्या चिसावध असें पंथी तुह्मा बोधिती. २

मग कांहीं पुढें चालले तों त्यानी एक जण त्याथोरल्या मार्गावरून हळू हळू एकराच त्यांजकडेस येताना दूरून पाहिला, ते समयीं ख्रिस्ती आपल्या सोबत्यास बोलतो, तिकडे तो गृहस्थ पाहिला काय. तो

सियनाकडेस पाठ करून आपल्याकडेस येतो आहे.

आ० — होय पाहिला; आतांतरी आपण सां भाळून असावें, नाहींतर हाही त्या स्तुतिकरणा रांसारिखा दगा देईल. मग हळूहळू करितां तो त्यांच्याजवळ येऊन पोंहचला, त्याचें नांव नास्तिक. तो त्यांस पुसतो तुम्ही कोठें जातां?

खि० — आम्ही सियनपर्वतास जात आहों. तें ऐकून नास्तिक पोट भरून हासूं लागला.

खि० — आपण काय म्हणून हासतां?

ना० — इतके मोठे श्रम करून हा लांब मार्ग क्रमून जावें आणि त्याचें शेवटीं फळ पाहतां श्रमांवांचून दुसरें कांहीं प्राप्त होऊं नये हें तुमचें अज्ञान पाहून मला हासूं आलें.

खि० — आमचा तेथें प्रवेश होणार नाहीं असें तुम्हास वाटतें काय?

ना० — प्रवेशाची काय गोष्ट सांगतां, आपण सांगतां तसें या लोकीं स्थळच नाहीं.

ख्रि० — यालोकीं नाहीं परलोकीं आहे.

ना० — मी माझ्या गावीं घरीं होतों, तेव्हां आ पण जें स्थळ सांगतां त्या स्थळाची गोष्ट ऐकून तें स्थळ पाहावयास बाहेर पडलों तो आज वीस वर्षे शोधीत आहें परंतु तें कांहीं मला आढळलें नाहीं, अझून प्रथमच दिवस आहे.

ख्रि० — पण तें स्थळ वस्तुतः आहे असें आ ह्मी ऐकिलें आहे, आणि तें वाक्य खरें असा आ मचा विश्वास आहे.

ना० — मी घरीं असतां त्या स्थळाविषयीं जें ऐ किलें तें खरें असा माझेठायीं विश्वास उत्पन्न झाला नसता तर मी येथपर्यंत तें स्थळ पहावयास आलों नसतों, आणि तें स्थळ जर वस्तुतः असतें तर अ झून ही मी पुढें गेलों असतों. तें पाहण्याकरितां म्या तर तुह्मापेक्षां अधिक मजल केली आहे, परंतु तें कोठें आढळत नाहीं ह्मणून मी आतां मागें फिर लों. आतां तें स्थळ तर मिळत नाहीं ह्मणून त्याचे आशेकरितां जीं सुखें म्या त्यागिलीं होतीं तीं भोगा

व्यास माघारें जातों.

तें ऐकून ख्रिस्ती आशावान् आपला सोबती त्यास बोलितो अहो हाजें बोलत आहे तें खरें काय?

आ० — संभाळून असावें, हाही एक गोडबोल्या दिसतो. असल्याच गोडबोल्याचें ऐकून आपल्यास जो अनर्थ प्राप्त झाला त्याचें तर स्मरण आहे. याची गोष्ट काय ऐकावी सियनपर्वत खोटा काय ? आपण रमणीय पर्वतांवरून त्यापर्वतावरील नगराचा दरवाजा पाहिला नाहीं काय. आतां आपण विश्वासानें चालूं नये काय[१६५] ? आपण आतां पुढें चाल करावी, नाहींतर ज्याच्या हातीं च्याबुक आहे तो येउन पुनः आपल्यास धरील.

आपण तर मला त्या वाक्याचा बोध करावा, तें वाक्य कोणतें ह्मणाल तर तें मीच आपल्यास ऐकवितों "माझ्या लेंकरा, जो संबोध कोणी ज्ञानाच्या वचनापासून बहके असें करितो तो ऐकायास अनुकूल होऊं नको."[१६६] ह्मणून दादा मी विनंती करितों कीं आपण त्याचें

ऐकूं नये, आपल्या जीवाच्या उद्धारा विषयींविश्वा
स ठेवावा[१६८]

शिष्य० — दादा ह्याजें बोलत आहे तें खरें काय
ह्मणून जें मी बोलिलों त्याजवरून आपल्याविश्वा
सा विषयीं मला संशय येऊन आपल्यास प्रश्न के
ला असें मानूं नये, परंतु आपल्या अंतःकरणा-
तील वास्तविक अभिप्राय बाहेर पडावा ह्मणून
मी तसें बोलिलों, त्या नास्तिका विषयीं पुसालत
र त्यास प्रपंचाच्या देवानें आंधळा केला आहे. अ
सो, आपणास सत्या विषयीं विश्वास आहे; आणि
"सत्यांत कांहीं लबाडी नाहीं." [१६९] असा भाव धरून,
चालतें व्हावें येथें थांबूं नये.

आशा० — देवलोकींचे वैभवा विषयीं मला आशा
आहे; त्यामुळें मला आनंद वाटतो. याप्रमाणें तेबो
लून त्या नास्तिकापासून एकीकडेस होऊन चाल
ते झाले; मग त्यांस हांसून तोही गेला.

मग मी आपल्या स्वप्नांत पाहतों तों ते पुढें जा
त असतां कोणे एके देशास पोंहचले तेथें कोणी

विदेशी आला ह्मणजे ते थलेहवेने त्याची प्रकृति जड होऊन त्यास निद्रा यावी असा तो देश होता. येथें येतांच आशावानाची प्रकृति जड होऊन त्यास डुकली येऊं लागली; ते समयीं तो ख्रिस्तीस बोलतो, माझी प्रकृति जड होऊन गेली, मला डोळे उघडून पाहवत नाहीं: याजकरितां आपण येथें जरा झोंपीस जाऊं.

ख्रि० — झोंपेची गोष्ट काढूं नका. झोंप एकवेळ लागली ह्मणजे मग पुढें जागे झालो!

आ० — असें काय दादा बोलतां? ज्यास श्रम झाले असतात त्यास निद्रा फार गोड लागती; तशांत आपण जरा झोंप घेतलीतर आपले श्रम जाऊन आपल्या अंगीं टवटवी येईल.

ख्रि० — मोहित जागे विषयीं संभाळून असा असेंजें त्या मेंढक्यांतून एकाजणाने सांगितलें होतें त्याचें तुह्मास स्मरण आहे ना? त्याच्या बोलण्याचा भाव हाच कीं आपण झोंपेविषयीं जपून असावें. याजकरितां जसें इतर निजतात तसें आपण निजूं नये. आपण जागावें आणि सावध राहवें.

आ० — अहाहा माझी बुद्धि चुकली खरी; जर मी येथें एकटाच असतों तर मी झोंपीं गेलों असतों, तेणेकरून मला कदाचित् मरण प्राप्त झालें असतें त्या ज्ञानी पुरुषानें ह्मटलें आहे तें नीट आहे कीं "एकापेक्षां दोघेजण चांगले." आजपर्यंत तर तुमच्या संगानें आमचें कल्याणच झालें. तुह्मी जे मजविषयीं श्रम घेतले त्याचें तुह्मास उत्तम फळ मिळेल.

खि० — बरें तर येथें नीज येऊं नये ह्मणून आपण एक्या चांगल्या विषयावर संभाषण करावें.

आ० — फार चांगलें, मी तीच वाट पाहत आहें.

खि० — तर आपण कोठून आरंभ करितां?

आ० — जेथून ईश्वरानें आपल्या बराबर आरंभ केला तेथून आपण आरंभ करावा. हां आतां चालूं द्यावें.

खि० — प्रथम मी तुह्मास एक गीत गावून ऐकवितों.

अभंग

साधकांस निद्रा व्यापितसे ज्व्हां,

याचें त्यानीं तेव्हां, याची स्थळीं. १
दोघे हे यात्रिक बोलती स्वभाचा,
संवाद तयांचा, ऐका वातो. २
तयापासूनीयां चित्तीं तो विचार,
धरावा साचार, स्वार्थालागीं. ३
आसूं पाहे निद्रा तयां हो लागून,
ठेवावे लोचन, उन्मीलित. ४
संतसमागम उत्तम प्रकारें;
धरितां आदरें, निद्राकैंची. ५
नरकींचीं भूतें करीती प्रयत्न,
निद्रित लोचन, करावया. ६
ऐसें घडे तऱ्ही संत समागम,
जागवी निस्सीम, साधकांशीं ७.

मग ख्रिस्ती आरंभ करून बोलूं लागला मी आपल्यास एक प्रश्न करितों, जहीं आपण ज्याबुद्धीने वागत आहां ती बुद्धि आपल्यास केव्हांपासून प्राप्त झाली?

आ० — आपल्या जीवाचें सार्थक करून

घ्यावें अशी बुद्धि केव्हांपासून प्राप्त झाली, असें आपण पुसतां काय ?

रिव्र० – होय

आ० – ज्या वस्तु आपल्या बाजारांत दृष्टीस पडतात, व ज्या तेथें विकल्या जातात अशां वस्तूं विषयीं मला प्रथम मोठा आनंद वाटत असे. आतां असें वाटतें कीं त्यां वस्तूं विषयीं मी आनंदतच मानीत राहिलों असतों तर माझा नाश होऊन मी दुःखांत बुडालों असतों.

रिव्र० – त्या कोणत्या वस्तू ?

आ० – इहलोकींचीं द्रव्यें, ऐश्वर्यें ह्या वस्तुत्या. ख्याली खुशाली, अपरिमित भोजन, मद्यपान, कुटिल भाषण, लबाडी, शिनळकी, साबाथ दिवस मोडणें, किंबहुना जेणेकरून जीवांचा नाश होणार अशीं कर्में मला आवडत होतीं. परंतु म्यापारलोकिक वस्तूं विषयीं तुह्मापासून ऐकिलें, आणि ज्याचा विश्वास आणि चांगूलपणा पाहून मायेच्या बाजारांत बंध केला अशा प्रिय विश्वासूपासून

श्रवण केलें आणि विचार केला त्याजवरून शेवटीं असें वाटलें कीं "तसल्या कृत्यापासून अंतीं मरण आहे" [१८१] आणि "जे अवज्ञा करितात त्यांजवर त्या कृत्यामुळें ईश्वराचा क्षोभ होतो" [१८२]

रिच० — हा असा विचार तुमच्या अंतःकरणांत तत्क्षणींच बिंबला काय?

आ० — नाहीं. पातक अमंगळ आहे व तें जो आचरतो त्याचा नाश होतो, ही गोष्ट जाणून घेण्याविषयीं श्रवण करून माझें मन डळमळूं लागलें. तेसमयीं तो सत्यबोध बुद्धिवर वागवूं नये असें वाटूं लागलें.

रिच० — तुह्मावर ईश्वराच्या पवित्र आत्म्याचा प्रथम अनुग्रह होई तोंपर्यंत तुह्मी सांगतां तसें तुह्मास कां वाटूं लागलें.

आ० — मला तसें वाटूं लागलें त्याचें प्रथम कारण. माझें मन डळमळूं लागलें तेसमयीं हें ईश्वराचें कृत्य असें मला ठाउक नव्हतें. हें म्या पातक केलें असें जें मनांत येणें हाच पातक्यास उत्तम

पथास लावण्याविषयीं ईश्वरकृपेचा प्रारंभ, हें मला समजलें नव्हतें. दुसरें कारण. माझें मन डळमळूं लागलें होतें खरें पण मला पातक प्रिय वाटत होतें, तें त्यागावयास माझें मन धजत नसे, तिसरें कारण. माझे जे सोबती होते त्यांस कसें सोडून द्यावें असें माझ्या मनांत येई. त्यांची सोबत, त्यांचीं कर्में मला फार अवडत होतीं. चौथें कारण, मी पातकी आहें, असा माझा निश्चय होऊन माझ्यामनांत वागूं लागे त्याकाळीं मला अंतरीं फार पीडा होऊन भयप्राप्त होई, तेसमयीं ती अंतःकरणाची स्थिति मला सहन होत नसे, फार काय सांगूं त्या स्थितीचें स्मरणही मला त्रास देई.

खि॰ — मग ती अंतरपीडा कोणेसमयीं आपण दूर करीत असाना ?

आ॰ — होय. दूर करीं, पण ती पुनः प्राप्त होई, ते समयीं मला पहिल्यापेक्षां अधिक दुःख होई.

खि॰ — बरें तुम्हास त्यां तुमच्या पातकांचें कशानें स्मरण होई.

उत्त० — त्यांस बहुत कारणें आहेत; मला कोणी उत्तम मनुष्य मार्गांत भेटला; अथवा म्या कोणास धर्मपुस्तक वाचितां ऐकिलें; अथवा माझें डोकें दुखूं लागलें; अथवा माझे कोणी शेजारी दुखण्यांत आहेत असें म्या ऐकिलें अथवा कोणी मेलें असतां लोकांस सूचनेकरितां जी मोठी घंटा वाजवितात तिचा म्या नाद ऐकिला; अथवा मी जर मेलों तर माझें कसें होईल असें माझ्या मनांत आलें; अथवा कोणी अकस्मात् मेल्याचें वर्तमान ऐकिलें; परंतु विशेषेंकरून, मी मरण पावून माझा लोकरच न्याय होईल असें मनांत आलें ह्मणजे मला माझ्या पातकाचें स्मरण होई.

शिष्य० — बरें यां कारणावरून तुह्मास त्यां पातकांचें स्मरण होई तेव्हां मला त्यां पातकांचा दोष नाहीं असें कधीं तुमचे मनांत येई काय ?.

उत्त० — नाहीं, जरा येत नसे; तसें मनांत करूं लागलें ह्मणजे तीं पातकें माझ्या मनास अधिकच होंचत असत. पातक करावें असें तर माझ्या

मनांत न व्हतें परंतु पातक करण्याचीजर कल्पना आलीतर फारच मन खाऊं लागे.

ख्रि० – मग ते समयीं तुह्मी काय करा ?

आ० – मी असें मनांत आणीं कीं आपण या ईट आचरण सोडून चांगलें आचरण धरावें नाहीं तर आपला नाश होईल.

ख्रि० – मग तुह्मी आपलें आचरण नीट ठेव-ण्याविषयीं जपत असा काय ?

आ० – होय, तेसमयीं केवळ पातकापासूनच दूर झालों असें नाहींतर पापीजनाचा संगही सोडून दिला, आणि ईश्वराची प्रार्थना करणें, धर्मपुस्तक वाचणें, पातकांकरितां शोक करणें, लोकांशीं खरें बोलणें, इत्यादिक दुसरीं बहुतजीं येथें सांगतां येत नाहींत अशीं सत्कर्में आचरूं लागलों.

ख्रि० – तेणेकरून मी चांगला झालों असें तुह्मास वाटे काय ?

आ० – होय, काहीं वेळपावेतों; परंतु पुनः पूर्ववत् अंतरीं पीडा होऊं लागे, त्यां माझ्या सत्कर्मांस ती

अंतर पीडा उत्पन्न नसे.

रिव्ह० — तुह्मी सत्कर्म करीत असतांही तुम-च्या अंतःकरणाची तळमळ राहिली नव्हती हें कसें ?

आ० — कित्येक गोष्टी माझ्या मनांत येत असत, ह्मणून ती तशी तळमळ होई. तो प्रकार सांगतो. आमचीं सर्व पुण्यकर्मे विटाळाच्या फडक्यासारखीं आहेत, नियम शास्त्रांतील कर्मे करून कोणी माणूस पुण्यवान् ठरला जात नाहीं, हीं सर्व कर्मे केलीं असतां ही आह्मी निरुपयोगी चाकर आहों असें ह्मणणें योग्य आहे, इत्यादि बहुतेक वाक्यांचें मला स्मरण होई. त्याजवरून मी असा विचार करी कीं जर माझीं सर्व पुण्यकर्मे विटाळाच्या फडक्या सारिखीं असलीं, तर नियम शास्त्रांत सांगितलेलीं कर्मे केलीं असतां मनुष्य पुण्यवान् ठरला जात नाहीं, आणि आपण सर्व केलें असतां ही निरुपयोगी चाकर आहों, तर नियम शास्त्रांतील कर्मानें दिव्य लोक मिळतो असें कल्पिणें केवळ वेडे

पणा आहे. कोणे एके माणसावर दुकानदाराचे शंभर रुपये चढले त्यांचा फडशा नकरितां त्याने मागाहून जो त्याजपासून जिन्नस आणिला त्याचा ऐवज दिला. तर तेणेकरून तें मागलें कर्ज दिलें असें होत नाहीं, तें त्याच्या नावावर तसेंचें तसेंच राहिलें, त्याकर्जाविषयीं तो दुकानदार त्याजवर फिर्याद करील, आणि त्याकर्जाचा फडशा होईतों पर्यंत त्यास तुरंगांत ठेवील.

खि० — ही गोष्ट तुह्मी आपल्याकडेस कशी लावून घेतली.

आ० — कशी लावून घेतली तें ऐका; म्या आपल्या मनांत असें आणिलें कीं माझीं पातकें बहुत झालीं असें ईश्वराकडेस माझ्या नावीं चोपडींत लिहिलें आहे. याजकरितां आतां मी चांगलें आचरण करूं लागलों ह्मणून तीं माझीं मागलीं पातकें पुसून गेलीं असें नाहीं. मी चांगलें आचरण धरलें तथापि पातकीच होय, पहिल्या पातकांवरून मला जो दंड प्राप्त होणार त्यापासून मी कसा मुक्त होईन

खि० — तुह्मी त्या गोष्टीची चांगली योजना केली, बरें पुढें काय झालें

आ० — मग असें झालें कीं मी उत्तम आचरण करितां माझ्या अंतरीं तळमळ होऊं लागली, त्याचें कारण मी माझीं केवळ उत्तम कर्मे सूक्ष्म विचारानें पाहूं लागलों ह्मणजे त्यांत पातक किंबहुना नवीन पातक मिसळलें आहे असें मला दिसे. त्यावरून मला असें वाटे कीं मी आपल्यास चांगला ह्मणवितों, आणि सत्कर्मे करितों, आणि अलिकडेस उत्तम आचरण धारण केलें आहे तथापि माझ्या कडून एके दिवसांत इतकें पातक घडतें कीं तेणेकरून मी नरकांतच जावें असें मला वाटूं लागलें.

खि० — मग तुह्मी काय केलें ?

आ० — मग काय करावें, काहीं सुचेना असें झालें. याप्रमाणें होत असतां विश्वासूचा माझा पूर्वीचा परिचय होता, तो मला भेटतांच त्याजपाशीं सद्गुत निरूपिलें. तेसमयीं त्याणें मार्ग सांगितला, त्याणें मला असा बोध केला कीं ज्या मनुष्यानें पातक

ह्मणून कधींच केलें नाहीं अशाचें जरपुण्य तुह्मास मिळेलतर तुमचें कार्य होईल. वरकड तुमच्यापुण्याने किंबहुना या अवघ्याजगाच्यापुण्यानें तुमचा उद्धार होणार नाहीं.

ख्रि० — मग तोजें बोलिला तें तुह्मास खरें वाटलें काय ?

आ० — मी माझें उत्तम आचरण पाहून संतुष्ट असें, ते समयीं जर त्या विश्वासुकाने असा मला बोध केला असता तर म्या त्यास वेडा असें मानिलें असतें, परंतु मी केवळ दुर्बळ, मी कितीही उत्तम कर्म केलें तथापि त्यांत पातकाचा संचार झाला असतो असें मला वाटूं लागलें ते समयीं त्याने जो मला बोध केला तो खरा वाटला.

ख्रि० — त्याने कधींच पातक केलें नाहीं असें बोललें असतां ज्याविषयीं वास्तविकपणें संभवतें, अशा लक्षणाचा मनुष्य विश्वासुकाने सांगितला त्याकाळींत सा मनुष्य कोठेतरी आढळेल असें तुह्मास प्रथमतः वाटलें काय ?

आ० - प्रथम तर त्याचें भाषण मला विपरीत वाटलें, परंतु नंतर त्यासीं कांहीं संभाषण करूं लागलों, त्याचा कांहीं समागम धरिला, ते समयीं त्याचें भाषण मला केवळ सत्य वाटलें.

खि० - बरें ज्याच्या पुण्यानें तुह्मी शुद्ध होणार तो कोणता पुरुष असें तुह्मी पुसलें काय ?

आ० - होय, पुसलें. मग त्याणें सांगितलें कीं तो प्रभु येशु, जो सर्वोत्तमाच्या उजव्या हाताकडे बसतो. त्यानें अवतार धरला होता त्याकाळीं जेंजें केलें, व त्यास झाडावर टांगिलें होतें त्याकाळीं जें त्यास दुःख झालें, त्याजविषयीं तुह्मी विश्वास धरला, ह्मणजे तुह्मी निर्दोष व्हाल. मग म्यां त्यास विचारिलें कीं, बरें त्याच्या पुण्यानें इतरजन ईश्वरापुढें निर्दोष कसे ठरतील ? तेव्हां त्याणें उत्तर दिल्हें कीं त्याचें पुण्य च तसें च. तो समर्थ प्रभु, त्याणें जें केलें व जें मरण सोशिलें तें त्याणें स्वतांच्याच साठीं केलें असें नाहीं, तर आपल्या साठीं केलें; आणि तुह्मी तर त्याच्या ठायीं भाव धरिला तर तीं सर्व कर्में, व त्याचें पुण्य तुह्मींच केलें असें

ठरेल.

ख्रि० — नंतर तुह्मास कसें वाटलें ?

ख्रि० — मला त्यांच्याठायीं भाव धरण्याविषयीं शंका वाटली, मी असें मानूं लागलों कीं मला तोता रायास इच्छीत नसेल.

ख्रि० — मग तो विश्वासू तुह्मास काय बोलिला?

ख्रि० — तो बोलिला कीं त्याजपाशीं जा, मग तोता रायास इच्छितो किं नाहीं हें कळेल. मग म्यां त्यास उत्तर केलें कीं त्याजपाशीं आपल्या आपण जावें हा धीटपणा दिसतो. त्याजवरून विश्वासू सांगतो कीं धिटपणा कशाचा. तो तर तुला बोलवीत आहे असें बोलून म्या येशूजवळ निर्भयानें जावें ह्मणून त्याणें मला येशूचें पुस्तक दिलें. त्यापुस्तकाविषयीं असें बोलिला कीं यांतील प्रत्येक बिंदु आणि मात्रा हीं पृथ्वी आणि आकाश यांजपेक्षां अधिक दृढ आहेत. नंतर म्यां त्यास पुसिलें कीं मी त्याजवळ जाऊन काय करूं. त्यानें मला सांगितलें कीं तूं अत्यंत दीन होऊन केवळ मनापासून पित्याची

अशी प्रार्थना कर कीं तुझा पुत्र मला दिसे असें कर. आणखी म्या त्यास असें पुसलें कीं मी त्याची प्रार्थना कोणत्या रीतीने करूं? त्यानि उत्तर दिलें कीं तूं प्रथम त्याजकडे सजा, तो तुला दयेच्या आसनावर बसलेला अढळेल. जे त्याजवळ येतात त्यांची पातकें क्षमा करावयास तो त्या आसनावर अवघें वर्ष बसला असतो. ते समयीं म्या पुसलें कीं मी त्याजपाशीं जाऊन कसें काय पुसावें हें मला नकळे. तें ऐकून तो सांगूं लागला कीं त्याजपाशीं जाऊन असें बोलावें "हे परमेश्वरा, मज पातक्यावर दया करावी, आणि मी येशुख्रिस्तास जाणून त्याचा ठा-यीं भाव धरीं असें करावें. कां तर मी जाणतों कीं त्याचें जर पुण्य नसतें तर माझा नाश होता आणखी त्याच्या पुण्यावर म्या विश्वास ठेविला नाहीं तर्‍ही माझा नाश होईल. हे प्रभु म्या ऐकिलें आहे कीं तूं दयाळू ईश्वर आहेस आणि तुझा पुत्र जगाचा तारक व्हावा असें त्वां नेमिलें आहेस. मजसारिख्या गरीब पाप्यावर दया करावयास तूं सिद्ध आ

हेंस, मी खरोखर पापी आहें, ह्मणून हे प्रभो या प्रसंगीं येशू ख्रिस्त तुझा पुत्र त्याच्या द्वारें मा झ्या जीवाचा उद्धार करून तूं आपल्या कृपेच्या महिमा वाढीव. आमेन"

ख्रि० - मग तुह्मास सांगितलें होतें त्याप्रमाणें तुह्मी केलें काय ?

आ० - होय त्याप्रमाणें म्या वारंवार केलें.

ख्रि० - मग पित्यानें आपल्या पुत्रास प्रकट करून तुह्मास दाखविलें काय ?

आ० - प्रथम दाखविलें नाहीं, दुसऱ्या, तिसऱ्या. चौथ्या. पांचव्या. सांहव्या वेळींही दाखविलें नाहीं.

ख्रि० - मग तुह्मी काय केलें.

आ० - मग काय, मग काय करावें अशा मोठ्या विचारांत पडलों.

ख्रि० - बरें तेसमयीं प्रार्थना करणें सोडून द्यावें असें तुह्मास वाटलें नाहीं काय ?

आ० - होय शेंकडो वेळ वाटलें.

खि० — मग काय ह्मणून प्रार्थना करणें सोडून दिलें नाहीं?

आ० — खिस्ताच्या पुण्यावांचून अवघ्या जगाच्यानें माझा उद्धार होणार नाहीं असें जें मला सांगितलें होतें तें सत्य वाटत असे ह्मणून माझ्या मनांत असें आलें कीं जर म्या प्रार्थना करणें सोडून दिलें तर मी मरून जाईन आणि कृपेचे सिंहासनाजवळ प्रार्थना करितां मेलों तरीं मरणच पावेन आणखी माझ्या मनांत असें आलें कीं जर त्यास विलंब लागला तर त्याची वाट पाहत राह, कां तर तें निश्चित येईल, तें आल्यावांचून राहणार नाहीं[१७९] मग पिता आपल्या पुत्रास मला दाखवी तोंपर्यंत मी त्याची प्रार्थना करीत राहिलों.

खि० — मग तुह्मी त्यास कसें पाहिलें?

आ० — म्या त्यास या चर्मचक्षूनें पाहिलें नाहीं, ज्ञानचक्षूनें[१८०] पाहिलें. ते समयीं असें झालें कीं एके दिवशीं मी मोठ्या दुःखांत होतों, तसें दुःख मला कधीं माझ्या जन्मांत झालें नव्हतें; माझीं पातकें पुष्कळ

आणि निंद्य असें नवीन माझ्या अनुभवास आल्यामुळें मला तें दुःख झालें. तेव्हां मी केवळ नरकास योग्य आहें, माझ्या जीवास निरंतर दुःखाचा दंड होईल, असा मी विचार करीत होतों. इतक्यांत मला एकाएकीं असें वाटलें कीं मला प्रभु येशु दिसला, तो आकाशांतून मला बोलूं लागला कीं प्रभु येशु ख्रिस्तावर विश्वास ठेव ह्मणजे तूं तरला जाशील[१८१]"

मग म्यां उत्तर केलें कीं हे प्रभो मी पातकी आहें, मी फार मोठा पातकी आहें, याजवरून तो बोलिला कीं "माझी कृपा तुला पुरे"[१८२] मग म्यां पुसलें, हे प्रभो भाव धरणें ह्मणून काय आहे? तेव्हां "जो कोणी मजकडेस येतो त्यास भूक लागणार नाहीं, जो कोणी माझे ठायीं भाव धरितो त्यास तान्ह लागणार नाहीं"[१८३] या वचनावरून मला असें दिसून आलें कीं भाव धरणें आणि येणें हीं दोन्ही एकच आहेत. जो कोणी आला अर्थात् ख्रिस्ताने माझा उद्धार करावा असें अंतःकरण पूर्वक व प्रीतिपूर्वक इच्छूं लागला ह्मणजे त्याने

ख्रिस्ताच्याठायीं भाव धरिला असें ज्ञाणावें तेसम
यीं माझ्या डोळ्यांत अश्रु आले. मग मी आणखी
पुसलें अहो प्रभु बरें माझ्या सारिखा महान् पात-
की असला तथापि त्याचा तुह्मी अंगीकार करून
त्यास ताराल काय? तेव्हां म्या त्यास बोलतां ऐकि-
लें "जो कोणी मजकडेस येतो त्यास मी जा असें क
दापि ह्मणणार नाहीं"[१८४] मग म्या पुसलें कीं हे प्रभु म्या
तुजकडेस येऊन तुला कसें मानावें हें समजलें असतां
माझा भाव तुझाठायीं चांगल्यारीतीनें बसेल? तें ऐ
कून तो बोलिला त्वां असें मानावें कीं ख्रिस्त पाप्यांस
तारावयास या जगांत आला. जो कोणी त्याच्याठायीं
विश्वास धरितो त्यास तो नियमशास्त्रांत सांगितलें
पुण्यें प्राप्तकरूनदेतो: तो आमच्या पातकांकरितां
मरण पावला, व आह्मास निर्दोष करण्यास्तव उठ
ला: त्याने आह्मावर प्रीति केली, व आपल्या रक्ताने
आमचीं पातकें धुतलीं; तो आह्माकरितां ईश्वरापा
शीं मध्यस्थी करितो: तो आमची मध्यस्थी करण्या
विषयीं निरंतर राहिला आहे.[१८५] त्या भाषणावरून म

ला असा बोध झाला कीं पुण्य त्याच्या देहापासून प्राप्त होईल, आणि माझे पातका विषयीं त्याच्या रक्तानें प्रायश्चित्त घडेल असा भाव धरावा, तो आपल्या पित्याच्या नियमशास्त्राप्रमाणें आचरला आणि त्यांत जो दंड लिहिला होता तो त्याणें सोसिला, हें जें त्याणें कर्म केलें तें त्याणें आपल्या करितां केलें नाहीं, तर जो कोणी आपल्या उद्धारा करितां त्या कर्माची इच्छा करील व त्याच्या उपकार स्मरेल त्या साठीं त्याणें तें कर्म केलें. ते समयीं माझें अंतःकरणांत आनंद झाला अंतःकरण आनंदानें उचंबळूं लागलें व नेत्रांत अश्रु दाटले, आणि येशुख्रिस्ताचें नाव त्याचे लोक, व त्याचे मार्ग यांजविषयीं माझे ठायीं प्रीति उत्पन्न झाली.

ख्रि॰ — याजवरून तुमच्या जीवास ख्रिस्ताचें दर्शन झालें खरें: बरें येणें करून तुमच्या आत्म्यास काय संस्कार प्राप्त झाला तें मला विशेषें करून सांगावें?

आ॰ — माझ्या आत्म्यास जो संस्कार प्राप्त झा

ला तेणेंकरून मला असें दिसूं लागलें कीं जगा
चें जरी किती हि पुण्य असलें तथापि जग अपरा-
धी त्याचा नाश होणार आणि ईश्वर जो पिता न्या-
य्य असतां त्याजकडेस पातकी आला आणि त्यापा
तक्याला त्यानें निर्दोषी असा मोजला तरी त्या ईश्वरा
च्या नीतीस बाध येत नाहीं, ते समयीं मी माझें माग
लें अमंगळ आचरण मनांत आणून मोठा लज्जित
झालों. आणि मी माझें अज्ञान पाहून मला कांहीं सु
चेना असें झालें. कां तर आतां जसें ख्रिस्ताचें सौं
दर्य माझे दृष्टीस पडलें तसें पूर्वीं माझ्या दृष्टीस प
डलें नव्हतें, त्याजविषयीं माझ्या मनांत कल्पना
ही आली नव्हती. नंतर पवित्र आचरणाविषयीं
माझे ठायीं प्रीति उत्पन्न झाली. आणि प्रभु येशूचे
नावाच्या महात्म्याविषयीं गौरवाविषयीं कांहीं क
रावें असें मनांत वाटूं लागलें, आणि या देहांत ह
जारो मण जरी रक्त असलें तथापि त्या सर्वांचा प्र
भू येशूकरितां व्यय करावा असें मनांत येऊं लागलें
मग मी स्वप्नांत पाहिलें तों आशावान् मागें पा

हूं लागला इतक्यांत ज्या अज्ञानास त्याणें मागें टाकिलें होतें तो त्याचे दृष्टीस पडला तो मागाहून येत होता, ते समयीं आशावान् ख्रिस्तीस बोलतो तो तिकडे दूर मुलगा पाहिला काय ? पहा कसा आळस करीत आळसत मागाहून येत आहे.

ख्रि० — होय होय पाहिला; त्यास आपल्या संगतीचें काय प्रयोजन.

आ० — तो अद्यूनपर्यंत आपल्या संगतीस असता तर त्याचें कांहीं वाईट झालें नसतें ?

ख्रि० — वाईट झालें नसतें खरें परंतु त्याच्या मतें कांहीं दुसरेंच असेल.

आ० — होय कांहीं दुसरेंच असेल, पण असलें तर असेना आपण त्याजकरितां थांबूं. मग ते थांबले.

ते समयीं ख्रिस्ती त्यास पुसतो कायरे चालेस ना, असा मागें मागें कां ?

अज्ञान० — मला एकटें चालण्यांत जो आनंद होतो तसा मला आवडती सोबत नसली तर आनंद

होत नाहीं.

ख्रिस्ती हळूच आशाचानाच्या कानाशीं लागून बोलतो, मी तुह्मास सांगितलें नाहींकीं यासआपल्या संगतीचें प्रयोजन नाहीं. आशाचान् उत्तर देतो असो पण या एकांतस्थळीं दोन गोष्टी सांगून काळक्रमूं. ते समयीं ख्रिस्ती अज्ञानाकडेस पाहून बोलूं लागला काय हो तुमचें काय वर्तमान आहे. आतां तुमचें ईश्वराशीं कसें चाललें आहे.

अ० - चांगलें चाललें आहे. माझें मन नित्य चांगल्या चिंतनानें भरलें आहे, मी माझ्या मार्गें चालत असतां तें चिंतन करितों तेणेकरून मला समाधान होतें.

ख्रि० - बरें तें चिंतन कसें आहे तें मला कळूद्या.

अ० - परमेश्वराविषयीं व परलोकाविषयीं मी चिंतन करितों.

ख्रि० - तसें चिंतन भूतांच्या व नरकांत पडले ल्या माणसांच्याही मनांत येतें.

अज्ञा० - परंतु मी त्यां पदार्थांचें चिंतन करूं

न त्यांची इच्छा करितों आहे.

खि० — परलोकास ज्यांचें जाणें कधीं घडणार नाहीं तेही तुमच्या सारिखे इच्छा करितात. आळशाचा जीव इच्छा करितो परंतु त्यास प्राप्ति नाहीं.

अज्ञा० — परंतु मी त्यां पदार्थांचें चिंतन करून त्यांजविषयीं म्या सर्वांचा त्याग केला आहे.

खि० — त्याजविषयीं मला संशय आहे; कांतर सर्वांचा त्याग करणें ही मोठी कठिण गोष्ट आहे, ही गोष्ट किती कठिण आहे, याचा बहुतेकांस अनुभव आहे: तुह्मी सर्व ईश्वराकरितां व परलोकाकरितां सोडून दिलें असा तर तुह्मास कसा बोध झाला व तो कोणी बोध केला?

अ० — माझ्या अंतःकरणानें केला

खि० — ज्ञाता पुरुष काय ह्मणतो तें ऐकिलें काय? "जो आपल्या अंतःकरणाचा विश्वास धरितो तो मूर्ख"

अज्ञा० तें वाईट अंतःकरणाविषयीं बोलिलें आहे, माझें अंतःकरण तर चांगलें आहे.

खि० तुमचें अंतःकरण चांगलें आहे त्यास प्रमाण काय?

अज्ञा० — माझ्या अंतःकरणांत परलोकाविषयीं ची आशा आहे तेणेकरून मला समाधान होतें.

खि० — तें तुमचें अंतःकरण तुह्मास भ्रमवित असेल ह्मणून तें तसें तुह्माला वाटत असेल ज्याची आशा करण्याविषयीं काहीं चांगला आधार नसतांही त्याजविषयींउगीच आशा उत्पन्न होऊन समाधान पावावें असाही अंतःकरणाचा स्वभाव आहे.

अज्ञा० — परंतु माझें अंतःकरण व आचरणहीं परस्परांस अनुसरून आहेत, याजकरितां माझे आशेस चांगला आधार आहे.

खि० — तुमचें अंतःकरण व आचरण हीं परस्परांस अनुसरून आहेत असें तुह्मास कोणी सांगितलें.

अज्ञा० — माझ्या अंतःकरणानें सांगितलें.

खि० — माझी सोबत ज्यानें धरली आहे त्यास मी चोर किंवा साव असें कोण पुसेल. तुमच्या अंतःकरणानें सांगितलें काय? जर ईश्वराचे वाक्याचें येथें प्रमाण असलें तरच खरें, इतर प्रमाण उपयोगी नाहीं.

अज्ञा० – अहो पण ज्या अंतःकरणांत उत्तम कल्पना येतात तें उत्तम अंतःकरण नव्हे काय ? आणि जें आचरण ईश्वराचे आज्ञेस अनुसरून असतें तें उत्तम आचरण नव्हे काय ?

ख्रि० – होय ज्या अंतःकरणांत उत्तम कल्पना येतात तें उत्तम अंतःकरण आणि जें आचरण ईश्वराचे आज्ञेस अनुसरून असतें तें उत्तम आचरण. परंतु असें कल्पणें व यासारिखें असणें त्या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत.

अज्ञा० – बरें तर आपण उत्तम कल्पना, कशास बोलतां आणि ईश्वराचें आज्ञेप्रमाणें आचरण करणें तें कोणातें समजतां ?

ख्रि० – उत्तम कल्पना नानाप्रकारच्या आहेत. कित्येक आपल्याविषयीं आहेत, कित्येक ईश्वराविषयीं आहेत, कित्येक ख्रिस्ताविषयीं व कित्येक दुसऱ्या गोष्टीविषयीं आहेत.

अज्ञा० – आपल्याविषयीं उत्तम कल्पना त्या कोणत्या ?

ख्रि० — आपल्याविषयींच्या ज्या कल्पना ईश्वराच्या वाक्यास अनुसरून असतात त्या कल्पना त्या जाणाव्या.

अनु० — आपल्याविषयींच्या कल्पना ईश्वराच्या वाक्यास केव्हां अनुसरून असतात.

ख्रि० — ईश्वरवाक्यांत आपल्याविषयीं जो सिद्धांत केला आहे तसेंच आपण आपल्याविषयीं सिद्धांत करूं लागलों म्हणजे आपल्याविषयीं चांगल्या कल्पना येतात असें जाणावें. याचा मी स्पष्ट अर्थ सांगतों. ईश्वरवाक्यांत मनुष्याच्या स्वाभाविक अवस्थेविषयीं असें लिहिलें आहे कीं "कोणी पुण्यवान् राहिला नाहीं, कोणी चांगलें करीत नाहीं" [१८७] आणखी असें लिहिलें आहे. "मनुष्याचे अंतःकरणाच्या प्रत्येक कल्पना केवळ दुष्ट आहेत, व त्या निरंतर दुष्ट आहेत." [१८८] पुनः असें सांगितलें आहे: "मनुष्याच्या अंतःकरणाच्या कल्पना त्याच्या बाळपणापासून दुष्ट आहेत." असें आपल्यास आपणाविषयीं ज्ञान होऊन आपण चिंतन क-

रुं लागलों ह्मणजे त्या उत्तम कल्पना, का तर त्या ईश्वरवाक्यास अनुसरून असतात.

अ० — माझें अंतःकरण आपण सांगतां तसें वाईट आहे असा माझा कदापि विश्वास होणार नाहीं.

खि० — तर मग तुमच्या आवघ्या आयुष्यांत ही तुमच्या विषयीं चांगली कल्पना आली नाहीं असें जाणावें. आणखी सांगतों ऐका. ईश्वरवाक्यांत आपल्या अंतःकरणाविषयीं जसा सिद्धांत केला आहे. तसाच आपल्या मार्गाविषयीं केला आहे. आणि आपलें अंतःकरण व मार्ग यांविषयीं जो ईश्वरवाक्यांत सिद्धांत केला त्या सिद्धांतास अंतःकरण व मार्ग यांविषयींच्या कल्पना अनुसरून असल्या ह्मणजे त्या चांगल्या कल्पना असें जाणावें.

अ० — हें जरा स्पष्ट करून सांगावें

खि० — ईश्वरवाक्य असें आहे कीं मनुष्याचे मार्ग वांकडे आहेत; ते चांगले नाहींत ते विपरीत.

आहेत: मनुष्यस्वभावतः चांगल्या मार्गास सोडून आहेत, त्यांस चांगला मार्ग ठाऊक नाहीं. याप्रकारें मनुष्य आपल्या मार्गाविषयीं कल्पूं लागला, तो विचाराने आणि नम्र अंतःकरणानें असें चिंतूं लागला ह्मणजे त्यास आपल्या मार्गाविषयीं चांगल्या कल्पना आहेत, असें जाणावें. कांतर त्या कल्पना ईश्वरवाक्यांत सिध्दांत केला आहे त्यास अनुसरून असतात.

अज्ञा० – बरें ईश्वराविषयींच्या उत्तम कल्पना कोणत्या?

ख्रि० – आपल्या विषयीं जसें सांगितलें तसेंच ईश्वराविषयीं जें त्याच्या वाक्यांत सांगितलें आहे त्या वाक्याशीं आपल्या ईश्वराविषयींच्या कल्पना अनुसरून असल्या ह्मणजे त्या चांगल्या कल्पना असें जाणावें. तेरसमयीं त्याच्या वाक्यापासून जसा बोध झाला असतो तसेंच त्याजविषयीं व त्याच्या गुणाविषयीं मनांत येऊं लागतें; या विषयावर आत्तां विस्तरेंकरून बोलावयाचा समय नाहीं, ईश्वर व मनुष्य यांचा जो संबंध आहे तो

सांगतों. ईश्वराविषयीं चांगल्या कल्पना मनांत आल्या ह्मणजे आपल्यास असें वाटतें कीं जसें ईश्वर आपल्यास जाणतो, तसें आपण आपल्यास जाणत नाहीं, आणि आपल्यास आपलें पाप जराही दिसत नसतां त्यास तें दिसतें आपल्या कितीही शुद्ध कल्पना असल्या तथापि त्यास त्या कळतात. आणि आपलें अंतःकरण व त्यांतील सर्व गुह्येंहीं पहावयास त्याच्या दृष्टीस काहींएक प्रतिबंध नाहीं, व आपलें कितीही पुण्य असलें तथापि तें त्यास दुर्गंधवत् वाटतें, याजकरितां आपलीं कशींही उत्तम कर्में असलीं तथापि तो आह्मास त्या दुर्गंधारूपानें आपल्या पुढें उभें राहूं देत नाहीं.

अज्ञा० – तुमच्या मतें मी असें मानितों कीं ईश्वरास मजपेक्षां अधिक कळत नाहीं आणि केवळ उत्तम कर्मांच्या योगानें माझें ईश्वराकडेस जाणें घडेल, असें मी मानीन तर काय मी अगदीं मूर्ख आहें?

ख्रि० – बरें तर तूं कसें मानितोस ?

अज्ञा० – मी असें मानितों कीं ख्रिस्ताच्या ठायीं विश्वास धरल्याविना मी निर्दोषी होणार नाहीं.

ख्रि० – परंतु तुला ख्रिस्ताचें अगत्य आहे असें तुला वाटत नाहीं मग त्याच्याठायीं विश्वास धरायाची गोष्ट कशास करितोस ! मी मुळींहून दुर्बळ व सांप्रत दुर्बळच आहें असें तुला कळत नाहीं, मी उत्तम आहें, मी जें करितों तें उत्तम आहे असें तुझ्या मनांत वागतें याजवरून असें सिध्द होतें कीं ईश्वराकडेस निर्दोष होण्याविषयीं तुला ख्रिस्ताचें पुण्य अवश्य पाहिजे असें तुला वाटत नाहीं. असें असतां माझा ख्रिस्ताच्या ठायीं विश्वास आहे असें कशावरून बोलतोस.

अज्ञा० – आपण हीं दुषणें देतां तथापि माझा विश्वास चांगला आहे.

ख्रि० – तो कसा विश्वास आहे मला ऐकीव

वरें ?

अज्ञा० – मला असा विश्वास आहे कीं ख्रिस्त पातक्यांकरितां मरण पावला. आणि मी ईश्वराचे नियम शास्त्राप्रमाणें चाललों तें पाहून ईश्वर मजवर रुपा करून मला शापापासून मुक्त करील: अथवा माझीं जीं सत्कर्में तीं ईश्वरास मान्य होत असें ख्रिस्त आपल्या पुण्यानें करील तेणेंकरून मी निर्दोष होईन.

ख्रि० – हा जो तूं आपला विश्वास सांगितला-स याचें उत्तर ऐक.-

१ तुझा हा छांदिष्ट विश्वास आहे: कांतर असा विश्वास ईश्वरवाक्यांत कोठे सांगितला नाहीं-.

२ तुझा विश्वास खोटा, त्यापासून अपसिद्धांत होतो, कांतर ख्रिस्ताच्या पुण्यानें तुझें पुण्य शोभवून तूं निर्दोष होऊं पाहतोस.

३. तुझ्या विश्वासावरून असें सिद्ध होतें कीं ख्रिस्त तुलाच निर्दोष करीत नाहीं तुझीं कर्में निर्दोष करून ठरवितो याप्रमाणें तीं कर्में निर्दोष

झाली असतां त्यां कर्मांच्यायोगानें तूं निर्दोष होतोस असें मानणें हा अपसिद्धांत होय.

